UNIVERSAL
LIBRARY
OU_192734
UNIVERSAL
LIBRARY

OUP—831—5-8-74—15,000.

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M83 P56g Accession No. M1252

Author फडके, ना. सी.

Title ...

This book should be returned on or before the date last marked below.

# गुप्त प्रायश्चित्त

जर्मन लेखिका व्हिकी बाउम हिच्या

“ Secret Sentence ”

या कादंबरीचा अनुवाद

ना. सी. फडके

भास्कर ग्रंथ माला, कोल्हापूर.

मुद्रकः—
मा. भी. सोलापुरे एम्. ए.
जयहिंद प्रिंटिंग प्रेस,
सुभाष रोड, लक्ष्मीपुरी—कोल्हापूर.

प्रकाशकः—
बा. रा. टेंबे
भास्कर ग्रंथ माला
कोल्हापूर.

प्रथमावृत्ति १९४१
द्वितीयावृत्ति १९४८

या भाषांतराच्या पुढील आवृत्तींचे हक्क
प्रो. ना. सी. फडके, एम्. ए., यांचेकडे आहेत.

किंमत ५ रु.

# भाषांतरासंबधीं थोडा खुलासा

" Secret Sentence " या कादंबरीचें हें भाषांतर तयार करतांना तें शक्य तितकं शब्दशः व्हावं अशी खबरदारी घेतली आहे परंतु प्रत्येक भाषेची एक स्वतंत्र मोडणी असते व भाषांतरकाराला अनेक वेळा तिचा अडथळा होतो. अशा वेळीं शब्दापेक्षां अभिप्रायाकडेच अधिक लक्ष दिल्यानं भाषांतर सुरस उतरतं. जर्मन माणसांचीं व स्थलांचीं नांवं वगळलीं तर कादंबरी भाषांतरित नसून मुळांतच मराठींत लिहिली गेली आहे असं वाचकाला वाटावं हें धोरण या भाषांतरात मीं सतत ठेवलं आहे.

मूळ इंग्रजी कादंबरींत (म्हणजे जर्मन कादंबरीच्या इंग्रजी अनुवादात) कांहीं भाग अनावश्यक वाटले. ते गाळले तर कथानकाची यत्किंचित्‌हि हानि न होता पाल्हाळाचा दोष मात्र कमी होईल व पुस्तकाची चित्तवेधकता वाढेल असं मला वाटलं. या विचारानं इंग्रजी पुस्तकातील आठवं, नववं पंधरावं व सतरावं अशी पांच प्रकरणं संबंधच्या संबंध मीं गाळून टाकलीं आहेत. त्याचप्रमाणें पृष्ठें ३२ ते ३५, ५०--५१, ७२-७३, ९५ ते १०० १०५ ते १०८, १३८, व २०७ गाळलीं आहेत. माझं हें भाषांतर Secret Sentence या पुस्तकाशीं ताडून पाहाण्याची ज्याना इच्छा होईल त्यांच्यासाठीं हा खुलासा करणं मला इष्ट वाटतं.

१९१४ सालच्यां महायुद्धानंतर जर्मनीच्या राजकारणांत जीं आंदोलनं झालीं त्यांच्या पार्श्वभूमीवर उभारलेली ही कादंबरी आहे. या कादंबरीच

मूळ जर्मन नाव " Feme " असं आहे. तिचं इंग्रजी भाषांतर ' एरिक् सटन ' यांनी केलेलं आहे. कादंबरीचा प्रचारात्मक उद्देश उघड आहे. परंतु ही एक हृद्य प्रेमकथाच आहे; व पुस्तक संपल्यावर जर्मनीच्या राजकारणा ऐवजीं नायकाच्या अंतःकरणातल्या प्रीतीच्या विविध अवस्थाच वाचकाच्या लक्षांत राहतील. म्हणूनच हिचं कथानक जरी जर्मनीत घडलेलं असलं तरी हिचं सौंदर्य मराठी वाचकांनाही आकर्षक वाटल्यावांचून राहणार नाहीं ! अक्षर वाङ्मयाची ही एक कसोटी आहे. हवी टीकाकारांना ती कधीं बदलतां येणार नाहीं '

कोल्हापूर,
१९४१.

ना. सी. फडके

# प्रो. फडके यांच्या कादंबऱ्या


१ अल्ला हो अकबर
२ कुलाब्याची दांडी
३ जादूगार
४ दौलत
५ अटकेपार
६ निरंजन
७ कलंकशोभा
८ आशा
९ उद्धार
१० काश्मिरी गुलाब
११ प्रवासी
१२ समरभूमि
१३ उन्माद
१४ गुप्त प्रायश्चित्त
१५ इंद्रधनुष्य
१६ प्रतिज्ञा
१७ वादळ
१८ शाकुंतल
१९ अखेरचं बंड
२० बस् नंबर बारा
२१ जीवन--संगीत
२२ माझा धर्म
२३ झंझावात
२४ अंजलि


## गोष्टी


१ प्रो. फडके यांच्या गोष्टी भाग १ ला
२ ,, ,, ,, ,, भाग २ रा
३ लीला आणि इतर गोष्टी
४ नमुनेदार गोष्टी
६ वत्सला आणि इतर गोष्टी
७ चंद्रा आणि इतर गोष्टी
८ लाडकी लक्ष्मी आणि इतर गोष्टी
९ माझा देश आणि इतर गोष्टी
१० जिवाचं मैतर आणि इतर गोष्टी


## नाट्यवाङ्मय


१ काळे--गोरे
२ युगांतर
३ संजीवन
४ तोतया नाटककार
५ जडावाची देवी ( नाटिका )
६ आगलावी ,,
७ क्षमेसाठीं अपराध ,,

## प्रबंध

१ मानसोपचार
२ मानसोन्नति
३ सुखाचे संसार
४ संतति--नियमन
५ आजचे तरुण स्त्रीपुरुष व त्याजपुढील प्रश्न
६ प्रतिभासाधन
७ वाङ्मयविहार
८ आधुनिक गीता
९ मानसमंदिर
१० साहित्य व संसार
११ आकाशवाणी
१२ वेंचलेले मोती
१३ टाकीचे घाव
१४ टांकाच्या फेकी
१५ माझ्या साहित्यसेवेंतील स्मृती भाग १ ला
१६ शेलापागोटें
१७ कोंदणें

## ललित निबंध व पत्रें

१ गुजगोष्टी
२ नव्या गुजगोष्टी
३ धूम्रवलयें
४ अबोलीच्या गोष्टी

## चरित्रें

१ दादाभाई नौरोजी
२ टेरेन्स मॅक्स्विनी
३ डी व्हॅलेरा
४ तीन थोर देशभक्त

## व्याख्यानें

१ गाजलेलीं भाषणें
२ मित्रहो !
३ मंथन

## इंग्रजी

1 Sex Problem in India
2 Psychology
3 Elementc of Ethics
4 Manual of Logic
5 Birth Control
6 History of Philosophy
7 Leaves in the August Wind (Novel)

# भाग पहिला

# खुनी

# १

तो आपल्या खोलीच्या खिडकीजवळ गेला, अन् त्यानं वाकून खालीं रस्त्यात पाहिलं. मनातल्या मनांत त्यानं कुणाची तरी प्रतीक्षा केली असावी ती त्याच्या दृष्टींत दिसली, व तिच्यामुळें त्याच्या ओठाचीहि क्षणभर हालचाल झाली.

बाहेर रस्त्यांत जवळ जवळ शुकशुकाटच होता. साऱ्या शहरावर धुरळयाचा मळकट पडदा पसरल्यासारखा दिसत होता; रस्त्याच्या या टोका-पासून त्या टोकापर्यंत घराला घर लागून ऊभं होतं; रस्त्याच्या दिव्यांचे खांब खडे होते ते शिरच्छेद झाल्यानंतरही सरळ ताठ उभ्या राहिलेल्या शिपायांसारखे भासत होते. मधेंच हातांत भाजीचं टोपलं घेतलेली एक बाई रस्त्यानं रेंगाळत गेली एका हातान थोटा असलेला टपालवाला दारावरून गेला. त्यानं पत्राबित्र कांहीं टाकलं नाहीं. पलीकडे पोरांचा घोळका खेळत होता. त्यांतलं एक पोर भोकांड वासून रडूं लागलं. एक मोटार कोपऱ्याचं वळण घेऊन आली अन् पों पीं करून शिंग वाजवून पुढें गेली. एका घराच्या गॅलरींतल्या कुंडींत 'जिरेनिअम'चीं फुलं— त्या फुलांचा मोसम वास्तविक आतां सपत आला होता तरी— फुललेलीं दिसलीं! पण यापलीकडे रस्त्यांत कांहीं नव्हतं!

त्या तरुण माणसानं दृष्टि परत फिरविली अन् एक निःश्वास टाकला. त्याच्या मनांत आलं, कांहीं घडत नाहीं, कां ऽ ऽ हीं नाहीं! जिवाचा कोंडमारा करणारी जी तीव्र निराशा त्याच्या ठिकाणीं आज कित्येक महिने साचत आली होती, ती या विचारांत जणूं व्यक्त झाली. त्यानं आपल्या खोलींत इकडे तिकडे पाहिलं तेव्हा त्याला वाटलं, तिथल्या वस्तू–वस्तूवर गतिशून्यतेचा उदासपणा पसरला आहे. जुनाट टेबलावर कायद्याचीं पुस्तकं पडलीं होतीं, त्यावर धुळीचा लहानसा थर साचला होता. जुन्या थाटाच्या सोनेरी चौकटीच्या आरशातून जमिनीवर कवडसा पडला होता तो किती अंधुक! पलंगावरचं अंथरूण किती दिवसांत न झटकलेलं. भिंतीवर त्याच्या वडिलांचे व आजोबाचे लष्करी वेषातले फोटो होते, ते विटून गेलेले. सेंट बार्थोलोम्यूच्या कत्तलीच्या चित्रावरचाही रंग उडालेला. खणाखणाच्या उंच कपाटावर त्याच्या वडिलांच्या टोपीची पेटी होती तिच्यावहि किती धुरळा साचलेला!

ज्योआकिम बुर्थनं आपले हात खिशांत खुपसले, अन् अंथरुणावर पडून त्यानं पांघरून लपेटून घेतलं. त्याला वाटलं, आपण आतां गारठून जाणार. शेगडींत विस्तव नव्हता; टेबलावरच्या दौतीतली शाई सरली होती; अन् पाण्याची सुरईसुद्धां रिकामी होती. !

अन् या तापत्रयांत भर घालायाला म्हणूनच कीं काय, पलीकडच्या खोलींतल्या बिऱ्हाडकरूंनीं फोनोग्राफवर लष्करी गाण्याच्या तबकड्या लावून सारखी कटकट चालविली होती!

उसकटलेल्या अंथरुणांत ज्योआकिम पडून राहिला. त्यानं आपले दोन्ही पंजे गुंतवून डोक्याखालीं घेतले, अन् पाय दुमडून गुडघे उभे केले. जवळच्या टेबलावर सिगारेटची डबी पडली होती ती त्यानं हात लांबवून घेतली, अन् तिचा चाप दाबून उघडली. पण तिच्यांत सिगरेट होती कुठें? त्याचा हात गळून बिछान्यावर पडला तो त्यानं सावरला नाहीं, अन् त्यानं एक दीर्घ श्वास घेतला. किती गारठलेली, धुरकटलेली, कडवटलेली होती खोलींतली हवा!

सूर्यप्रकाश जवळ जवळ नाहींसा होत आला होता. भिंतीवरच्या कलंडल्या जुन्या आरशाचा कवडसा भुईवरून सरपटत गेला, अन् अखेर शेगडीच्या जागेच्या कोपऱ्यांत जाऊन दिसेनासा झाला. खोलींतल्या वस्तूंच्या रूपरेषा अस्पष्ट झाल्या, अन् वाढत्या अंधारांत त्या मोठ्या अन् जड भासूं लागल्या. शेजारच्या बिऱ्हाडां-तला फोनोग्राफ जरा वेळ थांबला अन् पुन्हा सुरू झाला. समोर भिंतीवर 'सैनिकांचें प्रयाण' नांवाचं चित्र होतं, त्याकडे ज्योआकिमनं शून्य दृष्टीनं टक लावून पाहिलं तों त्याच्या लहानपणीं होत असे तसा त्या चित्रांतलीं माणसं चौकटींतून निघून खाली उतरताहेत असा भास त्याला होऊं लागला. दोघे स्नेही एकमेकांना आलिंगन देत होते. एकजण दाराशीं थांबून मागं वळून पाहत होता. दुसरा एक टेबलाजवळ बसला होता त्यानं आपल्या हातांवर मस्तक टेकलं होतं. या क्षणी अंधारांत त्या आकृती त्याला धड दिसत नव्हत्या, पण लहानपणापासून पाहून पाहून तें चित्र ज्योआकिमला इतकं पाठ झालं होतं, कीं चित्रांतला तो प्रसंग त्याच्या कल्पनाचक्षूंपुढें सहज उभा राहिला.

मधेंच तो दचकला. आनंदाची लकेर त्याच्या अंतःकरणांत स्फुरली. कुणी तरी शीळ घातलीसं त्याला वाटलं. हीच शीळ ऐकूं यावी म्हणून तो तासन् तास वाट पाहत बसला होता. 'ऑस्केनिअस!' त्याच्या मनांत आलं, अन् तें येतांच खोलींत एकदम प्रकाश व उल्हास भरल्यासारखं त्याला वाटलं. त्यानं पलंगावरून उडी मारली अन् तो धावत खिडकीपाशीं गेला. पण खालीं रस्त्यात मघांचाच देखावा होता. त्यात बदल येवढाच झाला होता कीं नोव्हेंबर महिन्यांतलं ठरीव धुकं हवेंत दाटलं होतं, अन् दूर अंतरावर एकच एक कंदील आतां लागला होता त्याचा अंधुक प्रकाश रस्त्यावर पडला होता. ग्रेगॉर फॉन ऑस्केनिअस दिसेल असं ज्योआकिमला वाटलं होतं, पण त्याचा मागमूसही नव्हता!

ज्योआकिमनं पुन्हा अंथरुणांत अंग टाकलं, अन् आपल्या प्रिय मित्राबद्दल तो विचार करूं लागला. खोलींत अंधार असूनही ग्रेगॉरची मूर्ति त्यानं

आपल्या डोळयांपुढें उभी केली. तें शूर मर्दाला शोभेसं कपाळ, उन्हानं तांबूस झालेला तो चेहरा, औदार्य व साहस दर्शविणाऱ्या त्या भ्रुकुटी, द्वंद्वयुद्धांत झालेल्या जखमेचा तो तोंडावरचा व्रण, ती चालण्याची ऐट, त्या त्याच्या हालचाली, तो त्याचा स्वर, अन् ते त्याचे शद्ब ! जणुं ते शब्द अगदीं स्वच्छ स्वच्छ आपल्या कानीं पडत आहेत असं ज्योआकिमला वाटलं, अन् त्यामुळें त्याच्या चित्ताची प्रसन्नता वाढली. त्याला मग वाटलं, कांहीं घडणार नाहीं असं काय म्हणून ? कांहीं तरी घडणार–नव्हे घडलंच पाहिजे. दिवस कांहीं असेच जायचे नाहींत. त्याच्या दृष्टीपुढें शस्त्रं, निशाणं, अश्वारूढ सैनिकाच्या आकृती आल्या, अन् त्या सर्वांची एकच तेजस्वी भडकलेली हालचाल झाली. सैनिकांच्या रांगांमागून रांगा निघाल्या होत्या, अन् त्यांच्या अग्रभागीं उंच उंच ध्वज दिमाखानं, आनंदानं नाचत होते ! सभासभांतून त्यानं ऐकलेल्या त्वेषयुक्त वाक्याचे ध्वनी उठून त्या दृश्याची साथ करूं लागले. आताशा ज्योआकिमनं देशभक्तीनं भरलेलीं भाषणं वारंवार ऐकलीं होतीं, अन् त्यांतली किती तरी वाक्यं त्याच्या कानांत अजून घुमत होतीं. पितृभू ! देशाची इज्जत अन् शरम ! स्वातंत्र्य अन् गुलामगिरी ! भेकडाची निष्क्रियता, अन् मर्दांचीं शूर कृत्यं !—असले शद्ब त्याच्या कानीं सतत पडले होते. शूर कृत्यं ! होय, शूरकृत्यं...तरुण ज्योआकिम मनाशीं म्हणाला. पलीकडच्या खोलींतल्या फोनोग्राफची कटकट चालूंच होती. दूर कुठें तरी लागलेली दृष्टि त्यानं परतविली. पायांतल्या बुटांकडे त्याचं लक्ष गेलं. ओबडधोबड अन् राठ कातड्याचे होते ते. पुरुषाला शोभणार नाहींत असे नव्हते. पण लष्करी अधिकाऱ्याच्या मुलाला कांहीं ते शोभण्यासारखे नव्हते; पण दुसरे त्याच्याजवळ नव्हतेच ! तो प्रयत्नानं उठला. त्यानं बूट पायांतून काढून टाकले, अंथरूण सरळ केलं अन् पुन्हा अंग टाकलं; पण आता त्याच्या दृष्टीस त्याचे पाय पडले ते त्याला बुटाइकेच वाईट वाटले. काळ्या, फाटक्या मोज्यांनीं अर्धवट झाकलेलीं तीं पावलं ! भोकांतून बाहेर आलेले अन् जणूं त्याच्याच नजरेला दीनवाणी नजर भिडविणारे ते अंगठे ! ते दिसताचं तरुण ज्योअकिमचं अंतः-

करण एकदम निराशेनं भरून आलं. तो एकदम वळून पालथा झाला, अन् त्यानं आपलं तोंड उशीत घट्ट घट्ट खुपसलं. "स्! नको नकोसं वाटतं सारं!" असं तो स्वतःशींच मोठ्यांदा म्हणाला, अन् त्या उद्गारांनीं हृदय हलकं झाल्यासारखं त्याला वाटलं.

मग घटकाभर तो अंथरुणावर अगदी निश्चल पडून राहिला. त्याचे विचार चालूच राहिले. काय काय धाडसी आणि उदात्त कल्पना त्याच्या डोक्यात येऊन गेल्या! खरं म्हणजे त्याला झोप लागून स्वप्नं पडत होतीं.

त्यानं न काढता तशीच ठेवलेली कॉलर गळ्याभोंवतीं कशीबशी राहिली होती. त्याचं मस्तक कानशिलाच्या वरच्या बाजूस अरुंद असल्यासारखं वाटे हनुवटी दुबळी दिसे. आणि एकंदर चेहऱ्यावर पोरसवदेपणाची झाक नजरेस पडे. बुर्थ घराण्यांतल्या मंडळींनीं पिढ्यान्‌पिढ्या पसंत केलं होतं तसलंच चपटं पातळ नाक त्याच्या वांट्याला आलं होतं; अन् त्याच्या देखणेपणांत न्यून उत्पन्न करणारी एक विचित्र बारीकशी गोल पुळी जन्मतःच त्याच्या डाव्या भुवईवर उगवलेली होती...

त्याची बहीण खोलींत आली अन् तिनं बटण दाबून दिवा लावला तेव्हां तो जागा झाला. ज्या हर्षानं अन् उल्हासानं उंच हवेंत तरंगल्यासारखं त्याला झोपेंत वाटलं होतं तो सारा त्याला जागृति येतांक्षणींच नष्ट झाला. उलट कसलीशी प्रतीक्षा व भीति त्याच्या नजरेत चमकली व लगेच गेली. "हात्तिच्या! तूंच का? मला वाटलं..." असं तो उद्गारला तेव्हां त्याच्या शब्दांत निराशेचा स्वर होता.

"होय, मीच बरं." शार्लोटेनं उत्तर दिलं. तिनं सिगरेटची डबी उचलली अन् उघडली. "पुन्हा रिकामीच!" असं म्हणतांना तिनं जणूं निर्भर्त्सना केली, अन् त्या वेळीं तिच्या डोळ्यांची नजर नेहमींपेक्षाही अधिक करारी अन् पक्ष्यासारखी सावध व शोधक दिसली. तिचे अवयव बुर्थ कुटुं-

बांतल्या सांच्याचेच होते, पण तिचे केस तांबूस होते, अन् नासिकेच्या रेषेवर बारीक बारीक टिपके होते. भावापेक्षां तिच्या हनुवटीच्या ठेवणींत करार व सामर्थ्य अधिक व्यक्त होत होतं. पण तिच्या हातांकडे पाहतांच या मुलीनं फार कष्ट अन् दुःख सोसलं आहे असं कुणालाहि वाटावं असे ते होते. तिचं नांव शार्लोटे. बुर्थ कुटुंबांत हें नांव फार रूढ होतं, अन् तिला तें शोभे. ज्योआकिम तिच्या त्या हाताकडे कांहीं वेळ टक लावून पहात राहिला, अन् मग अव्यवस्थित पोषाकांत आपण एका तरुण स्त्रीच्या सान्निध्यांत आहोंत हें एकदम मनांत आल्यामुळें तो किंचित् त्रासिक स्वरात म्हणाला, " माफ कर हं. मी असा उघडा... पण मी तरी काय करूं? असा दमून गेलों होतों. कीं..."

शार्लोटेनं समयज्ञतेनं तोंड वळवलं, अन् " सैनिकाचें प्रयाण " निरखून पाहण्यास आरंभ केला. ज्योआकिमनं कपडे व्यवस्थित केले अन् बूटही चढविले.

" आतांशा शिकवण्या बिकवण्या बंदच आहेत वाटतं तुझ्या?" तिनं एकदम विचारलं. तिचा स्वर विलक्षण खोल व गंभीर होता, पण शब्दोच्चारांत असं कांहीं मार्दव होतं कीं त्यामुळें तिच्या बोलण्यांतली तीव्रता कमी व्हावी. आवाजाच्या या असामान्य देणगीमुळें गायनकलेंत ती नांव कमावील असं तिच्या घरांतल्या माणसांना वाटलं होतं, अन् ' जेलेना माइकोना ' नांवाच्या प्रसिद्ध रशियन गायिकेकडे ती कांहीं दिवस शिकायला गेली होती.

आपल्या टपोऱ्या गोल डोळ्यांची नजर लावून तिनं भावाला पुन्हा विचारलं, " शिकवण्या बंदच आहेत वाटतं आतांशा?"

" बंदच तर काय?"

" मग पैसे कुठले आणतोस?"

ज्योआकिमनं खांदे उडविले. " पैसे? हंः! आहेत कुणा लेकाजवळ पैसे? जरूरीपुरते मिळतात कसेबसे झाल!"

"अन् कॉलेजांतलीं व्याख्यानंही बुडवितोस मला वाटतं."

"हो तर काय..."

शार्लोटे एकदम ताठ होऊन कपड्यांच्या कपाटाला टेकून उभी राहिली. "हीं कसलीं लक्षणं आहेत सांगू का महाराज! वाहवत चालला आहांत आपण! आपली अशी दैना झाली आहे याचं कारण आपला धरबंद सुटला आहे. तुझं तुला कळत नसेल, पण हें बघ ..." असं ती बोलत गेली तेव्हां सहानुभूतीचा, दुःखाचा श्रान्त भाव तिच्या नजरेंत दिसूं लागला. परंतु तो लगेच गेला अन् मग तिची चर्या नेहमींप्रमाणें गंभीर अन् करारी दिसली.

ज्योआकिमहि पलंगाजवळ ताठ उभा होता. अगदीं एखाद्या खड्या शिपायासारखा ताठ! तो म्हणाला, "छट! मी वाहवत चाललों नाहीं! बिलकुल नाहीं. किंबहुना माझं चित्त इतकं ठिकाणावर पूर्वी कधींच नव्हतं. बारीकसारीक गोष्टींकडे माझं दुर्लक्ष होत असेल; पण त्याचं कारण हें, कीं फार मोठ्या अन् महत्त्वाच्या गोष्टींत माझं चित्त गुंतलेलं आहे. मी कुठल्या उद्योगांत आहे तें माझं मला स्पष्ट कळलं आहे..."

त्याचं बोलणं संपलं तरी शार्लोटे कांहीं बोलली नाहीं; पण तिनं अशी कांही स्थिर व भावपूर्ण नजर त्याच्याकडे लावली होती, कीं ती चुकवून दुसरीकडे पाहणं त्याला शक्यच नव्हतं. क्षणभर दोघेंहि मनांतल्या मनांत अस्वस्थ झालीं. मग तिनंच जेव्हां दृष्टि वळविली व किंचित् हास्य केलं तेव्हां ज्योआकिम खिडकीपाशीं गेला, अन् वाकून आतां निर्मनुष्य व अंधःकारमय झालेल्या रस्त्याकडे पाहूं लागला.

मागून शार्लोटेनं विचारलं, "आस्केनिअसची वाट पाहतो आहेस वाटतं?"

"हं."

"पुन्हा जाणार आहेस कीं काय त्याच्याबरोबर?—तिकडे?"

" कदाचित्. "

" त्यांत धोका नाहीं ? "

" तें बोलणं काढूं नकोस. "

" बरं राहिलं. पण माझ्या मनांत आल्यावांचून राहत नाहीं. आस्केनिअस म्हटलं कीं कांहीं तरी धोका असला पाहिजे असं मला वाटतं. तूं अन् आस्केनिअस मिळून कसले बेत करताहांत तें सांग कीं मला ! सैंपाकघरांत रांधतां रांधतां मनाला उद्योग तरी मिळेल आम्हांला त्याबद्दल विचार करण्याचा. एका गोष्टीबद्दल माझी खात्री झाली आहे, सांगूं का तुला ? आम्हा बायकांच्या वांट्याला आलेलीं कामं सैतानानं निर्माण केलीं असलीं पाहिजेत. तेव्हां पुरुषांचं ठीक आहे. नवे बेत करावे, उद्योग करावे, आशा धरावी. आम्हीं बायकांनीं मात्र सदा तिष्ठत बसायचं, वाट पाह्यची..."

" आम्हां पुरुषांनासुद्धा वाट पाहत बसावं लागतं किती तरी वेळां. तिष्ठत बसायची ही विद्या मोठी कठीण आहे, पण ती शिकावी लागते आम्हांला. खोटं नाहीं..." ज्योआकिम एकीकडे बोलत होता, पण दुसरीकडे त्याचे कान रस्त्याकडे लागले होते.

शार्लोटे त्याच्याजवळ आली, व हलक्या आवाजांत तिनं विचारलं, "दिवस बरे येतील असं तुला खरंच वाटतं ?...नंतर...? "

" कशाच्या नंतर ? "

" तुमचे जे बेत चालले आहेत ते सिद्धीस गेल्यानंतर ? " असं विचारतांना तिनं आपले नेत्र त्याच्यावर रोखले अन् माझ्यापासून उगीच लपवूं नकोस, मला सारं माहीत आहे अशा अर्थाचा भाव तिनं आपल्या दृष्टींत आणला.

"अर्थात् माझी खात्री आहे. गोष्टी कांहीं अशाच चालायच्या नाहींत सदा. कांहीं तरी घडलंच पाहिजे..."

" घडो म्हणजे झालं ! " असं आपल्या खोल गंभीर आवाजांत म्हणून

शार्लोटेनं दिवा मालविला अन् दार उघडून ती म्हणाली, "पण चल आतां. जेवण तयार आहे."

बोळांत अंधार होता. त्या दोघांना चांचपडत जपूनच जावं लागलं. वाटेंत बंदुका ठेवायचा जुना घोडा होता, सायकली भिंतीला टेकून ठेवलेल्या होत्या, बिऱ्हाडकरूंचं दार होतं त्यांतून फोनोग्राफवरचं गीत ऐकूं येत होतं, लगतच मूळचं स्नानगृह पण आतां सैंपाकघर बनविलेली खोली होती तिच्यां-तून प्रकाशाचा स्रोत बाहेर आला होता. इथें कांद्याचा दर्प सुटला होता, अन् ज्योआकिमनं आपल्या सैंपाकघरांत पाऊल ठेवलं तों तिथेंही तो दरवळ-लेला त्याला आढळला. हात धुवायसाठीं तो आंतल्या मोरींत गेला. शार्लोटेही त्याच्या मागोमाग गेली. त्यांची आई तव्यावर कायसं तळीत होती, अन् त्याचाच दर्प जिकडे तिकडे सुटला होता. कृश बांध्याची अशक्त बाई होती ती, अन् तिचे केस वार्धक्यानं करडे झाले होते. चुलीवर वाकून तव्यावरचा जिन्नस परततांना तिची चर्या गंभीरच नव्हे तर दमल्यासारखीसुद्धां दिसत होती. शार्लोटे हात धुऊन आली, अन् तव्याचा दांडा व चमचा आईच्या हातून घेऊन तिनं तव्यावरचा जिन्नस बशींत काढला, बशी एका ट्रेवर ठेवली, अन् तो ट्रे उचलून पलीकडच्या जेवणाच्या खोलींत नेला. तिची आई हसण्याचं खोटं अवसान आणून पाहत राहिली तेव्हां ती म्हणाली, "बाई-साहेब आतां वाढप करताहेत!"

आतां चांगलीच थंडी जाणवूं लागली होती, पण जेवणाच्या खोलींत विस्तव नव्हता. मात्र शेगडी विझलेली अन् थंड होती तरी जणूं तिच्यांत विस्तव असल्याप्रमाणें अगदीं तिच्या कठड्याजवळ खुर्ची ओढून घेऊन ज्योआकिमचा बाप वर्तमानपत्र वाचीत बसला होता. पुष्कळच वयाचा गृहस्थ होता तो. कदाचित् म्हाताराहि वाटण्याइतका. एखाद्या लष्करी अधिकाऱ्याला अवेळींच पेन्शन घ्यावं लागलं, कीं त्याच्या चेहऱ्यावर वयापेक्षां रोषाच्या रेषा उठतात तशा त्याच्या चेहऱ्यावर दिसत होत्या. तों आपण

होऊनच नोकरींतून निवृत्त झाला होता. महायुद्धानंतरच्या नव्या जमान्याशी आपलं पटणं कठीण आहे असं त्याला दिसून आलं होतं, आणि आतां सेवानिवृत्त झाल्यावर घरीं बसून वर्तमानपत्रं वाचावीं, त्यांतल्या बातम्या वाचून मनाशीं चरफडावं, खोकल्याची उबळ, संधिवाताची वेदना, आणि निरुद्योगामुळें उद्भवलेली मानसिक असंतुष्टता कशीबशी सहन करावी, हेंच त्याचं रोजचं जीवन होऊन बसलं होतं. आपले केसही आपण धड साफसूफ करीत नाहीं याची त्याला खंत वाटे. निजायच्या वेळीं घालायच्या सपाताच तो दिवसभर वापरी, अन् त्याच्या कोटावर दहा ठिकाणीं डाग पडलेले असत. परंतु या गोष्टींवर इलाज नव्हता. आपलं उतारवय झालं, आपल्या आयुष्याची इतिश्री झपाट्यानं जवळ येत आहे हें त्याला माहीत होतं.

ज्योआकिमच्या आईची मात्र अशी गोष्ट नव्हती. संसारांतल्या रोजच्या जबाबदाऱ्या पार पडतांना हूं कीं चूं करायचं नाहीं म्हणून तिला तोंड घट्ट मिटून ठेवावं लागे, त्यामुळें तिच्या जिव्हणीच्या दोन्ही बाजूंस उभ्या रेषा उमटल्या होत्या. पण तिनं आपले हात वज्रीनं घासून अन् लिंबरसानं धुऊन सुबक ठेवले होते. पांढरेसफेत अन् नाजूक हात होते ते. त्यांवर निळसर शिरा अन् बोटांच्या नखांच्या बाकदार कडा मोठ्या शोभून दिसत. घरकामामुळें त्या नखांची रेखीव शोभा कायम राहत नसे येवढंच ! ती आपले केस कपाळावरून सरळ मागें ओढून माळीत असे, अन् त्यावर जाळं घालीत असे. कधीं कधीं वासाची पूडही टाकीत असे. तिच्या पोलक्याची कॉलर उंच असे, अन् तिचीं टोकं उंची खड्यांच्या आंकड्यानं ती गुंतवीत असे. या सगळ्या शिस्तींत व्यंग उत्पन्न करणारी एकच गोष्ट ती ही, कीं सैंपाकांतल्या कांद्यांचा उग्र वास तिच्या साऱ्या कपड्यांतून उधळत असे. आणि आतांशा एका सूक्ष्म पण सतत कंपाची व्यथा तिला जडली होती. तिचे ओठ, तिची मान, स्वर, कधीं कधीं गुडघे देखील कांपत राहत, अन् तीं झोपेंत असली म्हणजेच काय तो हा कंप बंद होई. ज्योअकिमची

आई म्हणजे खरंच एक मोठा नाजूक जीव होता— खानदानींत वाढलेला, पण आतां अंतर्बाह्य टेकीस आलेला!

ज्या खोलींत मंडळी जेवायला बसणार होती तिथल्या सामानाच्या मांडणींत अभिरूचि दिसत नव्हती. देशांत दिवसच उरले नव्हते आतां अभिजात रुचीचे! शिवाय घरांत एक बिऱ्हाडकरू ठेवल्यामुळें दोन खोल्यांतलं सामान या एका खोलींत ठेवणं बुर्थ मंडळींना भाग पडलं होतं. जमिनीचं पॉलिश काळया रंगाचं तर जेवणाच्या खुर्च्यांचा रंग पिंगट, असा गंगाजमनी थाट झाला होता! छताला झुंबर होतं त्याच्या गॅसच्या दिव्यांचा प्रकाश अंधुक वाटत होता. गॅसच्या कारखान्यांतल्या मजुरांचा पगारवाढीबद्दल झगडा चालला होता त्यामुळें गॅसचा पुरवठा घटला होता. जेवायच्या टेबलावर साधं मेणकापड घालण्याची पाळी आली होती या कुटुंबावर. बाकीचा बशा–चमच्यांचा अन् चांदीच्या भांड्यांचा थाट मात्र मध्यमवर्गीय कुटुंबांत असावा तसा होता. तोंडपुसणी ठेवायच्या कळकट कड्यांवर "सोनं दिलं अन् लोखंड घेतलं" अशीं अक्षरं कोरलेलीं होतीं. टॉवेल पातळ, झिजलेले, ठिगळलेले होते. किंबहुना, त्या टेबलावरच्या अन् त्या घरांतल्या साऱ्याच वस्तू झिजलेल्या, ठिगळलेल्या, मोडकळीस आलेल्या होत्या...

ज्योआकिमच्या बापानं वर्तमानपत्राची घडी केली, अन् अवघडत पावलं टाकून तो जेवणाच्या टेबलाजवळ येऊन बसला. मग सगळ्यांनीं बशींतला पदार्थ घ्यायला प्रारंभ केला.

"ओहो!" ज्योआकिमचा बाप म्हणाला. पण तेवढंच!

"आतां या सारणाचीं किती पाकिटं उरलीं आहेत?" शार्लोटेनं आईकडे पाहून विचारलं. पण ती कांहीं न बोलतां नुसती हसली.

ज्योआकिम कांहींसं बोलणार होता, पण या एकंदर दुर्दशेबद्दलच्या तिरस्कारानं अन् संतापानं त्याचा घसा इतका दाटून आला, कीं त्याच्या तोंडून शब्दच उमटला नाहीं.

या पाकिटांची हकीगत म्हणजे एक छोटीशी शोककथाच होती. एका कारखानदारानं 'स्पेशल लिव्हरचं तयार सारण' म्हणून हीं पाकिटं काढलीं. पाकिटांच्या वेष्टनांवर सारणांत कोणकोणते पदार्थ होते त्याबद्दलचा मजकूर होता तो असा, कीं तो वाचतांच तोंडाला पाणीच सुटावं! अन् तो सोनेरी अक्षरांत छापलेला! जिकडे तिकडे या पाकिटांच्या जाहिरातींचा सुळसुळाट झाला होता. दुकानदाराकडून सवलतीची किंमत ठरवून शभर पाकिटं खरेदी करतांना आपण एक अजब सौदा थोडक्यांत केला अशा आनंदांत ज्योआकिमच्या आईचीं बोटं कधीं नव्हे इतकीं कापत राहिलीं होतीं. पाकिटांतलं सारण दिसायला कससंच दिसे. पण चवीला वाईट नव्हतं, पोट भरायला ठीक होतं, अन् शिवाय स्वस्त. बुर्थ कुटुंबाचं तें एक आवडीचं पक्वान्न झालं.

पण थोड्याच दिवसांत त्या सारणाबद्दल भलभलत्याच गोष्टी उघडकीस येऊं लागल्या वर्तमानपत्रांतून. तें तयार करण्याच्या पद्धतीबद्दल सरकारी चौकशी झाली, अन् कारखानदाराला शिक्षा ठोठावण्यांत आली. तें सारण म्हणजे निवळ ठकबाजी होती याबद्दल शंका उरली नाहीं. पण शंभरापैकीं पन्नास पाकीटं अजून उरलीं होतीं. तीं सवलतीनं मिळालीं असलीं तरी पैसे पडलेच होते ना त्यांना. तीं फेंकून कशीं द्यायचीं? इतकी कांहीं वाया चालली नव्हती श्रीमंती? म्हणून ज्योआकिमची आई त्या पाकिटांतलं सारण आठवड्यांतून तीन दिवस मंडळींना खायला घालीच. त्यांत कोणकोणत्या प्राण्यांचं मांस होतं देव जाणे. पण त्याला थोडी तरी चव यावी म्हणून ती कांदा, दालचिनी अशा परोपरीच्या मसाल्यानीं तें सजवी आणि तें पुढें आलं कीं, सारीं जणं कसंबसं घशाखालीं घालीत. त्याबद्दल कुणी कांहीं बोलायचं नाहीं असं आतां ठरून गेलं होतं.

घास घ्यायसाठीं पावाचा तुकडा तयार करीत ज्योआकिमचा बाप म्हणाला, "हीं वर्तमानपत्रं वाचलीं कीं वाटतं परमेश्वरानं कुठें दडी दिली आहे कुणास ठाउक, अन् हें जग खरोखरीच चाललं आहे तरी कुठें? जगाची कांहीं धड-

गत दिसत नाहीं. या गृहस्थाच्या हातांत सत्ता आल्यापासून साऱ्या अधिकाराच्या जागा त्यानं आपल्या स्नेह्यां-सोबत्यांना देऊन टाकल्या आहेत, अन् सगळयांनी मिळून चैन चालविली आहे. नफेबाजी, लाचलुचपती अन् वशिलेबाजी असल्या प्रकारांचा बुजबुजाट माजला आहे नुसता. देवा देवा, काय दुर्भाग्य ओढवलं आहे आमच्या करंट्या देशाचं—"

ज्योआकिमच्या नजरेंत उत्सुकतेची चलबिचल झाली. त्यानं विचारलं, "म्हणजे लाइप्झिग शहरीं काल त्यानं खरंच भाषण केलं ?"

"शंका आहे कीं काय ? अन् भाई लोकांनीं लाचारपणानं टाळयासुद्धां दिल्या असतील त्याच्या भाषणाला. तो आपलं हें नवं बिल पास करून घेणार बघ. त्यामुळें कोण कसं धुळीस मिळेल त्याचा काय त्याला हिशेब ? गोड गोड बोलून आपला कार्यभाग नेहमीं साधीत असतो तो..."

"किती दिवस चालेल असं ?" ज्योआकिम एकदम त्वेषानं उद्गारला.

"आं ?..."

"नाहीं, म्हटलं हें किती दिवस चालेल ? समाजाचा विध्वंस करणारी ही सत्ता लोक किती दिवस सहन करतील ? असंतोषाचीं चिन्हं दिसूं लागलीं आहेत. प्रधानसाहेब शाहाणे असतील तर त्याकडे दुर्लक्ष करणार नाहींत. असला कारभार काय नेहमींच चालेल म्हणतां ? लोकांच्या सहनशक्तीला कांहीं तरी मर्यादा आहे, अन् ही मर्यादा आतां जवळ जवळ संपत आली आहे. न्याय म्हणून कांहीं तरी चीज आहे ही गोष्ट लोक कांहीं अजून अजीबात विसरले नाहींत. मी सांगतों पहा, या प्रधानाची उचलबांगडी होणार हें नक्की. ती झाली कीं सारी परिस्थिति बदलेल."

आपल्या ढपोऱ्या डोळयांची उत्सुक, शोधक नजर लावून शार्लोटे भावाचं बोलणं ऐकत होती, अन् शेवटचे उद्गार काढतांना त्याच्या पोरसवद्या चेहऱ्यावर जेव्हां आवेशाचा प्रकाश चढला तेव्हां ती हसली. ती मनांतल्या मनांत

म्हणाली, बंधुराज आपण ही पोपटपंची करताहांत, हे शद्ब तुमचे नाहींत, दुसऱ्या कुणाचे तरी आहेत.

"उचलबांगडी?" म्हातारबुवांनीं विचारलं, "मागच्या निवडणुकींत ऐंशी टक्के मतं त्याला मिळालीं, विसरलास वाटतं? त्याची उचलबांगडी कशी होणार समजत नाहीं मला!"

"दिसेल, दिसेल, बाबा. बेत होऊन राहिले आहेत सगळे, अन् सारी जय्यत तयारी झालेली आहे. पिस्तुल रोखणारा एक कृतनिश्चयी माणूस निघाला तरी तो या प्रधानाची उचलबांगडी करील. या प्रधानानं आमच्या सगळ्याच्या जीवितांत विष कालवलं. त्याच्या अन्नांत विष घालणं शक्य नाहीं! याची गाडी उलथून पाडणं शक्य नाहीं? घर उडवून देणं शक्य नाहीं?..."

त्याचा आवेश वाढत गेला तेव्हां त्याच्या फुललेल्या, मोहरलेल्या चेहऱ्याकडे सारीजणं विस्मयानं पाहत राहिलीं. त्याच्या आईनं नेहमींच्या सवयीपेक्षांहि अधिक जोरानं आपले ओठ दाबून घट्ट धरले. त्याच्या बापानं आपल्या पुढची बशी रागानं दूर सारली अन् म्हटलं,

"शक्य! शक्य काय वाटेल तें आहेच कीं! एखाद्या तरुणानं गुप्त पोलिसाच्या गोष्टी वाचाव्या अन् मूर्खासारखं बडबडत सुटावं हें सुद्धां शक्य आहे? मी सांगतों तुला, कायद्याच्या अभ्यासांत नीट लक्ष घाल. भलत्या भानगडींत वेळ वायां घालवूं नकोस."

एखाद्या लष्करी अधिकाऱ्याचा हुकूम ऐकून शिपायानं उत्तर द्यावं तशा थाटांत ज्योआकिम म्हणाला, "जशी आज्ञा."

त्याच्या बापानं एक निःश्वास टाकला, अन् त्यामुळें त्याला ठसकल्यासारखी ढास आली.

शार्लोटेनं विचारलं, "खिडकी उघडूं का?" अन् उठून ती उघडून तिनं टेबलावरच्या बशा, काटे-चमचे उचलायला प्रारंभ केला. म्हातारबुवा उठून हलकेच शेगडीजवळ गेले अन् त्यांनीं वर्तमानपत्र पुन्हा हातीं घेतलं. ज्योआकिमनं टेबलावर कोपरं टेकलीं अन् डोक्याला पंजाचा आधार दिला. अवज्ञेच्या तिडिकेनं त्याचे डोळे लाल दिसत होते. स्वयंपाकघरांतली आवराआवर करून शार्लोटे परत आली अन् उघड्या खिडकीजवळ उभी राहिली. तिच्या आईनं शिवणकाम टेबलावर मांडलं अन् कापऱ्या हातांनीं ती टाके घालूं लागली. शेजारच्या खोलींतून फोनोग्राफचं गाणं ऐकूं येत होतं.

शिवतां शिवतां शार्लोटेची आई म्हणाली, "खरंच, एक गोष्ट सांगणार होतें ती राहिलीच. मघाशीं जिन्यांत शेजारची 'श्लीप्के-' बाई भेटली अन् आपल्या भावाची हकीगत मला सांगूं लागली. 'पाशूल्के!' माहीत आहे ना त्याचं नांव? त्याचा म्हणे एका मुलीशीं संबंध होता, अन् ती गर्भार राहिली तेव्हां तिच्याशीं लग्न करणं भाग पडलं त्याला. अन् आतां कुटुंबाचा निर्वाह करण्याइतका पैसा मिळत नाहीं त्याला. मीं म्हटलं, "श्लीप्केबाई, माझा भाऊ मोठा नांवलौकिकाचा प्रोफेसर आहे, पण त्याला तर तुझ्या भावाइतकेहि पैसे मिळत नाहींत." यावर ती म्हणते काय, "तो नुसता प्रोफेसर आहे तेव्हां तें ठीकच आहे, पण माझा भाऊ कामगार आहे ना!"

म्हातारबुवा जागेवरून म्हणाले, "पाहिलं, लोकांच्या कल्पना कशा व्हायला लागल्या आहेत आतांशा."

शार्लोटेनं खिडकींतून विचारलं, "कसलं काम करतो तिचा भाऊ?"

"मिस्त्री आहे वाटतं."

तितक्यांत शार्लोटे दचकल्यासारखं करून खिडकीपासून दूर झाली. खालीं रस्त्यांत शीळ वाजली. स्पष्ट, झटकेबाज, लष्करी इशाऱ्यासारखी होती ती शीळ.

" ज्योआकिम..." शार्लोटे भावाला म्हणाली. तिच्या घशांत आवंढा आला.

ज्योआकिम उठला, अन् कवाइतींत उभं राहावं तसं उभं राहून बापाला उद्देशून म्हणाला, " माफ करा, मला गेलं पाहिजे. काम आहे."

तो घाईनं गेला तेव्हां त्यानं जातांना लोटलेल्या दाराकडे त्याची आई कष्टी व खेदयुक्त अंतःकरणानं पाहत राहिली. शार्लोटे खिडकीजवळ गेली, अन् रस्त्यांतली पावलांची चाहूल ऐकूं येईनाशी होईपर्यंत ती वाकून अंधारांत पहात उभी राहिली. तिनं खिडकी लावून घेतली तेव्हां तिचा चेहरा फिकट दिसत होता.

# २

ज्योआकिम धाडधाड जिन्याच्या पायऱ्या उतरून गेला, अन् दरवाजांतून धावत बाहेर घुसला. दिव्याच्या खांबाला टेकून ग्रेगॉर फॉन आस्केनिअस उभा होता.

"आलास?" असं विचारतांना आपल्या आवाजांतला अत्यानंदाचा कंप उघड होऊं नये म्हणून ज्योआकिमनं सहज विचारल्याचा अभिनय केला.

"होय, आलों. कांहीं बातमी?" आस्केनिअस म्हणाला.

"कांहीं नाहीं."

"आतां आठ वाजतां गुप्त बैठक आहे काय?"

"हूं."

आपल्या मनगटावरच्या घड्याळाकडे पाहून आस्केनिअस म्हणाला, "रगड अवकाश आहे."

ते दोघेजण चालूं लागले. रस्त्यांत धुकं दाटलं होतं. आस्केनिअस ज्योआकिमपेक्षां किती तरी अधिक मजबूत बांध्याचा अन् त्याच्याहून चांगला वीतभर उंच होता.

ज्योआकिमनं मान वर करून पाहिलं नाहीं म्हणून आस्केनिअस पुन्हा म्हणाला, " मी परत आलों हं! अन् येवढ्यांत काय तें समज."

" मला अगदीं कांहीं सुचेनासं झालं आहे आतांशा. स्वस्थ हात जोडून बसायला लागलं कीं माथं फिरतं माणसाचं!"

आस्केनिअसनं आर्जवी हास्य करून म्हटलं, " वा! असा संताप करून घेणं बरं नाहीं."

ज्योआकिम जरासा घोटाळला पण मग म्हणाला, " मला फार आशा होती मनांतल्या मनांत, कीं लाइप्झिग शहरीं कांहीं तरी घडेल एकदाचं."

" मलाहि वाटलं होतं."

" मग?"

" मग काय वेड्या! नाहीं साधलं, दुसरं काय?"

" तूं गेला होतास स्वतः लाइप्झिगला?"

" बच्चा लोकांना सगळंच सांगायचं नसतं."

" बरं, राहिलं." असं म्हणून ज्योआकिम स्तब्ध झाला.

रस्त्यानं चालतां चालतां आस्कोनियस शीळ घालून एक लष्करी गीत वाजवूं लागला. पराभवाच्या व निराशेच्या गोष्टी त्यानं तोंडानं सांगितल्या तरी त्यांचा त्याच्या वृतीवर परिणाम झालेला दिसला नाहीं. ज्योआकिमनं मान तिरपी करून त्याच्याकडे दृष्टि टाकली, व तत्क्षणीं उल्हासाची अन् आनंदाची लाट आपल्या सबंध शरीरभर खेळलीसं त्याला वाटलं. आस्केनिअसच्या सहवासाचा हा परिणाम त्याच्या अनुभवाला नेहमींच येई. मात्र आपली ही सुखसंवेदना आस्केनिअसला कळतां कामा नये अशी तो दक्षता घेई. ती नुसती कल्पना मनांत आली तरी त्याला विलक्षण शरम वाटे.

बोलण्यापूर्वी घसा नीट साफ करून ज्योआकिमनं विचारलं, " तूं आपलं घड्याळ उजव्या मनगटावर कां घातलं आहेस आज?"

आस्केनिअस क्षणभर शीळ घालीत राहिला, अन् मग तार सप्तकांतल्या स्वरावर ती संपवून त्यानं ज्योआकिमची टोपी उचलून त्याचं डोकं निरखून पाहिल्यासारखं केलं, अन् थट्टेच्या आवाजांत म्हटलं,

" हां हां ! दिसते त्यापेक्षां फार चलाख आहे तर आपली स्वारी ! "

" जखम झालीय् तुला ? " ज्योआकिमनं विचारलं, अन् त्याचा हात धरण्यासाठीं हात पुढें केला.

" झाली असेल ! "

" पिस्तुल झाडलं कुणी ? "

" जखम कांहीं मोठी नाहीं. जरासा ओरखाडा ... " असं म्हणून त्यानं इतका वेळ जाकिटाच्या खिशांत ठेवलेला डावा हात वर केला, व दाखवून परत खिशांत घातला. हातावर पट्टया बांधलेल्या दिसल्या. तो जरी जखम सामान्य आहे अशा आविर्भावानं बोलत होता तरी ज्योआकिमनं त्याच्या तोंडाच्या हालचाली पाहून ओळखलं कीं तो आविर्भाव खोटा होता. दुःखाची मातबरी ठेवल्यावर मग तो आस्केनिअस कोठला ?

आस्केनिअस म्हणाला, " प्रवासांतल्या थंडीनं पावलं तुटून गेलीं आहेत, छऱ्याचे तुकडे इथें कुठें तरी कुशींत घुसले आहेत, अन् रताळं भाजावं तशी तोंडाची अवस्था झाली आहे. सौंदर्याचा गर्व वहायची सोय उरली नाहीं मला आतां ! "

इतकं म्हणून तो हंसला.

" तर-तर ! कांहीं माणसांना तूं वेड लावलं आहेस, माहीत आहे मला ! " असं म्हणतांना खांद्याला खांदा लावून बरोबर चालणाऱ्या आपल्या त्या मित्राबद्दलच्या प्रीतीनं ज्योआकिमचं हृदय अगदीं भडभडून आलं. आस्केनिअस पुन्हा शीळ घालूं लागला. आतां ते ज्या रस्त्यानं चालले होते तिथें अधिक रहदारी होती, पण धुक्यामुळें अन् दिव्यांचा प्रकाश मिणमिणीत असल्यामुळें

तो उदासच भासत होता. आणि त्याच्या अंगाला वारा झोंबत होता त्यांत धुरळ्याचा खकाणा होता.

आस्केनिअस मधेच स्वतःच्या पूर्वचरित्रांतली एक हकीगत सांगू लागला. अशा गोष्टी सांगण्याची त्याला पुष्कळदां लहर येत असे. तो म्हणाला,

" बल्गेरिआमधें होतों ना त्या वेळची गोष्ट. एकदां मी बल्गेरिआंत होतों माहीत आहे कीं नाहीं तुला ? हं. तर काय झालं, लढाईच्या अखेरीला आमच्या पलटणीची झाली तिकडे रवानगी. धड बंदुकादेखील नव्हत्या आमच्याजवळ. तिथें गेलों तर उन्हाळा म्हणजे कोण ! नुसती भट्टी ! अन् पाण्याचा थेंब नाहीं. ज्यांनीं असे हाल सोसले असतील त्यांनाच कल्पना येईल आमच्या दुर्दशेची. तिघं हपीसर होते आमच्याबरोबर ते मेले. तिकडे तहावर सह्या झाल्या, पण त्याची आम्हांला खबर नव्हती अन् आम्ही लढतच होतों. आमची कुणाला आठवणही राहिली नव्हती. कुणाला सांगितलं तर खरंसुद्धां वाटायचं नाहीं. शेवटीं एक दिवस बिनतारी संदेशानं आम्हांला हुकूम आला स्वदेशीं निघून या म्हणून. त्या वेळीं मी सपाटून आजारी होतों. ताप का हगवण देव जाणे. पण मी जों गाडींत पडलों होतों तों निपचीत; भोंवतालीं काय चाललं होतं त्याची मला शुद्धही नव्हती. सगळेच शिपाई आजारी झाले होते. कित्येक वाटेंत मेले. कसे बसे रखडत आलों. येतांना आमच्या मनांत एकच विचार कीं घरीं परत चाललों आहोंत आपण. जर्मनीला, आपल्या मायभूमीला पोंचणार आपण. म्यूनिकच्या स्टेशनवर गाडी आली, अन् मी खालीं उतरलों तों एक गृहस्थ जवळ आला अन् माझ्या पोषाकाचे पट्टे ओढून काढूं लागला—"

इतकं बोलून आस्केनिअसनं जशी गोष्ट एकदम सुरू केली होती तशी ती एकदम बंद केली, अन् पुन्हा शीळ घालायला प्रारंभ केला. ज्योआकिमनं जोरानं मुठी वळल्या. खरं म्हणजे त्यानं तसं करावं म्हणूनच आस्केनिअसनं ती गोष्ट सांगितली होती.

ज्योआकिमनं विचारलं, "अन् काल तुझ्या हातावर जखम कोणी केली?" मनांत उसळलेल्या संतापानं त्याचा आवाज घोगरा झाला होता.

"कुणी कसली, माझी मीच करून घेतली. प्रधानाच्या गाडींत मी होतों. जवळ बॉंब होता. पण संधि मिळेना. उलट मीच पकडला जाण्याचं लक्षण दिसूं लागलं. मग धावत्या गाडींतून उडी टाकण्याशिवाय गत्यंतर उरलं नाहीं. प्रधानाची स्पेशल ती! किती वेगानं चालली असेल तूंच कल्पना कर. पण ठोकली उडी. मुतारीच्या खोलींत बॉंब ठेवून दिला माझी आठवण म्हणून.

"अन् हें सांगतांना तूं हसतो आहेस?"

"अर्थात्. हसूं नको तर काय करूं? हात हलवीत परत यायची माझी ही तिसरी खेप. हें मनांत आलं कीं वेड लागायची पाळी येते. पण चिडण्यांत अन् संतापण्यांत अर्थ नाहीं. मी तुला एक सांगतों बघ. कधीं विसरूं नकोस माझे शब्द. ज्याला आपल्या प्राणांची पर्वा नाहीं असा एक कृत-निश्चयी मनुष्य निघाला तर तो इकडचं जग तिकडे केल्यावांचून राहणार नाहीं."

ज्योआकिम एकदम आवाज चढवून म्हणाला, "मग आपल्या हातून कां नाहीं होत हें? आपल्या कार्यसिद्धीसाठीं जिवाचं बलिदान करणारा एकही मनुष्य नाहीं आपल्यांत? तसं म्हटलं तर जिवाची मातबरी ती काय? ध्येया-पुढें प्राणाची पर्वा कसली! आपल्या डोळ्यांपुढें ध्येय नसतं तर दुःखभोगानं गुदमरून मेलों असतों आपण केव्हांच! मला नवल वाटतं तें हेंच, कीं आपण इतकेजण आहोंत, वाटेल तें करायला सिद्ध आहोंत, अन् तरी कांहीं घडत नाहीं! दिशा चुकलेल्या गलबतासारखी देशाची अवस्था झाली आहे. घटकेघटकेला दुर्दशा वाढते आहे. गेला दिवस परत येणार नाहीं हें दिसतं आहे. या येवढ्या एका माणसाला दूर केला कीं साऱ्या गोष्टी ठीक होतील हेंही स्पष्ट कळतं आहे. अन् तरी दिवसामागून दिवस, आठ-वड्यामागून आठवडे तसेच लोटताहेत—कांऽऽहीं होत नाहीं! आज

काय अमक्या कारणानं बेत फसला, अन् उद्यां तमक्या कारणानं. आपले बेत असे फसताहेत अन् त्यांची सत्ता वाढते आहे. रोज धरपकडी चालल्या आहेत. अन् आतां तूं जखमी झालास. तुला काम साधेना, मग साधणार कुणाला ? "

तो एकदम थांबला. दुसऱ्यांच्या तोंडून ऐकलेल्या अन् त्याच्या स्वतःच्या मनाला झोंबलेल्या गोष्टींचं मिळून तयार झालेलं मिश्रण त्याच्या तोंडून आवेगानं बाहेर पडत होतं तें एकदम बंद झालं. तो क्षणभर स्तब्ध राहिला. मग त्याची नजर एकदम प्रज्वलित झाली व त्यानं पुन्हा आवेशानं विचारलं, " कुणाला साधणार ? सांग की ! "

आस्केनिअस थंड स्वरांत म्हणाला, " असल्या वैतागाच्या अन् निराशेच्या भाषेचं कांहीं एक कारण नाहीं. प्रधानाचा प्राण घ्यायची आपण प्रतिज्ञा केली आहे. अन् तीन महिन्यांत ती पुरी करायची आपण शपथ घेतली आहे. आपला बेत चार वेळां फसला हें खरं आहे. पण म्हणून काय झालं ? आपली प्रतिज्ञा पुरी झाल्याशिवाय राहील ? "

या प्रश्नापुढे गप्प होणं ज्योआकिमला भागच होतं. जरा वेळानं आस्केनिअसनं खिशांतून सिगारेटची डबी काढली, एक स्वतः घेऊन एक ज्योआकिमला दिली, अन् दुसऱ्या हाताकडे अधिक्षेपाची नजर टाकीत दोन्ही सिगारेट शिलगवायला त्याला सांगितलं. ज्योआकिमला सिगारेट केव्हां ओढायला मिळेलसं झालेलं होतं. त्यानं अगदीं हपापून झुरका मारला व धूर सोडीत तो म्हणाला, " मनांतल्या या तळमळीनं माझी प्रकृति खराब व्हायला लागली आहे. "

आस्केनिअस म्हणाला, " युद्धावर गेला असतास तूं म्हणजे बरं झालं असतं. महायुद्ध म्हणजे काय संकट होतं तें तुम्हां पोरांना कळलंच नाहीं म्हणून तुमची अशी अवस्था होते आहे. तें सुरू झालं तेव्हां तुम्ही बच्चे होता. तुम्हांला मिसुर फुटूं लागली तेव्हां तुमची भरती झाली अन् तुमची

कवाईत झाली. तुमच्यापैकीं कांहीं थोडे आघाडीच्या जवळपास गेले. मग देश बुडाला, अन् आतां तुमच्या तारुण्याला अन् उमेदीला वाव कुठें उरला नाहीं असं तुम्हांला झालंय. पण या वळवळीचा काय उपयोग बाबा! लढाईवर गेला असतास म्हणजे धीरानं कसं घ्यावं अन् बेत हुकला तर हुकला कसं म्हणावं हें तुला समजलं असतं. आतां आपलं कार्य रेंगाळत आहे म्हणशील तर सांगतों. त्याचं कारण असं, तुम्हां पोरांना अजून समज नाहीं. तुम्हाला वाटतं क्रांति म्हणजे लहान पोरं लपाछपी खेळतात त्यांतलाच एक प्रकार आहे. तुम्हांला गप्प बसायचं माहीत नाहीं, तोंडाला कुलूप लावायचं तुम्हाला ठाऊक नाहीं. शपथ घ्यायच्या वेळेस मोठे गंभीर चेहरे करतां हें कबूल. तरवारीच्या धारेवर हात ठेवतांना गंमत वाटते तुम्हांला. पण नंतर, तुमची अक्कल राहात नाहीं जागेवर, अन् अशी बडबड सुरूं होते तुमची कीं ती ऐकून एखाद्या पोरीनंही तुमचे गुप्त बेत ओळखावे. आजपर्यंत जेव्हां जेव्हां आपण कारस्थान ठरविलं त्या त्या वेळीं तें कसं तरी, कुठून तरी फुटलेलं आहे; अन् उद्यां आपल्या मंडळाचा नायक किंवा मी पकडला गेलों तर त्याचा दोष कुणाकडे जाईल? तुमच्याकडे. तुम्हां कोंवळ्या पोरांना शिस्त कशी ती ठाऊक कुठें आहे?"

"ठीक ठीक, समजलों साहेब!" ज्योआकिम म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर हट्टाचा व दुराग्रहाचा भाव दिसूं लागला. कुणी त्याला फैलावर घेतलं कीं त्याची चर्या नेहमीच अशी बदले. त्याच्या डोक्यांत ज्या विचारांचं थैमान चाललं होतं त्यांपैकीं एकही त्याला आवरतां येईना, अन् मग सुसंबद्ध कसं बोलावं याचा विचार खुशाल टाकून तो बोलूं लागला.

तो म्हणाला, "तुझं म्हणणं सामान्यतः बरोबर असेल. पण असं आहे ना, कीं जसा आमचा काळ तसे आम्ही बनलों. आमच्या आधीच्या पिढीनं यथेच्छ खातां खातां अन् दारू ढोसतां ढोसतां आपल्या अंतःशक्तीचं

वाटोळं केलं. त्यांपैकीं आम्ही नाहीं. तूं कांहींही म्हणालास तरी येवढी गोष्ट तुला कबूल करणं भाग आहे. तेव्हां तुझं म्हणणं सामान्यतः खरं असलं तरी आपलं कार्य कां सिद्धीस जात नाहीं या प्रश्नाचं तें उत्तर नाहीं. मुख्य प्रधानाला वाटेवेगळा करण्याच्या कामीं आपल्याला पुनः पुन्हा अपयश कां येतं त्याचीं कारणं माझ्या मतें निराळींच आहेत. आपले व्यूह फार गुंतागुंतीचे असतात हें एक; योगायोगावर अन् हजार माणसांच्या हालचालींवर आपण फाजील भिस्त ठेवतों हे दुसरं; अन् सगळयांत अधिक वाईट असं, कीं जीव बचावून काय करतां येईल असां तुम्ही हिशोब करतां. माझं असं ठाम मत आहे, कीं आपल्याला करायचं तें कृत्य एकट्या व्यक्तीवर सोपविलं पाहिजे. त्याला बेत, मदत कांहीं असतां कामा नये. अन् सुटकेची तरतूद बिलकुल करून ठेवतां कामा नये. जो सरळ प्रधानापुढें जाऊन उभा राहील, त्याला गोळी घालील, अन् मग स्वतःवर पिस्तुल उडवून घेईल असा एक करारी इसम आपल्याला खरं म्हणशील तर हवा आहे अर्थात् हा इसम अगदीं क्षुद्र, अगदीं अज्ञात असला पाहिजे. म्हणजे त्याचा कोणाला वहीम यायचा नाहीं कीं आपल्या मंडळींशीं त्याचा संबंध असेल असं कुणाच्या मनांत यायचं नाहीं. मला विचारशील तर माझं हें मत आहे.''

क्षणभर आस्केनिअसनं कांहींच उत्तर केलं नाहीं. त्या स्तब्धतेंत ज्योआकिमला स्वतःच्या मस्तकांत उसळत्या रक्ताचे चाललेले घाव ऐकूं आले.

मग आस्केनिअस म्हणाला, "हं, असं तुझं मत आहे म्हणतोस! पण हा जो तुझा करारी इसम, तो प्रधानापुढे जाऊन उभा राहणार कसा! प्रधानाभोंवतीं सतत सज्ज पहारा असतो."

"तें कांहीं मोठं कठीण आहे असं नाहीं मला वाटत. एखाद्या समारंभाला वृत्तपत्राचा प्रतिनिधि म्हणून प्रवेश मिळवितां येईल त्याला, अन् मग प्रधानाचं भाषण चालू असतांना त्याला अगदीं जवळ राहतां येईल. किंवा प्रधानाच्या घरांतल्या टेलिफोनच्या तारा तोडतां येतील, अन् मग दुरुस्तीसाठीं म्हणून

कामगाराच्या वेषांत त्याला घरांत प्रवेश करून घेतां· येईल. मला तर ही कल्पना नामी वाटते."

कांहीं वेळ त्यांचं संभाषण बंद पडलं. शीळ घालून लष्करी थाटाचे सूर काढायला आस्केनिअसनं पुन्हा प्रारंभ केला. ज्योआकिम आपल्याच कल्पनेवर विचार करीत राहिला. मग कांहींशा चेष्टेच्या स्वरात आस्केनिअसनं विचारलं,

"वाईट नाहीं; पण तुझ्या डोक्यांत येतात तरी कशा रे या कल्पना?"

"मी त्या आवरतों कशा याचं तुला अधिक आश्चर्य वाटलं पाहिजे. कारण त्या सतत माझ्या डोक्यात असतात. झोपेंत, जागेपणीं, हरघडीं. अभ्यासाचं पुस्तक उघडावं तों त्याच्या पानापानावर त्या उभ्या राहतात. खिडकींतून बाहेर पाहावं तों समोरच्या भिंतीवर त्या लख्ख लिहिलेल्या दिसतात. डोळे गच्च मिटून घेतले तरी त्या दृष्टीपुढून हालत नाहींत..."

आस्केनिअस पुन्हा बराच वेळ स्तब्ध राहिला व मग हलकेंच म्हणाला, "तूं म्हणतोस तसा इसम आपल्याला मिळेल असं तुला वाटतं? क्षुद्र, अज्ञात, कृत्य केल्याबरोबर स्वतःला गोळी घालण्याइतका कृतनिश्चयी मनुष्य मिळेल? तुला असं वाटतं?"

ज्योआकिमनं एक दीर्घ श्वास घेतला, अन् मग मान वर करून आस्केनिअस-कडे निश्चल दृष्टीनं पाहत तो हलक्या आवाजांत म्हणाला, "होय. मला असं वाटतं."

आस्केनिअसनं क्षणभर त्याच्या नजरेला नजर दिली व मग तो हसूं लागला. संभाषणांतलं गांभीर्य कमी करण्याचा त्याचा हेतु दिसला. तो म्हणाला, "बेटा, तुला शिस्त शिकायला पाहिजे. तूं आपला खुशाल स्वतःच्या जबाबदारीवर बेत करीत सुटला आहेस! पण यांत मोठा धोका आहे. अशीं माणसं उपयोगी नाहींत. त्यांच्याकडून कार्याचा विघात होतो. उतावळेपणा

करून चालायचं नाहीं येवढं कसं नाहीं तुला समजत ? काय वाटेल तें होवो मंडळाची आज्ञा पाळीन अशी तूं शपथ घेतली आहेस ! "

" होय, घेतली आहे ! "

इतका वेळ ते दोघे ज्योआकिमच्या घरापुढच्या रस्त्यांतच येरझारा घालीत होते. आस्केनिअस एका कंदिलाखालीं उभा राहिला अन् त्यानं आपल्या मनगटावरचं घड्याळ पाहिलं. त्याच्या अंगावरून एक मनुष्य गेला तेव्हां त्याच्याकडे त्यानं निरखून पाहिलं. तो ज्योआकिमला म्हणाला,

" आठ वाजायला दोन मिनिटं; आपण वर जाऊं या आतां. तो इसम गुप्त पोलिस असला पाहिजे. आपली जागा त्यांना समजली आहे अशी माझी खात्री आहे. आपली डर वाटते आहे त्याना म्हणूनच अजून त्यांनीं छापा घातला नाहीं आपल्यावर...चल. "

ते ज्या इमारतींत शिरले ती अगदीं सामान्य, तिच्याकडे कुणाचं लक्षही वेधूं नये इतकी सामान्य होती. दारापाशीं चार पाट्या होत्या. एक दातांच्या डॉक्टरची, एक मासिकाच्या कचेरीची, एक लोकरीच्या दलालाची, आणि एक 'युरेनिआ ॲशुअरन्स सोसायटीची.' बोळासारखी वाट होती तिथें गॅसच्या दिव्याचा उजेड होता नव्हता, केरकचरा अन् घाण साचली होती तिची उग्र दुर्गंधि सुटली होती, अन् चौकांत कचऱ्याचे हातगाडे रिचून पडले होते. मागच्या जिन्याच्या तोंडाशीं 'युरेनिआ ॲशुअरन्स सोसायटी' अशी आणखी एक पाटी होती अन् तिच्यावर सोसायटी तिसऱ्या मजल्यावर आहे असं दर्शविणारा पंजा होता. जिन्यांत अंधार होता. आस्केनिअसनं दिव्याचं बटण दाबलं, पण व्यर्थ. मग ज्योआकिमनं खिशांतून टॉर्च काढली अन् ते दोघे त्या गलिच्छ जिन्याच्या पायऱ्या चढले. मधेंच आस्केनिअस दचकला अन् त्यानं वाकून मागच्या चौकांत पाहिलं. ज्योआकिमनंहि पाहिलं,

अन् त्याला वाटलं कुणी तरी झटकन् हातगाड्याच्या आड लपलं. ते वर जाऊन पोंचले. आस्केनिअसनं खिशांत हात घातला, अन् ज्योआकिमच्या कानाशीं तोंड नेऊन तो म्हणाला,

"पिस्तुल सरसावून तयार रहा. पोलिस आंत लपून बसलेलेसुद्धां असायचे."

ज्योआकिमनंहि खिशांत हात घातला, अन् दीर्घ श्वास ओढला. संकटाशीं तोंड देण्याचा, साहस करण्याचा क्षण येऊन ठेपला या कल्पनेनं त्याला बरं वाटलं. पण तें व्यर्थच ठरलं. त्यांनीं दारावर सांकेतिक टकटक केली तशी दार उघडलं गेलं.

आंत त्याचे दोस्तच होते!

# ३

गॅसच्या कारखान्यांत मालक अन् मजूर यांच्यामध्ये पगारवाढीच्या प्रश्नावर झगडा चालू होता. महागाई सारखी वाढत होती, उपासमारीनं मजूर मरत होते, त्यांच्या हालांची सीमा झाली होती, अन् आमची मजुरी वाढवा अशी त्यांनीं मालकांजवळ मागणी चालविली होती. मरमर कष्ट करायचे तर पोटाला भरपूर पाहिजे. बुर्थ मंडळींच्या घरांत बिऱ्हाडानं राहणाऱ्या 'श्लीपुके'चे सारे दात अतिश्रमानं पडले होते. खायला भरपूर नसल्यामुळें त्याच्या हिरड्या रक्तावांचून ढिल्या झाल्या, अन् दांत सरळ गळून पडले. वयानं अवघा तीस वर्षांचा तो, पण एकाद्या थेरड्यासारखं त्याच्या तोंडाचं बोळकं दिसायला लागलं. तसाच त्याचा मेहुणा 'पाशूल्के'! तुरुंगांतून सुटून आल्यापासून त्याच्या कफांत रक्त पडत होतं. अशा प्रकारें कामगारांची दुर्दशा होत होती. हातपाय हालविल्यावांचून आपली दाद लागायची नाहीं ही गोष्ट ते उमजले होते. त्यांच्या सभा भरत होत्या.

प्रथम प्रथम मालक व मजूर याच्यांतलीं बोलणीं सामोपचारानं झालीं. मालकांनीं सहानुभूतीचा अन् मित्रत्वाचा देखावा केला. मजुरांना थोडासा शिधादेखील त्यांच्याकडून पुरविण्यांत आला. पण कामगार म्हणूं लागले, तुमची सहानुभूति अन् दया पुरे झाली, आमच्या पगाराचं काय

करतां बोला. त्याबरोबर नूर बदलला. मालक म्हणाले, तुम्हांला काय कमी पगार देतों आम्ही ? सरकारी नोकरांना किंवा डॉक्टरांना तुमच्यापेक्षां कमी प्राप्ति आहे ! कामगारांना हा युक्तिवाद कसा पटणार ? त्यांचं म्हणणं इतर लोकांच्या गोष्टी आम्हांला कशाला सांगतां ? आम्हांला येवढ्या मजुरीवर जिवंत राहतां येत नाहीं येवढं आम्हांला माहीत आहे. ते म्हणत कष्ट करून, अर्धपोटी राहून, दुखणीं अंगावर काढून आमच्या देहांचीं चिपाडं झालीं आहेत तीं बघा. आमचीं फुप्फुसं कुजलीं आहेत. वेळीं अपघातांत सापडून आमच्या हातांपायांवर जखमा झाल्या त्यांचे वण अजून आहेत ते पहा, घाण्याच्या बैलासारखं आमचं जीवित चाललं आहे त्याकडे लक्ष द्या, आमची मजुरी वाढवा ! यावर मालकांनीं चक्क सांगितलं, कीं पैशाची बात आम्ही ऐकणार नाहीं. मग सामोपचाराचीं बोलणीं बंद झालीं, एकंदर हवा गरम व्हायला लागली. कामगारांनीं संप केला. कारखानदारांनीं दुसरे उपरे लोक धरून आणून कामाला लावले. संपवाल्यांनीं निरोधन सुरू केलं. सशस्त्र पोलिसांचे पहारे सुरू झाले. कारखान्याच्या सबंध उपनगरांत मोठी खळबळ माजून राहिली. एके दिवशीं गोळीबार झाला. कुरापत संपवाल्यांनीं काढली कीं पोलिसांनीं काढली तें कुणालाच कळलं नाहीं. एक पोरसवदा लष्करी अधिकारी रक्ताच्या थारळ्यांत मरून पडलेला आढळला. रेल्वेच्या फाटकापाशीं मशीन गन्सचा पहारा बसला. कामगारांनीं लुटालूट केली. जखमी लोकांची लॉरीमधून इस्पितळांत रवानगी झाली. प.शूल्केला गोळी लागली ती त्याच्या आधींच बिघडलेल्या फुप्फुसांत ! त्याला घरीं येतां आलं नाहीं. त्याच्या बहिणीचा त्याच्यावर फार जीव होता. तिनं रडून आकान्त केला, अन् मग मनाला विरंगुळा म्हणून ती सारखी ग्रामोफोन लावून बसली. पलीकडच्या खोलींत शेगडीशीं बसलेला ज्योआकिमचा बाप फोनोग्राफचा आवाज ऐकून म्हणाला, “ चैन आहे या कामकऱ्यांची ! ”

याच्या उलट कांहीं लोकांची खरोखरच चैन होती. उदाहरणार्थ

डॉ. थेलमान. त्याची चांगली चलती चालली होती हें कोणालाही सहज दिसण्यासारखं होतं. प्रथम त्यानं व्यापारधंदा सुरू केला तो एका छोट्याशा कारखान्याचा डायरेक्टर म्हणून. त्या वेळीं त्याची कोणाला माहितीही नव्हती, अन् त्याला मोठी आटापीट करावी लागत होती. पण हळूहळू त्याचा धंदा वाढूं लागला, अन् त्याबरोबर त्याच्या शरिराचा विस्तारहि. तो सर्वच दृष्टीनं मोठा वजनदार झाला. तो हसे तो खोखो करून केवळ्यांदा तरी, अन् छोट्या व्यापाऱ्याशीं बोलतांना जणूं त्यांच्यावरची मोहबत दाखविण्यासाठीं त्यांच्या खांद्यावर थाप मारी. ज्या त्या कारखान्यांत त्याचा हात असे. कुठलीही कंपनी असो, डॉ. थेलमान तिचा डायरेक्टर असलाच पाहिजे. त्याची शेअर्सची विक्री खरेदी सारखी चालू असे. खोऱ्यानं पैसा ओढावा, अन् तो उडवावा हाच त्याचा उद्योग. मोटारगाड्या, गालिचे, पिआनो, इमारती लाकूड, साबण अशा हरतऱ्हेच्या मालाच्या वखारीच्या वखारी त्याच्याकडे गहाण होत्या. त्याचा खर्चही असाच अवाढव्य होता. साऱ्या नमुन्याचीं तैलचित्रं त्यानं खरेदी केलीं होतीं, अन् त्याच्या संग्रहांतलं जडजवाहिर पाहण्यासारखं होतं. एकेका वेळीं तो तीस तीस सूट करून घेई अन् बुटांच्या पन्नास जोड्या विकत घेई. पाहुण्यांना पाजायसाठीं इतकी दारू त्याच्या मद्यागारांत साठविलेली होती, कीं जणूं वेढा पडला तर आपल्या घराचा किल्ला लढवायची तयारीच त्यानं केली आहेसं वाटावं. पुष्कळजण त्याला एक आचरट अवलिया समजत व तें ऐकून त्याला गंमत वाटे आणि तो मनसोक्त हसत सुटे. अशी ही थेलमानची स्वारी होती. सुस्वभावी, उदार, अन् ‘ अच्छा, चलेगा ’ असं म्हणून क्षुल्लक गोष्टी निकालांत काढणारा. तो अशिक्षित होता असं म्हणतां येणार नाहीं, अन् अगदीं साधुसंत होता असंही नाहीं. कारण त्यालाही राजकीय मतं होतींच, व त्यांपुढें तो सत्याची तमा बाळगीत नसे. तो स्वतःला ‘ राष्ट्रीय ’ पक्षाचा म्हणवी. जुन्या अधिकारीवर्गाला साहाय्य करण्यासाठीं तो शक्य तो झटे. आपल्या अठरा कारखान्यांत तो त्यांची कुठें तरी वर्णी लावून देई. तो

त्यांना आपल्या घरीं वारंवार जेवायला बोलवी, शिकारीवर आपल्याबरोबर नेत असे, मेजवान्या देई. ते त्याच्या जिवावर मजा करीत, त्याची स्तुति करीत, निघून जात. मनांतल्या मनांत ते डॉ. थेलमानला तुच्छ समजत असत, अन् थेलमानही त्यांना तुच्छ समजे.

पण या मिष्टान्नपुष्ट स्थूल देही थेलमानाच्या जीवितांतही एक गोष्ट अशी होतीच कीं तिथें त्याला सर्वस्वी शरणागति पत्करावी लागे. पैशांत लोळणाऱ्या या लक्ष्मीधराला दुःख माहीत नव्हतं असं थोडंच म्हणतां येईल ?

ज्या जेलेना मायकोवाजवळ ज्योआकिमची बहीण शार्लोटे संगीत शिक्षण घेत असे ती थेलमानची कामांगिनी होती, अन् अवमान व असूया इत्यादींच्या दाहांत त्याला सतत पोळत कसा ठेवावा हें तिला पूर्ण अवगत होतं. ती पस्तीस वर्षांची होती. लावण्यवती होती. रशिआंतल्या एका खानदानी सरदार कुळांतली ती होती असं लोक म्हणत. आपली सर्व संपत्ति अन् वैभव थेलमान तिच्या ऐषआरामासाठीं उधळीत होता, पण त्यांत तिचं मन नव्हतं. त्यापासून तिला सुख वाटे असं नव्हे, पण त्याचा ती अव्हेर करीत नसे. तिचा देह त्यानं विकत घेतला होता. तो त्याच्या स्वाधीन करण्याचं तिनं नाटक करावं इतकी किंमत त्यानं मोजली होती. जेलेनाच्या ज्या मंद शिथिल देहचेष्टितांच्या मोहिनीला थेलमान बळी पडला होता त्यांचं लावण्य रंगभूमीवरही तसंच प्रगट होई. तिचा आवाज मोठा नव्हता, पण भारी मृदु अन् कमावलेला होता. तिची दंतपंक्ति ठसठशीत व शुभ्र होती, केस दाट अन् काळेभोर होते, आणि तिच्या भुजलतांच्या हालचाली इतक्या सहज होत कीं त्या पाहाताच माणसाचं अंतःकरण घायाळ व्हावं. जेलेना शक्य तितक्या प्रकारानीं थेलमानशी बेईमानी करी. बेइमानी दाखविण्यासाठीं ती मुद्दाम कांहीं करी असंही म्हणतां यायचं नाहीं. आपल्या रंगेलपणाची जाहिरात करण्याच्या हेतूनं म्हणा किंवा आपला अधिकार

मिरविण्याच्या बुद्धीनं म्हणा, थेलमान आपले तरणेबांड दोस्त आणून त्यांच्याशीं जेलेनाची ओळख करून देई. अन् मग ती खुशाल त्याच्या डोळयांदेखत त्यांच्याशीं लहर लागेल तेवढा वेळ रंगढंग करी व उलट लहर फिरली कीं त्यांना झिडकारून दूर लोटी. अशा तरुणांपैकीं आस्केनिअसच काय तो असा होता, कीं त्याच्याशीं तिनं प्रणयाचा कसलाही व्यवहार ठेवला नव्हता. ती त्याला अगदीं वेगळया रीतीनं वागवी. कांहींशा आदरानं, कांहींशा संशयानं. जणूं तो तिच्यावर अन् ती त्याच्यावर पाळत ठेवीत असे. दोघंही पूर्वी रशिआंत होती तेव्हांपासून एकमेकांना ओळखीत होतीं. मात्र या पूर्वपरिचयाचा उल्लेख दोघांपैकीं कुणीच कधीं करीत नसे. आस्केनिअस तिच्या घरात पडून असे. तो तिचा चहा पीत असे, सिगरेट्स ओढीत असे, पण वागे मात्र अशा तऱ्हेनं कीं जणूं तिच्यावर त्याचा विश्वास नव्हता, अन् दोन हात दूरच रहाण्याची त्याची इच्छा होती.

जेलेना व ज्योआकिम याचे संबंध मात्र फारच निराळ्या प्रकारचे होते.

गेल्या कित्येक महिन्यांपासून तिनं त्याचा प्रियकर म्हणून स्वीकार केला होता, व स्थूलदेही थेलमानप्रमाणें त्यालाहि प्रीतिदाहाचे असह्य चटके सोसावे लागत होते. त्याचीं नवथर आलिंगनं, त्याचा सुकुमार देह, त्याचं कौमार्य, इत्यादींचा तिनं उपभोग घेऊन तीं सर्वस्वीं अंकित करून घेतलीं होतीं. त्याच्यावर ती अनुरक्त होतीसं दिसे. तिची लहर फिरेपर्यंत ती तशी अनुरक्त राहणार हें उघड होतं. परंतु तिच्या समागमाची अशी कांहीं विकृत, लाजिरवाणी, दाहक चटक ज्योआकिमच्या ठिकाणीं उत्पन्न झाली होती कीं तिची अतृप्ती व तृप्ती या दोन्ही गोष्टींनीं त्याचा जीव सारखाच थकून शुष्क होत असे. तिच्याविषयींच्या त्याच्या भावना नवतारूण्यांतल्या पहिल्या ताज्या प्रेमानं सुगंधित झालेल्या नव्हत्या; दोन यौवनसंपन्न जीवांच्या वासंतिक स्वप्नांच्या मधुर संगमाचा अंश त्यांत मुळींच नव्हता. त्याच्या साध्याभोळया दुर्बल, अविकारी स्वभावाला या प्रेमसंबंधांतल्या पापाची व वंचनेची किळस

येई. कितीदां तरी तो आपल्या सत्प्रवृत्तीचं सारं सामर्थ्य एकवटून हा पाश तोडून टाकण्यासाठीं दूर पळे. तो आस्केनिअसचा आधार घेई, किंवा गुप्त मंडळाच्या उद्योगात अनुभवास येणाऱ्या साहसाच्या काव्यमय कल्पनेचा आश्रय करी. आपलं नैतिक बल नष्ट होत आहे असं त्याच्या मनांत येई, अन् मग त्याला वाटे एखाद्या निग्रहाच्या कठीण कार्यांत आपण पडलों कीं तें आपल्याला परत मिळवितां येईल. ज्या योगानं जेलेनाच्या लावण्याचा विसर पडेल अशा गोष्टींचा तो विचार करीत राही. आपल्याच विचाराच्या तंद्रींत राहण्याची त्याची ही सवय प्रथम प्रथम केवळ एक आत्मसंरक्षणाची युक्ति होती, पण पुढें पुढें तिच्यांत तो अधिक गुरफटत गेला. तीच त्याची सततची वृत्ति बनली. "लवकरच आपण मुख्य प्रधानावर गोळी झाडायची, अन् आपल्या देशाची मुक्तता करण्यासाठीं हुतात्मा बनायचं..." हा एकच ध्यास त्यानं घेतला. "विलासिनीच्या अंकावर बसणाऱ्या कुत्र्यापेक्षां, तिच्या हातांतल्या खेळण्यापेक्षां आपली योग्यता सहस्रपटींनीं मोठी आहे हें प्राणांची आहुति देऊन आपण जगाला लवकरच पटवून देऊं! लवकरच..."

मात्र हे विचार त्याच्या अंतर्यामीं असूनही ज्योआकिमनं जेलेनाकडे जाणं बंद केलं नव्हतं.

आत्तांच पहा, तो तिच्या दिवाणखान्यांत बसलेला आहे. त्याच्याकडे पाहणाराला तो एखाद्या कोंवळ्या पोरासारखा वाटेल. त्याच्या भालप्रदेशाची वरची बाजू उन्नत नाहीं. शाळेंतल्या विद्यार्थ्याला शोभतीलसे त्याचे कपडे त्याला धड पुरतही नाहींत. त्याची एकच एक बुटाची जोडी, ती त्यानं साफ केली असूनही मूळचं खडबडीत कातडं कांहीं झाकलं गेलेलं नाहीं. थेलमानच्या पैशानं खरेदी झालेल्या जाड जाड लोकरीच्या गरम दुलया त्यानं आपल्या पायांवर घेतल्या आहेत. जेलेनानं चिनी थाटाची इजार पेहरली आहे, अन् ती मंडळींना चहाचे पेले देते आहे. पुढें मागें होतांना ती मुद्दाम ज्योआकिमच्या अंगाला अंग घाशीत आहे; अन् तिचा स्पर्श झाला कीं

दर वेळीं त्याच्या सबंध शरीरावर कंपयुक्त रोमांच थरारत आहेत. आस्केनिअस पिआनोला टेकून उभा आहे, अन् सिगरेटचे झुरके मारून धूर घशापर्यंत घेत आहे. त्याच्या गुप्त मंडळाचं कार्य अनेक अपयशांनंतर आतां जवळ जवळ थंडावलंच आहे, अन् मंडळच मोडण्याच्या बेताला आलं आहे तरी तो नेहमीं-प्रमाणें मोठा खुषींत दिसत आहे. थेलमान एक जंगी चिरूट तोंडाच्या कोपऱ्यांत ठेवून राजकारणावर व्याख्यान देत आहे,

" महागाई झाली याला कारण कोण माहीत आहे ? हे कामगारच. मजुरी वाढली कीं महागाई वाढते, अन् महागाई वाढली कीं मजुरी वाढवावी लागते; असं हें साटंलोटं आहे. अशानं शेवटीं काय होईल, तर आपण सगळेच कफल्लक होऊं. भलत्या मागण्या चालवल्या आहेत कामकऱ्यांनीं. आपली पायरी विसरले आहेत ते, दुसरं काय ? त्यांच्यापुढें आम्ही नमत राहिलों तर हा विचका कधींच संपायचा नाहीं ! "

आस्केनिअस म्हणाला, " दहापांच वेळां गोळीबार केला कीं सारी गडबड शांत होईल कीं नाहीं पहा. मी असतों तर सहा महिन्यांत देशांत शांतता अन् सुव्यवस्था प्रस्थापित केली असती ! आहे काय त्यांत ! "

मद्याचा एक पेला त्याच्या हातीं देतां देतां जेलेना म्हणाली, " अरेरे, काय करावं ! तुला कोणी प्रधान करीना ! "

" जेलेना, तूं बोल्शेविकाचा कैवार घेणारच, माहीत आहे मला ! " असं म्हणून आस्केनिअसनं तिला कुर्निसात केल्यासारखं केलं, पण तिच्याकडे पाहिलं मात्र नाहीं. ' बरं आहे, पाहून घेईन ' अशा अर्थाचा ध्वनि त्याच्या शद्बांत असल्याचा भास झाला. ज्योआकिमनं एकदां त्याच्याकडे अन् मग जेलेनाकडे झटकन् पाहिलं. त्याच्या मनांत आलं, या दोघांच्यांत नेहमीं कांहीं तरी भानगड असते...

जेलेनानं आस्केनिअसच्या बोलण्यावर कांहींच उत्तर केलं नाहीं. ती कोचा-

वर जाऊन पडली, तिनं दोनचार उशा आपल्या डोक्याखालीं घेतल्या, एक रेशमी बाहुली उचलून हातांत घेतली, अन् गाणं गुणगुणायला प्रारंभ केला. तिचा स्तनभाग या वेळीं रेखीव, उठून दिसत होता. सारे पुरुष त्याकडे पाहत राहिले, अन् जणूं अंकित झाल्याप्रमाणें स्तब्ध झाले. जलेना जरा वेळ तशीच पडली, पण मग तिनं आपला उजवा हात उचलला, विचारमग्न मुद्रेनं त्याकडे पाहिल्यासारखं केलं, आणि किंचित् हसून ती म्हणाली,

" आस्केनिअस, रशिआंतून मी पळून आलें तेव्हां या माझ्या हातानं पांच बोल्शेविकांना गोळ्या घालून ठार केलं मीं; माहीत आहे ? "

" पांच बोल्शेविकांना ?—करवलं तरी कसं हें साहस तुमच्यानं ? " मंडळी-पैकीं कुणीसं विचारलं.

जेलेना म्हणाली, " किती वेडा प्रश्न ! आतांशा प्रत्येकजण कुणाला तरी गोळी घालून ठार करतो आहे. येवढंच, कीं त्याची वाच्यता करायची नसते. प्रेमाच्या बाबतींत जशा कांहीं गोष्टी उघड बोलायच्या नसतात तसंच त्याचं असतं. "

तिच्या रशिअन थाटाच्या उच्चारामुळें या तिच्या उद्गारांत क्रूरता असल्या-सारखं वाटलं. तिनं केलेली तुलना ज्योआकिमला आवडली नाहीं. तो रागावून म्हणाला,

" रणांगणावर लढतांना चेवानं एखाद्याचा प्राण घेण्यांत माणसाला जो उन्मत्त आनंद होतो त्याची स्मरयुद्धांतल्या कांहीं प्रकारांपासून होणाऱ्या सुखाशीं तुलना करतां येईल कदाचित्. पण मनुष्य जेव्हां पूर्ण विचाराअंतीं, युक्तायुक्ततेचा निर्णय करून, कर्तव्य म्हणून एखाद्याचा प्राण घेतो त्या वेळीं गोष्ट फार वेगळी असते. या कृत्याशीं अंतःकरणाच्या भावनेचा कांहीं संबंधच राहत नसावा. फांशी देण्याचा धंदा करणाऱ्या लोकांची त्या वेळची मनः-स्थिति कशी असेल याचा मी कित्येक वेळां विचार करून पाहतों. ते लोकांचे

प्राण घेतातच कीं नाहीं ? कोर्टानं दिलेली शिक्षा अमलांत आणणारे तेच कीं नाहीं ?..."

बोलतां बोलतां तो अडखळला अन् मग स्तब्ध झाला.

थेलमान हसला व म्हणाला, "मोठा मजेदार मुलगा आहेस तूं ज्योआकिम! काय म्हणे फांशी देणाऱ्या लोकांचा मी विचार करतों! खरंच करतोस ?"

जेलेना म्हणाली, "त्याचं काय ऐकतां तुम्ही ? कांहीं तरी चटकदार बोलावं म्हणून बोलतो तो असल्या गोष्टी. वेळ आली तर त्याच्या हातून कांहीं होईल म्हणतां ? छी: ! गोजिरवाणं छोटंसं कोंकरूं आहे तें!"

तें ऐकून ज्योआकिमची मुद्रा चिडल्यासारखी झाली, व तो गप्प राहिला. जेलेनानं हा त्याचा उघड अपमान केला होता. तो मनाशीं म्हणाला, गोजिरवाणं छोटंसं कोंकरूं काय ? ठीक आहे. दाखवूं आपण लवकरच या लोकांना आपलं खरं स्वरूप किती निराळं आहे तें!

वस्तुतः ज्योआकिम म्हणजे दुबळा, खुरटलेला छोकरा होता यांत काय संशय ? पण त्याचा काय नेम, मानभंगानं चिडून जी स्तब्धता त्यानं धारण केली त्या स्तब्धतेच्या या क्षणांतच त्याच्या मनांत कांहीं एक विलक्षण साहसी कल्पना उद्भवली असेल व तिला निश्चयाचं स्वरूप आलं असेल.

त्याच्या लक्षांत आलं नाहीं, पण जेलेनानं त्याच्या कोंवळ्या विषण्ण मुद्रेकडे दृष्टिक्षेप केला. ती उठली, त्याला घसटून मंद पावलं टाकीत पियानोजवळ गेली, पडलीं त्या पट्ट्यांवर तिनं बोटं टाकलीं, अन् मग ती गाऊं लागली.

मधुर अन् कारुण्यपूर्ण असं एक इटालियन गीत होतं तें. ज्योआकिमला संगीतांत विशेष गम्य नव्हतं. तिच्या गाण्याकडे त्याचं पुरतं लक्षहि नव्हतं, परंतु तिच्या कंपयुक्त आवाजाची मोहिनी त्याच्यावर पसरली, व क्षणापूर्वीची

त्याच्या मनाची चिडलेली वृत्ति विरघळूं लागली. लहर फिरतांच जेलेनानं गीत अर्धवट तसंच बंद केलं. गाण्याचे छापील कागद शोधायला म्हणून ती आंतल्या खोलींत गेली, अन् जातां जातां आपल्या मागून येण्याबद्दल तिनं ज्योआकिमला नेत्रसंकेत केला.

तो खोलींत गेल्याबरोबर जेलेनानं झटकन् त्याला आपल्या बहुपाशांत ओढून हृदयाशीं धरलं. त्या दाहक आलिंगनानं त्याचा संयम पार सुटला. त्याची शुद्ध हरपली. त्याच्या शरीराला कंप सुटला. त्याचीं सारीं गात्रं बेहोष सुखानं सुन्न, विकल झालीं.

बाहेरच्या दिवाणखान्यांत चाललेलीं बोलणीं खोलीच्या दारावर सोडलेल्या लठ्ठ लठ्ठ किनखापी पडद्यांतून थोडीं ऐकूं येत होतीं. जेलेना त्याच्या कानाशीं तोंड नेऊन म्हणाली, " थेलमान उद्यां शिकारीला जाणार आहे. उद्यां तूं ये..." मग तिनं आपली मिठी सैल केली. तिच्या स्पर्शसुखानं अन् सुगंधानं गुदमरलेला ज्योआकिम झटकन् दूर झाला. बाहेरच्या दिवाणखान्यांत तो परत आला तेव्हां त्याचीं पावलं सरळ पडत नव्हतीं.

नंतर कित्येक घटकांनीं मंडळी एकमेकांचा निरोप घेऊं लागली, तेव्हां ज्योआकिमला एकीकडे गाठून आस्केनिअस म्हणाला, " आतां सरळ घरीं जा आणि चांगली झोप घे. अन् हें बघ, मी काय सांगतों तें नीट लक्षांत ठेव. या जेलेनाच्या नादीं लागूं नकोस. ही बया मोठी जहांबाज आहे. मला बिलकुल भरंवसा नाहीं तिचा. प्रेमांत सापडून आपल्या मंडळाचं कार्य बिघडविलंस तर तुझी किंचित्सुद्धां दयामया करणार नाहीं कोणी. गुड-नाइट ! जा ! "

" मी तुझ्याबरोबर येऊं थोडा ? " असं ज्योआकिमनं सहज म्हणून विचारलं, पण तें विचारतांना त्याची मुद्रा अगदीं असहाय अन् दीनवाणी झाली.

पण आस्केनिअस निर्विकारपणानं म्हणाला, "नको. मला दुसरीकडे जायचं आहे." आपला न दुखणारा हात त्यानं त्याच्या हातीं दिला, अन् मग तो निघून गेला.

ज्योआकिम भारी कष्टी अंतःकरणानं त्याच्याकडे बघत राहिला. आस्केनिअस नेहमीं सरळ ताठ चालत असे, अन् लष्करातले सारेच लोक दिसतात त्याप्रमाणें मळकट कपड्यांतहि ऐटबाज दिसत असे. त्यानं आपला पट्टी बांधलेला हात ओव्हरकोटाच्या खिशांत घातला होता. मधेंच एक मनुष्याकृति रस्त्यावर दिसूं लागली अन् आस्केनिअसच्या मागोमाग पावलं टाकूं लागली. ती आकृति कोणाची तें ज्योआकिमला ओळखतां येईना. तो पाहत राहिला तों कांहीं वेळानं आस्केनिअस व त्याच्या मागोमाग जाणारा तो माणूस दोघेहि कोपऱ्यावर वळून दिसेनासे झाले.

आपल्यामागून कोणी तरी येत आहे हें आस्केनिअसच्याही लक्षांत आलं. साऱ्या इंद्रियांच्या संवेदना जागृत ठेवण्याची त्याला इतकी सवय झाली होती, कीं त्याच्या पाठीलासुद्धां डोळे असल्याप्रमाणें माणसं दिसत. एक भाड्याची मोटार जात होती ती त्यानं शिटी वाजवून थांबविली, अन् तो तिच्यांत चढून बसला. कांहीं वेळानं एका कालव्याच्या पुलापाशीं तो उतरला. त्या ठिकाणीं चिटपाखरूं नव्हतं, अन् दिवाही नसल्यामुळें अंधार होता.

त्या अंधारांत पुलाच्या भिंतीशीं एक कृश आकृति थकून, कंटाळून उभी राहिल्यासारखी उभी होती. ज्योआकिमची बहीण शार्लोटे होती ती.

आस्केनिअसनं तिच्या हाताचं चुंबन घेतलं, व तिला मोटारकडे नेलं.

साऱ्या शहरावर धुकं तरंगत होतं. पण धुक्याहूनही उंच, अथांग, अनंत असं जें आकाशवर्तुळ होतं तें सज्जन, दुर्जन सर्वांच्याच माथ्यांवर भेदाभेद न करतां फिरत होतं! त्या आकाशाखालीं किती तरी माणसं आपलीं भिन्न भिन्न सुखदुःखं भोगीत जीवित कंठीत होतीं.

पापी नर्तिका जेलेना, जायबंद होऊन इस्पितळांतल्या शय्येवर पडलेला पाशूल्के, झोपेवांचून तळमळणारी अन् रडणारी ज्योआकिमची आई, अन् तिच्याप्रमाणेंच पाशूल्केची बहीण, चिंतेनं अन् जखमी हातामुळें आलेल्या ज्वरानं विव्हळ होऊन शार्लोटेच्या स्कंधावर मस्तक टेकून पडलेला आस्केनिअस, त्याच्यावर पाळत ठेवण्यासाठीं मोटारीमागोमाग जाणारा पोलीस…

ज्याच्या प्राणघाताची प्रतिज्ञा झाली होती तो प्रधान, अन् त्याला गोळी घालायचा ज्यानं आज रात्रीं मनाशीं निश्चय केला होता तो ज्योआकिमही !

# ४

प्रधान घरीं आले तेव्हां अगदीं संध्याकाळ झाली होती. पाऊस पडत होता. गेल्या कित्येक दिवसांपासून अगदीं हट्टाला पेटल्याप्रमाणें पावसानं संतत धार धरली होती, अन् शहरावर उदास कळा पसरली होती. गॅसच्या कारखान्यांतला तंटा आतां मिटला होता; त्यामुळें दर चारांपैकीं एका का होईना पण रस्त्यावरच्या बत्त्या पेटलेल्या होत्या. बाकीच्या तीन बत्त्यांवरचे दिवेच काढून टाकल्यामुळें त्यांचा शिरच्छेद होऊन त्यांचं जीवितच संपल्या-सारखं भासत होतं. घरांत शिरल्यावर प्रधानांनीं आपली निथळती छत्री अन् ओलाचिंब झालेला वरकोट नोकराजवळ दिला व आपल्या खोलींत प्रवेश केला. त्यांच्या लिहिण्याच्या मेजाखालीं त्यांचा कुत्रा पडून राहिला होता त्यानं आळस दिला व तो उठून पुढें आला. प्रधान त्याला म्हणाले, "काय दोस्त, बरं आहे ?" जीं माणसं अंतर्यामीं एकाकी असतात त्यांना स्वतःशीं अन् पाळीव जनावरांशीं मोठ्यांदा बोलायची सवय असते. त्यांनीं कुत्र्याला थोपटलं, अन् कांहीं वेळ थंडीनं काकडलेला आपला हात त्याच्या ऊबदार अंगावर तसाच राहूं दिला. त्यांच्या हातावर निळ्या निळ्या शिरा स्पष्ट उठून दिसत होत्या. त्यांची प्रकृति ठीक नव्हती हें त्यांकडे पाहतांच

कळण्यासारखं होतं. नोकरानं त्यांच्या कागदांच्या फायली आणून मेजावर ठेवल्या. ते मेजाजवळ गेले अन् टेबलावरच्या दिव्याचं बटण त्यांनीं दाबलं. फाइली न उघडतां ते तसेच कांहीं वेळ विचार करीत पण शून्य मुद्रेनं उभे राहिले. मग "नको, राहूं दे" असं मोठ्यांदा उद्गारून ते दूर झाले. त्यांनीं खोलींतल्या खोलींत दहापांच येरझारा घातल्या. खोलींत सामान अगदीं थोडं होतं. चित्त विषण्ण करण्यासारखा गारठा खोलींत भरला होता. निदान त्यांना तसं वाटलं. या भिंतीकडून त्या भिंतीकडे पावलं त्यांनीं टाकलीं तीं जणूं मिळेल तिथें सहानुभूति, आश्रय, ऊब घ्यायला ते उत्सुक होते अशा आविर्भावानं. मग त्यानीं आपले दोन्ही हात पाठीमागं घेऊन जुळविले, आणि प्रशस्त खिडकीजवळ तिचे पडदे दूर न करतां तसेच उभे राहून ते विचार करूं लागले.

अगदीं विटून बोलल्याप्रमाणें ते स्वतःशींच मोठ्यांदा म्हणाले, "बस् झालं!"

मग त्यांनीं दिवे मालवून टाकले, व त्या खोलींतून ते आपल्या लायब्ररी-कडे गेले. ती खोली वर्तुलाकार होती, अन् तिथल्या सामानाची सजावट साधी पण चांगली होती. साऱ्या भिंतींना लागून पुस्तकांचीं कपाटं मांडलेलीं होतीं. कातडी पुठ्ठ्याचीं अन् सोनेरी नावांचीं तीं पुस्तकं पाहतांच जणूं आपलं प्रेमपूर्वक स्वागत झालंसं प्रधानांना वाटलं. त्यांनीं सहज हात पुढें करून एक पुस्तक काढून घेतलं. गॉएटेचं पुस्तक होतं तें. त्याचं नांव "Theory of Colour." त्यांनीं उभ्या उभ्याच तें वाचायला प्रारंभ केला, अन् मग गोडी लागून ते पानामागून पान उलटीत गेले. कांहीं वेळापूर्वीची त्यांची शिणलेली चिंतायुक्त मुद्रा आतां बदलली. त्यांना न कळत त्यांच्या चेहऱ्यावर हास्य दिसूं लागलं. थोड्या वेळानं एक दीर्घ निःश्वास टाकून ते आरामखुर्चीकडे गेले व तिच्यांत पडून पुस्तक पुढें वाचूं लागले. मग ते त्यांत इतके गर्क झाले, कीं जणूं कोठल्या तरी दूरच्या उंच आध्यात्मिक

जगांत ते शिरल्याप्रमाणें त्यांची मुद्रा दिसूं लागली. मधेंच एखाद्या वाक्या-खालीं ते आपल्या अंगठ्याच्या नखानं रेघ ओढीत. ही चमत्कारिक खोड त्यांना कधीं टाकता आली नव्हती. अखेर जेव्हां त्यांची बहीण आंत आली, अन् पुस्तकांनीं रिचलेल्या रुंदी मेजावर तिनं वर्तमानपत्रं ठेवलीं तेव्हां तिच्या चाहुलीनं ते आपल्या वाचनसमाधींतून जागे झाले.

वर बघून ते म्हणाले, " गॉएटेच्या या ग्रंथांत सगळयाचा खुलासा आहे बघ. " त्यांनीं पुस्तक मिटलं, पण खुणेसाठीं बोट पुस्तकांत ठेवलं.

" सगळयाचा म्हणजे कशाचा ? " त्यांच्या बहिणीनं विचारलं.

" प्रत्येक प्रश्नाचा. साऱ्या विश्वाचा म्हणेनास ! गॉएटेच्या लिहिण्यां-तली अजब गंमत आहे ती हीच. त्याच्या कुठल्या तरी ग्रंथांत कुठें तरी अकस्मात् असं एखादं वाक्य सापडतं, कीं त्यामुळें एकदम लख्ख प्रकाश पडतो, आपल्या सगळया शंकांचीं उत्तरं मिळाल्यासारखं वाटतं..."

त्यांची बहीण हसली व म्हणाली, " मग मला वाचून दाखीव तर. " ते पंचेचाळीस वर्षांचे होते, पण ती त्यांच्यापेक्षां थोडी वडील असल्यामुळें त्याना ती अरे-तुरे म्हणूनच बोलत असे. ती किंचित् थांबली व म्हणाली,

" आज फार उशीर झाला तुला. " हें बोलतांना ती हसली खरी, पण तिच्या स्वरांत कंप होता.

" हं. झाला खरा. कारण चालत आलों, अन् जरा हिंडून आलों. मोकळी हवा केव्हां मिळेलसं झालं होतं. "

" मला भारी काळजी लागून राहिली होती. "

" काळजी...अं..." असं कांहींसं पुटपुटून प्रधानांनीं पुन्हा पुस्तक उघडलं.

" तूं असं पायीं हिंडतां कामा नये हें मीं सांगितलं का पाहिजे ? मला

तुझ्याबद्दल सतत चिंता वाटली तर तें साहजिकच नाहीं का बरं ? " तिचा आवाज किंचित् सद्गदित झाला होता.

" मुळींच नाहीं; मी सांगतो तुला, माझी चिंता करण्यासारखं कांहीं एक नाहीं. "

" तुझा शरीररक्षक पॉलिकाउस्की परवां म्हणत होता, कीं तूं असा लहर लागेल त्याप्रमाणें हिंडूं लागलास तर तुझ्या सुरक्षितपणाची हमी त्यानं कशी घ्यायची ? "

प्रधान हंसले व म्हणाले, " पॉलिकाउस्की ? झालं ! खरंच तो असं म्हणाला ? त्याचं ऐकतेस तूं ? मला बाबागाडींत घालून ढकलीत कचेरींत न्यायला मी त्याला सांगावं असं त्याला वाटतं; अन् तसं मी सांगत नाहीं तंवर माझ्या सुरक्षिततेची त्याची ही बडबड अशीच चालायची, माहीत आहे मला ! "

" तूं सारंच थट्टेवारी कसं नेतोस ?

" मग काय, तुझं म्हणणं मी घाबरून ओरडत सुटावं ? मला वाटतं वर्तमानपत्रं वाचून तीं मला भेकड म्हणतात तेंच तुला खरं वाटायला लागलं आहे. साऱ्या गटारपत्रांनीं माझी अशी भरपूर निंदा चालवली आहे, माहीत आहे मला. मी कांहीं पुराणकाळांतला खड्गधारी वीरपुरुष नाहीं, कबूल. पण माझ्यासारख्या माणसांतही विशिष्ट प्रकारचं धैर्य असतंच. इतकंच काय बेडरपणानं चार कोट्या कशा कराव्या तेंही समजतं मला. चार हलकट गुंडांनीं माझा प्राण घ्यायची प्रतिज्ञा केल्याचं सोंग आणलं हें ऐकतांच मी घाबरून जावं असं तुला खरंच वाटतं ? छे छे वेडे, असल्या गोष्टी मी क्षुल्लक समजतों. मी ज्यांची चिंता वाहावी अशा अधिक महत्वाच्या इतर गोष्टी थोड्या कां आहेत ? "

" आज पार्लमेंटच्या बैठकींत फार त्रास झाला का तुला ? "

" अं...त्याचं असं आहे, पार्लमेंटची बैठक म्हटली, कीं त्रास हा व्हायचाच. " असं उद्गारून प्रधानांनीं हातांतलं पुस्तक कायमचं दूर ठेवलं, " पण एकंदरीत सारं ठीक चाललं आहे. आमच्यापुढचा हातभर मार्गही स्पष्ट दिसत नाहीं हें लक्षांत घेतां आम्ही करतों आहोंत तें पुष्कळ आहे असं समाधान मानलं पाहिजे. झाडुवाल्याचं काम मला करावं लागतं आहे म्हणेनास. जे साधेल तें करून टाकायचं अशा धोरणानंच चाललं पाहिजे मला. गॉएटेचं एक फार मार्मिक वाक्य आहे कुठें तरी: " माणसानं प्राप्त कार्य शक्तिसर्वस्व एकवटून करावं " असंच कांहीं तरी. तें असो. आजच्या वर्तमानपत्रांत काय आहे नवलविशेष ? "

" नेहमींच्याच गोष्टी. "

" दुसरं काय असणार त्यांत ? ठरारिक ठशाच्या वायफळ बाता... " असं म्हणत प्रधानांनीं वर्तमानपत्रं चाळायसाठीं उचललीं. त्या ओलसर कागदांना चमत्कारिक दर्प येत होता. दृष्टिदोषामुळें त्यांनीं तीं दूर अंतरावर धरलीं, मजकुरावरून नजर फिरवली, अन् मग तीं खालीं बैठकीवर टाकून दिलीं. ते एकदम म्हणाले, " हां हां आठवलं. " जे असाध्याचा ध्यास धरतात ते मला प्रिय असतात ". जर्मन माणसाच्या प्रकृतीचं हें सार आहे. हें त्याचं अलिखित ब्रीदवाक्य आहे. हाच त्याच्या जीविताचा हेतु. " जे असाध्याचा ध्यास धरतात... " असाध्य ! जर्मन लोकांना त्याचीच मोहिनी वाटते. क्षितिजावर स्फुरणारी विद्यूत् ! अप्राप्य ! असाध्य ! नेमकं तेंच त्यांना हवं. ते उपाशी मरत असतांना तुम्हीं त्यांना वांचवलंत, अन्न मिळवून दिलंत, सर्वनाशापासून त्यांचं रक्षण केलंत, तरी त्यांना सुख वाटणार नाहीं, ते कृतज्ञता दाखवायचे नाहींत. त्यांत कल्पनारम्य ध्येय कुठें आहे ? त्यांना पाहिजे उच्च, उदात्त, ध्येयाचं नादयुक्त काव्य ! मजा आहे. असले वेडेपीर मला मनांतल्या मनांत आवडतात बुवा ! "

त्यांच्या बहिणीनं किंचित् चिडून विचारलं, " ते तर तुझे वैरी ? "

" माझे वेरी ? हो, एका अर्थी वैरी खरेच. पण वैऱ्यावर प्रेम करावं अशी धर्माज्ञा आहे ना ? मी तुला सांगतों बघ, दुसरा मनुष्य अमुक तऱ्हेनं कां वागतो हें आपण विचारपूर्वक ओळखलं, कीं मग तो आपला वैरी आहे असं वाटेनासंच होतं. मग तो बलिष्ठ आहे असंही वाटत नाहीं, तो आपला घात करूं शकत नाहीं. तीव्र द्वेषबुद्धि अन् सम्यक् ज्ञान यांचं अगदीं वांकडं आहे."

" मग तुझे वैरी महामूर्ख असले पाहिजेत तर ? "

" आता कसं बोललीस ! तुलाहि विनोद सुचायला लागला बघ. महामूर्ख नाहीं तर काय ! ते साधेभोळे, आडदांड, अविचारी आहेत. दोन अन् दोन चार एवढंच त्यांना कळतं. जो त्यांच्या बाजूचा तो वीर, अन् बाकी सारे चोर बदमाष—संपलं ! सापेक्षता म्हणून कांहीं चीज नसती तर जगाचा कारभार सोपा झाला असता. दुर्दैवानं मी फार विचार करतों. माझ्यातला हा एक दोषच आहे..."

तें वाक्य पुरं न करताच प्रधान गप्प झाले. त्यांनीं टेबलावरचा दिवा दूर सरकाविला त्यामुळें त्यांच्या तोंडावर छाया पडली ते खुर्चीवर मागं टेकले, अन् त्यानीं डोळे अर्धवट मिटून घेतले. त्यांच्या डोळयांचीं झांकणं आजारी माणसासारखीं, सुरकुतलेलीं काळवंडलेलीं होतीं. भालप्रदेश भव्य आणि रेखलेला होता, नाकपुड्या पातळ होत्या, अन् त्यांच्या दोन्ही बाजूंस रेषा उमटल्या होत्या त्यावरून त्याच्या अंतर्यामीं किती चिंता आणि किती थकवा असेल त्याची कल्पना येण्यासारखी होती. ज्याच्या वृत्तींत विचाराचं पूर्ण वर्चस्व आहे अशा माणसाच्या चर्येसारखी त्यांची चर्या होती. पण त्यांच्या मुद्रेकडे पहातांच कांहीं एका चमत्कारिक भयाचा त्यांच्या बहिणीला अकस्मात् अनुभव आला. या क्षणीं त्यांनीं चित्ताला पूर्ण विसांवा दिल्यामुळें त्यांच्या तोंडावर अस्पष्ट हास्य आलं होतं, पण दिव्याच्या छायेंत तें दिसल्यावरोबर त्यांच्या बहिणीच्या मनांत झटकन् मृत्यूची अशुभ कल्पना येऊन गेली.

तिनं चिंतातुर स्वरानं विचारलं, "तूं फारच थकला आहेस?"

"नाहीं. उगीच जरासा. मीं आज फार मोठं भाषण केलं, अन् तें चांगलं वठलं मला वाटतं. पण भाषण परिणामकारक करायचं म्हणजे श्रोत्यांच्या वृत्तीला भरती आणावी लागते, अन् ती आणतांना करावा लागणारा प्रयत्न अन् पडणारा ताण मला आतां उत्तरोत्तर सोसवेनासा झाला आहे." ते बोलतां बोलतां किंचित् गप्प झाले, व मग म्हणाले, "कांहीं लोकांना मानसिक कुस्ती केल्यावांचून साधतां येतात या गोष्टी. असल्या कामाला लागणारी उत्कटता अन् समयसूचकता त्यांच्या ठिकाणीं सदा तयार असते..."

त्यांनीं आपलं मस्तक मागं खुर्चीवर टेकलं, पण त्यांच्या तोंडावर हलकेंच हास्य उमटलं. "कारस्थानी लोकांचं एक टोळकंच्या टोळकं आम्हीं नुकतंच नेस्तनाबद् करून टाकलं आहे. आचरट पोरकटपणा सगळा बेटयांचा. भारी घातुक. पण किती वेडसर ! बनावट किल्ल्या करतील, पण एका कुलपाला त्या लागतील तर शपथ. घरगुती बॉम्बगोळे बनवतील, पण ते कांहीं केल्या उडायचे नाहींत. खोटे कागद तयार करतील, पण ते असे, कीं त्यावरच्या सह्या खोटया आहेत हें चार हातांवरून सांगतां यावं ! या मंडळींत एक इसम मात्र असा आहे, कीं त्याच्या अंगीं नेत्याचे गुण जन्मसिद्ध आहेत. तो अगदीं गरीब कुळांतला आहे. त्याचं नांव ग्रेगॉर, पण तो स्वतःला आस्कोनिअस म्हणवितो. आस्केनिअस ! छान आहे नांव, नाहीं ? ग्रेगॉर फॉन आस्केनिअस ! पंधरा वर्षांपूर्वी त्यानं आपलं घरदार सोडलं, अन् जिथं लढाई झाली तिथें तिथें ही स्वारी प्रगट झालेली आहे. चीनमध्यें, आफ्रिकेंत बाल्कन प्रदेशांत. बातमीदार, एजंट, शिपाई, चित्रपटांतला कामगार असे नाना धंदे केले आहेत त्यानं अन् गेल्या युद्धांत कॅप्टनच्या हुद्दयापर्यंत तो चढला होता. त्याच्या अंगीं साहस आहे. खरं वीरत्वही आहे. अन् मूर्खपणाही आहे. मला वाटतं वीरत्वाबरोबर मूर्खपणा येतोच नेहमीं. असल्या

लोकांचा देशाला उपयोग होत नाहीं हें केवढं दुर्भाग्य. पण त्यांनाच तें नको असतं. कुणाचा ताबा म्हणून ते सहन करायचे नाहींत. मोठे हाल होतात अशा लोकांचे. कारण त्यांच्या दृष्टीनं त्यांना जे पराक्रम वाटतात ते देशाच्या आजच्या कल्याणाच्या दृष्टीनं भयंकर गुन्हे ठरतात. समजून घ्यायचे नाहींत ते कधीं. त्यांना वाटत असतं आपण देशाचा उद्धार करीत आहोंत, पण वस्तुतः ते करीत असतात घात. खरं म्हणशील तर या आस्कोनिअसचा मला पुष्कळदां हेवा वाटतो. पण त्याचे उद्योग बंद झाले नाहींत तर तुरुंगाची हवा पाहावी लागेल त्याला एक दिवस..."

आणि मग एकदम विषय बदलून ते ब्रहिणीला म्हणाले, "खरंच, तुला सांगायचं राहिलं. मघाशीं पॉलिकाउस्कीचं नांव काढलं होतंस ना, त्याला एक गोष्ट सांग. या चार-आठ दिवसांत एक तरुण येईल आपल्या बंगल्यावर. टेलिफोन दुरुस्त करायला आल्याचा बहाणा करील तो. नीट लक्ष ठेव त्याला म्हणावं."

"बहाणा करील? म्हणजे, हें आहे तरी काय?"

"कसलं काय? शुद्ध गाढवपणा. माझ्या एका निनावी हिताचिंतकानं मला इशारत दिली आहे या प्रकारची. दमदाटी करून पाहताहेत हे लोक. मला घाबरवायची खटपट आहे त्यांची. अन् मी भित्रा आहे असं ते मानीत असल्यामुळें त्याना वाटतं असल्या दहशतीनं मी घाबरेन अन् अधिकारत्याग करीन. अधिकारपद सोडायला मी तर उत्सुक आहे. पण माझ्या हतभागी देशाला आधीं या कर्दमांतनं बाहेर काढलं, तरच ज्या यंत्रांत मी सापडलों आहे तें बंद करतां येईल. पण हें बोलून काय फायदा? जाऊं दे. आज नेहमींचा नियम मोडून मी रात्रीं काम करीत बसणार आहे. मला थोडी गरम कॉफी धाडतेस? गारठून गेलों आहे. मला वाटतं पावसांत हिंडलों तें बाधलं."

"तुला हवी तर अवश्य करतें कॉफी. का, 'एल्डरबेरी'च्या पात्याचा चहा करून देऊं? हवा?"

" एल्डरबेरीचा चहा ? इतकं सुंदर नांव आहे हें कीं तो चहा खात्रीनं भयंकर असला पाहिजे चवीला. नको."

त्यांची बहीण दरवाजात थबकून म्हणाली, " तुझ्या लहानपणीं पावसांत नेहमीं हिंडायचास तूं. जोराच्या सरी आल्या कीं पन्हळाखालीं जाऊन उभा राह्यचास अन् गाणीं गायचास. चारपांच वर्षांचा असशील त्यावेळीं."

" खरं म्हणतेस ?

" होय. अन् मग आई तुला धरून घरांत आणून अंथरुणांत निजवायची अन् एल्डरबेरीचा चहा द्यायची. खूप रागं भरत असे ती तुला. मारायची सोय नसे. कारण तूं अगदीं नाजूक होतास आणि मनाला फार लावून घ्यायचास. सोशिकपणा अगदीं नव्हता तुझ्या अंगीं."

" मला रडूं आणायचा बेत आहे काय तुझा ? बरं बरं, कर एल्डरबेरीचा चहा. घेईन मी. तुझी गोष्ट फार गमतीची आहे. होय, केव्हां तरी एकदां मी लहान होतो खास. अन् काय म्हणालीस ? माझ्या अंगीं सोशिकपणा अगदीं नव्हता ? अं ?"

पण त्यांची बहीण खोलीतून निघून गेली होती.

" सोशिकपणा नव्हता ?..." असं स्वतःशींच मोठ्यांदा म्हणून ते विचारांत मग्न झाले. पलीकडच्या खोलींत त्यांच्या कुत्र्याचे श्वासनिःश्वास चालले होते ते त्यांना ऐकूं येत होते. त्यांना जास्तजास्तच गारठल्यासारखं वाटलं. त्या कुत्र्याची ऊब जवळ असेल तर बरं होईल असं त्यांच्या मनांत आलं. त्यांनीं त्याला हाक मारली नाहीं, पण तोच ताबडतोब खोलींत आला, अन् त्यांच्याजवळ येऊन त्यांच्याकडे पहात राहिला. ते कृतज्ञतेनं म्हणाले " किती शहाणा !" त्यांनीं दिव्याचं तोंड फिरवून घेतलं, अन् गॉएटेचा तो ग्रंथ आपल्या थकलेल्या, विचारी, दूरदृष्टीपुढं धरून ते वाचूं लागले.

" व्यक्तींच्या व राष्ट्रांच्या जीवनांत दोन कालखंड असतात...एक संवर्धनाचा, शांतीचा, उत्कर्षाचा... दुसरा विघटनेचा, युद्धाचा, निःपाताचा...

...या दुसऱ्या कालखंडांत जुलूमजबरदस्ती उतास येते...ही सुलतानशाही एका व्यक्तीची असेल, किंवा सामान्य जनतेची असेल...जनतेचा जुलूमही अत्यंत प्रबळ अन् क्रूर असूं शकतो..."

त्यांनीं पुस्तक हातांतून गळूं दिलं अन् त्यांची चर्या शान्त, निर्विकार झाली.

पण ते जसजसे विचारांत अधिक गढले तसतशी त्यांच्या चर्येवरची ती निर्विकार शांति नाहींशी होऊन एकाद्या तामसी साधूला साजेलशी त्यांची मुद्रा गंभीर, कष्टी व कृतनिश्चयी दिसूं लागली. त्यांनीं त्या ग्रंथाच्या पानांवर एकाद्या धर्मग्रंथाप्रमाणें आपलं मस्तक टेकलं, अन् ते हलकेच म्हणाले, " मला लोककल्याण करायचं सामर्थ्य येईल तर किती बरं होईल..."

# ५

'श्रीपृके' बाईच्या सैंपाकघरांत डोकावून ज्योआकिमनं तिला विचारलं, "तुमच्या नवऱ्याचीं किंवा भावाचीं हत्यारं असतील का घरात? मला हवीं आहेत."

"हत्यारं?" श्रीपृकेबाईनं कांदे परततां पसरतां विचारलं.

"हं. आमच्या दिव्याची दुरुस्ती करायला हवी आहे, अन् ती मलाच करतां येते का पाहणार आहे मी. येईल तर काय झालं..."

चुलीवरचं भांडं उचलून पलीकडच्या खोलींत तिचा नवरा जेवत होता तिकडे तें घेऊन जातां जातां श्रीपृकेबाई म्हणाली, "दारामागच्या त्या पेटींत आहेत बघा हत्यारं. तुम्हांला हवीं तीं घेऊन जा. अन् जातांना दिवा घालवून टाका हं."

"थँक् यू!" ज्योआकिम पुटपुटला. श्रीपृकेबाई जाईपर्यंत तो तसाच थांबला. मग त्यानं गुडघे टेकून दारामागच्या पेटींत धुंडाळायला प्रारंभ केला. त्याची छाती धाडधाड उडत होती. पेटीजवळ निळया रंगाच्या कपड्यांचं बिंडोळं पडलं होतं. खरं म्हणजे हे कपडेच त्याला हवे होते. पाशूल्केचे होते ते. कामाच्या वेळीं अंगावर चढवायचे. मळकट, तेलाचा अन् घामाचा भपकारा मारणारे. कांपऱ्या हातांनीं ज्योआकिमनं तें

बिंडोळं उचललं. क्षणभर तो चाचरला, पण मग त्यानं तें खाकोटीला मारल, अन् दिवा घालवून टाकून तो तेथून निसटला आपल्या खोलींत पोचल्याबरोबर त्यानं आपल्या कपड्यांच्या कपाटांत तें बिंडोळं लपवून ठेवलं, अन् उस्कटलेल्या अंथरुणावर अंग टाकलं. अंथरुणांत पडावं, अन् समोरच्या भिंतीवरच्या चित्राकडे टक लावून घटकान् घटका विचार चालू करावा अशी विचित्र सवय त्याला आतांशा जडली होती.

अलीकडे त्याची प्रकृति खराब होत चालली होती. पाहणाऱ्याला अनुकंपा वाटावी इतका तो वाळला होता. त्याचे गाल अगदीं खोल गेले होते. आतांशा त्याच्या अंगावर एकदम शहारे येत. मध्येंच सारं अंग घामानं भिजे. कानठळ्या बसविणारे घडम् घडम् असे आवाज कानांत होत राहत. तेच शब्द डोक्यांत पिंगा घालीत. आणि जेलेनाच्या कुशींत तो निजलेला असतांना त्याला एकदम शक्तिपात झाल्या-सारखं वाटे.

अथरुणावर पडून ज्योआकिम विचार करूं लागला. जी साहसी कल्पना आपल्या डोक्यांत आतां अगदीं पक्की दृढमूल झाली तिचं बीज प्रथम कोणी पेरलं ? ... हो, आस्केनिअसनं ! ... अन् त्यानंच आतां खुशाल आपल्याला सोडून जावं ? ... हो, आस्केनिअस आपल्याला टाकून गेला नाहीं तर काय ? 'युरेनिया ॲशुअरन्स सोसायटी'चं तर विसर्जन करण्यांत आलं होतं, अन् आस्केनियस कुठें नाहींसा झाला होता कुणास ठाऊक ? प्रधानाचा बळी घेण्याच्या प्रतिज्ञेची कुणाला आठवणही राहिली नव्हती.

पोरसवदा ज्योआकिम बुर्थच्या मस्तकांत मात्र ती प्रतिज्ञा पूर्ण जागृत होती !

त्याची बहीण शार्लोट खोलींत आली तिचा चेहरा पांढरा फटक, स्तब्ध, एखाद्या दगडाच्या खोट्या मुखवट्यासारखा दिसत होता. ती

त्याच्या खाटेजवळ बसली, अन् दोन्ही हात आपल्या मांडीवर ठेवून त्याच्याकडे बघूं लागली...

ज्योआकिमनं घाबरून विचारलं, " काय ग ? "

" तूं खाणार ना थोडंसं ? "

" अहं मला भूक नाहीं. "

ती काहीं वेळ स्तब्ध राहून म्हणाली, " आस्केनिअसनं तुला नमस्कार सांगितले आहेत. "

मला ? तुला भेटला होता तो ? "

" हो. " आपल्या उजव्या हाताची मूठ डाव्या हातावर आवळून धरीत तिनं नंतर सांगितलं, " तो निघून गेला. "

ज्योआकिम एकदम उठून बसला, अन् त्यानं विस्मयानं विचारलं,

" काय म्हणतेस ? तुला कसं माहीत ? तुला कसं कळलं ? "

" मला माहीत आहे. दोन दिवसांपूर्वी तो जर्मनीची हद्द सोडून गेला. त्यानं तुला फार फार विचारलं आहे. आम्हीं दोघांनीं एकमेकांचा निरोप घेतला तेव्हां त्यानं तुला नमस्कार सांगायला मला बजावलं. "

मुद्रेची अगदीं एकतानता करून ती त्याच्याकडे सारखी पाहत राहिली. जणूं स्वतःच्या दृष्टींत लपलेलं कांहीं एक गौप्य त्याला समजावं म्हणून ती जोराचा प्रयत्न करीत होती. मग ती हलकेच म्हणाली,

" हो, त्याची माझी फार फार मैत्री होती. जातांना त्यानं माझ्याजवळ काहीं कागद दिले नाहींसे करायसाठीं, अन् तुला सांगायसाठीं निरोप सांगितला. "

" थँक यू. " ज्योआक्मि थंड स्वरांत म्हणाला. दोन्ही हात डोळ्यांवर टेकून त्यानं थोडा वेळ विचार केला व मग त्यानं विचारलं, " फक्त

नमस्कारच ? दुसरा कांहीं निरोप नाहीं सांगितला आस्केनिअसनं ? आमच्या मंडळाबद्दल कांहीं नाहीं ? "

" कांहीं नाहीं " असं म्हणून तिनं मांडीवर टेकलेल्या आपल्या मुठी उचलल्या अन् ती उठून गेली. तिचा चेहरा अजूनही पांढराफटक अन् स्तब्धच दिसत होता.

ज्योआकिम विचार करूं लागला, " मी करणार. अवश्य करणार ! मी अगदीं एकटा आहे, पण मी जें आज करायचं तें करणारच ! उद्यां ! "

त्यानं डोळे मिटून घेतले. त्याला सारा प्रकार स्पष्ट दिसूं लागला. ज्या कृत्याचा त्यानं व त्याच्या दोस्तांनीं कितीदां तरी बेत केला होता, पण जें त्याना करतां आलं नव्हतं, तें कृत्य त्याच्या अंतर्दृष्टीपुढें अगदीं घडत असल्यासारखं उभं राहिलं. त्यानं कामकऱ्याचे घामट निळे कपडे अंगावर चढविले होते, व हत्यारांची पिशवी खाकेंत धरली होती. प्रधानांच्या घरीं तो निघाला होता. दाराशीं जाऊन तो म्हणाला टेलिफोन दुरुस्त करायला आलों आहे. आंत जाऊन तो विजेच्या तारा तपासून पाहूं लागला. तें करतांना त्याचा हात कांपला नाहीं, कीं " आंतल्या खोलींतल्या तारा पाहिल्या पाहिजेत " असं तिथल्या नोकराला म्हणतांना त्याचा स्वर कंप पावला नाहीं. नोकर म्हणाला, आंत प्रधान आहेत त्यांना त्रास होईल. ज्योआकिम म्हणाला, पण मला आंत गेलंच पाहिजे, एका मिनिटांत मी काम आटपीन. मग दार उघडलं गेलं, अन् त्यानं आंत पाऊल टाकलं...

त्या क्षणीं त्याचा सारा श्वास गुदमरून गेला. त्याची चाहूल ऐकून प्रधानांनीं वर मान करून पाहिलं. किती कुरूप दिसले ते. एखाद्या बेडकासारखा होता त्यांचा चेहरा. ज्योआकिमनं तो चेहरा ओळखला. व्यंगचित्रांत अन् प्रचार-पत्रकांत त्यानं तो पाहिलेला होता. त्यानं झटकन् आपल्या खिशांतून पिस्तुल ओढलं अन् उडविलं. तो बार त्यानं स्पष्ट

ऐकला. त्या एका बारांत त्याचे स्वतःचे पंचप्राण आणि त्याच्या बांधवांचे प्राण शृंखला तोडून बंधमुक्त, स्वतंत्र झाले! त्यानं पिस्तुल आपल्या कपाळावर टेकून पुन्हा चाप ओढला. हा दुसरा बार त्यानं ऐकला नाहीं...

तो मरून पडला. प्रधानाच्या मृत देहाजवळच त्याचाही देह पडला. त्याचं कृत्य आटपलं!...

ज्योआकिमनं डोळे उघडले. आपल्या अंथरुणाकडे, संध्याकाळच्या खिन्न प्रकाशाकडे, खिडकींतून दिसणाऱ्या रस्त्यांतल्या घरांच्या विटक्या भिंतींकडे तो आश्चर्यानं पाहूं लागला. त्याला मनस्वी थकल्यासारखं वाटलं. त्याचं सारं अंग घामानं न्हाऊन निघालं होतं.

मग त्याला एकदम मोठा हुंदका आला. आंसवांनीं डोळे भरून गेल्यामुळें समोरच्या चित्रांतल्या आकृती थरथर कापताहेतसं त्याला वाटलं त्यानं दिवा मालवून टाकला, अन् उशींत डोकं खुपसून तो रडूं लागला. अखेर त्या दुःखांतून निद्रेनं त्याची मुक्तता केली. ती त्याला दूर घेऊन गेली!... त्याचा देह शय्येवर स्वस्थ पडला होता. नियति त्याची वाट बघत उभी होती!...

ज्योआकिम झोंपेंतून जागा झाला तेव्हां बाहेर पाऊस पडत होता. नोव्हेंबर महिन्यांतले दिवस होते ते. खिडक्यांच्या तावदानांतून आंत आलेला सूर्यप्रकाश क्षीण होता. ज्योआकिम उठून अंथरुणावर बसला अन् विचार करूं लागला. काल रात्रींपेक्षां आतां त्याला अधिक हुशारी वाटत होती, अधिक उल्हास वाटत होता, त्याची चित्तवृत्ति अधिक प्रसन्न झाली होती. तो आठवून पाहूं लागला. रात्रीं त्याला स्वप्न पडलं होतं! कसलं? 'बर्च' वृक्षाचं! काय चमत्कार! आजपर्यंत बर्च वृक्ष कसा तो त्यानं कधीं पाहिलाहि नव्हता! तो विचार करूं लागला, आज आपण इतके आनंदांत कसे? आपण आजारी होतों, नव्हे? काय वाटेल तिकडे भरकटताहे आपलं मन झालं! आपल्याला एखादं भयंकर स्वप्न पडलं असलं पाहिजे! पण आतां आज? काय घडेल आज?

घडेल ? शीः ! कांहीं नाहीं. आपण उठूं, तोंड वगैरे धुऊं, कपडे करूं, अन् कदाचित् युनिव्हर्सिटींत जाऊं. तिसऱ्या प्रहरीं वाटलं तर जेलेनाकडे जाऊं. पैसे ? घेऊं थेलमानकडून उसने. मग नवे सुंदर बूट घेऊं विकत, मजा करूं. कांहीं झालं तरी मजा करायला कोण नको म्हणतं आहे ?...

पण हे सारे बेत म्हणजे मनाची शुद्ध फसवणूक होती. मनांतल्या मनांत ज्योआकिम पक्कं जाणून होता, कीं ज्या कृत्याचा निश्चय त्यानं केला होता तें तो आज करणार होता...

दिवस चांगला वर आला तेव्हां तो उठला. त्यानं तोंड स्वच्छ धुतलं. कपड्यांचं कपाट उघडतांच त्यांत लपवून ठेवलेल्या तेलकट घामट निळ्या कपड्यांचा त्याला वसकन् वास आला. पण त्यानं तो मानला नाहीं. त्यानं कपडे केले, आपलं लष्करी पिस्तुल खिशांत घेतलं अन् निळ्या कपड्यांचं तें बिंडोळं कोटाच्या आंत लपविलं. थोड्याच वेळानं तो घराबाहेर पडला !

# ६

प्रधानांचा खून झाला त्यानंतर दुसऱ्या दिवशीं पाऊस थांबला. तो थांबला तो मात्र तिसऱ्या प्रहराच्या आधीं एकदम. प्रथम ढगांमधें एक निळी चीर दिसूं लागली, ती हलके हलके मोठी होत गेली, सूर्यप्रकाशाचे किरण फुटले, रस्त्याच्या फरसबंदीवरून सुवर्ण-रंगी वाफा उठूं लागल्या अन् मग चर्चच्या मागच्या बाजूस इंद्र धनुष्य दिसूं लागलं. संध्याकाळच्या सुमारास आभाळ निवळलं, तांबूस विरळ ढगांचा झुपका माथ्यावरून वेगानं सरकत गेला अन् पूर्व दिशेला नाजूक चंदेरी शशिबिंब क्षितिजावर चढून शोभूं लागलं. आकाशाच्या रंगभूमीवर नयनरम्य नाट्यप्रसंग घडत होता, स्वर्गीय स्वप्नरचना चालली होती, पण तिकडे लोकांचं लक्ष असणार कोठून? शहरांत ठिक-ठिकाणीं अर्धांतरावर ठेवलेलीं, पावसानं भिजून निश्चल झालेलीं निशाणं आतां थोडीं सुकूं लागलीं होतीं, तीं वाऱ्यानं फडफडलीं कीं उडण्याचा पहिलाच प्रयत्न करण्यासाठीं पंख फडफडविणाऱ्या काळ्या पांखरांसारखी दिसत होतीं. भीतीनं व धास्तीनं शहरांतले सारे स्त्री-पुरुष जणूं घराबाहेर पडले होते, अन् रस्त्यांत कधीं नव्हे अशी रहदारी सुरू होती. लोक ठिकठिकाणीं जमावानं उभे होते, ओळख-पाळख नसलेले

तिऱ्हाईत एकमेकांशीं बोलत होते, वर्तमानपत्रांच्या कचेऱ्यांपुढें झुंडीच्या झुंडी उभ्या होत्या, मुख्य पोलिसठाण्याला तर प्रचंड गर्दीचा वेढाच पडला होता. रस्त्यांत जिथें तिथें कुजबुज चाललेली होती, जिकडे पाहावं तिकडे दुःखाचं अशुभ पटल पसरल्यासारखं दिसत होतं. शहरांतल्या मोठ्या बागेंतल्या अगदीं टोकाच्या भागांत प्रधानांचं प्रेत ज्या जागीं आढळलं त्या जागीं सशस्त्र सैनिकांचा पहारा उभा होता. सैनिकांच्या सांखळीमागं आपापसांत कुजबुजणाऱ्या किंवा अगदीं स्तब्ध राहिलेल्या लोकांची भिंतच्या भिंत खडी होती. लोकांची ती अष्टौप्रहर सारखी लागली होती. जणूं त्या भयंकर स्थलाकडे त्यांचे पाय ओढले जात होते. ज्योआकिमचा बाप इतका विटलेला मनुष्य, पण तो सुद्धां त्या जागीं गेला. ज्या हिरवळीच्या पट्ट्यावर आतां फक्त थोडीशीं सुकलेलीं पानंच दिसत होतीं त्याकडे पाहत तो विचार-मग्न होऊन स्तब्ध उभा राहिला. मग तो प्रधानांच्या घराकडे गेला, व तिथें तळमजल्यावरच्या एका खोलींत दुखवटा काढायला आलेल्या माणसांनीं आपलीं नांवं लिहावीं म्हणून एक पुस्तक ठेवलेलं होतं त्यांत त्यानं सही केली. घरीं गेल्यावर तो अगदीं हळू आवाजांत बोलत होता. मृत्यूनंतर शत्रूबद्दल-सुद्धां आदर दाखविला पाहिजे हें तो जाणत होता.

इतर हजार लोक त्या मोठ्या बगीचाकडे चालले होते त्यांतच ज्योआकिम बुर्थही होता. कुणी त्याकडे लक्ष द्यावं असं त्या तरुणाच्या ठिकाणीं काहींच नव्हतं. जिथें गर्दी उभी होती तिथे पोंचल्यावर त्यानं पुढें घुसण्याचा प्रयत्न केला नाहीं. पण काहीं वेळानं लोकांच्या धक्क्यांनींच तो पुढें लोटला गेला. सैन्यांच्या खांद्यावरून डोकावून त्यानं खुनाच्या जागेकडे वटारून पाहिलं, त्या वेळीं काळसर वलयांनीं विशोभित झालेल्या त्याच्या डोळ्याची दृष्टि स्तिमित दिसली. समोर हिरवळीवर सुकलेल्या पानांचा लहानसा ढीग त्याला दिसला. हिरवळीवरची पायवाट कोरडी व्हायला लागली होती, अन् तिच्यावर उठलेल्या पावलांच्या खुणा अस्पष्ट होऊं लागल्या होत्या. जवळच

एक बाक होतं, अन् पलीकडे, जिथें पायवाट वळण घेऊन जात होती तिथें एक बोडका दिव्याचा खांब उभा होता. ज्योआकिमच्या घशाला कोरड पडली म्हणून त्यानं खाकरल्यासारखं केलं. कांहीं वेळ उभं राहिल्यानंतर तो तेथून निघाला. घरीं जाऊन तो अंथरुणांत पडला. तो जेव्हां जागा झाला तेव्हां त्याचं तोंड अगदीं कडवटून गेलं होतं, अन् डोकं इतकं सुंद झालं होतं कीं कांहीं विचार करणं शक्यच नव्हतं. तो पुन्हा घराबाहेर पडला, अन् पुन्हा मोठया बगीचांतल्या 'त्या' जागेकडे गेला. अजून तिथें मोठा जमाव उभा होता. लोक निराळे होते, पण ते पहिल्या लोकांसारखेच दिसत होते. या वेळीं मर्घाच्या विरुद्ध बाजूला जाऊन ज्योआकिम उभा राहिला, त्यामुळें सैनिक लोक त्याला समोरून दिसले. खूप माहिती असल्याचा आव आणणारा एक इसम बोट दाखवून लोकांना सांगत होता, "त्या तिथें पडलेले आढळले ते. तोंड हिरवळीवर हात, अन् पाय त्या वाटेवर होते, पिस्तुल जवळच पडलं होतं."

एक स्त्री हळू आवाजांत म्हणाली, 'पालथे पडलेले असतील, नाहीं-?'

"अर्थात्, गोळी लागली, कीं माणूस नेहमीं पालथाच पडतो!" हें सांगतांना त्या सर्वज्ञ इसमानं असा कांहीं स्वर काढला, कीं ऐकणारानं तें निर्विवादच समजावं.

एका हातानं थोटा असलेला एक इसम इतका वेळ स्तब्ध उभा होता तो म्हणाला, "जर्मनींतल्या उत्तमांतल्या उत्तम माणसाला मारलं या लोकांनीं."

दोन तरुण कामकरी घुसून पुढच्या रांगेंत ज्योआकिमच्या शेजारीं आले. त्यांनीं डोक्यावरच्या टोप्या काढल्या. जणूं समोरच्या हिरवळीवर प्रधानांचं शव अजूनही होतंच. ज्योआकिम मग तिथे अधिक उभा राहिला नाहीं.

बराच वेळ तो शहरांत भटकला, कोपऱ्याकोपऱ्यावर उभा राहिला, मनांत कसलाच हेतु न धरतां वाटेल तें करीत राहिला. उदाहरणार्थ, एका बुटांच्या

दुकानांत जाउन भारी किंमतीचे ढीगभर बूट त्यानं पाहिले, अन् मग खरेदी न करतां, दुकानदाराशीं एक अक्षरही न बोलतां तो तिथून उठून गेला. एकदां एका पोलिसाजवळ जाऊन त्याच्या नजरेकडे चमत्कारिक तऱ्हेनें पाहत त्यानं त्याला कायसं हळूच पुटपूटून विचारलं. वेळ अगदीं मंद गतीनं चालला होता. किंबहुना कालाची गति बंदच झाली होती असं ज्योआकिमला वाटलं. प्रधानांच्या खुनानंतर काळानं कांहीं एक विचित्र स्वरूप धारण केलं होतं. तो जागच्या जागीं थबकला होता. त्याचा प्रवाह आजिबात थांबला होता. एखाद्या जलौघ नं आपली गति बंद करावी आणि कसल्या तरी भयसूचक अपेक्षेनं खुंटून निश्चल व्हावं, तसं कालाचं झालं होतं. दूर अंतरावरच्या आरशांतल्या प्रतिबिंबाप्रमाणें साऱ्या वस्तू सपाट, अनोळखी, छायांसारख्या भासत होत्या. जणूं ज्योआकिमच्या जवळ येण्यापूर्वी त्या थबकून उभ्या रहात. तोडून उन्मळून टाकलेल्या झाडासारखी ज्योआकिमची अवस्था झाली होती. विचित्र भयप्रद कोंडींत सापडल्यासारखं त्याला वाटत होतं. प्रधान मृत झाले होते, त्यांचा देह किनखापी तिरडीवर पडला होता. ज्योआकिम बुर्थ जिवंत होता, रस्त्यानं हिंडत होता. कुणाला वाटावं त्याला बूट विकत घ्यायची घाई झाली आहे ! पण जीवनाशीं पुरती ताटातूट कुणाची झाली होती ? प्रधानांची ? नव्हे, ज्योआकिमची !

तो अजून जिवंत होता. त्याबद्दल वाद नव्हता. प्रधानांवर गोळी झाडल्यानंतर लगेच स्वतःवर पिस्तुल चालवायचा त्यानं बेत केला होता; पण ते घडले नव्हतं, अन् त्यामुळें तो आता जें जीवन त्याच्या वाट्याला आलं होतं ते सर्वस्वी हेतुशून्य, रिक्त होतं. त्याला भय वाटत होतं असं मुळींच नव्हे. किंबहुना तें भयंकर कृत्य करूनही आपण इतके शांत अन् बेफिकीर कसे राहिलों आहोंत असं तो आश्चर्यच करीत होता. सध्याच्या संवेदनाशून्य जीवनांतही मध्येंच असा एखादा क्षण चमके, कीं त्या क्षणीं त्याच्या

वृत्ती एकदम उचंबळून येत. आनंद, अभिमान, विजयोन्माद इत्यादींची अजस्र लाट त्याच्या अंतःकरणांत उसळून जाई, आरोळी कोंडल्याप्रमाणें त्याचा कंठ दाटून देई, आणि त्याच्या हृदयाचे ठोके भडकल्यासारखे, घणाच्या घावांसारखे पडूं लागत. पण हीं अवस्था क्षणभरच टिके अन् नंतर तो अगदीं थकून जाई. त्या अवस्थेचा येवढाच परिणाम शिल्लक राही कीं मोठ्या बगीचांतल्या ज्या स्थळीं त्यानं हें कृत्य केलं होतं त्या स्थळाकडे वाट-आडवाट करीत पुन्हां जावं अशी इच्छा त्याला बोचूं लागे. जेलेनाच्या घराभोंवतीं घिरट्या घालताना ज्या चोरट्या मधुर अपेक्षांची संवेदना त्याच्या अनुभवास येई तसंच काहींसं या इच्छेचं स्वरूप होतं. शेवटीं संध्याकाळीं तिसऱ्यांदा तो बगीचाकडे निघाला तेव्हां मात्र त्यानं आपले पाय आवरले अन् तो एकदम परत फिरला.

अशा प्रकारें युक्तायुक्ततेची त्याची जाणीव परत आल्यावर त्याची चाल देखील सुधारली. छाती ताठ काढून लष्करी थाटांत तो तालावर पावलं टाकीत निघाला. शहराच्या अगदीं टोकाच्या वस्तींत तो गेला. तिथल्या एका लहानशा मदिरागृहांत त्याचे दोस्त नेहमीं जमत असत. इमारतींत शिरून त्यानं विचारलं, “ कुणी आलं आहे का ? ”

नोकरानं हातांतलं मळकं फडकं झटकीत म्हटलं, “ होय साहेब, बहुतेक सारी मंडळी जमली आहेत.”

ज्योआकिम आतल्या दालनांत गेला. त्याच्या दोस्तांनीं त्याच्याकडे विशेष लक्ष दिलं नाहीं. त्यानं पुटपुटून त्याना अभिवादन केलं. तो वाट काढून टेबलामागच्या एका बाकावर बसायसाठीं गेला तेव्हां चारपांचजणांनीं मान हालवून “कसं काय ? ठीक ? ” केलं. टेबलापाशीं पांच मंडळी आधींच बसली होती. गार्व्हेन्स नांवाचा वकिलीची परीक्षा पास झालेला विद्यार्थि डोळ्यांवरचा चष्मा सावरीत घोगऱ्या आवाजांत एक वर्तमानपत्र वाचीत होता. बाकीचे ऐकत होते. टेबलाच्या टोकाशीं बसलेला स्पिअेस नांवाचा विद्यार्थि मधून मधून

एखादं वाक्य बोलत होता. मंडळींत खिन्नतेचं अन् मुद्दाम स्वीकारलेल्या स्तब्धतेचं वातावरण पसरलेलं होतं.

वृत्तपत्रांतल्या खुनाबद्दलच्या ताज्या बातम्या वाचतां वाचतां कांहीं वेळानं गार्व्हेन्सचं लक्ष ज्योआकिमकडे गेलं तेव्हा तो "बूर्थ? अरे, तूं कसा इथें?" येवढंच म्हणाला, अन् पुढें वाचूं लागला. ज्योआकिमला या गोष्टीची चीड आली, त्या मंडळींचा त्याला राग आला, त्यांची कींवही वाटली. 'हा गाढवानो, तुम्हाला खरी गोष्ट कळली तर!...' असं त्याच्या मनात आलं. ते त्याचे एका काळचे दोस्त त्याला या क्षणीं महामूर्खासारखे वाटले. स्वतांत व त्यांच्यात केवढं अंतर आहे याची त्याला एकदम जाणीव झाली. तो त्यांच्याहून अगदीं वेगळा होता. ते इथें गुत्यात बसत होते, 'बिअर' चे पेले फस्त करीत होते, लंब्याचवड्या बाता करीत होते; त्यांच्या हातून कांहीं कृति घडेल तर शपथ! त्याच्या डोक्यातल्या साहसी विचाराची व त्यानं करून टाकलेल्या कृत्याची त्याना दाद नव्हती, शंकासुद्धा नव्हती. त्यांच्याशीं तो काय बोलूं शकणार? तो जें सांगेल तें त्यांना कसं खरं वाटणार? त्यानं हात चालविला होता, त्यांच्या जिभांचे पट्टे चालले होते–त्याच्यांत व त्यांच्यांत समानशीलता कुठें राहिली होती? त्याच्या मनात आलं, आतां ते आपल्या दृष्टीला जसे निर्बुद्ध, कंटाळवाणे, सामान्य दिसताहेत तसेच ते वस्तुतः पूर्वीं-सुद्धां होते काय? त्यानं आपल्या हातांतला ग्लास अगदीं घट्ट पकडला. स्वप्नात किंवा वायूचा झटका आल्यावर माणूस भोंवतालच्या साऱ्या गोष्टींवि-षयीं बेभान होतो तसल्या बेहोषपणाचा झटका त्याला पुन्हा येऊं लागला. त्या दालनाच्या साऱ्या भिंती आंत कलंडत आहेतसं त्याला वाटलं. त्याच्या मेंदूची क्रियाच एकदम बंद झाली. तो पुन्हा भानावर आला तेव्हां गार्व्हेन्सच्या आवाजाचा खडखडाट चालूं असलेला त्यानं ऐकला. वृत्तपत्रांतले स्तंभच्या स्तंभ निषेधानं भरलेले होते.

स्पिअेस मधेंच म्हणाला, "प्रधान हयात होते तेव्हां हींच पत्रं त्यांच्यावर

शिव्याशापांचा वर्षाव करीत होतीं. अन् आतां स्तुतीला कांहीं मर्यादा राहिलेली नाहीं ! हंः ! ''

चष्म्यांतून वटारून पाहून गार्व्हेन्स म्हणाला, " मृताविषयीं चांगलंच बोलायचं असतं. तुझं म्हणणं काय प्रधानांचा असा शोककारक मृत्यु झाला, म्हणून वृत्तपत्रांनीं ' शाबास ' म्हणून आरोळ्या ठोकाव्या, अन् आनंदाचे समारंभ करा म्हणून लोकांना सांगावं ? ''

ज्योआकिम खरंच आनंदानं आरोळी ठोकायसाठीं उत्सुक होता. पण त्यानं ग्लास आणखी घट्ट धरला, अन तो आपल्या जागीं निमूटपणें बसून राहिला.

एक फिकट रोगट चेहऱ्याचा तरुण म्हणाला, " प्रधान गेले, मार्ग मोकळा झाला, कबूल ? पण त्यांची जागा कोण घेणार ? त्यांच्यापेक्षां अधिक लायक माणूस आहे का देशांत ? ते निदान व्यवहारचतुर होते, सज्जन होते. गृहस्थ या दृष्टीनं नांव ठेवण्यासारखं कांहीं नव्हतं त्याच्यात...''

गार्व्हेन्स म्हणाला, " कसं बोललात ! म्हणून त्यांच्या शवावर फुलंच उधळली पाहिजेत. त्याची आठवण काढून अश्रू सांडले पाहिजेत आपण. बूर्थ, तुझं आरोग्य चिंतण्यासाठीं हा ग्लास मी पितों. आज अगदीं घुम्यासारखा बसला आहेस तूं. कां रे ? "

बूर्थनं ग्लास उचलला, " तुझं आरोग्य...'' एवढंच तो म्हणाला. तितक्यांत पलीकडच्या टेबलावरच्या मंडळींनीं संध्याकाळच्या वृत्तपत्राचा ताजा अंक या मंडळींस दिला. त्या फिकट चेहऱ्याच्या माणसानं म्हटलं, " बघा, बघा, वाचा. खुनी इसमाचा कांहीं पत्ता लागतो आहे का ? "

स्पिअेस वाचतां वाचतां सांगूं लागला, " बागेजवळच्या एका सार्वजनिक मुत्रीत कामगार घालतात तसले निळे कपडे सापडले. पोलिसांनीं ते आपल्या ताब्यांत घेतले आहेत. त्या कपड्यांवर चिखलाचे बरेचसे डाग आहेत. त्यावरून तपासाची कांहीं तरी नवी दिशा सापडण्याचा संभव आहे. "

गार्व्हेन्स म्हणाला, "छान, छान! आतां बर्लिन शहरांतल्या साऱ्या मुख्या तपासतील पोलिस. स्पिअेस तुझं आरोग्य चिंतितों!"

"तुझंही." असं म्हणून स्पिअेसनं तें वर्तमानपत्र ज्योआकिमच्या हातीं दिलं.

ज्योआकिमच्या हाताला तें ओलं ओलं लागलं, अन् त्याचा विचित्र दर्प त्याच्या नाकांत भरला. प्रत्येक संवेदना त्याच्या मेंदूला अगदीं स्पष्ट कळत होती. आपल्या उभ्या हातावर त्यानं कपाळ टेकलं अन् तो वाचूं लागला. त्यानं ठळक टाइपांतले मथळे पाहिले, निळ्या कपड्याची ती बातमी पुन्हा वाचली, अंत्यविधीचा समारंभ केव्हां कसा होणार त्याबद्दलच्या वर्णनावरूनही त्यानं उडत उडत नजर टाकली. अन् मग तो एकदम दचकला. त्याच्या हृदयाचे ठोके थांबले. पानाच्या अगदीं तळाशीं आस्केनिअसचं नांव त्याला आढळलं. तो वाचूं लागला,

"अगदीं ताज्या तपासावरून असं वाटायला लागलं आहे कीं लष्करी नोकरींतून निवृत्त झालेल्या एका इसमाचा या खुनाशीं संबध असावा या इसमानं फॉन आस्केनिअस असं नांव धारण केलेलं असून तो शहरांत एक भाड्याची खोली घेऊन राहत होता. अलीकडे बरेच दिवस तो कोठें दिसलेला नाहीं. त्याची उंची पांच फूट सहा इंच असून तो वर्णानं काळसर आहे. त्याचे केस पांढरे आहेत, त्याच्या मानेवर व डाव्या गालावर तरवारीच्या जखमांचे वण असून डाव्या हातावर नुकतीच जखम झालेली आहे. तो अखेरचा दिसला तेव्हां लोकरीच्या कॉलरचा शिकारी कोट, अन् करड्या रंगाच्या 'ब्रीचेस' त्यानं घातल्या होत्या आणि पोटऱ्यांवर 'पट्टी' बांधल्या होत्या. या इसमाचा ठावठिकाणा कुणाला माहीत असेल तर त्यानं मुख्य पोलिस कचेरींत ती माहिती द्यावी."

हा मजकूर वाचतांच ज्योआकिमच्या दृष्टीला आस्केनिअसची मूर्ति दिसूं लागली. अगदीं स्पष्ट, जणूं त्या मूर्तीनंच दशदिशा व्यापल्या होत्या.

आस्केनिअस त्याला नेहमीं कांहीं झालं कीं " खुळारे खुळा ! " असं म्हणे ते शब्द देखील त्याला स्पष्ट ऐकूं आले. मात्र या वेळीं त्याच्या बोलण्यांत उपरोध नव्हता, आणि त्याच्या स्वरांत मार्दव—कारुण्ययुक्त मार्दव—होतं. आस्केनिअसविषयींच्या हळुवार प्रीतीनं ज्योआकिमचं हृदय इतकं उचंबळून आलं कीं त्याचा चेहरा एकदम फिका झाला. त्याच्या ओठांवर निकराचं आर्जवी हास्य दिसूं लागलं. तो उठून उभा राहिला.

" हें काय ? " असं म्हणून गार्व्हेन्सनं त्याला ओढून बाकावर बसविलं.

" नाहीं, कांहीं नाहीं ... पण या वृत्तपत्रांत आस्केनिअसबद्दल— "

" श् जरा हळू ... "

मग कुणीच कांहीं बोललं नाहीं.

तिथें जमलेल्या त्या सर्व मंडळींची खात्री होती हें कृत्य आस्केनिअसवांचून दुसऱ्या कुणाच्या हातून घडणंच शक्य नाहीं. प्रधानाच्या खुनाच्या पहिल्या त्रोटक बातम्या वृत्तपत्रांत त्यानी वाचल्या तेव्हांच ते मनात समजले होते कीं, हें काम दुसऱ्या कुणाचं नव्हे, आस्केनिअसचंच. या विचाराची आपल्याकडून वाच्यता होऊं नये म्हणून ते एकमेकांत कुजबुजून जपून बोलत, खुनाचा निषेध करायचीही हुक्की त्यांना मधेंच येई; पण त्यांच्या या प्रयत्नानीं गुन्हेगार कोण हें ते पूर्ण जाणून होते ही गोष्ट उलट उघड होत असे. आतां वृत्तपत्रांनींच आस्केनिअसचं नांव घेतलेलं पाहून मात्र त्यांनीं ओळखलं कीं लक्षण कांहीं ठीक दिसत नाहीं. त्यामुळें टेबलावर पडलेल्या त्या वर्तमान-पत्राच्या ओलसर अंकाकडे दृष्टि टाकीत सारेजण स्तब्ध झाले. कुणी एक अक्षरसुद्धां तोंडावाटे काढीना. गुत्त्यांतला नोकरसुद्धां टेबलाजवळ उभा राहिला तो हातांत थाळी सावरून मुकस्तंभासारखा निश्चल.

अखेर गार्व्हेन्स म्हणाला, "कांहीं झालं तरी आस्केनिअस कुठं लपून राहिला आहे तें आपल्यापैकीं कुणाला माहीत नाहीं हे तर खरं. आपल्याला किती तरी

दिवसांत तो भेटलेला नाहीं, अन् त्याची माहिती तरी कुठें आहे आपल्याला फारशी?...आहे?...झालं तर!"

त्यानं बिअरचा ग्लास उंच केला. सगळ्यांनीं ग्लासाला ग्लास लावले त्यांचा किणकिण ध्वनि झाला. गार्व्हेन्सच्या बोलण्यांतला अभिप्राय सगळ्यांच्या ध्यानांत आला. मग ती मंडळी दुसऱ्याच गोष्टी आवेशानं मोठमोठ्यांदा बोलूं लागली.

ज्योआकिमनं आणखी एकदां उठण्याचा प्रयत्न केला. तो कसाबसा उभा राहिला. त्याची मुद्रा भांबावलेली, निस्तेज, शाळेंतल्या एखाद्या गर्भगळित विद्यार्थ्यासारखी दिसत होती.

गार्व्हेन्स गुरगुरला, "बैस रे. बैस. काय, झालं आहे तरी काय तुला?"

ज्योआकिम चाचरत म्हणाला, "पण लोकांना असं कसं म्हणूं द्यायचं आपण? आस्त्रेनिअसनं हें कृत्य केलेलं नाहीं. तो जर्मनी सोडून गेलेला आहे."

स्पिअेस उठून त्याच्याजवळ आला, व त्याला दाबून खालीं बसवीत म्हणाला, "हां पुरे-पुरे, बूर्थ, तमाशा करावयाचा आहे का तुला?" बाकीची मंडळी त्या दोघांकडे पाहत राहिली.

गार्व्हेन्स नोकरांकडे पाहून ओरडला, "ए, ए! गाणं सुरू कर. वाजव!"

बँडचं यंत्र वाजूं लागलं. पण तें जुनं अन् मोडकं होतं. त्यांतून संगीताच्या स्वरांइतकाच खरखराट अन् कर्कश चिरचिराट बाहेर पडूं लागला. सगळी मंडळी मोठमोठ्यानं बोलत होती त्याचा कोलाहलही त्यांतच मिसळला.

गेल्या दोन दिवसांत वारंवार जी अभिमानाची, विजयोन्मादाची उसळी ज्योआकिमच्या अंतःकरणात उठली होती तीच आतांही उठली. तो मनाशी म्हणाला, "बस्! सांगून टाकूं या लोकांना मींच तें केलं म्हणून...बोलूं आपण ..." तो फार प्याला नव्हता, पण तो उभा राहिला तेव्हां त्याच्या लक्षांत आलं कीं आपण झिंगलों आहोंत.

तो ओरडून म्हणाला, "दोस्त हो! भाई हो! ऐका. मला तुम्हांला कांहीं सांगायचं आहे. आपण मूठमाती द्यायला उभे आहोंत. एक उमदा

माणूस मेलेला आहे. होय, उमदा असंच म्हणतों मी. कारण ज्याच्या कृत्याचं क्षालन मृत्यूनं झालं तो मनुष्य उमदाच होय! (गाव्हेंन्स गुरगुरला, ए ब.बा, पुरे, पुरे!) मृत प्रधानांच्या दृष्टीला दृष्टि लावून ज्यानं ज्यानं पाहिलं असेल तो सांगेल मी बोलतों आहे तें खरं आहे म्हणून. (ज्योआकिमच्या मनांत आलं, हें मी काय भरकटतों आहे?) पण तें असो. जें कृत्य झालं त्याचे परिणाम हे झालेच पाहिजेत. ज्यानं तें केलं तो कोणीहि असो– मी म्हणतों तो कोणीही असो–येवढं खास कीं आपलं कृत्य वाया जाऊं नये अशी त्याची इच्छा असली पाहिजे. आतां तुम्हीं आम्हीं कांहीं तरी करून दाखवावं असं त्याचं मागणं असणार. हें मागण्याचा त्याचा हक्क खचित आहे. तुम्ही आतां नुसते हात जोडून उभे राहणार अन् वेळ दवडणार काय? आहांत कुठें तुम्ही सगळे? तुमचे ते झेंडे अन् तुमचीं तीं शस्त्रं काय झालीं? जो तुमचा एके काळीं दोस्त होता त्याची जागा भरून काढायसाठीं तुमच्यापैकीं कोण कोण पुढें येणार? ("झिंगला आहे तो! बैस! तोंड बंद कर! ए बूर्थ!) छे छे, मी काय म्हणतों तें तुम्हांला समजत नाहीं. तुम्हांला एक गोष्ट सांगतों—"

ज्योआकिमचं तें भडकलेलं भाषण एकदम थांबलं. एखादं पिशाच्च दिसल्याप्रमाणें त्यानं समोर दाखविलं, आणि ओठ आवळून तो हलकेच म्हणाला, "आस्केनिअस—"

सगळ्यानीं भयभीत होऊन दचकून दरवाजाकडे पाहिलं.

दरवाजांत आस्केनिअस उभा होता!

वर्तमानपत्रांतल्या त्या वर्णनाप्रमाणें अगदीं हुबेहुब! उंच, कृष्णवर्ण, तोंडावर वण, डाव्या हातावर फडकं, शिकारी कोट, ब्रीचेस, अन् मुद्रा नेहमींसारखीच. शांत, हसरी, उपरोधी!

तो आंत येऊन म्हणाला, "काय दोस्त; ठीक? तुम्ही सगळे भेटलांत, मला फार आनंद झाला. अर्थात् अर्थात्, मला बिअर पाहिजे, खायलाहि

कांहीं तरी पाहिजे. फार लांबचा प्रवास करून आलों आहे मी! हं, काय नवलविशेष?"

"आस्केनिअस!—" ज्योआकिम हळूच म्हणाला, अन् एखाद्या झोपेंत चालणाऱ्या माणसानं हसावं तद्वत् त्यानं हास्य केलं. त्याच्या प्रिय सुहृदाच्या स्कंधाचा स्पर्श त्याला झाला तो त्याला किती सुखाचा वाटला. क्षणभर त्या मंडळींपैकीं कुणीच कांहीं बोललं नाहीं. जणूं सगळेच किंचित् भयभीत होऊन, भांबावून निःशब्द झाले होते. मग आस्केनिअसशीं हस्तांदोलन करण्यासाठीं साऱ्यांचे हात पुढे झाले. टोकाला बसलेला स्पिअेस आपला ग्लास उंच करून उठला, व गर्जना केल्याप्रमाणें ओरडला,

"जीते रहो, आस्केनिअस! शाबास!"

उल्हासाच्या आणि आनंदाच्या आरोळ्या उठल्या. आस्केनिअस कांहीं वेळ मोठमोठ्यानं हसत राहिला. मग तो म्हणाला, "अरे पण हो हो, बच्चे लोक! किती दंगा हा! बस्!"

गार्व्हेन्सनं त्याच्याकडे वर्तमानपत्राचा अंक टाकला, पण त्यानं तो परत दिला. तो म्हणाला, "वाचलं आहे मीं. सगळं कांहीं माहीत आहे मला. म्हणून तर मी आलों."

"म्हणजे?"

"मला समजलं आहे सारं अन् त्यासाठींच मी परत आलों आहे. मी खरं म्हणजे सरहद्द ओलांडून 'हंगारी'च्या वाटेला लागलों होतों. तिथें नोकरी मिळणार होती मला; पण मीं बेत बदलला. आतां मी सरळ पोलीस कचेरींत वर्दी देणार अन् खुनाच्या दिवशीं मी मुळीं जर्मनींत नव्हतो हें सिद्ध करणार. जें मीं केलंच नाहीं त्याचा वहीम माझ्यावर राहावा अन् पोलिसांनीं माझी एखाद्या लांडग्यासारखी शिकार करावी यांत काय मजा?..."

'लांडग्यासारखी शिकार!' ते त्याचे शब्द ज्योआकिमच्या विशेष ध्यानांत राहिले.

आस्केनिअस पुढें म्हणाला, "सरकारची माझ्यावर गैरमर्जी म्हणून चार-सहा महिने मला इथं एकाद्या किल्ल्यांत बंदिवान होऊन पडावं लागलंच तर त्याला इलाज नाहीं. पण या प्रकरणांत माझे हात स्वच्छ आहेत. आपल्याला कांहीं एक कर्तव्य नाहीं या भानगडीशीं !"

कुणीसं विचारलं, "हं ? अन् तुला खरंच सिद्ध करतां येईल तूं जर्मनींत नव्हतास म्हणून ?"

"अलबत्, अगदीं सहज."

मग पुन्हा सारे स्तब्ध झाले. जो तो आपल्या मनाशीं विचार करूं लागला.

अखेर साऱ्यांच्याकडे चष्म्यांतून दृष्टि टाकीत गाव्हेंन्स म्हणाला, "पण मग दुसऱ्या कोणी तरी केलं असलं पाहिजे ना तें कृत्य ?"

"अर्थात्. पण मुळीं राजकीय हेतूनं हा खून करण्यांत आला असं काय म्हणून गृहीत धरायचं ? मला तर वाटतं कीं या प्रकारणीं पोलिस पूर्वग्रहाला बळी पडून विचार करताहेत. या कृत्यांला इतर कोणता तरी हेतु कारण झाला नसेल कशावरून ? उदाहरणार्थ, मत्सरानं केलं गेलं असेल हें कृत्य. त्याच्याच पक्षांतल्या एखाद्या प्रतिस्पर्ध्यानं मारलं असेल त्यांना. किंवा कोणी सूड घेतला असेल. किंवा एखाद्या माथेफिरूनं वेडाच्या लहरींत—वेडे लोक काय थोडे आहेत या बर्लिन शहरांत ?"

"अच्छा ! तुझं आरोग्य..." गाव्हेंन्सनं ग्लास उंच केला.

मग इतर विषयावर मंडळी आपापसांत बोलूं लागली तेव्हां आस्केनिअसनं ज्योआकिमला हळूच विचारलं,

"शार्लोटे कशी आहे ? ठीक ?"

"हां ठीक."

"मला तिची भेट घेतां आली नाहीं तर सांग तिला मी फार विचारलं आहे म्हणून. सांगशील ?"

" अवश्य " ज्योआकिम म्हणाला. आपल्या अंत:करणांतली गुप्त गोष्ट सांगून टाकायसाठीं तो कमालीचा अधीर झाला होता, पण त्याच्या तोंडातून शब्द उमटेना. अखेर खाणं आटपून आस्केनिअसनं जेव्हां मंडळींचा निरोप घेतला तेव्हां तोच त्याला म्हणाला, " बूर्थ, मला जरा तुझ्याशीं कांहीं बोलायचं आहे. "

ज्योआकिम उठला अन् त्याच्या मागोमाग निघाला. दालनाच्या बाहेरच्या अरुंद अंधाऱ्या बोळांतून आस्केनिअसच्या मागोमाग जात असतां आपल्या हृदयाचे ठोके अंतराअंतरानं पण फार मोठ्यानं होत आहेतसं त्याला वाटलं. न्हाणीघरांत ते पोचले तेव्हां आस्केनिअस थांबला, अन् ज्योआकिमच्या अगदीं कानाला लागून त्यानं एकदम विचारलं,

" तूं केलंस हें ? "

आणि तितक्याच झटकन् ज्योआकिमनं उत्तर दिलं,

" नाहीं ! "

एकीकडे ' नाहीं ' हा स्वतःचा शब्द त्याला ऐकूं आला, अन् एकीकडे तो आपण कसा उच्चारला याचा चमत्कार वाटून तो दचकला. स्वतःवर गोळी झाडायचा त्यानं बेत केला होता, पण ऐनवेळीं त्यानं पिस्तुल टाकून दिलं होतं. अन् आत्तासुद्धां ' होय ' म्हणायचं त्यानं ठरविलं होतं, अन् ' नाहीं ' असं त्यानं उत्तर दिलं होतं !

नळावर हात धुतां धुतां आस्केनिअसनं विचारलं, " तुझं पिस्तुल मला देतोस ? सरहद्दीवरच्या तपासणींत त्रास होऊं नये म्हणून माझं मला टाकावं लागलं. तुझं घेतलं तरी तें इथं मला फार वेळ बाळगतां येईल असं नाहीं, पण खिसा चाचपला कीं रिकामा लागतो तें कांहीं बरं वाटत नाहीं. "

ज्योआकिमचा हात खिशाकडे गेला. पण तो रिकामा होता. " अं... माफ कर. पण माझं पिस्तुल हरवलं " तो हळूच पुटपुटला.

आस्केनिअसनं त्याच्या नजरेला नजर लावून रोखून पाहिलं. मग तो

येवढेच म्हणाला, " अस्सं. परमेश्वर तुझं रक्षण करो. पिस्तुल हरवलं असलंस तर–तर संभाळ ! "

ते दोघेहि क्षणभर अगदीं स्तब्ध उभे राहिले. तें न्हाणीघर चांगलं होतं. स्वच्छ, फरसबंद, सर्व प्रकारच्या आधुनिक सोईंनीं सज्ज. पूर्वी कधीही कोणतीही गोष्ट दिसली नसेल इतकं या क्षणीं तें न्हाणीघर ज्योआकिमच्या दृष्टीला अगदीं स्पष्ट स्पष्ट दिसलं. भिंतीला लावलेलीं तीं शुभ्र चिनीमातीचीं पात्रं, ते नळ, त्या ' निकेल ' च्या चकचकीत मुठी ! आस्केअसनं दार उघडलं तेव्हां ज्योआकिमला वाटलं आपण भोंवळ येऊन पडणार अन् त्यानं एका मुठीला धरून आपला तोल सावरला.

बाहेरच्या बोळांत परिचारक कुणा तरी दोघां साध्या पोषाखांतल्या इसमांशीं बोलत होता.

आस्केनिअस हसत हसत ज्योआकिमला म्हणाला, " अच्छा, गुड इव्हिनिंग ! मला आवडतं बघ कुणी असं झटपट काम केलं कीं. तुझी गाडी आहे काय ? मी इतका थकून गेलों आहे म्हणतोस. तूं आघाडीवर गेला होतास, नव्हे कां ? हां दिसतंच तें ... "

आणि तेच ज्योआकिमच्या कानीं पडलेले आस्केनिअसचे शेवटचे शब्द ! त्या नंतर तो आपली वाट सोबतीवांचून चालूं लागला !

# ७

मुख्य प्रधानांच्या मृत्यूबद्दल सारे लोक हळहळले त्याप्रमाणें थेलमानही आपल्या परीनं हळहळला. देशाची आर्थिक परिस्थिति आतां फार बिकट होणार, इतर राष्ट्रं जर्मनीकडे आतां साशंक दृष्टीनं पाहणार, अन् राजकारणांत अंदाधुंदी माजणार, असं तो बोलूं लागला. टेबलावरच्या वर्तमानपत्रावर तो आपल्या मुद्रिकांकित हाताची मूठ वळून हापटी, अन् संतप्त चिंताग्रस्त स्वरानं व्याख्यान झोडायला सुरुवात करी. तो पुनः पुन्हा म्हणे, "मुख्य प्रधान कसाही असला तरी त्याचा खून व्हावा म्हणजे काय? हीं चिन्हं कांहीं ठीक नाहींत." मात्र सवड सापडेल तेव्हां तेव्हां त्याची असली बडबड चालू होई हें जरी खरं, तरी हताश होऊन त्यानं आपले उद्योग बंद ठेवले होते असं नव्हे. ते पूर्ववत् चालूच होते. "ऱ्हाइनलॅंड" प्रदेशांत योग्य वेळीं व्यापारी करारमदार केले तर घबाड मिळण्याची संधि आहे असा सुगावा लागल्याबरोबर आज आपली उंची सूटकेस भरून घेऊन तो तिकडे जायला निघाला होता.

स्नानाच्या वेळीं अंगाला लावलेल्या उंची साबणाच्या सुगंधाचा दरवळ सोडीत, हसत, तो जेलेनाच्या घरी गेला. प्रवासाला निघण्यापूर्वी तिची भेट

घ्यायची होती त्याला. पण तो चांगल्या शकुनावर निघाला नसावा. आदल्या रात्री एका नव्या नाटकाच्या तालमीमुळें जेलेनाला फार जाग्रण झालेलं होतं, अन् अशा वेळीं आपल्याला कांहीं 'लभ्यांश' होण्याची आशा नाहीं हें थेलमानला अनुभवानं माहीत झालं होतं. तिचा चेहरा सुकला होता, तिचं लक्ष ठिकाणावर नव्हतं, ती आपल्याच विचारांत दंग असल्यासारखी दिसत होती, तिच्या बोलण्यांत थकवा आला होता. तिच्या हालचालींतली अन् शब्दांतली नेहमींची रोषनाई पार विझून गेली होती. आपल्यापुढें कामचतुर जेलेना बसली नसून ज्याचा स्पर्शही सुखकारक वाटणार नाहीं असा एक प्राणी बसला आहे असं थेलमानला वाटलं. शिवाय, त्याला वेळ तरी कुठें होता तितका ? त्याच्या गाडीची वेळ जवळ जवळ झाली होती; त्याची मोटर खालीं दाराशीं वाट पाहत उभी होती. जेलेनानं नेहमींप्रमाणें त्याला आलिंगन दिलं, त्याच्या अंगावरून हात फिरविला, अन् परत येतांना तिच्यासाठीं एक नवी मोटर आणायचं त्यानं वचन दिलं.

दारांत गेल्यावर मागं वळून त्यानं तिला म्हटलं, "माझी लाडकी गुणाची राहील ना ?"

ती म्हणाली, "होय–होय—"

त्यानं अगदीं कळवळून विचारलं, "माझी लाडकी मला ठकविणार नाहीं ? माझीच राहील ना ?"

"अगदीं तुझीच, लाडक्या" त्याच्या समाधानासाठीं ती म्हणाली.

थेलमान निरोप घेऊन निघून गेल्यावर तिनं सगळे दिवे मालवून फक्त टेबलावरचा एक मंद दिवा राहूं दिला, अन् मनाशीं कसला तरी विचार करीत ती खोलींत येरझारा घालूं लागली. मधेंच ती पिआनोजवळ थांबे, एखाद्या पट्टीवर बोटाचा आघात करी, अन् त्या आघातानं उत्पन्न झालेल्या ध्वनीच्या लहरी अस्पष्ट होत जाऊन हवेंत पुरत्या विरेपर्यंत ती त्या ऐकत राही. कांहीं वेळानं तिनं आपलं लिहिण्याचं टेबल उघडलं, त्यांत ठेवलेले

खाजगी कागदपत्र जुळविले, अन् रशिअन लिपींत कांहीं टांचणं केलीं. तिनं टॅलिफोन उचलून हातीं घेतला, अन् कुणाशीं तरी तुटक स्वरांत रशिअन भाषेंत थोडं संभाषण केलं. मग तिनं एक निःश्वास सोडला, अन् ती आंतल्या दालनांत गेली. एक खुर्ची ओढून घेऊन ती आरशासमोर बसली व तिनं आपल्या मुखशृंगारास प्रारंभ केला.

बाहेरच्या दारावरची घंटा खणखणली. वृद्ध दासी जेलेनाच्या खोलीच्या दाराशीं येऊन कांपऱ्या स्वरानं हळूच म्हणाली, " ज्योआकिम आला आहे."

" आलेंच म्हणून सांग " असं उत्तर देऊन जेलेनानं एक काळा जपानी झगा अंगावर टाकला. ती बाहेरच्या खोलींत आली तों ज्योआकिम आंत येऊन बसलाही होता. डोक्याला टोपी, अंगांत आंखूड कोट, मुद्रा बावरलेली असा तो तिला दिसला. कसा तें सांगतां येण्यासारखं नव्हतं, पण तो पार बदलल्यासारखा दिसत होता येवढं खरं.

तो चाचरत अडखळत म्हणाला, " जेलेना, माफ कर— मी भलत्या वेळेस आलों खरा..."

तिनं त्याला गंभीर दृष्टीनं न्याहाळलं व म्हटलं,

" छे, मुळींच नाहीं. तूं आलास हें पाहून मला आनंदच झाला आहे. खरं म्हणजे तुझीच आठवण करीत होतें मी आत्तां—"

तिनं त्याला हळूं हातांनीं धरून शय्यागृहांत नेलं. तिथें एका खुर्चीवर त्यानं अंग टाकलं. त्याच्या चित्ताचा संभ्रम उघड दिसण्यासारखा होता. तो सांगूं लागला,

" जेलेना, खिडक्यांतून दिसणाऱ्या प्रकाशाकडे पाहत किती वेळ तरी मी तुझ्या घरापुढें बाहेर रस्त्यावर उभा होतों. थेलमान तुझ्याकडे येऊन बसला होता. खालीं त्याची गाडी उभी होती ती पाहिली मीं. त्याचा ड्रायव्हर मला ओळखतो. त्याच्या दृष्टीस पडायला नको म्हणून मी थोडा वेळ हिंडून

आलों. पण तरी थेलमानची गाडी उभीच होती. पण जाऊं दे तें. शेवटीं मला यायला मिळालं. आहा! किती ऊबदार वाटतं इथें..." •

त्यानं सुस्कारा सोडला, अन् डोळे झाकून घेतले. तिनं त्याचं मस्तक थोपटलं. तिचा तो मृदु स्पर्श होतांच त्याच्या अंगावर शहारे आले, अन् एखाद्या झोपलेल्या बालकाप्रमाणें त्याचा श्वास संथ व दीर्घ होऊं लागला. ती एक शद्बही न बोलतां खालीं नजर करून त्याच्या मुखाकडे लक्षपूर्वक पाहत राहिली. मग ती म्हणाली,

"मग इथेंच पडून रहा तर जरा वेळ. थांब मी चहा करतें."

ती उठून गेली व स्टोव्ह घेऊन परत आली. खोलींत अगदीं शांत अन् एकान्त वाटत होतं. भिंतीवर कलाबतूचे पडदे सोडलेले होते, खोलीच्या भुईवर जाड किनखापी रुजामा अंथरला होता, अन् जाळीदार पडद्याआड मोठा उंची मंचक होता.

जेलेना ज्योआकिमजवळ गुडघे टेकून बसली, वर बघून तिनं आपल्या नाजुक भुजलता त्याच्या कृश कापऱ्या देहाभोंवतीं टाकल्या, व म्हटलं,

"तूं आलास हें छान केलंस. आताशा किती वाट पाहतें आहे मी तुझी रोज."

"तूं माझी वाट पाहत होतीस?"

"होय. माझ्याकडे किती दिवसांनीं आज येतो आहेस तूं! माझ्याकडे यावंसं वाटलं नाहीं तुला?"

"अं...मी कामांत होतों. तुझ्याकडे यावंसं वाटलं तर. खरं म्हणजे तूं केव्हां भेटशीलसं झालं होतं मला. फार चमत्कारिक मनःस्थिति झाली आहे माझी— तुला कसं समजावून सांगूं? कधीं कधीं मला वाटतं मी मरून गेलों आहे; अन् कधीं कधीं भास होतो कीं कशानं तरी माझे दोन वेगवेगळे तुकडे पडताहेत. तुझी भेट केव्हां होईलसं झालं होतं..."

. त्याच्याकडे पाहतां पहातां ती हलकेच म्हणाली, " माझं छकुलं!... माझं पाखरूं तें !..."

" मघांशीं मी खालीं रस्त्यावर उभा होतों तेव्हां मला काय वाटलं तें वर्णन करून सांगतां येत नाहीं मला. तुझ्या भेटीसाठीं इतका आर्त झालों होतों मी कीं जणूं ज्वर भरला होता माझ्या अंगांत. मला वाटलं, माझे गुडघे दुमडून मी पडणार रस्त्यावरच. खरंच वाटलं. वाटलं, तुझ्याशीं अगदीं एकजीव व्हावं म्हणजे या जगाचा संपर्कच उरणार नाहीं."

" खरंच जसं कांहीं. माझं चुंबन घे..."

" अगदीं खरं; पण मीं आवरून धरलं आहे स्वतःला."

" होय लाडक्या ?..."

हे शब्द ऐकतांच त्यानं मोठा हुंदका दिला, अन् तो तिच्या बहुपाशांत शिरला. कोंडमाऱ्यांतून वाट काढावी म्हणून त्याच्या जिवाची उलघाल झाली होती. स्वत्वाची सारी जाणीव पार बुडवून टाकायसाठीं तो घाबरा झाला होता. त्यासाठींच त्यानं जेलेनाकडे धाव घेतली होती. पण आतां ऐन वेळीं त्याच्या जिवाची ती धडपड एकदम लुप्त झाली. तो तिच्या बाहूंतून दूर झाला. " दुबळा... किती दुबळा मी..." असं कांहींसं तो पुटपुटला.

जेलेना दचकली, उठली, तिनं आपला झगा अंगाभोंवतीं लपेटून घेतला. दिव्याच्या लालसर प्रकाशानं तिची आकृति कृष्णवर्ण दिसली. स्टोव्हचा बुद्बुद् आवाज होत होता, तो ऐकून ज्योआकिमला वाटलं जणूं एकाच शब्दाचा मंत्र चालू आहे. तो म्हणाला,

" केवढ्यांदा आवाज होतो आहे स्टोव्हचा !"

जेलेना म्हणाली, " लाडक्या तूं थकला आहेस, दुसरं कांहीं नाहीं. तापबीप तर नाहीं ना येणार तुला ? तुझे हात किती वाईट दिसताहेत—"

" वाईट दिसताहेत ? माझे हात ? कांहीं तरी काय बोलतेस ?"

" चुकलं होय माझ्या बोलण्यांत कांहीं ? माफ कर. मला अजून साधेना

तुमची जर्मन भाषा. पण तूं असं काय करतो आहेस? काय झालंय् तुला?"

"कांहीं नाहीं. गुंगींतून जागा होत असल्यासारखं वाटतं आहे मला. अगदीं हुबेहुब तसं वाटतं आहे. गुंगी दिली कीं कसं होतं माहीत आहे का तुला? प्रथम कांहीं वेळ तिचा अंमल चढूं नये म्हणून मनुष्य धडपडतो. पण मग घंटा वाजल्याप्रमाणें आवाज होऊं लागतात डोक्यात, एक दोन असे आंकडे मोजलेले ऐकूं येतात, अन् मनुष्य स्वतःही मोजूं लागतो. आपलं मोजणं आपल्याला कळत असतं; मग वाटतं पुरे, थांबूं या; अन् त्याच वेळीं शुद्ध नाहींशीं होते; खलास होतो माणूस. जेलेना, नंतरची स्थिति याहून फार भयंकर. मनुष्य हलकेच शुद्धीवर येऊं लागतो. प्रथम वाटतं कीं डोळ्यांवर जाड जाड पट्ट्या आहेत, पण हळूहळू त्या विरळ आहे-तसं वाटूं लागतं, प्रकाश दिसूं लागतो, अन् मनुष्य पुरता सावध होतो. आपण जिवंत आहोंत हें तर त्याला उघड दिसत असतं, पण आपला कशाशीं कांहीं संबंधच उरलेला नाहीं असा भास त्याला होऊं लागतो. कांहीं वेळानं वेदनाही सुरू होतात. गुंगी उडून गेल्यामुळें दुखायला लागतं. प्रथम कांहीं वेळ चमक यावी, बंद व्हावी असं चालतं; पण नंतर भडका उडतो. माणसाला तो सहन करवत नाहीं, अन् तो तर क्षणक्षणाला वाढतच जातो... जेलेना, अशी स्थिति झाली आहे माझी—"

बोलता बोलतां तो एकदम थांबला. जेलेना शय्येच्या कडेवर बसली होती अन् त्याच्या तळहाताकडे निरखून पाहत होती. जरा वेळ स्तब्ध राहून तिनं विचारलं,

"मला नीट सांग, कुठं दुखतं आहे?"

"तें नाहीं सांगतां येत. पुढें केव्हां तरी येईल कदाचित्. आत्तां आलों तो तुला सांगायसाठींच. पण वाटतं नको आत्ताच. पुढें कदाचित् वेळ येईल अन् मग मी सांगेन. खरं म्हणजे मला सोसावं लागतं आहे तें शारीरिक दुःख नाहींच. आत्म्याचंहि दुःख असूं शकतं..."

एखाद्या अजाण मुलासारखा तो बोलत होता. तें ऐकून जेलेनाच्या ओंठांवर स्मित प्रगट झाल्यावांचून राहिलं नाहीं. तो सांगू लागला,

" इकडे तुझ्याकडे येण्यापूर्वी मी कुठें गेलो होतो माहीत आहे तुला ? ' लुनपार्क ' च्या जत्रेला. मी माझ्या एका दोस्ताला म्हटलं, " जिथं मन-मुराद करमणूक होईल अशा ठिकाणीं जावंसं वाटतं आहे मला. " तो म्हणाला ' लुनपार्क ' ला जाऊं. माझ्याही मनांत अगदीं तेंच होतं. आम्ही गेलों अन् खूप चैन केली. खेळ खेळलों, पाळण्यांत बसलों, वाटोळ्या फिरणाऱ्या घोड्यांवर बसलों, हवा तसा धिंगाणा घातला. पण माझं मन कशांतच रमेना. मला पुनः पुन्हा वाटे, कशाला आलों मी या लोकांत ? यांचा माझा आतां काय संबंध ? "

तो किंचित् थांबला व मग म्हणाला,

" हें सारं मी तुला सांगतों आहे हें चमत्कारिकच. पण सांगावसं वाटतं म्हणून सांगतों आहे. आपण एकमेकांशीं नीट अंतःकरणापासून कधीं बोललों नाहीं आजपर्यंत. दुसऱ्या चाळ्यापुढें आपल्याला वेळ झाला नाहीं— " हें म्हणतांच त्याच्या तोंडावर हास्य आलं, पण त्या हास्यात सुखापेक्षां वेदनेचाच अभिप्राय अधिक होता. " पण आज मला अकस्मात् वाटलं, जेलेनाकडं जावं अन् तिच्याशीं बोलावं. मी सहसा कोणाशीं असा बोलत नाहीं. माझ्या बहिणीशीं देखील नाहीं. अन् तुझ्याजवळ मी या क्षणीं इतकं बडबडतों आहे, अन् तूं जवळ बसून सारं ऐकून घेत आहेस ! किती चमत्कारिक...! "

" चमत्कारिक काय म्हणून ? मुळींच नाहीं. तुला वाटत असेल, जेलेना म्हणजे काय, एक सामान्य नायकीण. चुकतो आहेस तूं. पण तें जाऊं दे. मी ऐकतें आहे. बोल. अन् मी एक गोष्ट सांगतें ती लक्षांत ठेव. प्रत्येक माणसाच्या अंतर्यामीं दोन भिन्न प्रवृत्ती असतात. समजलास ? चालूं दे तुझं. सहानुभूति वाटते मला फार तुझ्याविषयीं. "

" छे. मला सहानुभूति नको आहे कोणाची. तुला माझ्या स्थितीची खरी जाणीव असती तर कोरडी सहानुभूतीच नसती दाखविलीस— "

" मग लाडक्या, मी काय करावं म्हणतोस ? तुझी प्रशंसा करूं ? का तुझा हेवा करूं ? का तुझं भय बाळगूं— ? "

" किती शांत वाटतं इथें ! जेलेना, तूं गा, मी ऐकतों. "

" माझं गाणं थिएटरांत ऐकायला मिळतं; इथें नाहीं. अन् तुला कुठें वाटतं गाणं ऐकावसं ? "

" आज वाटतं. तुझं गाणं ऐकायची फार इच्छा झाली आहे आज. गा. पण शास्त्रीय नको. कांहीं तरी अगदीं साधं. एखादं सोपं भावगीत. "

जेलेना उठली. अनवाणी पावलांनींच ती दूर झाली. एका कोपऱ्यांत येशूच्या वगैरे तसबिरी होत्या त्यांपुढें उभे राहून ती म्हणाली,

" तुमचीं जर्मन गाणीं मला येत नाहीत. पण एक रशियन गाणं मी तुला म्हणून दाखवितें रशिआंतल्या खेडुतांच्या मुली फेर धरून नाचतात तेव्हां त्या हें म्हणतात. ऐक. "

तिनं गीताला प्रारंभ केला तेव्हा तिचा चेहरा अंधारामुळें दिसत नव्हता. प्रथम ती नुसते सूर गुणगुणली, अन् मग कांहीं वेळानं जेव्हां ती गीताचे शब्द उच्चारूं लागली तेव्हा तिनं आपले करतल एकमेकांत गुंतविले अन् ती आपले नितंब गीताच्या तालांत हलवूं लागली. गीत असं होतं—

" हेमंत ऋतूंतली ही अंधारी मनोहर रात्र ! जी माझें रक्षण करील, अन् माझ्या हृदयाला थोडा धीर देईल अशी एकदेखील तारका आकाशांत नाहीं ! मला ना बाप, ना आई, ! माझ्या जीवाचा सखा, माझा प्रियकर आहे. पण माझ्या हृदयाची ही ओढ त्याला कधींच कळायची नाहीं— ! "

अगदीं जिवाचे कान करून ऐकत असल्यासारखी ज्योआकिमची मुद्रा ओढलेली दिसत होती. पण जिवाचा कोंडमारा संपल्याचा जो अनुभव त्याला हवा होता तो त्याला मिळाला नाहीं.

तो एकदम उठून उभा राहिला व म्हणाला,

“ बस् पुरे, जेलेना पुरे. तुझ्या गाण्यानं माझ्या अंतःकरणाला अधिकच पीळ पडतो. फार कारुण्यपूर्ण आहे तें.”

त्याला निश्चल राहवेना. या भिंतीपासून त्या भिंतीपर्यंत अन् पुन्हा परत त्यानं पावलं टाकलीं. आत्तांपर्यंत गच्च एके जागीं बसलेली अशी कांहीं तरी गोष्ट आपल्या अंतःकरणांत आतां हलूं लागली असं त्याला वाटलं. तो मधेंच एकदम जेलेन पुढें उभा राहिला, व म्हणाला,

“ आज संध्याकाळीं आस्केनिअसला पकडलं.”

“ होय ? वा ?”

“ कारण— या खुनाच्याच संबंधांत.”

“ असं होय ? पण त्यानं खून केला नाहीं ”

“ अर्थात् नाहीं. पण तुला कसं—?”

“ काय विचारायचं आहे ? विचार ना.”

“ आस्केनिअसनं खून केला नाहीं हें तुला कसं माहीत ? इतक्या खात्रीनं कसं तूं बोलतेस ?”

“ हं ऽ ! त्यांत काय ? माणसाला मनानं कळतंच कीं. आस्केनिअसला मी पुरतं ओळखतें. त्यानं हें कृत्य केलेलं नाहीं. अशा कृत्याचे परिणाम भोगणं त्याच्यानं व्हायचं नाहीं. तो कधीं पाप करणार नाहीं.”

तें ऐकून ज्योआकिम डोळे विस्फारून तिच्याकडे पाहूं लागला. तिनं त्याच्या नजरेला नजर दिली व मग ती पुढें म्हणाली,

“ पापी माणसं देवाचीं लाडकीं असतात.”

धर्मग्रंथांतलं एखादं पवित्र वचन उच्चारल्यासारखी तिनं मुद्रा केली. कृत्रिम रंगानें माखलेल्या तिच्या ओठांतून ते शब्द बाहेर पडले तो त्यांचा ध्वनिही चमत्कारिक भासला.

“ देवाची लाडकीं ? खरंच ?” ज्योआकिम पुटपुटला. त्याच्या अंतः-करणांतलं दुःख पुन्हा उफाळलं. मधांशी थोडा वेळ तें थांबलं होतं. पण

आतां तें पुन्हा सुरू झालं, अन् अधिकाधिक खोल खोल शिरूं लागलं. तो म्हणाला,

"पोलिसाच्या स्वाधीन होण्यापूर्वी आस्केनिअस काय म्हणाला ठाऊक आहे? तो म्हणाला, 'एखाद्या लांडग्यासारखी स्वतःची शिकार होऊं द्यायची नाहीं मला.' हेच शब्द त्याचे. अन् कां कुणास ठाऊक ते माझ्या डोक्यात अगदीं घोळताहेत. 'लांडग्यासारखी शिकार' हेंच मला ऐकूं येत आहे सारखें. तुझा स्टोव्हसुद्धा तेंच पालुपद चालवतो..."

जेलेना पुन्हां गुडघे टेकून त्याच्या जवळ बसत म्हणाली, "बरं बरं, आपण मुळीं तो मालवूनच टाकूं. लाडक्या, तूं थकला आहेस अन् तुझं चित्त ठिकाणावर नाहीं. माझ्या अंथरूणात पडतोस का थोडा वेळ? ये, चल. मी तुझे बूट काढतें, तुझ्या जवळ बसतें, अन् तुला गोष्टी सांगते. असं. अन् आतां अगदीं स्वस्थ पडून रहा बरं. माझ्या लहानपणीं माझी दाई लांडग्याची गोष्ट सांगत असे मला, ती सांगू? अन् असे हात लपवूं नकोस. असे पांघरुणाच्यावर राहूं देत ते. असे जुळविल्यासारखे..."

तिची गोष्ट ऐकता ऐकतां ज्योआकिमला झोप लागली असावी. तो अगदीं निश्चल पडून राहिला होता. त्याचं श्वसन अगदी सावकाश लयींत चाललं होतं; त्याच्या भुंवईवरची ती खूण मधेंच थरारे.

पुष्कळ वेळानं त्यानं अगदीं हळू आवाजांत विचारलं, "अं? काय म्हणालीस जेलेना?"

"कांहीं नाहीं; मीं म्हटलं, स्वस्थ निजून राहा; मी तुझ्यासाठीं प्रार्थना करतें."

मग पुन्हा खोलींत स्तब्धता झाली.

पण लगेच पलीकडच्या खोलींतला टेलिफोन खणखणून वाजला, व तो थांबेना.

ज्योआकिम दचकून उठला. त्यानं आपलं अंग ताठ केलं.

" भिऊं नको, लाडक्या भिऊं नकोस ! " असं त्याच्या कानांत कुजबुजून जेलेना गेली. तिनं ते शब्द किती चमत्कारिक स्वरांत उच्चारले !

ज्योआकिमनं अंथरुणांतून उडी मारली. तो ऐकूं लागला. जेलेना टेलिफोनमधें घोलत होती. तिचा स्वर अगदीं संथ, निर्विकार होता. ती काय बोलत होती तें कळवण्यासारखं नव्हतं, कारण ती रशियन भाषेंत बोलत होती. त्याच्या हृदयाचे ठोके भडकल्यासारखे धाडधाड पडूं लागले ते त्याला सहन करवेनात. त्यांच्या घशांत. कपाळांत, गुडघ्यांत, टाळयाच्या जागीं फणफण व्हायला लागलं, अन् कवटीचं कातडं तडतडायला लागून एकदम गार टणक पडल्यासारखं त्याला वाटलं. त्याच्या मनांत आलं, बस आत्तांच ! आत्तांच सांगून टाकावं जेलेनाला सगळं...

ती परत आली तेव्हां याच विचारांत तो होता. आपण किती पांढरेफटक दिसत आहोंत याची त्याला कुठून कल्पना ? त्याला पाहतांच जेलेनासुद्धां पांढरी पडली. भीतीनं ती एक पाऊल मागंच सरकली. पण तोंच धडपडत पुढें झाला.

" तुला एक गोष्ट सांगायची आहे—" येवढं तो म्हणाला, पण पुढें त्याला सांगवेना. जणूं त्याचे ओठ त्याची आज्ञा मानीत नव्हते. त्यानं श्वास घेतला व पुन्हा तेंच म्हटलं, " मी तुला एक गोष्ट सांगणार आहे—"

" आत्तां नको." जेलेना हळूच म्हणाली " नको. बोलूं नकोस. गप. " असं म्हणत जेलेनानं त्याचं मस्तक आपल्या हातांनीं गच्च धरलं अन् त्याच्या नजरेला नजर भिडवून अगदीं टवकारून पाहिलं. कांहीं वेळ ती तशी अगदीं निश्चल उभी राहिली. मग ती एकदम मोठ्यानं हसूं लागली अन् तिच्या डोळयांतून अश्रुधारा निघून त्या तिच्या गालांवरून ओघळूं लागल्या. ती घाईघाईनं त्याला म्हणाली,

" लाडक्या, तूं आतां इथें थांबतां कामा नये. तूं पळ काढला पाहिजेस. तुझा पत्ता लागूं न देतां त्यांना आणखी एक दिवस झुलवीन मी.

होय मी ! असं काय पाहतोस माझ्याकडे ? मीहि पापी आहे तुला माहीत नाहीं ? कसा रंगविला आहे मीं माझा चेहरा— बघ ! हां ! मला सांग, ईश्वरावर तुझी श्रद्धा आहे ना ? असलीच पाहिजे. कारण, तूं देवाचं लाडकं बाळ आहेस."

अशा प्रकारें कांहीं तरी असंबद्ध बोलतांना ती हसतही होती, अन् तिनं आपलं कपाळ जवळ जवळ भुईला लावून प्रणाम केला. ती म्हणाली, " जा. पळ. ते आतां एकाद्या लांडग्यासारखी तुझी शिकार करतील. देवाचा दीन दास तूं ! तुझ्यावर माझं प्रेम आहे ! माझं तुझ्यावर प्रेम आहे."

ज्योआकिम एखाद्या पुतळ्यासारखा उभा राहिला, अन् खालीं नजर करून तिच्याकडे पाहूं लागला. या स्त्रीचं अंतर्याम त्याला कधीं कळलं नव्हतं, आतांहि कळेना. या क्षणीं हृदयाच्या खोल कप्प्यांत एकाच विचाराची अस्पष्ट जाणीव त्याला होत होती.

सुरू झाला ! आतां आपला पाठलाग सुरू झाला !

# भाग दुसरा

# फ रा री

# ८

ज्योआकिम ! लपूनछपून दिवस काढणाऱ्या दुर्दैवी तरुणा ! काय तुझं हें आयुष्य ? आतां तुझ्या वाट्याला कायमच्या आलेल्या यातना तूं सोसतोस तरी कशा ? स्वतःचं हें विलक्षण रूपांतर तूं केलंस तरी कसं ? आपल्या अंतरंगांत कोणत्या नव्या शक्ती तूं निर्माण केल्या आहेस ? अन् गतायुष्य विस्मृतीच्या खाईंत टाकून देण्याची तुझी तयारी व्हावी अशी कोणती नवी गोष्ट तुला जीवितांत सापडली आहे ? जग तुझ्या दृष्टीला कसं दिसतं आहे ? त्यानं तुझ्याशीं आरंभिलेलं वैर तुझ्या प्रत्ययाला कसं कसं येत आहे ? अन् तुझ्यासारख्या माणसांतनं उठलेल्या गृहहीन मित्रहीन जीवानंही आशेला गुंतून जगावं असं कोणतं सुख या जीवितांत तुला मिळणार आहे ?

पहिली गोष्ट अशी कीं तूं आतां एकटा आहेस. अगदीं अगदीं एकटा ! तुला एक रहस्य लपवायचं आहे. त्यामुळें दुसऱ्या माणसाचा स्नेह अगर सहवास तूं जोडूंच शकत नाहींस. जगापासून तूं स्वतःची ताटातूट करून घेतली आहेस. आतां तुझं असं कोणी नाहीं. लवकरच अशी वेळ येईल कीं पूर्वी एके काळीं मैत्रीचा ओलावा आपण अनुभवला याची आठवणसुद्धां

तुला राह्यची नाहीं. सध्याच्या या एकाकी जीवनामुळें तुझ्या अंगीं थोडा थोडा उर्मटपणा येऊं लागला आहे. जे अंतर्यामीं एकाकी असतात त्यांना संरक्षणाचं व प्रतिकाराचं साधन म्हणून उर्मटपणा अंगीं आणावाच लागतो.

पण तूं जसा उर्मट, तसा भित्राही व्हायला लागला आहेस. कधीं कधीं एखाद्या लहान मुलासारखी भीतीनं तुझी कशी गाळण उडते तें आम्हांला माहीत का नाहीं ? ही भीति तुझ्या अंतःकरणाची काय दशा करते, रस्त्याच्या कोपऱ्या-कोपऱ्यावर पाटलाग करणारे दुष्मन छपले असावेत, भिंती-भिंतीआड सैनिक दबा धरून बसले असावेत, ज्या त्या जंगलांत पोलिसांचे कडं असावं अशीं भेसूर चित्रं तुझ्या भेदरलेल्या कल्पनेला भुताटकीच्या खेळासारखी सतत कशीं दिसतात हें आम्हाला समजत का नाहीं ? तुझे ते जड, चमकदार विलक्षण डोळे अशा धास्तीच्या वेळीं एखाद्या हिंस्र पशूच्या किंवा वेड्या-पिशाच्या डोळयासारखे दिसतात, तें तूं आरशात कधीं पाहिलं आहेस का ? अन् ही तुझी धास्ती खोटो तरी कशी म्हणावी ? तुझा पाठलाग खरोखरच चालूं आहे. तूं फरारी होऊन स्वतःवर वहीम ओढून घेतलास अन् आतां साऱ्या लोकांना तुझ्याबद्दल माहिती झालेली आहे कामकऱ्याचे निळे कपडे तूं एका मुतारींत टाकून दिलेस ते पोलिसाना सापडले, व त्यावरून त्यांनीं पुष्कळ तलास काढला. वृत्तपत्रं तुला वाचायला मिळालीं असतीं तर तुला समजलं असतं कीं आस्केनिअसवरचा आरोप निराधार असल्याचं सिद्ध झालं आहे, अन् इतर किरकोळ राजकीय आरोपांवरून तो कांहीं दिवस कैदेंत राहील येवढच. उपलब्ध झालेल्या एकंदर पुराव्याचा निष्कर्ष अधि-काऱ्यांनीं हाच काढला आहे कीं ज्योआकिम बुर्थ नांवाच्या एका तरुण विद्यार्थ्यानं प्रधानाचा खून केला असावा; आणि त्याला पकडण्याची अवश्य ती तजवीज करण्यांत आली आहे, अशी साऱ्या वृत्तपत्रांत बातमी आहे...

तुला आतां वेळ न घालवितां स्वतःचं रूप सर्वस्वी पालटून टाकलं पाहिजे. ज्योअकिम, तुला पुष्कळ शहाणपण शिकलं पाहिजे अजून. एका मोठ्या

अधिकाऱ्याचा तूं मुलगा खरा, कायद्याचा अभ्यास करणारा तूं विद्यार्थी खरा, पण अंतर्यामीं तूं दुबळा आहेस, अजाण आहेस, कल्पनेच्या आहारीं जाऊन वागणारा असा एक पोरसवदा तरुण आहेस. ज्यांनीं कधीं कष्ट केले नाहींत असे तुझे ते नाजुक, सर्दीनं ओले होणारे हात! ते असेच राहून कसं भागेल? ते बदललेले पाहिजेत, जीविताची घट्ट पकड घेण्याची ताकत त्या हातांत आली पाहिजे, बेटा!

आणि तुझं नांव? त्याचा त्याग तूं केलाच आहेस. पण पुरतं विसरून जायला पाहिजेस तूं तें नांव. भटक्याला नांव नसतं. किंवा हवीं तेवढीं असतात. कुंपणावरून 'ज्योआकिम' अशी एका मजुरानं दुसऱ्याला हाक मारली कीं तूं दचकून वळतोस हें ठीक नव्हे. शेजारच्या बखळींत तूं लाकडाच्या ओंड्यावर करवत मारतो आहेस, अन् तूं आपलं नांव 'हॅन्स' का असंच कांहींसं सांगितलं आहेस तें विसरूं नकोस. अशी मोलमजुरी करावी, कुणी ओळखील अशी भीति वाटली कीं रानांत लपावं, पुन्हा बाहेर पडावं, हेंच आयुष्य तुझं आतां.

त्या आडवळणाच्या फाट्यावरून एक भिकार आगगाडी रोज सकाळीं झुकझुक करीत अन् आपल्या इंजनांतून काळाकुट्ट धूर सोडीत बड्या स्टेशनाकडे जात असे. आज त्या आगगाडीच्या एका चवथ्या वर्गाच्या डब्यांत खवा विकायला निघालेल्या तीन बाया होत्या, आपली दाढ दाखवायला दंतवैद्याकडे चाललेला एक इसम होता, अन् वकिलाचा सल्ला घ्यायसाठीं जाणारा एक शेतकरी होता. एका कोपऱ्यांत एक तरुण निजला होता, त्यानं आपली टोपी पुढें ओढून डोळ्यांवर घेतली होती, अन् हात खिशांत घातले होते. खव्याच्या टोपल्या घेऊन निघालेल्या त्या बायकांची सारखी वटवट चालली होती. यंदा थंडीचा कोण हा कडाका पडला आहे, मांजरांच्या अंगावरची लोकर कशी लवकर काढावी लागली, 'ककू' फुलांचे मळे कसे बहरले आहेत, इत्यादि गोष्टी चालल्या होत्या त्यांच्या. दंतवैद्याकडे निघालेल्या इसमानं

मधेंच त्यांच्या गप्पांत भाग घेतला, व आपल्या विवाहानिमित्त झालेल्या मेजवानींचं वर्णन सुरू केलं. बडी मेजवानी झाली होती ती. पण त्या वेळींच एका घासांत हाडूक सापडून त्याची दाढ तुटली होती. हें सांगतांना नुसत्या आठवणीनं त्याचे डोळे भरून आले. वकिलाची गाठ घ्यायला निघालेला शेतकरी आपल्याच ऐटींत गप्प बसून तें सारं ऐकत होता. " भली खोड मोडली बेट्याची ! " असं मनाशीं म्हणत हसत होता तो. दुसऱ्याच्या दुःखानं कांहीं माणसांना आनंद होतो. दाढदुखीवाल्या इसमाला त्या बायांपैकीं एकीनं सांगितलं, " चहाच्या गरम गरम पाण्यानं धुवा दाढ म्हणजे बरं वाटेल."... आगगाडी रखडत चालली होती, तिची घंटा वारंवार खणखण करीत होती, मागच्या बाजूला एका मालाच्या डब्यांत दुधाचे डबे भरलेले होते त्यांचा सारखा खळखळाट होत होता.

मधेंच त्या शेतकऱ्याला बोलायची लहर आली. त्यानं आपली 'पाइप' तोंडावेगळी केली, अन् गाडींतच थुंकून तो म्हणाला,

" मागच्या स्टेशनावर एक पोलिस शिपाई होता, तुम्हीं पाहिलांत का ? "

खवेवाल्या बायकांनीं एकदम विचारलं, " पोलिस शिपाई ?...अन् तो कशाला ? "

" या गाडींतल्या उतारूंवर नजर ठेवायचा हुकूम सुटला असेल... "

त्या बायकांना कांहीं हा खुलासा पटला नाहीं. त्यांचे तर्कवितर्क सुरू झाले. कोपऱ्यांत अंग दुमडून पडलेला तरुण अजून निजलेलाच होता. पण त्यानं आपला श्वास एकदम आवरून धरला. मागच्या स्टेशनावर पोलिस शिपाई दिसला होता तर...

दाढ धरून बसलेला उतारू म्हणाला, " मी सांगूं का, हे पोलिस अन् बिलीस कशाकरतां तें ? इकडच्या भागांतून बटाटे बाहेर न्यायला बंदी केली आहे सरकारनं. तेव्हां कुणी चोरून नेत असतील बटाटे तर त्यांवर पाळत ठेवायला नको ? म्हणून असला पाहिजे तो पोलिस मागच्या स्टेशनावर. "

" हां तसंहि असेल, किंवा दुसरंहि कांहीं कारण असेल ! " असं उद्गारून त्या शेतकऱ्यानं पुन्हा एकदां पिचकारी मारली, अन् मग परत 'पाइप' तोंडात घालून तो गप्प बसला.

कोपऱ्यांत पडलेल्या तरुणानं डोळे उघडले. कांहीं विलक्षणच नजर दिसली त्याची. एखाद्या हिंस्र पशूसारखी किंवा भ्रमिष्टासारखी. त्यानं चळवळ केली, तो उठला. इतर उतारूंच्या तंगड्या, टोपल्या, गाठोडीं ओलांडून उड्या मारीत त्यानं दार गाठलं, अन् तें एकदम उघडून धावत्या गाडींतून त्यानं उडी ठोकली ! खालच्या चढणीवर तो धाडकन् आदळला, एक दगड लागून त्याच्या गुडघ्याला खोक पडली, उंचवट्यावरून गरंगळत तो खालीं गेला, तो कसाबसा उठला, पळाला, अन् शेतांच्या झाकरांत अदृश्य झाला !

उघड्या राहिलेल्या दारांतून गार झोंबऱ्या वाऱ्याचे झोत आंत येऊं लागले. दाढ दुखीवाला इसम उठला. आणि " खुळा असला पाहिजे ! " असं पुटपुटत त्यानं दार परत लावून घेतलं !

एका खेड्यांतली खाणावळ. संध्याकाळची वेळ. खाणावळीच्या पुढच्या कडीपाटाच्या खोलींत दारूचा दर्प सुटला होता, अन् तंबाखूचा धूर भरला होता. शेगडी चांगली रसरसली होती. कसं उबदार वाटत होतं त्या जागीं. खाणावळीचा मालक वाचण्यांत गढला होता. गिऱ्हाइकांना दारू व खाद्यपेयं वाढणारी परिचारिका आपल्या उंच टेबलाच्या कठड्यावर हात पसरून त्यांवर डोकं रेलून बसली होती. दोन इसम एका टेबलाजवळ पत्ते खेळत होते. एक भली मोठी रंगीबेरंगी माशी गुंगुं करीत इकडे तिकडे गिरक्या घेत होती. एका टेबलाखालीं एक कुत्रं झोपलं होतं. बाहेर अशी हवा पडली होती कीं तिचं वर्णन करणं कठीण. वादळी पावसाची झोड उठली होती, बर्फाची वृष्टि चालू होती, उजाड माळावर वारा घोंगावून थाड थाड करीत होता, रस्त्या-

वरच बर्फ गोठून दगडासारखं झालं होतं, अन् अंधार असा माजला होता कीं डोळ्यांत बोट घातलं तरी समजूं नये.

बाहेरच्या वादळानं आंत ढकलून दिल्याप्रमाणे एक इसम खाणावळींत शिरला. त्याच्यामागोमाग बर्फाचा अन् गार वाऱ्याचा जंगी झोत आंत घुसला. तो इसम आंत आला तो " गुड ईव्हिनिंग " म्हणून सरळ शेगडीजवळ जाऊन उभा राहिला. त्याच्या कपड्यांवर, मानेवर, केसांत, नाकातोंडावर गोठलेल्या बर्फाचे पापुद्रे बसले होते. तें त्यानं झटकले. पाय आपटून त्यानं आपल्या बुटावरचे बर्फाचे थर झाडून टाकले. हळूहळू बर्फाचीं तीं पुटं दूर करून जणूं तो बाहेर पडला, अन् मग त्याच्या तोंडावर हास्य दिसूं लागलं.

शेगडीजवळच एका टेबलावर, तिथें फारसा उजेड नाहीं असं पाहून, तो बसला अन् म्हणाला,

" किती ऊबदार वाटतं आहे इथें ! खायाची सोय होईल का ? "

परिचारिका म्हणाली, " तुम्हांला गरमागरम कांहीं तरी हवं असेल नव्हे ? वाटाण्याचं ' सूप, ' अन् ' सॉसेज ' चालेल ? अन् प्यायला काय देऊं ? ' श्नॅप ' दारू ? "

" हां हां ! बिलकुल ठीक ! " असं म्हणत त्या पाहुण्यानं खिशांतून नोटा काढल्या अन् टेबलावर ठेवल्या. जणूं आपल्याला बिल देणं कांहीं जड नाहीं हें त्याला दर्शवायचं होतं. तें पाहून मालकाला समाधान वाटलं. तो पुन्हा वाचण्यांत गर्क झाला. परिचारिका सैंपाकघरांत गेली. पत्ते खेळणाऱ्या इसमांनीं टेबलावर हात आपटले, अन् हुकूम सांगितले. ती जंगी निळीकाळी माशी वांकडीतिकडी उडाली अन् या नव्या पाहुण्याच्या टेबलावर तळ देऊन नखरेलपणानं आपली एक तंगडी साफसूफ करूं लागली. परिचारिका परत आली. तिनं पाहुण्यापुढें बशी ठेवली. बशींतल्या पदार्थांतून वाफा निघत होत्या, अन् त्याचा वासहि मोठा खमंग वाटत होता. पाहुण्यानं 'श्नॅप'चा एक घोट झोकला. त्याचा घसा गरम झाला, अजून थंडीनं बधिरच असलेली

त्याची हनुवटी हालूंचालूं लागली. आजची ही संध्याकाळ मजेदार उगव-लीसं त्याला वाटलं. त्याच्या वाट्याला क्वचित्च आली होती अशी. त्याला निवान्त आसरा मिळाला होता, खायला अन्न मिळालं होतं. आणखी काय पाहिजे ?

" आतां तुमचं बिल देतां ? " असं परिचारिकेनं विचारलं, त्यानं पुढें केलेल्या नोटा घेतल्या, अन् मग ती त्याच्याजवळ बसून बोलूं लागली.

" भारी वाईट हवेंतून आलांत तुम्ही !"

" याहीपेक्षां वाईट हवा खाल्ली आहे मीं ! " तो पाहुणा म्हणाला,

" कुठें कामधंदा नाहीं वाटतं तुम्हांला ? "

" तें कां ? रेल्वे कंपनींत आहे मी. सध्यां इकडे बदली झाली आहे माझी " त्यानं थाप मारली.

त्याच्याविषयींचा आदर एकदम वाढल्यामुळें ती उद्गारली, " हं ? कसलं काम करतां ? "

" काम होय ?... विजेचं. फार रंगेल असतात हें काम करणारे गडी ! बघ वाटलं तर माझी परीक्षा घेऊन..."

त्याच्या चावटपणाला लगाम घालायसाठीं ती म्हणाली, " हां, ती माशी हाकला ! पुन्हा कशी झिंगली बघा ! "

दारूच्या रिकाम्या ग्लासावर त्या माशीच्या उलटसुलट उड्या चालल्या होत्यां त्या पाहण्यांत ती गर्क झाली. पाहुणा येवढ्या मोठमोठ्यांदा खदखद हसूं लागला, कीं मालक भिऊन दचकला. तो तरुण पाहुणा अगदीं खुषींत आला होता. त्या माशीची, त्या परिचारिकेची, वाटलं तर स्वतःची थट्टा करावी अन् पोटभर हसावं अशी ही संधि त्याला मिळाली होती. अन् शिवाय गरमगरम ' सूप ' ची बशी त्याच्यापुढें होती. त्यानं अधाशीपणानं चमचाभर

, सूप ' ओरपलं तेव्हां त्याच्या जिभेला अन् हिरड्यांना चांगलाच चटका बसला; पण त्याचीही गंमत वाटून तो हसत सुटला. 'सूप' निवायची वाट पहावी म्हणून त्यानं चमचा खालीं ठेवला, व आपला काळा खडबडीत हात परिचारिकेच्या मांसल लालसर हातावर दाबून त्यानं खुशाल विचारलं,

"...रात्रीं...?"

"हुं !...पण वर माडीवर नाहीं." ती म्हणाली, "तिथल्या खोलींत कुणीसं आधींच उतरलं आहे. तुझी हरकत नसेल तर बाहेर कोठाराच्या खोलींत. पुन्हा रात्रीं अशा हवेंत कुठें भटकत जाणार तूं नाहीं तरी ?"

त्याला पटलं तें. तिची थट्टा करावी म्हणून तो म्हणाला, "रानांतल्या गवतांत एकटा निजलों तर भयानं झोप कुठली येणार मला ?"

तो अगदीं थकून गेला होता. पण नव्याच सुखाच्या अपेक्षेनं त्याच्या शरीरांतली शीरन् शीर थरारली. भयंकर हालांत गेले होते त्याचे दिवस. परंतु आज त्याला अन्न मिळत होतं, अन् विश्रांति मिळणार होती. बाहेरच्या अंधःकाराची अन् वादळी गारठ्याची त्याला आठवण झाली, अन् त्या ऊबदार जागेचा आसरा त्याला पराकाष्ठेचा सुखाचा वाटला. त्या परिचारिकेच्या रुंद, भोळ्याभाबड्या चेहऱ्याकडे त्यानं कांहीं वेळ अगदीं टक लावून पाहिलं, अन् मग तो खाऊं लागला.

जरा वेळानं लाकडी जिन्याच्या पायऱ्या करकरल्या, पावलं वाजलीं, आणि माडीवरच्या खोलींत उतरलेला प्रवासी खालीं आला. त्याच्या डोक्याला हिरव्या रंगाची टोपी होती, तिच्यावर कसला तरी बिल्ला होता. खोलींतल्या साऱ्याच माणसांना अभिवादन करायसाठीं त्यानं आपली टोपी जराशी उचलली अन् लगेच डोक्यावर परत ठेवली. नव्या पाहुण्याकडे दृष्टि जातांच त्यानं रोखून पाहिलं, व मग तो मालकाजवळ जाऊन बसला. त्याच्या एकंदर थाटावरून, व विशेषतः त्याच्या हिरव्या टोपीवरून तो कुणी सरकारी कामदार असावा. तो आपल्याकडे अगदीं शोधक नजरेनं पाहत

आहे असं या नव्या प्रवाशाला वाटलं. इतकंच नव्हे, याची व आपली पूर्वी कुठें तरी गाठ पडली असावी व त्यानं आपल्याला ओळखलं असावं असंही त्याच्या मनांत आलं. त्याला नकळत त्याचा चेहरा फिकट दिसूं लागला. तो उठला, त्यानं चमचा टेबलावर दूर ठेवला आणि दाराकडे दृष्टि टाकली.

मालकाची कल्पना झाली त्याला मुत्रीकडे जायचं असेल, म्हणून त्यानं हळूच सांगितलं, " अंगण ओलांडलं, कीं डाव्या हाताला डुकरांच्या गोठ्या-लगत एक खोपट आहे तिथें... " पाहुणा दार उघडून गेला. बाहेरचा सुसाट वारा, बर्फ अन् अंधारसुद्धां झोत घेऊन क्षणभर आंत घुसल्या-सारखं वाटलं.

पंधरा वीस मिनिटं गेलीं तेव्हां हिरव्या टोपीचा इसम म्हणाला, " केवढी मोठी म्हणायची याची लघुशंका " अन् असं म्हणून तो मोठ्यांदा हंसला. गाई विकायचा धंदा करीत असे तो. त्याचा विनोद उत्तान असल्यास नवल नाहीं. मालकही हसला. अर्धा तास झाला तेव्हां त्यानं उठून दार उघडलं, बाहेरच्या अंगणांत डोकावून पाहिलं, अन् कानोसाहि घेतला. तिथें कोण होतं ? कोणी नाहीं !

दार लोटून परत येतां येतां मालक उद्गारला, " बुडवलं बेट्यानं जेवणाचं बिल ... "

त्यानं तसं कां म्हणावं असं आश्चर्य दाखवीत परिचारिका म्हणाली,

" तें कां ? त्यानं आधींच दिले आहेत पैसे, अन् जेवण तसंच आहे अजून त्याचं टेबलावर. "

" हं. मग येईल येईल तो परत " असं म्हणून हिरव्या टोपीवाल्या इसमानं खोलीची वाट सुधारली.

पण तो प्रवासी परत आला नाहीं ! त्यानं धास्ती घेतली होती, आणि अपराध्याचं एकाकी जीवन पुन्हां पतकरून तो रात्रीच्या अंधारांत, हिमवृष्टींत, वादळांत भटकत चालला होता !

एक लहानसं शहर. वेळ तिन्हीसांजांची. शनिवार असल्यामुळें दुकानं

जरा लवकरच बंद होत आहेत. ' टाऊन हॉल ' वर देखरेख ठेवणारा कामदार ' हिमेलमान ' स्वतः प्रवेशद्वाराजवळची एक बत्ती लावतो आहे. बत्ती पेटवून झाल्यावर तो नजर वर करतो अन् आभाळाकडे पाहतो. ढगांचे लोट अंतराळातून सरकताहेत. त्यापैकीं कांहीं तर चर्चच्या शिखरावर टेकताहेत. गांवाचं जें मोडकंतोडकं हवामानखातं आहे त्याच्यावर हुकमत ' हिमेलमान ' चीच आहे. टाउन हॉलच्या अंगणातच एक जागा आहे, त्यांत दोनचार प्रकारचीं हवामापन यंत्रं आहेत. तीं पाहायचीं अन् हवेचा रिपोर्ट लिहून बाहेरच्या बोर्डावर लावायचा हें हिमेलमानचं काम. याच बोर्डावर जाहीर खबरी, किंवा नाटक-तमाशांच्या जाहिरातींनाही जागा मिळायचीं, अन् त्यांवरही हिमेलमानचीच देखरेख असायची.

हिमेलमाननं आभाळाकडे पाहिलं, हवामापन यंत्राची तपासणी केली, अन् मग आंत जाऊन त्यानं एका तक्त्यावर जाडजूड अक्षरांत लिहिलं : ' हवावृत्त : आभाळ ढगांनीं व्याप्त असून मधून मधून पावसाची सर येईल. हवेंत चलविचल संभवते. वादळी वारे सुटतील '. तो तक्ता घेऊन बाहेर येऊन त्यानं तो बोर्डावर चिकटविला. समोरच्या औषधी-संग्रहांतला नोकर त्याच्याजवळ येऊन उभा राहिला होता तो त्या तक्त्याकडे पाहत थट्टेनं म्हणाला, " अरे हिमेलमान, यापेक्षां बऱ्या हवेचं भविष्य वर्तविलंस तर तुझं काय जाईल ? " पण हिमेलमानचं लक्ष त्याच्या विनोदाकडे नव्हतं. त्यानं आणखी एका कागदाची सुरळी उघडली, त्यावर गोंद फासला, अन् तो नोटीसबोर्डावर लावला. त्या विनोदी इसमानं विचारलं,

" कसली रे जाहीर खबर ? "

गंभीर चेहरा करून हिमेलमान म्हणाला, " एक इसम फरारी आहे... प्रधानांचा खून करणारा माणूस अजून सापडलेला नाहीं पोलिसांना...त्याबद्दलची आहे ही नोटीस... !

नोटिशीवर फोटो छापला होता त्याकडे बघत तो दुसरा इसम म्हणाला,

" अस्सं ! ही स्वारी काय ती ! दिसतोच आहे अट्टल बेरडासारखा सापडला पाहिजे लवकर, फार दिवस झाले, नाहीं ? अच्छा, हिमेलमान जातो. दुकान बंद करावं म्हणतों. "

तो आपल्या दुकानाकडे गेला, अन् हिमेलमानही तेथें उभा राहिला नाहीं. फरारी इसमाबद्दलची ती खबर सबंध जर्मनीभर हजारों नोटीसबोर्डावर लागली होती तशीच इथेंही लावली गेली होती. शहरांतले लोक बोर्डा-जवळ थाबत, खबर वाचीत, फोटोकडे बघत, अन् मुकाट्यानं किंवा आपा-पसांत कांहीं बोलत शेजारच्या मद्यगृहांत प्रवेश करीत. हिमेलमानच्या भाकिताप्रमाणें वादळी वारा सुरूं झाला, आणि घाईनं चिकटविलेल्या जाहीर खबरीचा एक कोपरा वाऱ्याच्या झोतानं सुटा होऊन फडफडूं लागला. कांहीं वेळानं पुरता अंधार पडला आणि पावसाची सर सुरूं झाली. नोटीस-बोर्डावरून पाण्याचे ओघळ वाहूं लागले, अन् तिथल्या त्या एकाच दिव्याच्या प्रकाशांत जाहीर खबरीचा तो कागद चकाकूं लागला.

बऱ्याच वेळानंतर एक इसम स्टेशनच्या बाजूनं त्या चौकांत आला. आतां चौकांत एकही मनुष्य नव्हता. तो इसम फार लांबचा प्रवास करून आला असला पाहिजे. तो अगदीं थकल्यासारखा दिसत होता. त्याची तब्येतही बरी नसावी. त्याला मध्येंच ठसका येई, आणि त्या वेळीं एखादं आजारी कुत्रं भुंकावं त्याप्रमाणं तो खोके. मधेंच तो थबकून उभा राही व इकडे तिकडे पाही. चौकांत आल्यावर तिथल्या दिव्याचा प्रकाश, अन् रात्रीच्या प्रहराची तिथली शांतता पाहून त्याला बरं वाटलं. तो मद्यगृहाकडे जायच्या विचारांत होता, इतक्यांत नोटिसबोर्डावर फडफडणाऱ्या त्या कागदाकडे त्याचं लक्ष गेलं. पुढें होऊन तो ती खबर वाचूं लागला. अगदीं थकल्यामुळें तो एक एक शब्द वाचीत होता.

" ज्या इसमाचं या जाहीर नोटिशींत वर्णन केलेलं आहे तो खून करून फरारी झालेला आहे. ज्यांना तो कुठेंही दिसेल त्यांनीं त्याला अडकवून ठेवावं अन् पोलिसांत ताबडतोब वर्दी द्यावी. या फरारी माणसाचा पत्ता लावून देणारांस ३०,००० ( अक्षरी तीस हजार ) 'मार्क' इनाम देण्यांत येतील ..."

तो प्रवासी पुढें वाचूं लागला. त्याचं स्वतःचंच तें वर्णन होतं अन् तें अगदीं बिनचूक होतं. त्याची मध्यम उंची, किरकोळ बांधा, फिक्या पिंगट रंगाचे केस, इतकंच काय किंचित् वाकडा असलेला एक दांतसुद्धां त्या वर्णनांत होता. आणि त्याच्या डाव्या भुवईवरचा चामखिळीचा तर हमखास निशाणी म्हणून उल्लेख केला होता.

तो प्रवासी किती तरी वेळ ती जाहीर खबर वाचीत उभा राहिला. त्याची चर्या गंभीर झाली होती, अन् सर्व अंग अगदीं ताठरल्यासारखं बधिर झालं होतं.

त्या नोटिशींतल्या फोटोग्राफकडे त्यानं पाहिलं. तो कांहीं अगदीं स्पष्ट उठलेला नव्हता. पण त्यावरून त्याला ओळखणंही कठीण नव्हतं. तो थकलेला प्रवासी त्या चित्राकडे अगदीं निरखून पाहूं लागला. चित्रांतल्या त्या माणसाची चर्या तारुण्यसंपन्न दिसत होती, कपाळाच्या वरचा भाग कांहींसा अरुंद होता, हनुवटी नाजूक होती. ते अव्यवस्थित कपडे, नजरेंतली ती शून्यता !...

त्या चित्राकडे पाहतां पाहतां त्या प्रवाशाची चर्या विचारमग्न झाली. 'असा मीं होतों तर !...' असं तो मनाशीं म्हणत असावा. केवळ त्या कागदावरचं तें चित्रंच नव्हे तर इतरही अनेक चित्रं त्याच्या नजरेपुढं उभीं राहिलीं असावींत. माराभर कपडे घेऊन धुणारी त्याची आई, वरून शान्त पण आंतून असंतोषानं धुमसणारी त्याची बहीण, वृत्तपत्रं वाचण्यांत गढलेला त्याचा बाप-त्याला दिसला असेल. त्याच्या घरचं सैंपाकघर, मधला बोळ, त्याची निजायची खोली—विस्मृतींत गडप होत चाललेलं एक सबंध जगाच्या जग त्याच्या

नजरेपुढून गेलं असेल. त्याचा दोस्त आस्केनिअस, न्हाणीघरांतल्या तस्तांची पांढरी चकचकींत तोटी, एक टॉवेल, डॉ. थलमानचा रुंदट चेहरा अशीं अनेक चित्रं झरकन उभीं राहिलीं, आणि मग तीं सगळीं हलकेहलके विरघळून त्या जाहीर खबरींतला फोटोग्राफ त्या प्रवाशाला पुन्हा स्पष्ट दिसूं लागला...

कागद फडफडला, वाऱ्याचे झोत अधिकच जोरानं वाहूं लागले, आणि पावसाच्या सरीला अधिकच भर आला. शहराच्या बाजाराचा तो चौक जवळजवळ अंधकारमयच झाला होता, आणि तिथें पूर्ण स्तब्धता नांदत होती...

तो थकलेला प्रवासी मद्यगृहांत गेला नाहीं. तो परत फिरला आणि वाट चालूं लागला. त्याला गेल्या दोन दिवसांत झोप नव्हती. तो अगदीं श्रमून, थकून गेला होता; परंतु तरीसुद्धा त्या शहरांत तो थांबला नाहीं!

# १

जिकडे पाय नेतील तिकडे जावं, वाट फुटेल तिकडे भटकावं अशा तऱ्हेनं त्या तरुणाचा पळ जर्मनीच्या दक्षिण प्रांतांतून चालला असतांना ग्रीष्म ऋतूंत एक महत्त्वाचा प्रसंग घडला. महत्त्वाचा अशा अर्थानं, कीं त्या प्रसंगीं जें घडलं तें जरी शब्दांनीं वर्णन करणं अशक्य इतकं आध्यात्मिक स्वरूपाचं होतं, तरी त्यांत त्याच्या एकंदर भवितव्याचा हात होता यांत संशय नाहीं.

एके दिवशीं संध्याकाळीं तो एका शहराच्या सीमेवर येऊन पोंचला, व पुढें जावं कीं मुक्काम करावा असा कांहीं वेळ मनाशीं विचार केल्यावर त्यानं त्या शहरांत प्रवेश केला. शहराबाहेर अगदीं नदीकिनाऱ्यापर्यंत हिरवीं गार कुरणं पसरलीं होतीं, अन् त्यावर जागोजाग पांढऱ्याशुभ्र 'गूज' पक्षाचे थवे दिसत होते. किनाऱ्याला लागून किती तरी छोटे छोटे पडाव उभे होते, अन् एक मोठी पिंगट रंगाची 'फेरीबोट' पाण्यावर डुलत होती. सूर्याच्या तिरप्या किरणांचा सुवर्णरंग उंच वृक्षांच्या माथ्यांवर पसरला होता. त्या तरुणानं वेशीच्या आंत प्रवेश केला, व पाहिलं तो शहराच्या अरुंद रस्त्यांत प्रकाश नव्हता. घरांच्या कौलारांनीं खालीं केवढाल्या छाया पसरल्या होत्या.

लहान मुलं खेळ आटपून घराकडे वळलीं होतीं. एकाद्या मध्ययुगीन रम्य स्वप्नसृष्टींत आपण प्रवेश करीत आहोंत असं त्याला वाटलं. हवेंत लिंबवृक्षांचा सुगंध दरवळला होता. चर्चच्या घंटा घणघणून वाजूं लागल्या, अन् बाकीचे सारे आवाज एकदम बंद झाल्यासारखं वाटलं. त्या तरुणानं न कळत आपली टोपी डोक्यावरून काढली, कांहीं वेळ त्यानं अगदीं सावकाश पावलं टाकलीं, अन् मग अखेर तो थांबलाच. कांहीं वेळानं चर्चच्या घंटा थांबल्या, रहदारीचे सारे ध्वनीही एकामागून एक बंद झाले, अन् जिकडे तिकडे स्तब्धता पसरली.

किती शांत ! किती निःशब्द ! चर्चच्या परिसरांतल्या त्या स्तब्ध देखाव्याकडे पाहून तरुणाच्या मनांत आलं, "हेंच खरं. आपलं आयुष्य तर येवढंसं, मग त्याच्यासाठीं येवढी धडपड ? सारं उगीच, व्यर्थ नाहीं काय ?..."

चर्चचा दरवाजा उघडा होता. आंतल्या धूपाचा वास येताच तरुणाला वाटलं, जावं आंत. आंत अंधार झाला होता. उंच वेदीवरचे सतत तेवणारे दिवे मात्र होते. 'कुमारी' च्या मूर्तीपुढेंहि दिवे होते. वेदीपुढें एक मनुष्य गुडघे टेकून प्रार्थना करीत होता. त्याकडे पाहून तरुणाच्या मनांत विचार आला, इतक्या तन्मयतेनं मनुष्य प्रार्थना करतो ?... त्या माणसाचा त्याला हेवासुद्धां वाटला. दया, क्षमा इत्यादि कोमल मानवी भावनांचा त्याला स्वतःच्या जीवितांत अनुभव दुर्मिळ झाला होता, त्याचं स्वतःचं जीवित सौंदर्यहीन, रुक्ष झालं होतं; त्यामुळें प्रार्थनेंत मग्न झालेल्या त्या मनुष्याच्या मनःशांतीचा त्याला हेवा वाटला. चर्चमधल्या त्या मूर्तीचादेखील. अन् दुसऱ्याच क्षणीं स्वतःच्या दुःस्थितीची अशी कांहीं तीव्र चीड त्याच्या मनांत आली, कीं त्याला वाटलं स्वत्वाची सारी जाणीव ओरबाडून दूर फेकून गुडघे टेकावे अन् हात जोडावेत. प्रार्थना करावी. अश्रूपात होऊं द्यावा. 'माते'च्या कुशींत शिरून हुंदके देऊन अंतर्यामीं कोंडलेलं सारं सारं दुःख निपटून टाकावं.

त्याप्रमाणें त्यानं केलं तेव्हां असहायतेची, पराभूततेची, एक प्रकारच्या आध्यात्मिक दुर्बलत्वाची जाणीव त्याच्या हृदयांत उद्भवली. कां कोणास ठाऊक, पण परमेश्वराच्या सान्निध तो तसा उभा असतांना आपल्या कृत्यामुळें आपण पापी नव्हे तर अनाथ पोरके मात्र झालो असं त्याला त्या क्षणीं वाटलं. स्वत:च्या पोरकेपणाची त्याची ती जाणीव एकदम इतकी तीव्र झाली, कीं तो गोंधळला, स्वत:चीच थोडीशी खंतही त्याला वाटली, अन् तो मग चटकन् चर्चमधून बाहेर पडला.

एका कोळशाच्या खाणीवर काम करून मिळविलेले थोडे पैसे त्याच्या खिशांत होते. नवे स्वच्छ कपडे त्यानं अंगावर घातले होते. 'कॉर्डुरॉय' कापडाची पिंगट विजार, निळा शर्ट, त्यावर खरबरीत जाकीट, अन् तसल्याच कापडाची टोपी. या वेळीं त्याची मनःस्थिति कांहींशी चमत्कारिक झाली होती. त्याला उदासवाणं तर वाटत होतंच, पण तृप्तीची शांतताही त्याच्या अंतःकरणांत भरली होती. या शहरानं कसली जादू त्याच्या वृत्तीवर टाकली होती कोण जाणे. आपण फरारी आहोंत, नव्हे, त्याहूनहि वाईट दशा आपल्या वाट्यांला आली आहे या गोष्टीचा आज—आजच्या दिवसापुरताच का होईना पण– त्याला पूर्ण विसर पडला होता. त्याच्या आत्म्याला घटकाभर केवढा विसांवा मिळाला होता!

दुतर्फांच्या लिंबवृक्षांच्या पिवळ्या शाखांचा सुगंध घेत घेत रस्त्यानं जात असतां त्याला एक खाणावळ दिसली. तो आंत शिरला, व मद्यगृहांतल्या एका खुर्चीवर बसला. नेहमींप्रमाणें लोकांचे विस्मित चौकस कटाक्ष त्याच्याकडे वळले. पण त्यांचं त्याला आज भय वाटलं नाहीं. त्याचं चित्त आज निर्भय, शांत होतं. त्यानं खाद्यपेय मागविलं, खुशाल पाय पसरले, अन् खिडकीबाहेरच्या लिंबवृक्षांकडे तो आपल्याच विचारांत मग्न होऊन बघत राहिला. आजची रात्र या ठिकाणीं घालवावी असं त्यानं ठरविलं. त्यानं परिचारिकेला बोलावलं, व म्हटलं, " मला खोली मिळेल का ? "

" मालकिणीला विचारतें " असं उत्तर देऊन ती गेली, आणि मालकिणीला घेऊन परत आली.

मालकीण तरूण होती. अबोल, शान्त माणसाची असावी तशी तिची चर्या होती. तिच्या केसांचा रंग तांबूस होता. तिच्या गोल पण किंचित् लांबट चेहऱ्यांत अन् ज्योआकिमनं थोड्याच वेळापूर्वी चर्चमधें पाहिलेल्या ' माते ' च्या चेहऱ्यांत इतकं विलक्षण साम्य होतं, कीं ती जेव्हां जवळ आली, व त्याच्या शेजारच्या खुर्चीवर बसली तेव्हां आश्चर्यातिशयानं क्षणभर त्याच्या तोंडून शब्दच फुटेना.

" एक खोली आहे देतां येण्यासारखी. पण लहान आहे. " ती म्हणाली व उत्सुकतेनं ज्योआकिमकडे पाहूं लागली.

" लहान तर लहान, चालेल आपल्याला. भाडं बेताचं असलं म्हणजे झालं. पैसे फार नसले माणसाजवळ म्हणजे—"

" समजलं..." ती हसत म्हणाली, मग तुमच्यासाठीं मी ती तयार करवितें तर. "

ती गेली. ज्योआकिम तिच्याकडे पाहत राहिला. तिची चालण्याची तऱ्हा त्याला आवडली. ती लवकरच परत आली व एक वही त्याच्यापुढें ठेवून म्हणाली, " यांत तुम्ही आपलं नाव लिहितां ? "

असं विचारतांना तिनं अगदीं नजरेला नजर भिडवून त्याच्याकडे पाहिलं. तिच्या चेहऱ्यावर त्या वेळीं जो गंभीर, निष्कपट, उत्सुक भाव दिसला त्यामुळें ती चर्चमधल्या त्या ' माते ' सारखी अधिकच भासली. ज्योआकिमनं टाक उचलला, अन् शून्य दृष्टीनं समोर टवकारून पाहिलं. एक क्षणभर त्याचा निश्चय होईना. पण मग त्यानं मोठ्या अक्षरांत सावकाश आपलं खरं नांव लिहून टाकलं :

" ज्योआकिम बुर्थ. कायद्याचा अभ्यास करणारा विद्यार्थी. बर्लिन. "

तीं अक्षरं लिहितांना त्याचा चेहरा पांढरा झाला होता.

स्वतःचं खरं नांव लिहितांना आपण सरळ संकटाला आव्हान देत आहोंत असं त्याला वाटत होतं. पण तें लिहूनही जेव्हा कांहींच घडलं नाहीं तेव्हां त्यानं एक दीर्घ श्वास सोडला. त्याची छाती क्षणभर धडधडली, पण मग त्याला निर्भय वाटलं. त्याच्या टाकांतून उतरणाऱ्या अक्षरांकडे मालकीण उत्सुकतेनं पाहत होती. तिनं त्याचं लिहिणं संपल्यावर त्यावर वाळू टाकली, व म्हटलं,

" आमच्याकडे कायद्याचे विद्यार्थी पुष्कळदां येतात. गेल्या उन्हाळ्यांतच चौघे आले होते. इथल्या चर्चमधली 'माते' ची मूर्ति पाह्यला येतात लोक... "

ज्योआकिम तिच्याकडे निरखून पाहत राहिला तेव्हां तिनं विचारलं, " कां ? "

" मी सारखं आश्चर्य करतों आहे मनाशीं. तुमचा चेहरा अगदीं हुबेहुब मातेसारखा आहे ! तुम्हांला ठाऊक आहे ? "

" हो. इथल्या बहुतेक स्त्रिया तुम्हांला तशा दिसतील. "

" पण असं कसं ?

" त्याचं कारण असं कीं आमच्या आयांनीं, आज्यांनीं, पणज्यांनीं पिढ्यान्-पिढ्या सतत ' माते ' ची उपासना केली आहे. तिची मूर्ति इथल्या साऱ्या स्त्रियांच्या हृदयांत कोरली गेली आहे. मला मुलगी असती तर तीसुद्धां अशीच दिसली असती. "

" तुम्हांला मुलगी नाहीं ? "

" अंहं. मी एकटीच आहे. " असं म्हणून तिनं टेबलावर टेकलेले आपले हात जुळविल्यासारखे केले, अन् खिडकीकडे नजर फिरविली. मग विषय बदलून ती म्हणाली, " चला, तुमची खोली दाखवितें तुम्हांला तुम्ही म्हणत असाल तर. "

तिच्या मागोमाग जिन्याच्या पायऱ्या चढतां चढतां त्यानं विचारलं " इथले लोक विशेष पापभीरु आहेत काय ? "

ती हसून म्हणाली, " मला नाहीं वाटत. पुरुष भारी दारू पितात, अन् मुलींना लग्नाच्या आधींच मुलं होतात. जगभर चाललं आहे तेंच इथेंहि सुरू आहे. एक चोरसुद्धां आहे आमच्या गांवांत. भारी वाईट आहे. पांच वेळा तुरुंगांत जाऊन आला आहे, पण त्याचा धंदा चालूच आहे. "

" मग इथले पोलिसलोक सदा हुश्यार राहत असतील ? " असं ज्योआकिमनं विचारलं, अन् तें विचारतांना शरमेनं अन् गोंधळानं त्याचा घसा जवळ जवळ गुदमरून गेला.

" हो तर...." असं तिनं उत्तर दिलं, व तितक्यांत एका खोलीपुढें थांबून ती म्हणाली, " ही तुमची खोली. पाणीबिणी सारं कांहीं आहे हं. जाऊं मी ?..."

तो एकटाच राहिला तेव्हां त्यानं कांहीं वेळ खोलींतल्या खोलींत येरझारा घातल्या. मग तो खिडकीजवळ उभा राहिला व रात्रीच्या शान्त वायूचे झोत त्यानं नाकावाटे सावकाश आंत घेतले. एक संबंध रात्र तो पुन्हा ज्योआकिम झाला होता. केवढं साहस केलं होतं त्यानं हें ! पण भोंवतालच्या शान्ततेंत मग्न होऊन खिडकीशीं उभं राहिल्यावेळीं त्याच्या मनांत आलं, मी खरंच ज्योआकिम आहे काय ? ज्यानं खून केला तोच मी ? तो ज्योआकिम मी होऊं शकतो ? तो आरशाजवळ गेला अन् आपल्या चेहऱ्याकडे तीक्ष्ण नजरेनं पाहूं लागला. त्याचा चेहरा बदलला होता. त्यावरची जवानी गेली होती. त्यांत एक प्रकारची स्थिरता आली होती. रेषा स्पष्ट झाल्या होत्या. नाजुकपणा जाऊन राठपणा आला होता. डोळे मात्र अस्थिर अन् उग्र दिसत होते. त्या प्रतिबिंबाकडे पाहून त्याला खेद झाला तो पुन्हा खिडकीपाशीं जाऊन उभा राहिला.

शहराच्या तटबंदीची जुनी भिंत त्या खिडकीला अगदीं टेकली होती, तिच्या चिराचिरांतून ' एल्डर ' चे दाट झुबके उगवले होते व त्यावर टपोरीं

पांढरीं फुलं बहरलीं होतीं. पलीकडे नदीपर्यंत कुरणं पसरलीं होतीं त्यांवर आतां दंव अन् धुकं पसरल्यामुळें त्याचा हिरवा रंग धूसर दिसत होता. नदीच्या पाण्याची खळखळ अस्पष्टपणें ऐकूं येत होती. पैलतीरावर लहानसं रेल्वे स्टेशन होतं तिथले दिवे लुकलुकत होते अन् गडबडही कानांवर येत होती. मधेंच त्या तीरावरून कुणी तरी ' फेरी 'वाल्याला साद दिली तो शब्द मोठ्यानं स्पष्ट ऐकूं आला. मग पाण्याच्या पृष्ठावर वल्ह्यांचा आवाज झाला, अन् कांहीं वेळानं एक लहानसा कंदील कुरणावरून सरकत सरकत येऊन तटबंदीला वळसा घालून दिसेनासा झाला.

या साऱ्या गोष्टी ज्योआकिमनं पाहिल्या त्या उगीच नव्हे. आपल्याला पळ काढायचा प्रसंग आला तर कसा काढतां येईल हा हेतु त्यांत होता एखाद्या कोंडलेल्या श्वापदाप्रमाणें आजूबाजूच्या साऱ्या गोष्टींचं निरीक्षण करण्याची त्याला आतां सवयच जडली होती...जरा वेळानं शेजारच्या खोलींत चमत्कारिक आवाज होत आहे तसं त्याला वाटलं. सामान हालवलं जात होतं. या वेळीं ? अन् कुणाची तरी चोरट्या आवाजांत कुजबुजही चालली होती !... ज्योआकिम झटकन मधल्या दाराजवळ गेला. तें बंद होतं. त्यानं दाराला कान लावला. मालकिणीचा आवाज त्यानं ओळखला. दुसरा आवाज पुरुषाचा होता. पण कांहीं तरी गुप्त खलबत केल्याप्रमाणें त्यांचं बोलणं अगदीं कुजबुजून चाललं होतं त्यामुळें त्यांचे शब्द त्याला ऐकूं आले नाहींत. आपण सरळ आपल्या पायानीं येऊन सापळ्यांत तर सापडलों नाहीं ? अशा शंकेनं क्षणभर त्याच्या हृदयाची क्रिया थांबली. पण लगेच मालकिणीची निष्कपट, गंभीर, सात्त्विक मुद्रा त्याच्या नजरेपुढें आली व त्याचं भय नाहींसं झालं. काय वेड्यासारखे आपण घाबरलों असं मनांत येऊन तो हसला...

पण तितक्यांत खोलीच्या दारावर कुणी तरी टकटक केलं.

ज्योआकिम इतका दचकला कीं, " कोण आहे ? " असं ओरडतांना त्याचा घसा अगदीं सुकून गेला होता.

त्यानं दार उघडलं.

बाहेर मालकीण उभी होती!

तिचा चेहरा गोंधळलेला, ओशाळल्यासारखा दिसत होता.

" माफ करा, पण— " ती पुटपुटली.

" माफ करा ? काय झालं ? "

ज्योआकिमला वाटलं, मालकीणबाईच्या मागं खात्रीनं पोलिस अंमलदार हातकड्या घेऊन उभा असेल अन् तो आतां पुढें येईल...

पण तसं कांहीं झालं नाहीं.

मालकीण म्हणाली,

" तुम्हांला थोडासा त्रास होणार आहे आमच्या संगीताचा. मी विसरलें सांगायला. दर बुधवारीं आम्हीं पलीकडच्या खोलींत लहानशी मैफल करतों. आपलीं हत्यारं घेऊन आली आहेत मंडळी. तुम्हांला कटकट होणार आमच्या संगीताची!

" संगीताची ? शाबास! मला वाटलं काय आहे! संगीताबरोबर नृत्यही आहे कीं काय ? "

" नाहीं. इतकी रंगेल नाहींत मंडळी. अन् तसलं संगीत आम्ही वाजवीतही नाहीं. चार वाद्यांचं संघवादन आहे. "

" अस्सं! " तिचं बोलणं न समजताच ज्योआकिम म्हणाला.

आपल्याकडून पाहुण्याचा कांहीं तरी अपराध घडत आहे अशा अभिप्रायाची गंभीर मुद्रा कायम ठेवून ती म्हणाली,

" पुष्कळ लोकांना आवडते आमची ही मैफल. पण तुम्हांला कदाचित् गाण्याचा षोक नसेल— "

" तें कां ? मला त्यांतलं कांहीं समजत नाहीं— "

" होय ना. नाहीं तर मी तुम्हांला म्हटलं असतं, या अन् ऐका— " पर्यायानं असं आमंत्रण देतांना ती लाजली.

" तुम्ही ऐकत बसणार आहांत ? "

" नाहीं. मी फिडल वाजवितें. " असं म्हणून ती थांबली.

" हं ! वा फक्कड ! मग आपली हरकत नसेल तर – "

असं म्हणताना त्यानं आपल्या गतकालच्या विद्यार्थीदशेंतल्या शिष्टाचाराचा आविर्भाव आणला. त्या स्त्रीचा तो मोहक चेहरा फिडल वाजवितांना कसा दिसेल तें पाहिलं पाहिजे असं त्याला वाटलं. तो तिच्या मागोमाग पलीकडच्या खोलींत गेला.

जुन्या थाटाच्या वाड्यांत मध्यभागीं असते त्या प्रकारची ती खोली होती लहानशी. तिच्या भिंतींना भडक रंग दिलेला होता. तिला तीन खिडक्या होत्या. तिथें विजेची बत्ती नव्हती. कां कुणास ठाऊक. खिडक्यांच्या मधल्या जागीं मांडलेल्या टेबलावर दोन साधे तेलवातीचे दिवे होते, त्यांचीं प्रकाशवलयं आरशांत प्रतिबिंबीत झालीं होतीं. समोरच्या भिंतीला टेकून मांडलेल्या खुर्च्यांवर दोन वृद्ध स्त्रिया बसल्या होत्या. कोपऱ्यांत एक जुना पियानो उभा होता, अन् मध्यभागीं चार वादकांना आपले संगीताचे छापील कागद ठेवतां यावे म्हणून ' स्टँड ' उभे केले होते. तीन गृहस्थ आधींच आपलीं हत्यारं घेऊन स्थानापन्न झाले होते.

" आतां करूं या सुरूं ! " मालकीण म्हणाली, " हे पाहुणे बर्लिनचे आहेत. तिथं अभ्यासाला असतात. ते ऐकणार आहेत. तेव्हां आपलं सारं कसब दाखविलं पाहिजे त्यांना. "

नष्ट झालेलं जग स्वस्वरूपानें पुन्हा प्रगट होऊन त्यांत आपण वावरत आहोंत असा ज्योआकिमला भास होत होता. खोलींतल्या त्या मंडळींना त्यानें अभिवादन केलं. तें करतांना आपण अभिवादन कसं करायचं तें अजून विसरलों नाहीं तर, असं त्याच्या मनांत आलं. एक खुर्ची जरा बाजूला होती तिच्यावर तो बसला. आपल्या गुडघ्यांवर हात ठेवून तो वाट पाहूं लागला. त्या तीन गृहस्थांनीं आपले चष्मे चढविले—ते इतके वृद्ध होते कीं

चष्म्यावांचून त्यांना दिसणं शक्यच नव्हतं—हत्यारं उचललीं अन् त्यांच्या तारा मिळविण्यास सुरवात केली. ज्योआकिमच्या अगदीं नेमकी समोर मालकीण होती. तिनं आपलं फिडल हनुवटीखालीं धरलं. फिडलच्या तुळतुळीत लाकडांत तिच्या चेहऱ्याचं प्रतिबिंब पडलं. आपल्या हातांतला गज सफाईनं फिरवीत तिनं तारा जमविल्या, आणि मग लगेच चारी वाद्यं वाजूं लागलीं.

प्रथम कांहीं वेळ ज्योआकिमचं लक्ष गाण्याकडे नव्हतं. त्याला तें समजेना. तो फक्त तिच्याकडे बघत होता. वादनांत सर्वस्वीं मग्न झालेल्या तिच्या चेहऱ्याकडे पाहण्यानं त्याच्या जीवाला शान्ति वाटत होती. पण मग हळूहळू एखाद्या विरल वलयासारखा जेलेनाचा सुंदर, भावनाविवश, स्मरमग्न चेहराही त्याला दिसायला लागला. त्या स्वप्नसदृश कल्पनाविलासांत दृष्टीपुढें ते दोन्ही चेहरे ठेवण्याचा त्यानं प्रयत्न केला तेव्हां कांहीं एका विलक्षण अनुभवांत आपण बुडालों आहोंतसं त्याला वाटलं, अन् त्याच वेळीं स्वरमालांची प्रचंड लाट जेव्हां त्याच्या अंतःकरणावर थडकली तेव्हां त्याला भास झाला, कुणाची तरी हाक आपण ऐकत आहोंत. त्याला संगीत समजूं लागलं, व तो ऐकूं लागला—

कुणी तरी हाक मारून पुनः पुन्हा विचारीत होतं, जीवा, तूं कुठें आहेस?...

तो अगदीं पुढें वाकून उत्कण्ठ होऊन ऐकूं लागला तेव्हां त्या हाकेला संगीतांतच जबाब मिळत होता—

मी खोल गर्तेंत पडलों आहे. पण मी वर येणार आहे. मी अंधरांत धडपडतों आहे. पण प्रकाश जवळच आहे हें मला माहीत आहे. मीं माझ्या मार्गनं चाललों आहे...

संगीत किंचित् काल थांबलं अन् पुन्हा चारी वाद्यं वाजूं लागलीं.

पुन्हा तीच हाक; जीवा तूं कुठें आहेस?

पण या वेळीं जबाब येईना. सारी स्तब्धता !

ज्योआकिमनं दीर्घ श्वास घेतला.

पण ऐका, जीवाचा अस्पष्ट आवाज लांबून कोठून तरी, अगदीं खोल जागेंतून अजूनही ऐकूं येत आहे !...

मी खोल गर्तेत आहे. पण मला वर यायचं आहे. मी अंधारात बुडलों आहे. पण प्रकाश दूर नाहीं अशी माझी श्रद्धा आहे. मी वर येणार, वर येणार. .

पुन्हा गीत थांबलं. ज्योआकिमनं उसाचा टाकला. व्हायोलिन वाजविणा-ऱ्यानं इशारा दिला, " पुढें ! " अन् वाद्यं पुन्हा वाजूं लागलीं. आतां ज्योआकिमनं हात उभे धरून त्यांवर मस्तक टेकलं, अन् डोळे मिटून घेऊन तो ऐकूं लागला.

संध्याकाळ झाली होती. सोनेरी प्रकाशांत एका स्त्रीची आकृति दिसत होती ती मंद मंद पावलं टाकीत होती, अन् गात होती..

जीवा, रडूं नकोस मीं तुझं सांत्वन करीन.

पण जीवाचं रुदन थांबेना. उलट त्याला हुंदक्यावर हुंदके फुटूं लागले.

त्या स्त्रीचाहि आवाज उंच झाला. जीवा रडूं नकोस. मी तुझं दुःख दूर करीन...

कांहीं वेळानं जीवाचे हुंदके बंद झाले व अखेर जीव अगदीं शान्त झाला. अगदीं हळू स्वरांत पुन्हा एकदा ती स्त्री म्हणाली, जीवा रडूं नकोस, मी तुझं सांत्वन करीन. आणि मग सारंच स्तब्ध झालं...

ज्योआकिमनं काय पूर्वी संगीत कधीं ऐकलं नव्हतं ? त्यानं संगीत नाटकं पाहिलीं होतीं, जेलेमाचं गायन त्यानं ऐकलं होतं पण त्या वेळीं त्याचं स्वतःचं अंतर्याम अजाण, अपरिपक्क, रिकामं होत. आतां तें तीव्र दुःखांच्या ज्वालांनीं पोळून निघालं होतं. मृत्यूची सोबत घेऊन त्यानं वाटचाल केली होती. त्यामुळें आज संगीत ऐकतांच त्याचं चित्त विरघळलं. जें संगीत त्यानं

ऐकलं तें सामान्य प्रतीचंच होतं, पण त्यामुळें त्याच्या चित्ताची शुद्धि झाली. गेल्या वर्षभरांत जें मालिन्य त्यावर साठलं होतं तें धुऊन निघालं !...

मालकीण हलक्या पावलांनीं त्याच्याजवळ आली व तिनं त्याच्या हातांना हळूच स्पर्श केला. आभाराचे शब्द त्याच्या तोंडून धड बाहेर पडले नाहींत. तो आपल्या खोलीकडे निघून गेला.

हा पाहुणा संगीत ऐकून इतका सद्‌गदित व्हावा याचं बाजाविणाऱ्यांना आश्चर्य वाटलं. पण त्यांपैकीं एकजण आपला चष्मा काढून पुशीत उद्‌गारला, " 'बीथोव्हन'च्या संगीतांत आहेच असा गुण आमचं हें संगीत जोंपर्यंत आमच्याजवळ आहे..."

खोलींत जातांच ज्योआकिमनं अंथरुणावर अंग टाकलं, अन् तो रडूं लागला. आज कित्येक दिवस अंतःकरणांत दाबून टाकलेल्या शोकावेगाला त्यानं मनःपूत वाट दिली. त्याची चित्तशुद्धि झाली होती, अंतःकरण पालटलं होतं, हृदयांत नवीनच शक्ती उद्‌भवल्या होत्या. आत्म्याची जागृति व्हायला सामर्थ्य तर लागतंच, पण दुर्बलत्वहि लागतं.

ज्योआकिमला आध्यात्मिक अनुभव आला तो हा. त्याच्या जीवितांत संगीताची जाणीव त्याला आज प्रथम झाली. आणि ती होतांच त्यानं तें हृदयाशीं प्रेमानं धरलं.

पहाटेच्या धूसर प्रकाशांत तो खिडकीवाटे आपल्या खोलीबाहेर पडला, तटावरून धडपडत उतरला, कुरणावरून त्यानं धूम ठोकली, लपतछपत फेरींतून नदीपार होऊन तो स्टेशनापर्यंत गेला, व उत्तर दिशेला जाणाऱ्या एका गाडींत बसला !

# १०

दारावरची घंटा वाजली म्हणून श्रीपूकेबाईनं आपल्या मांडीवरचं तान्हं मूल अलगद उचलून पाळण्यांत ठेवलं, अन् ती दाराकडे गेली. तिनं दार उघडून पाहिलं तों तिथल्या अंधारांत एक भिकारी उभा असलेला तिला दिसला. तरणासा, रकटीं घातलेला. त्याच्या गालांवर व हनुवटीवर आखूड खरखरीत दाढी होती, अन् डोक्यावरच्या टोपींतून जखमेचा लाल वण दिसत होता. त्यानं कांहीं न बोलतां तिच्याकडे कांहीं वेळ निरखून पाहिलं, अन् मग सगळेच भिकारी सांगतात तशी आपली कहाणी सांगितली. त्याला कुठें काम मिळत नव्हतं, वाट फुटेल तिकडे तो भटकत होता; तीन दिवसांत त्याच्या पोटांत अन्न नव्हतं...

श्रीपूकेबाई त्याच्या तोंडाकडे बघतच राहिली कांहीं वेळ. मग ती म्हणाली, " थांब हं " अन् घरांत वळली. सैंपाकघरांत जाऊन तिनं पावरोटीचा मोठा तुकडा आणला, अन त्या भिकाऱ्यापुढें केला. त्यानं तो खसकन् घेतला व तिला दुवा दिला. त्याच्या हातावरच्या शिरा किती ठळक दिसत होत्या. तो जिन्याच्या पायऱ्या उतरत असतांना त्याच्या वाकलेल्या पाठीकडे श्रीपूकेबाई पाहत राहिली. मग तिनं दार लावलं.

खोलींत परत येतांच ती आपल्या नवऱ्याला म्हणाली, "काय भ्यालें मी ! भोंवळ येऊन पडलेंच असतें मी ! मोठं आश्चर्य आहे."

तिच्या नवऱ्यानं विचारलं, "काय झालं ?"

"बाहेर जो मनुष्य आला होता तो इतका हुबेहुब ज्योआकिमसारखा होता—"

"होय ?...काय म्हणत होता ?"

"म्हणत होता कसलं ? भीक मागत होता."

"मग ?"

"मी त्याला पावरोटी दिली."

"हं !" असा उद्गार काढून तिचा नवरा विचारांत गर्क झाला.

जरा थांबून त्यानं विचारलं, "खरंच ज्योआकिम आला होता ?"

"तो कसा येईल ? इथें दिवसाढवळ्या येण्यातका तो मूर्ख नाहीं. पण मी भ्यालें खरी. अगदीं हुबेहुब ज्योआकिमसारखा भासला मला तो इसम."

नवरा म्हणाला, "अजागळ आहेस तूं. तो खरोखरीच ज्योआकिम असेल तर पैसे मिळवायची चालून आलेली संधि घालवलीस तूं. त्याला पकडून देणाराला सरकारकडून मोठं बक्षीस मिळणार आहे."

श्रीप्‌केबाईचा विस्मयाचा धक्का अजून पुरता ओसरला नव्हता. नवऱ्याला उत्तर न देतां ती खोलींतली आवराआवर करूं लागली. तिच्या कपाळावर आठ्या उमटल्या, खालचा ओठ बिलग झाला. तिच्या मनांत कसले तरी विचार जोरानं आले असावेत.

अखेर ती म्हणाली, "हें पहा, तो खरोखरच ज्योआकिम असता तरी मी कांहीं त्याला पकडून सरकारच्या स्वाधीन केलं नसतं. असलं काम मी कधीं नाहीं करणार."

तिकडे ज्योआकिम जिना उतरून गेला होता. त्याचे पाय लटपटत होते. आपण आतां जमिनीवर पडल्याशिवाय राहत नाहीं असं त्याला

वाटत होतं. घराचं दार उघडायला श्रीपूकेबाई येईल असं त्याला वाटलं नव्हतं, अन् त्यामुळें तिला आलेली पाहतांच तो अगदीं गोंधळून गेला होता. त्याला कांहीं सुचेनासं झालं होतं. आताशा वारंवार असं होई. त्याचे विचार एकदम बंद होत, सारं सुन्न होई, त्याची शुद्धीच कांहीं वेळ नष्ट झाल्यासारखं होई. उपासमारीचा हा परिणाम होता. आतां तसंच झालं. त्याच्या हातांत रोटी होती. भुकेनं तो इतका व्याकूळ झाला होता कीं घसा आक्रसून जाऊन तिथला कडवट ओलावा टोचत होता. पण तळघराच्या पायऱ्यांखालीं जाऊन दाराआड लपायला मिळेपर्यंत त्यानं रोटी खाल्ली नाहीं. लपतछपत साऱ्या गोष्टी करणं त्याच्या अंगवळणींच पडलं होतं आतां. पायऱ्यांखालीं तो उकिडवा बसला, अन् खाऊं लागला, भोंवती अंधार होता. इथें आपण कांहीं वेळ तरी सुरक्षित आहोंत असं त्याला वाटलं.

आतां करावं तरी काय ? रोटीचे तुकडे गिळतां गिळतां तो विचार करूं लागला. पूर्वी जशी आपली आई दार उघडायला येत असे तशी ती यायला हवी होती. म्हणजे...

जरा वेळानं तो उठला अन् बाहेर रस्त्यावर गेला. तिथें वर्दळ मुळींच नव्हती. दोनचार मुलं खेळत होती तेवढीच. त्यांतलं एक पोर गळा काढून रडत होतं. मधेंच एक मोटार फर्रदिशीं गेली. टोपली हातांत घेतलेली एक बाई वाण्याच्या दुकानांत शिरली. एका घराच्या खिडकींतून फुलून सुकून गेलेलीं ' जिरेनिअम ' फुलं दिसत होतीं... मन उदास करून टाकणारं या रस्त्याचं तिसऱ्या प्रहरचं हें दृश्य ज्योआकिमच्या किती परिचयाचं होतं !

एका घराच्या वळचणीआड लपून त्यानं आपल्या स्वःतच्या घराच्या खिडक्यांकडे वर मान करून दृष्टि टाकली. खिडक्या बंद होत्या. आंत प्रकाशहि नसावा. तो शिटी घालूं लागला. आस्केनिअसपासून जें गाणं तो शिकला होता त्याचे स्वर प्रथम हलकेच व नंतर मोठ्यांदा शिट्टींत त्यानं वाजविण्यास

प्रारंभ केला. बराच वेळ तसाच गेला. त्याच्या परिचयांतला थोटा टपाल-वाला रस्त्यानं गेला; पण घरांत शिरला नाहीं. ज्योआकिम आपल्या जागे-वरून उठला आणि रस्ता ओलांडून पुन्हा आपल्या घरांत शिरून, तो तळघराच्या पायऱ्यांवर बसला अन् वाट पाहूं लागला.

बऱ्याच वेळानं दार उघडल्याचा आवाज झाला आणि जिन्यावर पावलंहि वाजलीं. ज्योआकिमनं मान मुरडून पाहिलं तों श्रीपूके पति-पत्नी थाटामाटाचा पोषाक करून घराबाहेर पडलेलीं त्याला दिसलीं. आतां अंधार पडूं लागला होता; रस्त्यावरचे दिवे लागले होते पूर्वीप्रमाणें दिव्यांचे खांब आतां मस्तकशून्य नव्हते. खड्या सैनिकांप्रमाणें ते उभे होते श्रीपूके पति-पत्नी रस्त्यांत जाऊन दिसेनाशीं होईपर्यंत ज्योआकिमनं वाट पाहिली मग तो जिन्याच्या पायऱ्या चढून वर गेला आणि तिथली घंटा त्यानं दाबली. एकदां, दोनदां, तीनदां.

परंतु उत्तर आलं नाहीं. सगळीकडे शांतच होतं.

ज्योआकिमला आतां थकव्यामुळें झोप येऊं लागली; परंतु तो बसला नाहीं. दृढ निश्चयानं उभा राहिला. मात्र वेळाचं भान त्याला आतां उरलं नाहीं.

रस्त्यालगतचं दार उघडल्याचा आणि परत लावलं गेल्याचा आवाज झाला. एक स्त्री जिना चढून वर आली. ती उंच होती अन् तिनं काळा पोषाक केला होता. ज्योआकिमनं प्रथम तिला ओळखलं नाहीं. ती अगदीं जवळ येईपर्यंत तो पुढेंहि झाला नाहीं. पण मग तो अगदीं हलक्या आवाजांत म्हणाला. "शार्लोटे, भिऊं नकोस!"

त्याला पाहतांच तिनं दचकल्यासारखी हालचाल केली. पण ती ओरडली नाहीं. त्याच्याकडे बघत अगदीं हलक्या आवाजांत तिनं विचारलं, 'कोण? ज्योआकिम, तूंच काय?" आणि मग त्याचा तो भिकाऱ्यासारखा अवतार

पुरता दृष्टीस पडल्यावर तिनं डोळयांची उघडझाप करून विचारलं, " तुला काय पाहिजे ? "

" इथें नको. इथें जिन्यावर नको " असं पुटपुटत तो जेव्हां तिच्या मागोमाग घरांत शिरूं लागला, तेव्हां त्याला मागं सरकण्याची खूण करून ती म्हणाली, " अंहं, तूं आत येतां कामा नयेस. "

काबाडकष्टानं खडबडीत झालेले आपले दोन्ही हात जुळवून अगदीं गया· वया करण्याच्या स्वरांत ज्योआकिम म्हणाला,

" शार्लोटे, मला खुशाल जा म्हणून सांगतेस ? असं करूं नकोस. मी आतां अगदीं अगतिक झालों आहे. तूं मला आश्रय दिला पाहिजेस. घरांत कोणी नाहीं ना ? मग मला आत येऊं दे. आपण दोघं अशीं जिन्यावर उभीं राहि· लेलीं दिसलों तर—त्यांत आपल्याला धोका आहे. "

त्याच्या त्या हातांकडे पाहून शार्लोटेला त्याची करुणा आली असावी. तिनं आपली तर्जनी ओठावर ठेवून त्याला गप्प राहण्याची खूण केली आणि ती हलकेच म्हणाली, " ये, आत ये. "

आंत जेवण्याच्या खोलींत गेल्यावर तिनं त्याच्याकडे अगदीं न्याहाळून पाहिलं. किती भयंकर बदलला होता तो. त्यानंहि तिच्याकडे निरखून पाहिलं तों तीहि त्याला पूर्वीपेक्षां फार निराळी दिसली. त्याला मोठा विस्मय वाटला,

कांहीं वेळ दोघंहि स्तब्ध राहिलीं. मग तिनं तुटक स्वरांत विचारलं. " तुला भूक लागली आहे काय ? "

" होय, शार्लोटे. "

तिनं कांहीं एक न बोलतां खाण्याचे पदार्थ टेबलावर मांडले.

तिनं हात पुसण्याचा टॉवेल त्याच्या हातीं दिला तेव्हां त्याच्या तोंडावर करुण हास्य दिसूं लागलं. तो आधाशीपणानं भराभर खाऊं लागला.

त्याची ती खाण्याची विचित्र तऱ्हा बघत शार्लोटे गंभीर चेहरा करून उभी राहिली, आणि त्याचं खाणं संपलं तेव्हां आपली चर्या उजू करून ती त्याच्या-समोर बसली व म्हणाली, " हं ? "

ज्योआकिमनं हलकेंच विचारलं, " आई केव्हां येईल घरीं ? "

उत्तर द्यावं न द्यावं अशा अनिश्चयांत किंचित् थांबून शार्लोटे म्हणाली, " ज्योआकिम, आपली आई वारली. " हें सांगतांना तिला त्याच्याकडे पाहवलं नाहीं.

ज्योआकिमनं मान खालीं केली आणि तो अगदीं स्तब्ध झाला. त्याच्या घशांत दुःखावेगाचा मोठा दाहक घुटका उभा राहिला, परतु तो त्यानं गिळून टाकला.

शार्लोटे म्हणाली, " तिला हृदयाचा विकार होता तुला माहीतच आहे. " जणूं त्याचं सांत्वन करण्यासाठीं तिनं आपला हात ज्योआकिमच्या हाताजवळ नेला. पण त्याच्या हाताला तिनं स्पर्श मात्र केला नाहीं.

ज्योआकिम किती तरी वेळ निःशब्द राहिला. मग त्यानं विचारलं, " आणि आपले बाबा ? "

" बाबा – ते अंथरुणाला खिळून पडले आहेत. तुला माहीत आहे का, त्यांची धरपकड झाली होती आणि त्यांना शिक्षाही झाली ? आतां मी एका रुग्णालयांत त्यांना ठेविलं आहे. मला त्यांची शुश्रुषा करणं शक्य नाहीं. घरखर्च भागविण्यासाठीं मला काम करावं लागतं..."

तें तिचं बोलणं ऐकून ज्योआकिमचं अंतःकरण अगदी चुरडून टाकल्या-प्रमाणें व्यथित झालं. ' तूं अपराधी आहेस ! तूं अधम आहेस ! ' असंच जणूं कोणी तरी ओरडून त्याला सांगितलं; आणि त्या शब्दांची धार त्याच्या अंतःकरणांतून आरपार गेली. आपल्या जागेवरून उठून त्यानं खोलींत येरझारा घातल्या आणि अंतर्यामीं उठलेला दुःखाचा दाह विझविण्याचा

प्रयत्न केला. मधेंच तो थांबला, आणि त्यानं हलक्या आवाजांत म्हटलं, " हें जुनं चित्र मला आठवतं. पण हें या खोलींत कसं आलं ? "

शार्लोटे म्हणाली, " तुझी खोली आतां आम्ही भाड्यानं दिलेली आहे, आणि तो भाडेकरी म्हणाला, माझ्या खोलींत नको हे चित्र. "

पण तिच्या बोलण्याकडे ज्योआकिमचं लक्ष नव्हतं. त्या चित्रांतल्या परिचित आकृतींकडे तो न्याहाळून बघत राहिला होता आणि बघतां बघतां त्याच्या नजरेत कांहीं विलक्षणच गूढ असा भाव खेळूं लागला होता.

" ज्योआकिम तूं फार बदलला आहेस. मी प्रथम तर तुला ओळखलंहि नाहीं. तूं बोललास तेव्हां आवाजावरून मला ओळख पटली. तुझ्या कपाळावर हा वण रे कसला ? "

असं विचारताना शार्लोटेच्या आवाजांत सहानुभूति स्पष्ट व्यक्त झाली.

आपल्या कपाळाच्या डाव्या बाजूला हात लावून ज्योआकिम म्हणाला, " हा वण म्हणतेस होय ? त्याचं असं झालं, माझ्या डाव्या भुवईवर ती मोठी खूण होती ना, तिच्यामुळें लोक मला ओळखतील म्हणून मी ती कापून टाकली. " हें बोलतांना आपलं दुःख लपविण्यासाठीं त्यानं हास्य केलं.

" कापून टाकली ? ती कशी ? "

" त्यांत काय आहे ! वस्तऱ्यानं. "

अजून तो भिंतीवरच्या त्या चित्राकडेच निरखून पाहत होता. मग त्यानं एकदम वळून विचारलं,

" आस्केनिअस ठीक आहे ना ? "

" आस्केनिअस ? —हं हं, कॅप्टन ग्रेगॉर म्हणतोस होय ? मला नीटसं माहीत नाहीं. परंतु त्याचं ठीक चाललं आहे. ड्रेसडेन शहरांत कुठल्याशा कंपनींत त्याला नोकरी आहे. कधीं कधीं त्याचं पत्र येतं मला. "

" काय चमत्कार पहा, आस्केनिअस कसा दिसत असे तें मला आतां

धड आठवतही नाहीं. त्याचं चित्र मला डोळयांपुढें आणतांच येत नाहीं. दुसऱ्याचा एका माणसाचा–एका मजुराचा चेहरा माझ्या डोळयांपुढें उभा राहूं लागतो. तो ठार मारला गेला, मला माहीत आहे "

एखाद्या माणसानं झोपेंत बडबड करावी त्याप्रमाणें तो बोलत होता. त्याला आतां अगदीं कमालीचा थकवा आला होता.

शार्लोटे म्हणाली, " हें बघ ज्योआकिम, इथें आतां फार वेळ तूं थांबतां कामा नयेस. श्लीप्के पति-पत्नी परत यायच्या आंत तूं गेलं पाहिजेस. तुला काय हवं आहे तें साग. तूं मुळीं इथें आलास तरी कसा ? मला वाटलं होतं तूं केव्हांच अमेरिकेला किंवा असाच दूर कुठें तरी गेला असशील. "

" हं, मी इथें आलों आहे खरा. पोलिसांचा पाठलाग चुकवितां चुकवितां मी इथें पुन्हा परत आलों आहे. माझ्या यातना मी तुला कशा सांगू ? शिकारी जनावराप्रमाणें पाठलाग चुकवीत एक सबंध वर्ष काढलं. शार्लोटे, माझ्या दुःखभोगाची तुला कल्पना देखील करतां येणं शक्य नाहीं. मी पुन्हा घरीं परत आलों आहे. यापुढें धावपळ करणं मला शक्य नाहीं. माझ्यांत अगदीं त्राण उरला नाहीं... "

शार्लोटे अगदीं हलक्या आवाजांत म्हणाली, " अरेरे... गरीब बिचारा ! मला सांग तरी एक वर्ष तूं कसं काढलंस तें. "

" मला सांगतां येणार नाहीं. लोक रचून सांगतात तसली कां हीं कहाणी आहे ? माझ्या कर्मकथेला प्रारंभ कुठें होतो आणि तिची अखेरी कुठें होते, हेंच मला धड कळत नाहीं. अरे बाप रे ! पण आठवून सांगतों. ऐक... "

असं म्हणून जणूं स्वतःच्या जीवितांतला एक एक दगड खणून काढल्याप्रमाणें तो गेल्या वर्षाच्या वृत्तान्तांतली एक एक आठवण प्रयत्नानं काढून तिला सांगूं लागला.

अखेर तो म्हणाला, "शेवटीं वाटलं पुरे झाली ही धावाधाव आणि पळापळ. म्हणून मी इथें आलों आहे, अन् इथेंच राहणार आहे. गेल्या तीन दिवसांत मला अन्न मिळालं नव्हतं, झोपेवांचून मी वणवण भटकत होतों. मनाशीं विचार केला, आतां घरीं जायला काय हरकत आहे ? माझी आई दार उघडील—"

हे शद्व उच्चारतांच त्याचा आवाज सद्‌गदित झाला. त्यानं दीर्घ श्वास घेतला. भावनेचा आवेग आवरला आणि मग तो म्हणाला, " छे छे. ? मला यापुढें सांगवत नाहीं. एखाद्या भयंकर चित्रपटांतल्या गोष्टीसारख्या साऱ्या गोष्टी घडत गेल्या आहेत. आणि जें जें घडलं तें जरी मीं सांगितलं तरी मला मनां-तल्या मनांत ज्या यातना सोसाव्या लागल्या त्याचं वर्णन मला कोठून करतां येणार ?..."

हें त्याचं बोलणं ऐकत असतांना शार्लोटेनं आपली विचारमग्न नजर एकी-कडे आपल्या भावावर रोखून धरली होती, अन् दुसरीकडे तिच्या मनांत सारखं येत होतं, छे, हा कुठला माझा भाऊ ? माझ्या समोर बसलेला, जंगली बुभु-क्षित चर्येचा, भणंग भिकाऱ्याच्या भाषेंत आपल्या खडतर दिवसांची कहाणी सांगणारा हा मनुष्य माझा भाऊ कसा असेल ? तिनं आपले पंजे घट्ट जुळवून मांडीवर धरले अन् विचारलं,

" अस्सं. पण तुला आतां काय हवं ? इथे काय करणार तूं ? "

कमालीच्या आर्जवी स्वरांत ज्योआकिम म्हणाला, "मला इथें घरीं निजूं दे."

त्याच्याकडे न बघतां ती चट्कन म्हणाली, "अंहं, तें शक्यच नाहीं."

" शक्य नाहीं ? शार्लोटे असं कसं म्हणतेस ? मला विश्रांति घेतलीच पाहिजे. दोनतीन दिवसांच्यावर मी इथें राहणार नाहीं. पण आतां मला निजलंच पाहिजे. मी अगदीं विलक्षण थकून गेलों आहे. एक पाऊल सुद्धां पुढें टाकणं मला शक्य नाहीं. माझ्या शरीराचं यंत्र आतां अगदीं बंद पडलं

आहे. तुला कळत कसं नाहीं ? मी सहसा हातपाय गाळीत नाहीं. पण देवालाच माहीत, आतां माझ्या सहनशक्तीचा अगदीं कडेलोट झाला आहे. मला विसांवा घेतलाच पाहिजे. शार्लोटे मला घरीं राहूं दे दोनच दिवस. एवढंहि माझं मागणं तूं कबूल करणार नाहींस ?"

त्याचा आवाज अगदीं विव्हळल्यासारखा होता, अन् बोलतां बोलतां तो तिच्या अगदीं जवळ आला होता.

पण शार्लोटे कांहीं वेळ अगदीं स्तब्ध राहिली, अन् मग अंतःकरणांत उत्पन्न होणारी अनुकंपा प्रयत्नानं दाबून ती म्हणाली, " नाहीं नाहीं, तुला इथें निजूं देणं शक्य नाहीं. "

" शार्लोटे, आई आज इथें असती तर तिनं असं उत्तर—"

शार्लोटे एकदम म्हणाली, " चूप ! आईचं नांव काढण्याची तुझी योग्यता नाहीं ! "

ज्योआकिमनं ओठांवर आलेले शब्द परत घेतले, आणि भीतीनं दचकल्याप्रमाणें मागें सरकून अंधारांत भिंतीच्या आधारानं तो उभा राहिला. कांहीं वेळानं नम्र स्वरानं तो म्हणाला,

" ठीक आहे. तुझं म्हणणं बरोबर आहे. मी इथें या खोलींत असतां कामा नये. पण इथें नाहीं तर निदान खालीं— तळघरांत— एक रात्रच काढूं दे मला. "

" छे—छे ! तेंही शक्य नाहीं. श्लीप्केबाईचे कोळसे अन् बटाटे खालीं तळघरांत असतात. तिला तूं दिसलास तर—"

" मग वर माळ्यावर ? "

" छे—छे ! श्लीप्केचा नोकर तिथें निजतो. तें कांहीं नाहीं, तूं इथें राहतां कामा नयेस. आमचं वाटोळं केलंस तेवढं पुरें नाहीं का झालं ? मी

कशीबशी सुखानं राहतें त्यांतही माझ्यावर संकट आणण्याची तुझी इच्छा आहे ? ”

ज्योआकिम अंधारांत ज्या जागीं उभा होता तिथेंच मटकन् खालीं बसला. त्याच्या तोंडून शब्द फुटेना. त्यानं आपल्या दोन्ही हातांनीं मस्तक झाकून घेतलं. पण मग जरा वेळानं तो बडबडूं लागला,

“ पंधरा वीस दिवसांपूर्वी माझी मोठी कठीण अवस्था झाली होती. मला वाटलं संपला सारा कारभार. मॅगडेबुर्ग गांवांतल्या एका रस्त्यांत मी होतों. दुपारचे दोन वाजण्याचा सुमार होता. मला एक तरुण मुलगी दिसली. अगदीं भलत्या धंद्यांतली ती असली पाहिजे हें मला उघड दिसत होतं. पण मी तिच्याजवळ गेलो आणि तिला म्हटल, मी अगदीं थकून गेलों आहे. मला पुढें पाऊल टाकवत नाहीं, अन् माझ्या खिशांत कवडीसुद्धां नाहीं. मला तुझ्याबरोबर येऊं दे, अन् तुझ्या घरांत कुठें तरी निजू दे मला जास्ती कांहीं नको. तुला द्यायला पैसेही नाहींत माझ्याजवळ. तिनं मला विचारलं, तुझ्यावर कांहीं संकट आलंय् का? मीं म्हटलं होय. पोलीस माझ्या पाळतीवर आहेत कीं काय असंही तिनं विचारलं. मीं खरं तें सांगून टाकलं. ती म्हणाली, माझा प्रियकर तुरुंगांत गेलेला आहे. हें सांगतांना तिनं माझ्याकडे निरखून पाहिलं, मग आपल्या हातावरच्या घड्याळाकडे पाहिलं, आणि ती म्हणाली, आतां मला गिऱ्हाईक मिळण्याचा संभव नाहीं. चल माझ्याबरोबर. तिच्याबरोबर मी गेलों. असल्या बायकांची खोली असते त्या प्रकारचीच तिची खोली होती. आपण कुठल्या कोपऱ्यांत पडावं म्हणून मी इकडे तिकडे पाहूं लागलों, पण त्या मुलीनं मला आधीं भरपूर खायलाप्यायला दिलं. तिनं माझ्यासाठीं कॉफी तयार केली. थकव्यामुळें माझे डोळे धड उघडेही ठेवतां येत नव्हते मला. पण एखाद्या लहान मुलाचे कपडे काढावे त्याप्रमाणें तिनं आपल्या हातांनीं माझा पोषाक उतरला. मग आपल्या अंथरुणांत मला निजवून ती जवळ बसली, अन् माझा हात आपल्या हातीं धरून ठेवून ती

बोलत राहिली. मला केव्हां झोप लागली तें मला कळलंही नाही. सकाळीं उठून मीं पाहिलं तों ती कोचावर निजली होती. तिनं आपले कपडेही उतरले नव्हते. तिनं पुन्हा माझ्यासाठीं कॉफी केली, अन् मला थोडे पैसे दिले. शरीर-विक्रय करणारी ती एक सामान्य मुलगी होती. ती कितीसे पैसे देणार मला ? पण शार्लोटे, तिनं मला आश्रय दिला."

शार्लोटेचा चेहरा कष्टी झालेला दिसला. पण ती म्हणाली,

"तिनं तिला असेल, पण मी देऊं शकत नाहीं."

ज्योआकिम अगदीं हलक्या स्वरांत म्हणाला, "शार्लोटे, किती कठीण हृदयाची तूं!"

ती आपल्या जागेवरूनच उठली, त्याच्या जवळ आली, आणि आवेगानं म्हणाली, "होय, मी कठीण हृदयाची आहे; आणि देवानं असं कठीण हृदय मला दिलं याबद्दल मी त्याचे आभार मानतें. मी अशी कठीण हृदयाची नसतें तर जें दुःख मला सोसावं लागलं त्यांतून माझा निभाव लागला असतां असं तुला वाटतं ? मला काय काय सहन करावं लागलं त्याची तुला कल्पना आहे ? पण मी सारं सहन करून दुःखाला पुरून उरलें आहे. मी हातपाय गाळले नाहींत. माझं मस्तक मी उंच ठेवलं आहे अन् माझ्या पायांवर मी उभी आहे. माझं हृदय कठीण कां आहे, याचं कारण कळलं तुला ? ज्योआकिम, तूं काय म्हणून नांवं ठेवावीस माझ्या निर्दयपणाला ?"

ज्योआकिमनं तिच्या नजरेला नजर दिली, अन् अगदीं अकल्पितपणें त्याच्या तोंडावर शांत मृदु हास्य दिसूं लागलं. तो म्हणाला, "ठीक ठीक. शार्लोटे, बरोबर आहे तुझं म्हणणं. घरीं राहावं म्हणून मी आलों होतों, पण आतां मी जातों. मी आलों म्हणून माझ्यावर रागावूं नकोस. इथली परिस्थिति मला कळली. माझ्या लक्षांत आल्या साऱ्या गोष्टी. माझं नशीब मला निस्तरलं पाहिजे. माझ्या पापाचं प्रायश्चित्त मलाच घेतलं

पाहिजे. त्याला तयारी आहे माझी. खोटं नाहीं. आपण सगळींच किती समजूतदार झालों आहोंत, पाहिलंस ? तूं, मी, अन् ड्रेसडेनमध्यें नोकरी करणारा आस्केनिअस. खरंच मी आतां जेलेनाकडे जातों. मला जी आपल्या अंथरूणांत निजवील अशी ती एक दुसरी स्त्री आहे."

" जेलेना आतां इथं कुठं आहे ?"

" म्हणजे ? कुठं गेली ?"

" कुणास ठाऊक ! कदाचित् 'मॉंटे'ला गेली असेल. तिच्यावर गुप्त हेराचं काम केल्याबद्दल खटला झाला होता."

" हं मग जेलेनाकडे जाणं शक्य नाहीं तर ? अच्छा. रस्त्यावर पडेन मी. शार्लोटे, जातो तर. मला जेऊं घातलंस हे तुझे मोठे उपकार झाले."

" थांब. हे थोडेसे पैसे घे. अन् तुला कांहीं कपडेही देतें—"

" हो, दे दे. मला फार गरज आहे. Thanks !" तो दाराजवळ गेला होता, पण तिथून त्यानं एकदम विचारलं, " शार्लोटे तूं अजून गातेस का ग ?"

त्याच्या त्या प्रश्नाचं तिला आश्चर्य वाटलं. ती म्हणाली, " नाहीं. पण तूं कां विचारलंस ?"

" कारण तूं गायलं पाहिजेस. शार्लोटे, तूं गायलं पाहिजेस. पूर्वी संगीतांतलं मला कांहींच कळत नसे. पण आतां– शार्लोटे, तूं गायलं पाहिजेस."

तिला तें सांगतांना त्याचा आवाज गंभीर झाला होता, अन् एकीकडे मनांतल्या मनांत त्याला वाटत होतं, हा सारा स्वप्नांतलाच प्रसंग आहे. शार्लोटेनं उत्तर दिलं तें सुद्धां स्वप्नाच्या पडद्यांतून ऐकूं आल्यासारखं त्याला वाटलं.

" ती म्हणाली. मला आतां गातां येत नाहीं. माझा आवाज फुटला— बाळंतपणांत."

तें ऐकतांच थकव्याच्या अर्धवट बेशुद्धींतून ज्योआकिम खाडकन् भानावर आला, आणि एकदम वळून त्यानं विचारलं,

" काय म्हणतेस ? तुला मूल झालं आहे ? "

तिनं त्याच्याकडे अगदीं स्थिर दृष्टीनं पाहिलं. ती एकदम निराळीच दिसूं लागली. जणूं तिच्या अंतर्यामीं एकदम प्रकाश प्रज्वलित झाला, अन् त्यानं तिचं सबंध शरीर उजळून टाकलं. तिचे ओठ विलग झाले, आणि ती हसत म्हणाली, "होय, ज्योआकिम, मला मूल आहे."

" म्हणजे तुझं लग्न झालं आहे तर ? "

" नाहीं, माझं लग्न नाहीं झालं. " हें म्हणतांना तिच्या स्वरांत त्याला गतकालांतला विनोदी खवचटपणा आढळला.

तो उद्गारला. " लग्न न करतां ?—तूं–छे मला नाहीं खरं वाटत. "

" उगीच कशाला आढून बोलतोस ? मला तर वाटलं तुझ्या नैतिक कल्पना आतां उदार झाल्या असतील. "

ते तिचे शब्द ऐकतांना आपल्या लहानपणाची आपली बहीण शार्लोटे आपण पुन्हा पाहत आहोंत असं ज्योआकिमला वाटलं. तांबड्या तांबड्या केशभाराच्या भूषणानं नटलेल्या दृढनिश्चयी धीट चर्येची शार्लोटे त्याला स्पष्ट दिसूं लागली. त्यानं आवेगानं विचारलं,

" आणि—आस्केनिअस ? "

" कॅप्टन ग्रेगॉर म्हणतोस ? तो आपल्या स्वतंत्र जीवितांत रमलेला आहे. त्याच्यापासून मला काहीं मागायचंही नाहीं. दुसऱ्याला भारभूत होऊन राहणारी स्त्री मी नव्हे. मला मुलगा झाला आहे, अन् मी त्याचा प्रतिपाळ करतें आहे. मूल झालं की स्त्रीच्या ठिकाणीं विलक्षण सामर्थ्य येतं; तिच्या अंगीं जेवढं म्हणून बल आणि धैर्य असेल तें सारं प्रगट होतं. लढाई सुरू झाली कीं साऱ्या सैनिकांची जमवाजमव व्हावी तद्वत् स्त्रीच्या ठिकाणच्या साऱ्या

शक्ती एकवटून घेतात. मला मुलगा आहे. मी फार सुखांत आहे. फार फार सुखांत''

ज्योआकिमनं अगदीं मृदु स्वरांत विचारलं, "मला दाखवतेस तुझा बाळ?"

शार्लोटेनं त्याच्याकडे न्याहाळून पाहिलं. त्याच्या शरीराच्या एकंदर मालिन्याची तिला खंत वाटली असावी असं तिच्या मुद्रेवरून दिसलं. तिनं काहींच उत्तर केलं नाहीं. तिचा तो अनिश्चय पाहून ज्योआकिमच्या अंतःकरणाला मोठी जखम झाली.

पण अखेर ती म्हणाली, "दाखवतें." तिनं त्याला आपल्या खोलींत नेलं आणि तिथला दिवा लावला. ही खोली मात्र पूर्वीच्या सुखाच्या दिवसांतल्या सारखी होती. भिंतींना स्वच्छ पांढरा रंग दिलेला होता, तलम पडदे लावलेले होते, अन् सजावट सामानावर गुलाबी साटणीचं अस्तर होतं. तारुण्य आणि उल्हास त्या खोलींतल्या लहानशा जगांत भरलेला होता.

पलंगाजवळ जाळीच्या पडद्यांनीं आच्छादलेला पाळणा होता. ज्योआकिम दारांतच थबकला, अन् हातांनीं आपल्या मळक्या टोपीची चाळवाचाळव करीत राहिला. जणूं खोलींत पाय टाकण्याचा त्याला अधिकार नव्हता.

शार्लोटेनं पाळण्यावरचा पडदा दूर केला, अन् खालीं वाकून ती म्हणाली, "बघ."

पण ज्योआकिम जेव्हां जवळ आला तेव्हां ती झट्कन म्हणाली, "अंहं, हात लावूं नकोस."

ज्योआकिम थांबला. त्यानं फक्त आपली मान लांब केली अन् पाळण्यांतल्या बालकाच्या मिटलेल्या मुठींकडे नजर टाकली. त्याच्या मनांत आलं, "मी खरोखरीच खुनी आहे काय?"

तो जणूं आपल्याशींच हलकेच पुटपुटला, "मला कांहीं केल्या उलगडा होत नाहीं."

"कसला?" शार्लोटेनं विचारलं.

पण त्यानं कांहींच उत्तर केलं नाहीं.

तिनं पाळण्याचे पडदे पुन्हा सरकविले आणि भावाकडे दृष्टि टाकली. तिची चर्या आतां पार बदलेली होती, आणि तिच्या नजरेंत करुणेचा मृदु भाव प्रगट झाला होता. जणूं आपला भाऊ किती श्रमला थकला आहे तें या एका क्षणांत तिच्या एकदम ध्यानांत आलं होतं. तो किंचित् हसत होता, पण अर्धवट गुंगींत असलेल्या माणसाचं तें हास्य होतं. तिच्या मनांत आलं, कष्टानं किती झिजलं आहे याचं शरीर! याच्या मुखावरची पूर्वींची सुकुमारता पार कशी नाहींशी झाली? किती खडबडीत याचे हे हात, अन् केवढाल्या टपोऱ्या त्यांच्यावरच्या या शिरा! हे दोन राठ अवजड हात जणूं याचे नव्हेतच!... पण लगेच आपलं द्रवणारं मन तिनं आवरलं, शरीर ताठ करून ती उभी राहिली, अन् तिनं विचारलं,

" ज्योआकिम, तूं पोलिसांच्या स्वाधीन कां होत नाहींस ? "

तिच्या त्या प्रश्नाची ज्योआकिमला गम्मत वाटली असावी. तो हसला-सुद्धां. तो म्हणाला,

" आतां मात्र पूर्वींच्या शार्लोटेची मला आठवण होते खरी. पूर्वी तूं मला विचारायचीस, अभ्यास कां करीत नाहींस ? आज तूं कॉलेजांत कां गेला नाहींस ? आतांशा तूं शिकवण्या कां करीत नाहींस ? तद्वतच तूं मला आतां विचारते आहेस, पोलिसांच्या स्वाधीन होऊन जन्माचा बंदिवास मी कां पत्करीत नाहीं ? खरंच, कां ? "

तो किंचित् थांबला, आणि पूर्वींच्या सवयीप्रमाणें लष्करी पवित्र्यांत उभा राहून म्हणाला, " कां तें सांगतों तुला शार्लोटे, ऐक. मी पोलिसांच्या स्वाधीन होत नाहीं याचं करण तसं करणं चूक होईल. कारण मला जगा-यचं आहे. मला तें अधिक उलगडून सांगतां येत नाहीं, पण मला जगायची इच्छा आहे. सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट हीच आहे. माझ्या गुन्ह्याचं प्रायश्चित मीं घ्यायला पाहिजे असा तुझ्या म्हणण्याचा अर्थ असेल कदाचित्. मला

कबूल आहे. मला प्रायश्चित्त भोगलं पाहिजे, अन् मी तें भोगणार आहे. पण तुरुंगांत खितपत पडून नव्हे, तर जिवंत राहून. परमेश्वरानं जें जीवित माझ्या स्वाधीन केलं तें मला जगविलं पाहिजे. एका जीविताचा मीं नाश केला. आतां माझ्या जीविताची नवी घडण करून जर मला मृत्यु आला तरच जीवितक्रियेची अर्धवट तोडलेली साखळी मीं पुन्हा जुळाविली असं होईल. मी पोलिसांच्या स्वाधीन कां होत नाहीं तें आतां कळलं तुला ? मला जें वाटतं तें तुला आणखी स्पष्ट करून सांगतां येत नाहीं मला. पण कित्येक दिवसच्या दिवस अन् रात्रीच्या रात्री विचार करून करून, अन् उलटसुलट विचारांच्या यातना सहन करून मला हा उमज आलेला आहे केवळ बंदिवासानं दुष्कृत्याची भरपाई होत नाहीं. एक सबंध वर्षभर मी धावपळ केली, दुःख सोसलं—त्यानंच माझ्या पापाची भरपाई थोडीशी झाली. माझ्या अंतर्यामी मला खरंच असं वाटतं. मी बदललों आहे. माझी शुद्धि झालेली आहे. मला मजुरी करावी लागली, काबाडकष्ट सोसावे लागले; पण त्यानंच मी माझं पाप थोडंसं धुऊन काढलं असं मला वाटतं– "

बोलतां बोलतां तो एकदम थांबला. कारण बाहेरच्या बोळकंडीत आवाज झालेला ऐकूं आला. शार्लोटेनं भिऊन डोळे वटारले, अन् ज्योआकिमला गप्प राहण्याची खूण केली. बाहेर पावलांची अलगद चाहूल झाली, काडी ओढल्याचा आवाज झाला. आणि कुणाचं तरी बोलणं ऐकूं आलं. श्रीपूके मंडळी घरीं परत आली होती.

भाऊबहीण दोघंही अगदीं ताठ निश्चल उभी राहिलीं. त्यांच्या तोंडून एक शब्दही बाहेर पडला नाहीं. श्रीपूके मंडळींच्या खोलींत जेव्हां अगदीं सामसूम झाली. तेव्हां मात्र शार्लोटेनं ज्योआकिमला खूण केली. तिचं बाळ ज्या खोलींत निजलं होतं त्या ऊबदार खोलींतून तिनं त्याला बाहेर नेलं. बोळकंडींतून पुढें जाऊन तीं जिन्याच्या पायऱ्या उतरली, अन् मग तिनं रस्त्यावरचं दार उघडलं. तिनं एक शब्दसुद्धां तोंडावाटे काढला नाहीं. जणूं अश्रूंचा

अन् प्रेमाचा जो लोंढा मन घट्ट करून तिनं आवरला होता तो तोंडांतून एखादा शब्द काढतांच बाहेर पडेल असं तिला वाटत होतं.

निरोपाच्या अखेरच्या क्षणीं मात्र तिनं त्याचं चुंबन घेतलं. तिनं आपले सुकुमार ओठ त्याच्या गालावर अगदीं आवेगानं पण घाईघाईनं अन् चुकतमाकत टेकले, अन् त्याला हळूच दिव्यांच्या प्रकाशांत रस्त्यावर लोटल्यासारखं केलं.

बिचारा ज्योआकिम पुन्हा आपल्या वाटेला लागला! त्या वाटेवर संकटं होतीं, अन् ती वाट अखेर कुठें जाणार त्याची त्याला कल्पना नव्हती!

# ११

छोट्या डॉक्टरांनीं इकडे तिकडे दृष्टि टाकली, आणि तिथल्या नोकराला विचारलं, " नंबर एकोणीस कुठें आहे ? "

नोकरानं उत्तर दिलं, " बागेंत आहे. तो सारखा बागेंत जातो अन् तिथें माळ्याच्या मदतनिसाशीं गप्पा मारीत राहतो."

" हं छान! बागेंत कसलं काम चाललंय रे सध्या ? "

" मला नक्की माहीत नाहीं साहेब, पण तिथं स्ट्रॉबेरी अन् भाजीपाला लावणार असं मीं ऐकलं आहे."

" अस्सं ! " असं पुटपुटत छोटे डॉक्टर बोळकंडींतून पुढें गेले. त्यांनीं पुन्हा विचारलं, " बडे डॉक्टर आले आहेत का रे ? "

" होय साहेब, वरच्या मजल्यावर–दंगेखोरांच्या वार्डांत- आहेत ते. तो कोशेर्ट नांवाचा रोगी आहे ना, त्याला पुन्हा बांधून घालावं लागलं आहे. "

" हं हं, काल रात्रीं फारच दंगा केला त्यानं. अच्छा, मी वर जातों बड्या डॉक्टरांकडे " असं म्हणून छोटे डॉक्टर शेजारचं दार उघडून आंत शिरले.

ती इमारत दुरून पाहतांच स्वच्छ अन् प्रसन्न दिसणारी होती. मात्र त्या इमारतींतल्या कांहीं गोष्टी चमत्कारिक वाटण्यासारख्या होत्या. तिथल्या कुठ-ल्याही दाराला हातकडी नव्हती, अन् सगळ्या खिडक्यांना गज मारलेले होते. याच कारण तें एक वेड्यांचं इस्पितळ होतं. ' होहेन हौसेन ' नांवाचं जें रेल्वे-स्टेशन होतं तिथून सुमारें दोन मैल अंतरावरच्या दाट अरण्यांत अगदीं मध्य-भागीं हें इस्पितळ होतं. प्रख्यात मानसोपचार-विशारद प्रो. लेन्झबर्ग हे या इस्पितळावरचे मुख्य अधिकारी होते. त्यांना सगळे लोक ' बडे डॉक्टर ' असं म्हणत. ऐ इस्पितळांत राहत नसत इस्पितळापासून बऱ्याच अंतरावर डोंग-राच्या उतरणीवर त्यांचा बंगला होता. एक लहानशी खडखडी घोडागाडी स्वतःच हाकीत ते रोज सकाळीं अगदीं लवकर इस्पितळांत येत, लांब लांब टांगा टाकीत बागेचं मोठं आवार ओलांडीत, आणि मग इस्पितळाच्या अगदीं पुढच्या मुख्य दिवाणखान्यांत प्रवेश करीत आजही ते नित्य क्रमाप्रमाणें आले होते, अन् घाईनं वर कोशेर्टच्या खोलीकडे गेले होते. त्याच्या आरोळ्या खालींसुद्धां ऐकूं येत होत्या.

त्या आरोळ्या सोडल्या तर आच सकाळच्या प्रहरीं इस्पितळांत जिकडे तिकडे शांतच होतं. इमारतीच्या पिवळ्या भिंतींवर सूर्याचीं लख्ख किरणं पडलीं होतीं आणि हिरवळीच्या बाजूकडल्या दिवाणखान्याच्या मोठमोठ्या खिडक्या उघड्या होत्या त्या मोठ्या प्रसन्न दिसत होत्या. बागेंत ठिकठिकाणीं मांडलेल्या बाकांवर कांहीं रोगी आपापल्या विचारांत अन् चाळ्यांत मग्न होऊन स्तब्ध बसलेले होते. वसंतऋतु सुरू झाला होता खास. मध्येंच वाऱ्याची सर्द झुळूक येत होती खरी, परंतु पक्ष्यांचीं गाणीं सुरू झालीं होतीं, आणि इस्पितळाभोंवतालच्या उंच भिंतींच्या पायथ्याशीं ' व्हायोलेट ' फुलांचे झुबके फुललेले दिसत होते.

मुख्य इमारतीसमोर जी किंचित् उतरती हिरवळ होती त्या ठिकाणीं म्हातारा माळी अन् त्याचा मदतनीस काम करीत होते. त्यांना तो सबंध

जमिनीचा पट्टा आधीं खणून काढायचा होता, अन् मग त्यावर स्ट्रॉबेरीचं बीं पेरायचं होतं. या घटकेला माळयाचा मदतनीस बागेच्या कोपऱ्यांत साठविलेलं खत हातगाडीवर भरून आणण्यांत, अन् खणून साफ केलेल्या जमिनीवर तें पसरण्यांत गुंतलेला होता व त्यामुळें त्याच्या इकडेतिकडे सारख्या येरझारा चालू होत्या. मधेंच तो एकदम मोठ्यानं गाणं म्हणूं लागे, पण मग त्याच्या लक्षांत येई कीं आजूबाजूला रोगी बसलेले आहेत, आणि तो तें बंद करी.

नंबर एकोणीस मात्र एका जागीं बसण्याऐवजीं एक लहानशी काठी हातांत घेऊन माळयाच्या त्या तरुण मदतनिसाबरोबर पुढेंमागें हिंडत होता, आणि हिंडताहिंडतां जणूं आपण फेरफटकाच करायला निघालों आहों अशा आविर्भावानं त्याच्याशीं सारखा जोरजोरानं बोलत होता. त्याचं वय चाळिशीच्या आसपास असेल. तो इतर रोग्यांशीं अगदींच मिसळत नसे. पुस्तकं वाचीत किंवा आपल्या जाड वहींत कांहीं तरी लिहीत तो आपल्या खोलींत बसलेला असे. खोलींत बसायचा त्याला कंटाळा आला कीं तो बागेंत येई, अन् माळयाच्या त्या तरूण मदतनिसाशीं संभाषण करूं लागे. तो तरूण मदतनीस एखाददुसऱ्या शब्दापलीकडे कांहींच बोलत नसे, तरीसुद्धां त्याचं व आपलं मोठं जोराचं संभाषण चालू आहे अशी नंबर एकोणीसची कल्पना असे, व त्याची वटवट सारखी चालू राही.

उदाहरणार्थ, तो विचारी, " वेड्यांच्या इस्पितळांत काम करण्याची ही तुझी पहिलीच वेळ आहे का ? " आणि तो स्वतः वेडा असून 'वेड्यांचं इस्पितळ' असं तो सरळ म्हणे.

माळयाचा मदतनीस उत्तर देई, " होय, पहिलीच वेळ. "

" इथें कांहीं दिवसांपुरतं काम पत्करलं आहेस कीं कायमचं ? "

" हे वाफे तयार होईपर्यंत, म्हणजे उन्हाळा संपेपर्यंत म्हणा ना. ",

" इथें बरं वाटतं का तुला ? "

" हं. "

" राहतोस कुठें अन् झोपतोस कुठें ? "

" पहिल्यांदा खालीं गांवांत राहत असे. पण तिथून यायचं म्हणजे फार लांब पडूं लागलं म्हणून इथेंच राह्यची परवानगी मागितली, ती मिळाली. आतां इथें कपडे धुवायची जी खोली आहे त्या खोलींत निजतों. "

नंबर एकोणीस कांहीं वेळ विचारांत मग्न झाला, अन् मग त्यानं एकदम विचारलं, " तुझ्या खोलीच्या दाराला हातकडी आहे का रे ? "

" हो आहे कीं. " असं उत्तर देऊन माळ्याच्या मदतनिसानं खतानं भरलेला गाडा खटदिशी उलटा करून रिकामा केला, अन् दुसरी खेप करायसाठीं तो खताच्या ढिगाकडे परत जाऊं लागला.

नंबर एकोणीस त्याच्याबरोबर चालतच होता. तो जेव्हां बोलूं लागे तेव्हां त्याची पातळ दाढी वर खालीं हाले. " इथं राह्यचं म्हणजे चमत्कारिक नाहीं का वाटत तुला ? म्हणजे माझं म्हणणं असं कीं ज्यांना वेड बीड कांहीं लागलेलं नाहीं त्यांना ही जागा चमत्कारिक वाटणारच. कधीं कधीं भीति नाहीं वाटत तुला ? "

" छे कधींच नाहीं " असं त्या मदतनीसानं उत्तर दिलं, अन् तो पुढें आणखी म्हणाला, " खूप हिंडलों आहे मी. जगाच्या हजार तऱ्हा दृष्टीस पडल्या आहेत माझ्या. इथल्यासारखे प्रकार जगांत सगळीकडेच आहेत. आतां मला कसलंच आश्चर्य किंवा भय वाटायचं नाहीं. " बोलतां बोलतां तो आपल्या गाड्यांत खत भरीतच होता.

नंबर एकोणीस म्हणाला, " हं, खरं आहे तूं म्हणतोस तें. वेड्यांची इस्पितळें इथून तिथून सारीं सारखीच कीं. पण कधीं कधी भय वाटण्यासारखे प्रकार होतात ना ? काल रात्रींच पहा, तो रोगी पिसाळला अन् मग सगळेच रोगी अनावर झाले. "

' हं ' असं पुटपुटत मदतनिसानं समोर शून्य दृष्टीनं पाहिलें. पक्ष्यांचीं गाणीं ऐकूं येत होतीं.

पुन्हा त्याच्याबरोबर चालतां चालतां नंबर एकोणीस सांगू लागला, " मी इथल्या साऱ्या गोष्टींची नीट पाहणी करीत असतों. मी वेडा आहे म्हणतां काय ? छट्, मी एक प्रेक्षक आहे इथला. डॉक्टरांची ज्याच्यावर नजर आहे असा प्रेक्षक. किती सुंदर वर्णन केलं मी आपल्या स्थितीचं, नव्हे ? मला वेड लागलं आहे कीं काय याची हे लोक पाहणी करणार म्हणे ! हं ! मीच करतों आहे त्याची— "

तितक्यांत 'हजेरीची वेळ झाली' असं कोणसं ओरडलं, आणि ती आरोळी ऐकतांच बागेत बसलेले सारे रोगी आपआपल्या जागेवरून उठले. " माफ करा हं. मला गेलं पाहिजे. पण जरा वेळानं येईनच मी परत. " असं म्हणून नंबर एकोणीसही गेला.

पण तो अर्ध्या घटकेनं खरोखरच पुन्हा परत आला. तो सांगू लागला, " ज्याला वेड लागलेलं नाहीं अशा शाबूत माणसांशीं प्रथमच बोलायला मला मिळत आहे, त्यामुळें तुमच्याशीं बोलण्यांत आनंद होतो मला. कारण मला वेड मुळींच लागलेलं नाहीं. इथें या इस्पितळांत आलों आहे तो आपली बरी निवाऱ्याची सुरक्षित जागा म्हणून. पकडला गेलों असतों आणि तुरुंगांत जावं लागलं असतं म्हणजे ? चांगला मुलाबाळांचा धनी आहे मी. घेतलं वेडाचं सोंग, आणि केला प्रवेश या इस्पितळांत. सोंग कायम ठेवायसाठीं इथेंही मधून मधून वेड्यासारखा वागतो, एखाद्या वेळीं दंगामस्ती सुद्धां करतों... "

अशा प्रकारें तो कांहीं वेळ बोलत राहिला, अन् त्याचं सारं बोलणं अगदीं सुसूत्र सुसंगत होतं. त्याचे हात अगदीं कृश आणि नाजूक होते, नजरेंत अस्थिरता होती, अन् तो बोलत असतां त्याची दाढी थरथर हाले किंवा वाऱ्यावर उडे तें अगदीं चमत्कारिक दिसे. कांहीं वेळानं मात्र तो अगदीं निस्स वेड्यासारखं बडबडूं लागला. तो म्हणे एक ग्रंथ लिहीत होता. त्या विषयावर त्यानं जें व्याख्यान द्यायला सुरुवात केली तें संपण्याचं कांहीं लक्षण

दिसेना. पण मग एकदम कांहीं तरी महत्त्वाचं काम आठवल्यासारखी त्यानं मुद्रा केली, आणि तो निघून गेला.

पण पुन्हा तिसऱ्या प्रहरीं स्वारी आली, आणि माळयाच्या मदतनिसाशीं बोलूं लागली. या वेळीं त्याची मुद्रा गूढ अन् खिन्न दिसत होती. आतां मदतनिसाचं खत वाहण्याचं काम संपलं होतं, अन् आपल्या हातगाड्यावर बसून तो पावरोटी खात होता. नंबर एकोणीस आला तो त्याच्याजवळ बसला. तो थरथर कापत होता. कांहीं वेळ तो मुळींच बोलला नाहीं. तो शून्य दृष्टीनं कुठें तरी पाहत होता. पण मग कसलीही प्रस्तावना न करतां त्यानं एकदम कापऱ्या घोगऱ्या आवाजांत हलकेच विचारलं,

"तूं कधीं कुणाचा खून केला आहेस का?"

"नाहीं." असं त्या तरुण माणसानं उत्तर दिलं. पण चमत्कार असा, कीं तें देतांना त्याचाही आवाज घोगरा झाला होता, आणि अगदीं कुजबुजल्यासारखं तो बोलला होता. त्या रोग्याच्या त्या अकल्पित प्रश्नानं तो भ्याला असला पाहिजे खास.

रोगी मदतनिसाच्या अगदीं जवळ सरकला अन् हलक्या आवाजांत म्हणाला, "हें बघ–तुला सांगूं?–मीं एका माणसाचा खून केला आहे."

त्याचे कृश खांदे या वेळीं अगदीं स्पष्ट थरथर कापत होते. माळयाच्या मदतनिसाचेही हातपाय कापूं लागले. तें पाहून तो रोगी त्याला म्हणाला,

"असा कापतोस काय? भ्यालास? मी खुनी असलों तरी तूं मला भ्यायचं कांहींच कारण नाहीं. खुनी!—" तो शब्द उच्चारतांना जणूं त्या शब्दाची चव तो मजेनं घेत होता. तो पुढें म्हणाला, "खुनी! कितीं फिकट रंगाचा शब्द! या शब्दाचा रंग फिकट जांभळा आहे असं नाहीं तुला वाटत?...मनुष्य खून कसा करतो याचा तूं कधीं विचार केला आहेस? सांग, मीं कसा केला असेल? फास घातला असेल? शस्त्रानं घाव घातला असेल? छे–छे! बरोबर आहे तुझा तर्क. तूं माझ्या हाताकडे निरखून पाहतो आहेस.

मीं पिस्तुल झाडलं अन् त्याला मारलं. खून करण्याच्या जुन्या तऱ्हांत मोठी मजा खरी; पण आम्ही माणसं बुद्धिप्रधान. आमच्या उपयोगाच्या नाहींत त्या... खुनाचा विचार– हं समजतंय ना तुला– विचार प्रथम येतो. तो विचार मनुष्य सारखा करूं लागतो. शंभर वेळां, हजार वेळां, कोट्यवधि वेळां. अन् मग कृत्य घडतं. नंतर अर्थातच मनाला एकदम थकवा येतो. खुनाच्या क्रियेंतला सर्वांत भयंकर क्षण कोणता असेल तर तो खून झाल्यावरचा. खुनाला बळी पडलेल्या माणसाची मान तूं कधीं पाहिली आहेस का? पण तूं कुठून पाहणार? मी सांगतों, ऐक. प्रथम माणसाची मान अगदीं ताठ असते. तिच्यांतल्या नाड्या, शिरा, कण्याचा भाग सगळं कांहीं अगदीं ताठ; पण खून झाल्याबरोबर ती अगदीं मुरगळून पडते. एखाद्या रिकाम्या बिलबिलीत पिशवीसारखी! अरे बाप रे! खून झालेल्या माणसाचे डोळे तर भयंकर दिसतातच. पण मान? छे-छे! अगदीं पाहवत नाहीं. अरे, पण तूं निघालास कुठें? काय पांढरा फटक दिसायला लागलास? थांब, थांब, मी येतो ना तुझ्याबरोबर..."

पण तो तरुण मदतनीस झटकन् उठून आपला हातगाडा घेऊन चालता झाला. पावलं टाकताना त्याचे झोक जात होते, आणि हातगाडा रिकामा असूनही त्याच्या कपाळावर आणि हातांच्या पंजांवर घामाचे थेंब उभे राहिले होते.

नंबर एकोणीसला त्या माणसाचा थोडासा राग आला, पण मग तो स्वतःशीच हसला, अन् उठून इमारतींत गेला.

त्या दिवशीं संध्याकाळीं माळ्याच्या मदतनिसानें योग्य सन्धि पाहून एका अधिकाऱ्याला विचारलं, "नम्बर एकोणीसला काय झालं आहे? वेड लागलंय् का?"

त्याला उत्तर मिळालं, "वेड कांहीं नाहीं. पण स्वारीचं डोकं ताळ्यावर नाहीं खास. तो एका बँकेत नोकर होता. त्यानं स्वतःची अशी कल्पना करून

घेतली आहे, कीं आपण बँकेच्या एका मोठ्या अधिकाऱ्याचा खून केला आहे. त्याचं आणि ह्याचं पटत नसे; आणि मनांत सतत साचलेल्या द्वेषाचा असा परिणाम झाला आहे, कीं ह्याला वाटत आहे आपण त्याचा खरोखरीच खून केला. सारी निव्वळ कल्पना आहे!"

"म्हणजे? त्यानं खून केला नाहीं तर?"

"छेः! बिलकुल नाहीं."

"पण त्यानं वर्णन तर इतकं हुबेहुब केलं—"

"हो, करील. म्हणून त्याला इस्पितळांत ठेवलं आहे."

माळ्याच्या मदतनिसाला मोठं आश्चर्य वाटलं.

त्यानंतर त्यानं नंबर एकोणीसला शक्य तों टाळण्याचा प्रयत्न केला. परंतु तो कांहीं यशस्वी होईना. कां कुणास ठाऊक, पण नंबर एकोणीसला या तरुण माणसाविषयीं विलक्षण आकर्षण वाटत असावं असं दिसलं, व तो त्याला कुठें तरी गाठी अन् बोलत सुटे. कदाचित् असंही असेल, कीं आपल्या बोलण्याचा त्या तरुण मजुरावर परिणाम होतो हें लक्षांत आल्यामुळेंच त्याच्याशीं बोलण्यांत त्याला आनंद वाटूं लागला असावा. किंवा त्या तरुण मजुराशीं बोलून अगदीं त्याच्या मर्माला हात घालून त्याच्या ठिकाणीं आत्यंतिक भयाची भावना निर्माण करण्यांत त्याला गंमत वाटूं लागली असेल. कसंही असो, त्याचा पिच्छा परवून त्याच्याशीं सतत बोलणं त्यानं चालू ठेवलं खरं, व त्या तरुण मजुराच्या प्रकृतीवर हळूहळू त्याचा अनिष्ट परिणाम झालेला दिसूं लागला. त्याच्या चर्येचा रंग पालटला, अन् त्याचे दात कृश दिसूं लागले. आजूबाजूच्या लोकांना हा फरक दिसूं लागला.

एके दिवशीं तर स्वतः बडे डॉक्टरच बागेंतून जात असतां त्याच्याकडे पाहून थबकले व आपल्या बरोबरीच्या छोट्या डॉक्टरांना त्यांनीं विचारलं,

"हा इथें नवीनच आला आहे काय? इथें कसं बसूं दिलं आहे याला?"

छोटे डॉक्टर किंचित् हसले व म्हणाले, "साहेब, तो कांहीं रोगी नव्हे."

त्या तरुण मजुराच्या चेहऱ्याकडे अगदीं निरखून पाहत बडे डॉक्टर म्हणाले, "रोगी नव्हे? मग कोण आहे हा? त्याची तब्बेत बरी नाहीं हें तर अगदीं उघड दिसतंय्"

"पण तो रोगी नाहीं. माळ्याला मदत करायसाठीं कामावर घेतलं आहे त्याला. मजूर आहे तो."

"अस्सं!" असं म्हणून असंतुष्ट चर्येनं बडे डॉक्टर पुढें झाले. पण पुन्हा एकदोन पावलं परत येऊन त्या तरुण मजुराकडे नजर लावून त्यानीं हशानं म्हटलं, "छे, हा मजूर नाहीं खास. याचे हात बघा कसे आहेत ते. हातांचे आंगठे बोटापासून किती विलग, अन् नखं कशीं बदामाच्या आकाराचीं लांबट? हे हात लेखकाचे आहेत. याचं हस्ताक्षर कसं आहे तें मला पाहायला मिळेल तर बरं होईल. अन् तुम्ही कांहीं म्हणा, याची मुद्रा वेड्यासारखी, थोडीशी बावरलेली नाहीं दिसत तुम्हांला?"

छोटे डॉक्टर हसले.

"हसतां काय? माझे डोळे मला कधीं फसवणार नाहींत." बडे डॉक्टर म्हणाले; "याचा पूर्वेतिहास काय असेल किंवा याच्या मनांत या क्षणीं कसले विचार चालले असतील तें कुणीं सांगावं? आतांशा फार माणसांचे मेंदू बिघडलेले असतात. मी तर म्हणतों, आज जर्मनींतल्या नव्वद टक्के माणसांची अशी स्थिति आहे कीं त्यांना प्रत्यक्ष वेड लागायचंच तेवढं शिल्लक आहे...!"

असं कांहीं तरी बोलत बडे डॉक्टर त्या दिवशीं निघून गेले.

पण दोन दिवसांनीं पुन्हा ते बागेंतून जातां जातां त्या तरूण मजुराजवळ थांबले. त्यानीं त्याच्या हाताकडे अगदीं सूक्ष्म नजरेनं पाहिलं, व क्षणभर स्वतःशींच विचार करून मग त्याला विचारलं,

"तूं नेहमीं मजुरीच केली आहेस काय?"

" नाहीं."

" मग तुझा धंदा काय तर ?"

" विजेचं काम करतों मी. पण सध्यां आमच्या धंद्यांत गर्दी झाली आहे—"

" हं, बरोबर आहे." असं उद्गारून बडे डॉक्टर थांबले. जणूं त्या माणसाचं उत्तर त्यानं खरं वाटलं नव्हतं. त्याच्याकडे निरखून पाहत ते पुढें म्हणाले, " तुझा चेहरा ओळखीचा दिसतो. तूं कधीं उपचारासाठीं इथें आला होतास ? नाहीं ? कधींच नाहीं ? पण तुझा चेहरा मीं पाहिला आहे खास. फोटो पाहिला असेल. काय म्हणतोस, शक्यच नाहीं ? पण उलट, माझी तितकीच खात्री आहे, कीं मीं तुला पूर्वी पाहिलं आहे. माणसांचे चेहरे लक्षांत ठेवण्याच्या बाबतींत माझी स्मरणशक्ति अगदीं भयंकर आहे. थांब हं, आठवण करूं दे मला. चू चू! याचा चेहरा कुठें पाहिला तें आठव-ल्याखेरीज मला आतां चैन पडायचं नाहीं..."

असं कांहींसं पुटपुटत बडे डॉक्टर निघून गेले.

नंबर एकोणिस इतका वेळ त्या तरुण मजुराजवळ स्वस्थ बसला होता. बड्या डॉक्टरांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत तो त्याला म्हणाला,

" मोठी वल्ली आहे हा थेरडा ! त्याच्यापासून कांहीं लपवून ठेवणं फार कठीण. पण मी मात्र त्याला असा खमंग भेटलों आहे ! काय बिशाद त्याला दाद लागेल ? गुप्त पोलीस आणून सोडलो आहे लेकाचा माझ्यावर—"

नंबर एकोणीसचं हें ताज्यांतलं ताजं वेड होतं. त्यानं कल्पना करून घेतली होती, कीं इस्पितळांत एक गुप्त पोलीस वावरतो आहे. तो ज्याच्या त्याच्या-जवळ सारखी इस्पितळांत नव्यानं दाखल झालेल्या नंबर वीसच्या रोग्याबद्दल बडबड करीत असे. तो म्हणे, " नंबर वीस हा मुळींच वेडा नसून त्याला गुप्त पोलिसांनीं इस्पितळांत हेरगिरी करायसाठीं वेड्याचं सोंग देऊन पाठविलं आहे."

इतके दिवस त्यानं त्या तरुण मजुराला खुनाच्या गोष्टी सांगून भंडावलं

होतं. आतां तो उठल्या सुटल्या नव्या गुप्त पोलिसांच्या गोष्टी सांगूं लागला. एके दिवशीं तर या गोष्टी सांगतां सांगतां त्यानं इस्पितळाभोंवतालच्या भिंती-कडे निरखून पाहून म्हटलं, ' किती उंच असेल बरं ही भिंत ? असेल अडीच तीन पुरुष, नाहीं ? समजा, या नव्या गुप्त पोलिसानं आपल्यावर संकट आणलं अन् पळून जायची वेळ आली तर ? बाकी वाटते तितकी अवघड नाहीं ही गोष्ट. भिंतींतले दहापांच दगड खिळखिळे केले, तर पाय ठेवायला जागा मिळून...''

अशा प्रकारें त्याची बडबड सारखी चालू राहिली.

एके दिवशीं सकाळीं तर तो त्या तरूण मजुराला अगदीं हलक्या आवा-जांत म्हणाला, " लक्षण कांहीं ठीक दिसत नाहीं रे बाबा. गांवांत म्हणे पोलिस दाखल झाले आहेत. एक मोठी तुकडीच्या तुकडी. वॉर्डर लोक बोलत होते, तें मीं ऐकलं. " त्यानं जांभई दिली अन् झोप येते म्हणून तो निघून गेला.

त्याच दिवशीं तिसऱ्या प्रहरीं सुमारें चार वाजतां तो तरूण मजूर जमिनींत खड्डे खणण्याचं काम करीत असतांना पांढरा सफेत लांब कोट घातलेले बडे डॉक्टर बागेतून जातां जातां त्याच्याजवळ आले, व अगदीं हलक्या आवजांत म्हणाले, " माझ्या खोलींत चल. थोडं काम आहे तुझ्याशीं ! "

तरूण मजुराच्या गालांवरचा रंग एकदम नाहींसा झाला. त्यानं आपली कुदळ खालीं ठेवली, मातीनं भरलेले हात आपल्या जांभळया पैरणीला पुसले, आणि तो बड्या डॉक्टरांच्या मागें निघाला. बड्या डॉक्टरांनीं एकामागून एक किती तरी दारं उघडलीं आणि लावून घेतलीं. त्यांचं ऑफिस इमारतीच्या अगदीं मागच्या बाजूस होतं. ती एक लहानशी खोली होती. जमिनीवर अन् साऱ्या खुर्च्यांवर पुस्तकांचे ढीगच्या ढीग पडले होते. लिहायच्या टेबलावर तर साऱ्या वस्तूंची नुसती गल्लत झाली होती, आणि खोलीभर सिगारचा दर्प साचला होता. मात्र खिडकी उघडली होती, आणि तिच्यांतून वसंतऋतूच्या

वाऱ्याचा झोत आंत येत होता. बडे डॉक्टर खोलींत शिरले ते खिडकीकडे पाठ करून उभे राहिले. आपले दोन्ही हात त्या तरुणाच्या खांद्यांवर ठेवून त्यांनीं त्याच्याकडे अगदीं रोखून पाहिलं. त्या वेळीं त्यांच्या नजरेंत विलक्षण गांभीर्य आणि शांति दिसली. लोकांच्या विकृत मनाची व्याधि घालविण्याची जादू ज्या व्यक्तीजवळ असते, अशाच व्यक्तीची मुद्रा अशी शांत व धीरगंभीर असूं शकते. बड्या डॉक्टरांच्या नजरेला जवळून नजर देतांना ज्योआकिमला त्यांच्या त्या नेत्रांमागं आणि करड्या रंगाच्या दाढीमागं केवढं सामर्थ्य, केवढी तपश्चर्या आणि किती असामान्य बुद्धि लपलेली होती याचा प्रत्यय आला.

थरथर कापणाऱ्या ज्योआकिमचे खांदे आपल्या सांत्वनशील हातांत घट्ट धरून बडे डॉक्टर म्हणाले,

"ज्योआकिम, मीं तुला कां बोलावलं, हें तूं ओळखलंच आहेस असं दिसतं. ही गोष्ट या ठिकाणीं व्हायला नको होती, एवढंच मला वाटतं. तुझी अशा प्रकारें धरपकड व्हावी यात माझा हात बिलकुल नाहीं. यावर मात्र तूं विश्वास ठेविला पाहिजेस. कांहीं दिवसापूर्वीं तूं कोण हें मीं ओळखलं; पण माझ्या हातीं असतं, तर तूं असाच बागकाम करीत राहिला असतास. अपराध्यांना शासन देण्याचं काम मला करायचं नाहीं, हें परमेश्वरसाक्ष सांगतों. या हॉस्पितळांत आल्यानं आपण सुरक्षित राहूं असं तुला वाटलं असेल तर तें साहजिक आहे. तुझी ती कल्पना खोटी ठरली, याबद्दल मला फार फार खेद होतो. सरकारी अधिकाऱ्यांनीं तुला हुडकून काढण्यासाठीं मोठी हुशारीची क्लृप्ति लढविली. खरं विचारशील तर मीसुद्धां फसलों. असो. आतां तुला ते पकडणार आहेत. अधिकारी खालीं उभे राहिलेले आहेत. तूं कसल्याही प्रकारें प्रतिकार करूं नयेस, किंवा दंगामस्ती करूं नयेस, अशी माझी इच्छा आहे. मी आतां तुला या खोलींत कोंडणार आहे, अन् अधिकाऱ्यांना वर धाडून देणार आहे. तूं या प्रसंगाला धैर्यानं तोंड दे आणि शांत राहा. राहशील ना?"

" होय. " एवढाच उद्गार ज्योआकिमच्या तोंडांतून बाहेर पडला, अन् तोदेखील अगदीं निराकार क्षीण शद्वासारखा.

बड्या डॉक्टरांनीं त्याच्याकडे अगदीं स्थिर दृष्टीनं पाहिलं. त्या क्षणीं ज्योआकिमचं अंतःकरण जरी निराशेनं पूर्ण बावरलेलं होतं, तरी बड्या डॉक्टरांच्या मुद्रेकडे पाहतांना त्याला वाटलं, तें किंचित् हंसत असावेत, व त्यांच्या त्या हसण्यांत सहानुभूति व विनोदही असावा. निमिषमात्र प्रतिकार करण्याची अनावर इच्छा त्याच्या मनांत सळसळून उठली. परंतु ज्या दुर्बलतेच्या आधीन तो झाला होता, तिच्यांत ती लगेच विरून गेली. बडे डॉक्टर खोलींतून बाहेर गेले व कुलपाची चावी फिरवितांना त्यांनी ती इतकी जोरानं फिरविली कीं, जणूं त्यांना सगळ्या जगाला सांगायचं होतं, 'बघा, याला कोंडला हं!'

त्या क्षणीं ज्योआकिमच्या मनांत एकच विचार आला की, हा शेवटच म्हणायचा. संपलं सारं; आटोपलं; आजपर्यंत धडपड केली ती वायां गेली! त्याचे डोळे हिंस्र श्वापदासारखे दिसले, उकळत्या कढासारखा फेस त्याच्या तोंडांत भरला, त्याचीं गात्रं थरथर कापूं लागलीं, खोलींतल्या साऱ्या वस्तूकडे तो डोळे फाडून पाहूं लागला...

बड्या डॉक्टरांनीं खोलीतून जातांना खिडकी कशी लावून घेतली नाहीं, हें कोडं ज्योआकिमला जन्मांत कधींच उलगडलं नाहीं. कदाचित् त्यांच्या सुप्रसिद्ध विसराळू स्वभावाचा तो परिणाम असावा. . किंवा कदाचित् त्यांना वाटलं असेल, बाहेरच्या उंच भिंतीवरून उडी टाकून पळून जाणं अशक्य आहे. मात्र कांहीं झालं तरी ' खोलीचा दरवाजा बंद आहे; पण खिडकी उघडी आहे ' असंच जणूं त्यांनी आपल्या मिस्किल हास्यानं सुचविलं असणं अशक्यचं होतं असं नव्हे!

सारी आडकाठी मोडून तोडून ओलांडून जाणाऱ्या श्वापदाची प्रचंड ताकद घटकाभर ज्योआकिममध्यें संचरली. त्यानं खिडकीबाहेर झाप टाकली, उडी ठोकली, खालच्या बागेंत आदळल्याबरोबर तो चटकन् उठला आणि

सूं धावत सुटला. वाटेंत कोण आलं, कोण नाहीं, तें त्यानं पाहिलं नाहीं. आपल्यामागें आरोळ्या अन् आरडाओरडा सुरू झालेला त्यानं ऐकला; पण तो धावत सुटला तो सुटला. बाहेरच्या भिंतीचे कांहीं दगड आधींच त्यानं ढिले करून ठेविले होते. त्यांवर पाय देऊन तो चढूं लागला. अर्धी भिंत चढल्यावर त्याची गति खुंटली. त्याला पायण्डा कांहीं केल्या मिळेना. पण मग सारी शक्ति एकवटून त्यानं भिंतीच्या माथ्यावर झाप घेतली, पलीकडच्या बाजूस कुद मारली, आणि तो पाठीवर आपटला. क्षणभर तो बेशुद्ध झाला; पण लगेच हातापायांवर कसंबसं फरफटत त्यानं रस्ता ओलांडला. तो पलीकडच्या खड्ड्यात गरंगळत गेला, उठला, आणि अरण्याच्या सीमेवरच्या झाडांझुडपातून वेगानं धावत गेला.

मागे ' ठो, ठो ' असे पिस्तुलाचे आवाज त्यानं ऐकलं. पण झाडांझुडपांच्या फांद्या तुडवीत, अडखळत, धडपडत तो पुढें गेला, एका उतरणीवरून घसरला अन् लवकरच जंगलाच्या अगदीं दाट भागांत नाहीसा झाला.

संध्याकाळीं जेव्हां इस्पितळांत पुन्हा शांतता झाली तेव्हां दिसून आलं कीं तिसऱ्या प्रहरच्या त्या धमाधमींत नम्बर एकोणीसही, कसा कोण जाणे, निसटून जंगलाकडे पळून गेला होता !

*  *  *

लवकरच सरकारतर्फे असं प्रसिद्ध करण्यांत आलं कीं, ज्योआकिम बूर्थ पळून जाऊन अरण्यांत लपला होता; परंतु शिपायांनीं वेढा घालून त्याला हुसकण्याचा जेव्हां प्रयत्न केला, तेव्हां बंदुकीच्या गोळीला बळी पडलेल्या ज्योआकिमचं प्रेत त्यांना सापडलं होतं ! '

# १२

प्रो. लेन्झबर्ग यांच्या राहत्या जागेला इस्पितळांतले लोक बड्या साहेबांचा बंगला म्हणत. परंतु खरं पाहतां ती एक शेतकऱ्याला साजेशी लहानशी वाकडी तिकडी झोपडीच होती. रानवट सफरचंदांच्या झाडांच्या जाळीमागें ती झोपडी लपल्यासारखी दिसे. या ठिकाणीं बडे साहेब, त्यांचा नोकर ' कॅडेराईट ' आणि त्यांची घोडी इतक्यांचीच वस्ती असे. बडया साहेबांचा नोकर आणि घोडी दोघेही पायानं किंचित् अधू होतीं. कॅडेराइट प्रथम इस्पितळांत नोकरीला होता, पण आतां बड्या साहेबांच्या आयुष्यांत तो कायमचाच सहभागी झाला होता. बड्या साहेबांच्या लंगड्या घोडीचा इतिहास उपलब्ध नाहीं.

बडे साहेब पुष्कळदा विनोदानं म्हणत, कीं " लग्नाच्या बायकोपेक्षा कॅडेराइटचा सहवास मला अधिक सोयीचा वाटतो," आणि त्याचं कारण कोणी विचारलं तर ते सांगत, " मला घरांत स्वच्छता अन् टापटीप असलेली अगदीं आवडत नाहीं." या त्यांच्या थट्टेत सत्यांश पुष्कळ असला पाहिजे. कारण त्यांच्या टेबलावर पुस्तकांचे, पत्रकांचे व हस्तलिखितांचे जे भारे अस्ताव्यस्त पडलेले असत त्यांवर धुळयाचे थरच्या थर साचले तरी

कॅंडेराइट त्यांना हात लावीत नसे. बड्या साहेबांच्या त्या घरांत त्यांना सुखावह होणारी जी अव्यवस्था जागोजाग दृष्टीस पडे तिचा नमुना दुसरीकडे पाहायला मिळणं खरोखरच कठीण हो'. रात्र आणि दिवस यांतला भेदसुद्धा त्या घरांत मानला जात नसे. अंथरूण पुस्तकांच्या ढिगांनीं खचलेलं असलं तर तीं उचलण्याऐवजीं बडे साहेब कोचावर निजत; आणि कामांत त्यांची तंद्री लागली तर झोपेवांचूनच त्यांची रात्र जाई. दोन्ही सांजांची जेवणं केव्हां व्हायचीं त्याची कांहीं वेळ ठरलेली नसे, अन् तीं उरकण्याची पद्धतही मोठी चमत्करिक होती. टेबलावर जेवण मांडण्याइतकी जागा नसली किंवा बसायला खुर्ची रिकामी नसली, कीं बडे साहेब खुशाल स्वैंपाकघरांत जात, अन् " हें काय ? असं काय ? " अशी तक्रार करीत कॅंडेराइट तिथेंच त्यांच्या पुढें वाढप करी.

मात्र या साऱ्या अव्यवस्थेंत एका कायद्याचा अंमल कसोशीनं केला जाई. तो कायदा म्हणजे शास्त्रीय शोधासाठीं सतत परिश्रम करण्याचा. शास्त्रीय संशोधनाच्या कामांत रात्रंदिवस व्यापृत राहणं हाच बड्या साहेबांच्या जीविताचा हेतु होता, व त्यामुळें आयुष्याच्या बाह्य उपचारांची त्यांच्या घरांत हेळसांड चाले. त्या घराला विचित्र, किंचित् हास्यास्पद स्वरूप आलेलं दिसे. जिकडे तिकडे पसरलेल्या पुस्तकांत टिप्पणवह्यांत, अन् गिचमीड अक्षरांत लिहिलेल्या कागदाच्या भाऱ्यांत देखील एक प्रकारचं सूत्र होतं. मात्र या सूत्राची किल्ली प्रोफेसर साहेबांच्या मेंदूत, त्यांच्या स्मरणशक्तींत, आणि ते बौद्धिक विषयांचं जें मनन करीत त्या मननांत असे. कागदपत्रं अन् पुस्तकं हवीतशीं अस्ताव्यस्त पडलेली दिसत, पण एखाद्या पुस्तकांतला विवक्षित उतारा प्रोफेसरसाहेबांना हवासा वाटला, कीं त्या अडगळींतून अन् खिचडींतूनही ते नेमकं तेंच पुस्तक इतक्या अचूकपणें उचलून घेत, कीं पाहणाऱ्याला त्याचा विलक्षण अचंबा वाटावा. अशा वेळीं टक्कल पडलेल्या डोक्याचा लंगडा कॅंडेराइट जवळच उभा असे, त्याच्या तोंडावर जें पूर्ण

हास्य दिसूं लागे त्यांत धन्याविषयीं त्याला वाटणारा अमर्याद आदर व्यक्त होई.

इस्पितळानजीकच्या जंगलांत शिपायांच्या गोळीबाराला ज्योआकिम बळी पडला त्यानंतर थोडया दिवसांनीं एके दिवशीं संध्याकाळीं कॅंडेराइट बाजार करून घरीं परत आला, अन् पाहतों तों आपला धनी खोलींत अगदीं अस्वस्थ चित्तानं येरझारा घालीत आहे असं त्याला दिसलं. बडे साहेब तिसऱ्या प्रहरीं आपल्या खडखडया घोडागाडीत बसून बाहेर गेलेले त्यानं पाहिलेले होते. ते नुकतेच परत आले असले पाहिजेत. कारण बाहेरच्या हवेतल्या दवाचे थेंब अजून त्यांच्या छोट्या करडया दाढीवर तसेच दिसत होते.

त्याला पाहतांच प्रो. लेन्झबर्ग म्हणाले, " कॅंडेराइट, इथें बैस असा. मला तुझ्याशीं कांहीं बोलायचं आहे. "

कॅंडेराइट कांहींसा गोंधळला व कोचावर दोन भल्या लठ्ठ फायलींच्या मधोमध जागा होती तिथें बसला.

प्रोफेसर म्हणाले, " कॅंडेराइट, तर्कशास्त्रांतल्या अन् तत्वज्ञानांतल्या कांहीं प्रमेयांबद्दल मला तुझं मत हवं आहे. नीट उत्तरं दे. माझी निराशा करणार नाहींस ना ? "

" नाहीं धनी. " कॅंडेराइटनं चातुर्यानें उत्तर दिलं. प्रोफेसरसाहेब ' फॉल्कन ' पक्ष्याच्या दाढीसारख्या दिसणाऱ्या आपल्या करडया दाढीमुळें कितीही गंभीर वाटले तरी संयमित खेळकर विनोदाची त्यांना मधून मधून कशी लहर येते तें त्याला माहीत झाल होतं.

प्रोफेसर म्हणाले, " कॅंडेराइट, मी काय सांगतों तें लक्षपूर्वक ऐक. चार दिवसापूर्वी आपल्या इस्पितळांतून दोन इसम फरारी झाले. त्यांपैकीं एक खरोखरच खुनी होता, अन् दुसऱ्याला आपण खून केला असा भ्रम झाला होता. दोघेही जंगलांत पळून गेले. वृत्तपत्रांत जी बातमी प्रसिद्ध झाली ती अशी, कीं खुनी इसम गोळी लागून मेला, कायद्याचं समाधान झालं,

अन् गुन्हेगाराला पकडण्यासाठीं आलेले शिपाई परत गेले. आतां, कॅंडेराइट, मी तुला असं विचारतों की तो दुसरा इसम कुठें आहे ? "

" तो म्हणे या गांवाच्या स्टेशनवर आगगाडींत बसला अन् एव्हांना सरहद्दीपलीकडे गेला असला पाहिजे. "

" हं हं, कॅंडेराइट, असे एकदम सिद्धान्त काढूं नकोस. तपकिरी रंगाचे कपडे घातलेल्या एका इसमानं आपल्या स्टेशनावर स्वित्झर्लंडचं तिकीट काढलेलं एका इसमानं पाहिलं खरं. पण जगांत तपकिरी रंगाचा पोषाक केलेला काहीं एकच इसम असूं शकत नाहीं. अशीं दोन माणसंही असतील. अन् स्टेशनवर दिसला तो आपला फरारी मनुष्य नसेलही. शिवाय त्यानं स्वित्झर्लंडचं तिकीट काढलं येवढ्यावरूनच तो स्वित्झर्लंडला गेलाच असला पाहिजे असंही अनुमान काढतां येणार नाहीं. समज तो स्वित्झर्लंडला गेला नाहीं असं मानण्याजोगा बळकट पुरावा माझ्याजवळ असला तर—? "

" मग त्याचा आपण शोध केला पाहिजे. "

" ही केला पाहिजे. हें बघ, पोलिसांनीं खुनी इसमाला ठार केला हें जर खरं, तर उरलेला तो दुसरा इसम निरपराधी म्हटला पाहिजे, नाहीं का ? समजा, तो आपल्यापुढें येऊन उभा राहिला तर त्याला पकडून पोलिसांच्या हवालीं करणं मूर्खपणाचं ठरेल की नाहीं ? कारण पोलिसांनीं आपली कामगिरी चोख बजावली आहे. आतां ' हा घ्या खुनी इसम ' असं म्हणून दुसऱ्या एका माणसाला पोलिसांच्या ताब्यांत दिल्यानं सरकार अन् सगळेच लोक मोठ्या घोटाळ्यांत पडतील. सारांश, या दुसऱ्या इसमाशीं पोलिसांचा कांहीं एक संबंध नाहीं, फक्त आपलाच आहे. खरं आहे की नाहीं मी म्हणतों तें ? "

कॅंडेराइट आतां अगदीं लक्षपूर्वक ऐकूं लागला होता. तो उद्गारला " हो, खरं आहे. "

" मग समज आपल्याला तो दुसरा इसम सापडला तर त्याचं काय करायचं ? "

" त्याला इस्पितळांत परत पाठवायचं. "

" बरोबर आहे. पण आतां असं समज—कल्पना मोठी चमत्कारिक आहे, पण समज—कीं पोलिसांनीं चुकून त्या भ्रमिष्टाला ठार केलं. मग जो इसम उरला तो कांहीं भ्रमिष्ट, वेडा नव्हे. अर्थात् तो आपल्याला सापडला तर त्याची रवानगी इस्पितळांत करण्याचा आपल्याला अधिकार नाहीं. कळलं कीं नाहीं ? "

कॅंडेराइटला नीट कळेना, पण तो उद्गारला, " हं... "

" तर्कशास्त्राच्या नियमाप्रमाणें हें उघड आहे. हें बघ, आपल्याजवळ तपकिरी पोषाख केलेले तीन इसम आहेत. त्यांपैकीं एक वृत्तपत्रांतल्या बातमीप्रमाणें स्वित्झर्लंडला गेला. दुसरा म्हणजे ज्यानं खरोखरीच खून केला तो पोलिसाच्या गोळीबाराला बळी पडला. मग आतां तिसरा मनुष्य उरला तो कोण ? तो खरा खुनीही असणं शक्य नाहीं अन् भ्रमिष्टही असणं शक्य नाहीं. तो मनुष्य जर आपल्याला सापडला तर कसं करायचं ? "

कॅंडेराइटनं एकदम उत्सुकतेनें विचारलं, " म्हणजे तो खरंच सापडलाय् का ! "

" हें बघ कॅंडेराइट, नीट ऐक. एका मनुष्याला खुनाचा इतका ध्यास लागला, कीं त्यानं तो अखेर भ्रमिष्ट झाला, अन् दुसऱ्या एका माणसानं खरोखरच खून केला, तर त्या दोन माणसांत कांहीं फरक आहे ? "

" पुष्कळच फरक आहे " कॅंडेराइटनं चटकन् उत्तर दिलं.

प्रोफेसरसाहेबांनीं थंडपणानं पुन्हा विचारलं, " फरक आहे म्हणतोस ! "

त्या प्रश्नानं कॅंडेराइट डळमळला व म्हणाला, " अं...तसं म्हटलं तर कांहीं फरक नाहीं. "

" बरोबर. त्या दोघांत खूपच फरक आहे असं मी तुला सिद्ध करून

दाखवीन; पण मुळींच फरक नाहीं असंही मला सिद्ध करतां येईल. हे सारे तत्त्वज्ञानाच्या गूढ चर्चेचे विषय आहेत. ते राहूं देत. आपल्या प्रश्नाचा आपण निर्णय करूं या. ' हेरॅक्लिटस ' नांवाचा ग्रीक तत्त्ववेत्ता काय म्हणत असे तुला माहीत आहे ना ? "

" तो म्हणत असे, प्रत्येक वस्तु क्षणोक्षणीं बदलत आहे. "

" बरोबर. त्या तत्त्ववेत्याच्या मताप्रमाणें एकाच नदींत दोनदां स्नान करणं आपल्याला शक्य नाहीं. अन् हें जर खरं तर असं सांग, कीं ज्या माणसानं एक वर्षापूर्वी खून केला तो आज आपल्या हातीं सापडला तर तोच तो खुनी मनुष्य असं आपल्याला म्हणतां येईल ? "

" नाहीं. पण—"

" थांब थांब. मला दुसरा एक प्रश्न तुला विचारायचा आहे. समज, ज्याच्या खांद्याला गोळीची जखम झालेली आहे अन् जो बेशुद्ध आहे असा मनुष्य आपल्याला सापडला तर त्याला पोलिसांच्या हवालीं करणं आपल्या रुग्णालयाच्या तत्त्वाशीं सुसंगत होईल काय ? "

आतां सगळ्या गोष्टींचा आपल्याला उमज पडला असं कॅडेराइटला वाटलं. तो हलकेंच हसूं लागला व म्हणाला, " नाहीं. आपल्या भूतदयेच्या तत्त्वाशीं तें मुळींच सुसंगत होणार नाहीं. "

" अच्छा, मग जा तर, त्याची जखम नीट बांधली आहे कीं नाहीं तें बघ, अन् त्याला ताप किती आहे तेंही पहा. मीं त्याला तुझ्या अंथरुणांत निजविला आहे. " हें सांगतांना मोठ्या समाधानानं प्रो. लेन्झबर्ग यांचे डोळे चमकले.

मालक आणि नोकर यांच्यातलं हें संभाषण म्हणजे ज्योआकिमच्या उद्धाराचा प्रारंभ होता असं म्हणायला कांहीं हरकत नाहीं.

* * *

तापाचा ऐन भर होता तोंपर्यंत ज्योआकिम नीटसा शुद्धीवर नव्हताच.

स्थलकालाच्या बंधनांपलीकडे कुठें तरी त्याचा आत्मा फिरत असेल. कदाचित् अज्ञाताच्या प्रवेशद्वारापर्यंत तो जाऊन आला असेल. स्वतःच्या देहाची अगर मनोव्यापाराची, कसलीच शुद्ध ज्योआकिमला उरली नव्हती. अशा बेहोष अवस्थेंत त्यानं किती काळ काढला कोण जाणे.

जेव्हां तो हळूहळू शुद्धीवर येऊं लागला तेव्हां आपण एका अंथरुणांत निजलों आहोंत व तांबडया चिटाच्या अभ्र्याच्या उशा आपल्या आंगाखालीं आहेत असं त्याला आढळून आलं. त्यानं अधिक लक्ष देऊन पाहिलं तों ज्या खोलींत तो निजला होता ती मोठी चमत्कारिक होती. तिचं छप्पर अगदीं खालपट होतं. भिंतीवर जिकडे तिकडे चित्रं लावलेलीं होतीं. त्या बहुतेक चित्रांत बियरच्या पिपांभोंवतीं जमलेले विद्यार्थी दाखविलेले होते. त्यांतच एके जागीं सुप्रसिद्ध चित्रकार रेंब्रां याचं ‘ Anatomy Lesson ’ हें चित्र होतं. एका लहानशा टेबलावर फुलानीं गच्च भरलेली फुलदाणी होती, व तिच्या शेजारींच ज्या दोन कवट्या मांडलेल्या होत्या त्यांपैकीं एक खरी कवटी होती आणि दुसरं कवटीसारखं दिसणार मातीचं मद्यपात्र होतं. एक टक्कल पडलेला मनुष्य खोलींत शिरून त्याच्या जवळ आला व म्हणाला, "माझं नांव कॅंडेराइट; ही माझी खोली आहे. आतां तूं इथंच राहणार आहेस." मग त्यानं ज्योआकिमच्या दुसऱ्या खांद्याभोंवतालचं बॅंडेज बदलून बांधलं. आपल्याशीं कोण काय बोलत आहे किंवा काय घडत आहे तिकडे नीट लक्ष देण्याइतकी ज्योआकिमच्या अंगात ताकद नव्हती; तो पुन्हां झोपी गेला.

कॅंडेराइटनं त्या खोलीला इस्पितळांतल्या खोलीला शोभेल असा साज चढविला होता. ज्योआकिमच्या उशागतीं त्यानं एक नकाशा टांगला होता व त्यावर जाड उभ्या रेघा मारून त्याच्या तापाची नोंद केली होती. त्याला अगदीं शिस्तीनं वागविलं जाई व त्याच्या खाण्यापिण्यांत वक्तशीरपणा संभाळला जाई. अव्यवस्थेच्या त्या माहेरघरांत ही गोष्ट व्हावी म्हणजे विशेषच म्हटलं पाहिजे. ज्योआकिमला कांहीं हवं असल्यास व कॅंडेराइटला बोलवा-

वयाचं असल्यास उपयोगी पडावी म्हणून एक घंटासुद्धा बसविण्यांत आली होती; पण ज्योआकिमनं ती कधींच वाजविली नाहीं. तो दुखण्यानं इतका निःशक्त झाला होता, कीं, जें मिळेल त्यापलीकडे कांहीं हवं असं त्याला वाटेनासं झालं होतं. सकाळ संध्याकाळ दोन्ही वेळां बडे साहेब येऊन त्याची प्रकृति पहात, आणि कर्तव्यदक्ष कॅंडेराइट त्यांच्यामागें तीन पावलं ऊभा असे. इजिप्शियन तत्त्ववेत्त्यासारखं दिसणारं बड्या साहेबांचं मस्तक ज्योआकिमच्या दृष्टीस प्रथम पडलं तेव्हा तो इतका दचकला, कीं त्याच्या हृदयाचे दोन चार ठोके चुकले; त्याचे ओठ पांढरे फटफटीत झाले आणि कण्हल्यासारखं करून त्यानं उशीवर आपलं मस्तक टाकलं.

बडे साहेब म्हणाले, " असं भ्यायचं काय कारण आहे ? मी कांहीं चावणार नाहीं तुला." त्यांनीं आपले पंजे ज्योआकिमच्या कपाळावर टेकले, अन् त्या स्पर्शानं ज्योआकिमला किती तरी बरं वाटलं. प्रोफेसरसाहेबांचे हात मोठे विलक्षण होते. इजिप्शियन लोकांसासारखे लांबसडक आणि पीतवर्ण; पण तळहात लाल, मृदु आणि खळ्या पडलेले —जणूं एखाद्या बालकाचेच ते तळहात ! आणि त्या हातांच्या स्पर्शांत केवढं तरी प्रेम, सामर्थ्य आणि शांति देण्याची जादू भरलेली होती !

तिसऱ्या दिवशीं ज्योआकिमनं भीत भीत विचारलं' " मी बरा झालों, कीं मला पोलिसांच्या स्वाधीन केलं जाणार आहे काय ? " आधीं दिवसभर अन् रात्रभर त्यानं याच प्रश्नाचा आपल्या मनाशीं विचार केला होता. " होय ? आपण मला पोलिसांच्या स्वाधीन करणार ? "

प्रोफेसरसाहेबांनीं आपल्या खिशांत हातांची काढघाल केली. ते मोठे खुषींत असले, कीं त्यांच्या हातांची अशी चाळवाचाळव होत असे. ते ज्योआकिमला म्हणाले, " अंहं. तुला मी पोलिसांच्या स्वाधीन करणार नाहीं. तुझ्या बाबतींत परमेश्वरानंच काय तो कौल द्यावा असं मीं योजिलं होतं, अन् ईश्वरानं तुझ्या बाजूचा निकाल दिला आहे. मी एक मानसोपचार करणारा

डॉक्टर आहे. मला शस्त्रवैद्यक समजत नाहीं. पण ज्या अर्थी बंदुकीच्या गोळीनं झालेल्या तुझ्या जखमेवर मी उपचार करूं शकलों अन् तूं बरा झालास, त्या अर्थी ईश्वरानं तुझ्या बाजूचा निर्णय दिला असं मी समजतों. काय कॅंडेराइट, माझं म्हणणं बरोबर आहे कीं नाहीं ? "

अशाच प्रकारें बडे साहेब जेव्हां जेव्हां येत तेव्हां तेव्हां बोलत. त्यांच्या बाह्य गांभीर्यामागें अंतर्यामीच्या सात्त्विक दयेचा अन् विनोदाचा जो गोडवा होता तो ज्योआकिमच्या अधिकाधिक लक्षांत येऊं लागला.

त्यांनीं खोलींत यावं, जवळ बसावं, अन् नाडी पहाण्यासाठीं त्याचा हात हातीं घेऊन विचारावं, " हं काय ' रेनॅट्स ' ? आज तब्येत काय म्हणते आहे ? हं, मीं तुझं नांव रेनॅट्स असं ठेवलं आहे. सुंदर आहे कीं नाहीं हें नांव ! तुझा नामकरणविधि केला पाहिजे, खरं ना ! ज्योआकिम बुर्थ नांवाचा मनुष्य गोळी लागून केव्हांच मेला. कॅंडेराइटनं तुला हें बहुतेक सांगितलंच असेल. जो मेला तो तुझा जिवलग दोस्त होता, दिसायलाही अगदीं तुझ्यासारखाच होता. पण आतां त्यांचं काय ? तो मेला, गेला. गरीब बिचारा ! आतां तुला नवं नांव दिलं पाहिजे. म्हणून म्हणतों ' रेनॅट्स ' "

बडे साहेब निघून गेल्यावर कॅंडेराइट ज्योआकिम म्हणाला, " बडे साहेब गंभीर चेहरा करतात तेव्हां त्याना बहुधा विनोद करायचा असतो, अन् जेव्हां ते थट्टेनं बोलल्यासारखं वाटतं तेव्हा त्याचा अभिप्राय फार गंभीर असतो. "

ज्योआकिम समजला. त्यानं आपलं मस्तक उशीवर पडूं दिलं, अंगावरच्या चादरीवर दोन्ही हात समांतर पसरले, आणि शांत विचारांत तो गढून गेला. आजपर्यंत त्यानं किती तरी वेष आणि नांवं धारण केलीं होतीं. आतां रेनॅट्स हें नांव त्याला मिळालं होतं.

दिवसामागून दिवस जाऊं लागले. ज्योआकिम स्वस्थ पडे आणि विचार

करी. बड्या साहेबांच्या त्या जागेंत जिकडे तिकडे अगदीं शांत स्तब्ध असे, त्याच्या खांद्याला इतकी जबर जखम झाली होती, कीं प्रथम शरीराचा तो भाग म्हणजे त्याला तप्तरसाच्या एखाद्या गोळ्यासारखा वाटे. पण हळूहळू जखम बरी होत गेली. अन् तापही येईनासा झाला. ज्योआकिम अंथरुणांत पडून राही, आणि खोलीच्या ठेंगण्या कडीपाटाकडे दृष्टि लावून आपल्या आयुष्याचा विचार करी. जणूं त्या आयुष्याची सारी कथा त्या कडीपाटावर लिहिलेली त्याला दिसे व ती तो वाचीत असे. कॅंडेइराटची चाहूल त्याला सतत ऐकूं येई; तो खोलींत येई तेव्हां पुष्कळदा गमतीच्या गोष्टी सांगे. शेजारच्या गोठ्यांत घोडीच्या टापांचे आवाज चाललेले असत. ती गाडीला जुंपली जाई व मग खडखड आवाज करीत गाडी निघून जाई, तें सारं ज्योआकिमला कळत असे. बाहेरच्या सफरचंदाच्या झाडावर जमलेल्या पक्ष्यांपैकीं एखादा प्रातःकाळचे पहिले सुस्वर काढी अशा प्रकारें दिवस सरे. संध्याकाळ झाली, कीं प्रोफेसरसाहेबांच्या परत येण्याकडे ज्योआकिमचे कान लागून राहात. त्यांची वाट पाहतां पाहतां तो उतावीळ अन् अस्वस्थ होई. घोडीच्या टापांचा आवाज जवळ जवळ येऊन घरापाशीं थांबला अन् सिगारच्या वासाचा दरवळ दारांच्या फटींतून आंत शिरला, कीं मग मात्र त्याच्या मनाची अस्वस्थता नाहींशी होई. मग बडे साहेब त्याची तब्येत पाहण्यासाठीं येत, अन् आतां ज्योआकिमच्या अंगांत ताप नसे म्हणून ते बराच वेळ त्याच्याशीं बोलत राहत. ते त्याला हजार प्रकारचे प्रश्न विचारीत, अन् हव्या त्या विषयावर बोलत सुटत. संभाषण करतांना त्यांच्या येरझारा अन् धूम्रपान चालू असे. त्यांचे हात खिशांत घातलेले असत अन् आपल्या विशिष्ट लकबीनं ते आपले खांदे उडवीत. त्यांच्या मनांत येई, किती अपरिपक्व या तरुणांचं मन! सामान्य सुशिक्षिताला मिळणाऱ्या शिक्षणापलीकडे त्याच्या मनावर विशेष कसलेच संस्कार झाले नव्हते. पोलिसांचा पाठलाग चुकवितांना जे अनुभव त्याला आले आणि जीं दुःखं त्याला सोसावीं लागलीं त्यांच्या

योगानं जीविताचं खरं स्वरूप त्याला थोडंफार समजलं असेल तेवढंच! पण त्याच्याशीं संभाषण करतांना प्रोफेसरसाहेब कधीं चिडत नसत. ते बोलत राहात, आपलीं मतं सांगत. तीं ऐकलीं कीं ज्योआकिमची जिज्ञासा वाढे आणि तो विचार करूं लागे. त्याच्या जीविताच्या गुंतागुंतीचा उलगडा त्याचा त्यानंच करावयाचा होता; आणि या प्रयत्नांत त्याला साहाय्य व्हावं अशा अनेक कल्पना प्रोफेसरसाहेब बोलून दाखवीत, अन् मग निघून जात.

वाचनाचे श्रम सोसवतील इतका ज्योआकिम बरा झाल्यावर प्रोफेसरसाहेबांनीं त्याला पुस्तकंही दिलीं. दोन्ही हातांत पुस्तकांचे भारे घेऊन कॅंडेराइट येई, अंथरुणाशेजारीं, जमिनीवर त्यांचे ढीग रचून ठेवी, अन् कधीं कधीं त्यांतलं एखादं पुस्तक काढून म्हणे, ‘ हें वाचा. ’ प्रथम प्रथम पुस्तक उघडून वाचण्याइतकी हुशारी ज्योआकिमला नसे. तो फक्त पुस्तक हतांत घेई, त्याच्या कातडी पुठ्ठयावरून हात फिरवी, अन् तेवढ्यानंच त्याला समाधान वाटे. पण एके दिवशीं मात्र तो पुस्तक वाचूं लागला.

सकृद्दर्शनीं असं वाटण्यासारखं होतं, कीं हातीं आलीं तीं पुस्तकं उचलून आणून ज्योआकिमच्या खोलींत त्यांचा ढीग केला होता; पण ज्योआकिमच्या हळूहळू लक्षांत येऊं लागलं कीं त्या अव्यवस्थित राशींतही योजना होती. ज्या ज्ञानाचा त्याच्या स्वतःच्या जीविताशीं संबंध होता, जें त्याला यापुढें मार्गदर्शक होणार होतं असंच ज्ञान या ग्रंथांच्या रूपानं त्याच्या हातीं आलं होतं. त्यानं पुस्तकं वाचलीं त्यांत प्रवासवर्णनं होतीं, पश्चिमेकडील एका वसाहतीचा इतिहास होता, कांहीं कवितासंग्रह होते, कित्येक साहित्यविषयक मासिकं होतीं. एकदां तर इंग्रजी भाषेच्या व्याकरणाचं पुस्तक हातीं आलं तें त्यानं वाचायला सुरवात केली. लहानपणीं शाळेंत असतांना तो इंग्रजी भाषा थोडीशी शिकला होता. तें जुनं ज्ञान आतां उजळण्यांत त्यानं अर्धा दिवस घालविला, आणि त्या गमतीच्या उद्योगामुळें त्याच्या मनावर मोठी प्रसन्नता आली. तें पुस्तक त्याच्याजवळ आणून टाकण्यांत कदाचित् एवढाच उद्देश

असेल. नंतर एके दिवशीं पाश्चात्य व पौर्वात्य धर्मावरचा एक प्रबंध त्याच्या हातीं आला, व त्याच्या वाचनांत ज्योआकिम अगदीं गढून गेला.

रोज संध्याकाळीं प्रोफेसर ज्योआकिमच्या खोलींत येत, व येरझारा घालत घालतां त्याच्याशीं संभाषण करीत. हें संभाषण म्हणजे न कळत त्याची परीक्षा घेण्याचाच एक प्रकार असे. या परीक्षेला ज्योआकिम बऱ्याचशा यशस्वी रीतीनं तोंड देई. त्याची विचारशक्ति आतां जागृत झाली होती, निरनिराळ्या प्रश्नांची छाननी स्वतंत्रपणें करण्याची आवड त्याला वाटूं लागली होती आणि त्याचा दृष्टिकोन विस्तृत होत चालला होता. मात्र अजूनही त्याच्या मनावर कसलं तरी दडपण होतं, कसली तरी अस्वस्थता दाटलेली होती; त्याचे मानसिक व्यापार गुदमरल्यासारखे होत असत. लोकांच्या मानसिक व्याधींचं निदान करण्याचा धंदा करणाऱ्या प्रोफेसरसाहेबांच्या लक्षांत ज्योआकिमची ही अस्वस्थता आल्यावांचून कशी राहील? परंतु तिच्याबद्दल ते कधीं बोलत नसत. कधीं कधीं ते संभाषण करीत, पण कधीं कधीं ते अगदीं स्तब्ध राहत. त्याचा हात आपल्या हातीं घेऊन ते त्याच्या अंथरुणाच्या कडेवर घटकान् घटका स्वस्थ बसून राहत. जणूं ते कशाची तरी वाट पाहत असावेत. अशा वेळीं ज्योआकिमही स्तब्ध राही; पण एकीकडे त्याच्या छातीची धडधड जोरजोरानं होत असे, अन् डॉक्टरांच्या हातीं असलेल्या त्याच्या हाताच्या नाडीची गति भडकल्यासारखी वेगानं चालू राही.

एके दिवशीं इस्पितळांत कोशेर्टनं पुन्हा दंगामस्ती केल्यामुळें व त्याला शांत करावं लागल्यामुळें प्रोफेसरना घरीं यायला फार उशीर झाला. त्यांनीं पाहिलं तों ज्योआकिमचा चेहरा पांढराफटक दिसत होता, आणि डोळे मात्र विलक्षण चमकत होते. त्याच्या मनांत कसली तरी विलक्षण खळबळ चालू असली पाहिजे. कॅडेराइटनं सांगितलं कीं त्याचा तापही वाढलेला होता.

तें ऐकून चिंता दर्शविण्याऐवजीं प्रोफेसर म्हणाले, "वाटलंच होतं मला.

त्याच्या सध्यांच्या मनःस्थितीवर औषध म्हणून एक पुस्तक मीं त्याला दिलं आहे. तें त्यानं वाचलं असेल तर असाच परिणाम होणार. कॅंडेराइट, मी माझ्या हातीं आलेल्या या तरुण माणसाचा रोग एखाद्या मांत्रिकाप्रमाणें ग्रंथांच्या सहाय्यानं बरा करणार आहे, समजलास?"

ज्योआकिमशीं बोलतांना त्यांनी कोशेर्टची हकीकत सांगायला सुरुवात केली. "गरीब बिचारा! मी त्याच्याजवळ किती वेळ तरी बसून होतों. त्याचा वाताचा झटका पार ओसरला तेव्हांच मीं उठलों त्याच्याजवळून. इस्पितळांत सगळयांत त्रासदायक रोगी कोणता असेल तर तो कोशेर्ट. त्याच्या मनांत जे जे विचार भडकतात ते ते एकदां मोठमोठ्यानं आरडून ओरडून बोलून टाकले म्हणजे मग तो शांत होतो. नंतर त्याला फार थकवा येतो, पण त्यामुळें त्याला आराम वाटतो. त्याला आम्हीं बांधून घातला म्हणजे तो काय म्हणतो माहीत आहे तुला ज्योआकिम? तो म्हणतो 'सबंध जग उलटं झालं आहे.' त्याच्या या बोलण्याचा अर्थ इतरांना कळत नसेल, परंतु त्याच्या मनःस्थितीची कल्पना मला करतां येते. सबंध जग उलटं झालं आहे! आपल्या या शतकांत मनुष्यजातीची जी श्रद्धाहीन, नीतिशून्य पाशवी अवस्था झालेली दिसते तिचा विचार केला, कीं खरोखरीच वाटूं लागतं, जग उफराटं झालं आहे. रेनॅट्स, तुझा परमेश्वरावर विश्वास आहे?"

"होय, आहे." ज्योआकिम गंभीरपणें म्हणाला.

प्रोफेसर कांहीं वेळ गप्प राहिले. ज्योआकिमनं अंगावर घेतलेल्या चादरीवर एक लहानसं पुस्तक वाचतां वाचतां तसंच ठेविलेलं दिसत होतं. त्या पुस्तकाचं नांव 'कर्म आणि भोग' असं होतं, आणि ज्या प्रधानांचा ज्योआकिमनं खून केला त्यांनीं तें लिहिलं होतं.

प्रोफेसरनीं तें उचलून घेतलं, थोडीं पानं चाळलीं, अन् ज्योआकिमकडे दृष्टि न टाकितां विचारलं, "हें तूं वाचीत होतास कीं काय? तुला दिलेल्या

पुस्तकांत हें होतं ! मला वाटतं पूर्वी कधी हें तुझ्या वाचण्यांत आलं नसेल !"

"नाहीं" असं उत्तर देतांना ज्योआकिमचा कंठ सद्‌गदित झाला होता.

"वाटलंच मला. तुला तें आवडलं ?"

"होय."

"चांगलं पुस्तक आहे हें. कांहीं कांहीं भाग तर मोठे सुंदर आहेत." असं म्हणतां म्हणतां प्रोफेसर अंथरुणांवर त्याच्या जवळ बसले, आणि त्यांनीं ते पुस्तक उघडून आपल्या मांडीवर ठेविलं. "पूर्वीच हें पुस्तक तुझ्या हातीं पडायला हवं होतं. तुझ्या मनावर त्याचा परिणाम खचित झाला असता. बाकी झाला नसताही. छे, नसताच झाला. कारण ज्याची बुद्धि थोडी तरी प्रगल्भ झाली आहे, ज्याला दुःखाचा थोडाबहुत अनुभव आला आहे, ज्याला सहानुभुतीचं महत्त्व समजलं आहे अशाच माणसाला या पुस्तकांतलं मर्म समजण्यासारखं आहे. आपल्या भोंवतालच्या माणसांची सुखदुःखं, त्यांचे वेडेवाकडे विचार आाणी व्यवहार यांचा थोडा तरी उमज ज्याला पडलेला आहे—सारांश, 'न्याय' म्हणजे काय याचं ज्ञान थोडं फार ज्याला झालं आहे, त्याच वाचकाला या पुस्तकांतल्या विवेचनाचा खरा खोल अभिप्राय कळेल. उदाहरणार्थ, हें तूं वाचलंस काय ? ऐक—

"दृढ नीति-नियमांची तऱ्हा चमत्कारिक आहे. सहनशीलता, निष्क्रियता आणि त्याग यांनाच नेहमीं नीतीचं स्वरूप येत असतं. जो बिनतक्रार सहन करतो आणि निष्क्रिय राहतो तो नीतिमान् ठरतो. जो धैर्यानं विरोध बोलून दाखवितो व कृतीही करतो तो नीतीच्या दृष्टीनं अपराधी ठरतो. ज्या वेळीं एखाद्या व्यक्तीच्या अगर राष्ट्राच्या जीवितांत दुःखाची परमावधि होते, तें सोसणं अशक्य होऊन बसतं, व कृतीवांचून गत्यंतर उरत नाहीं तेव्हां अधर्माचा उदय होतो; दंगेधोपे, खून, मारामाऱ्या, क्रांति अशी परंपरा सुरू होते. मानवी जीवितांतील ही एक नियति आहे—अनेक दुःखांनीं भरलेली खरी, परंतु अपरिहार्य. कारण अशीं दुःखं सहन करण्याची शक्ति जों जों

मनुष्याच्या अगर राष्ट्राच्या अंगीं अधिकाधिक येईल तों तों त्याची उन्नति अधिक झाल्यावांचून रहाणार नाहीं. ”

प्रोफेसरनीं त्या वाक्याचा शेवट करतांना असा कांहीं स्वर काढला कीं, जणूं ‘ बघितलंस ’ असंच त्यांना ज्योआकिमला विचारायचं होतं. आणि नंतर थोडी पानं चाळून त्यांनीं पुन्हां एक वाक्य मोठ्यांदा वाचून दाखविलं,

“ सहनशक्ति व कृति यांचा, म्हणजे कर्म व भोग यांचा, बरोबर मेळ बसला म्हणजेच मानवजातीच्या अंतःकरणांतील सारी अशुद्धता जळून जाऊन तिचा खरा उद्धार होत असतो. ”

हें वाक्य वाचल्यानंतर त्यांनीं पुस्तक हातावेगळं होऊं दिलं, व ते म्हणाले, “ या पुस्तकाच्या लेखकाइतका प्रेमळ हृदयाचा अन् मनुष्यजातीचं बिनचूक ज्ञान असणारा दुसरा मनुष्य मीं पाहिलेला नाहीं. मी प्रधानांना चांगला ओळखीत होतो; नव्हे, आम्ही दोघे चांगले स्नेही होतों असं म्हणायला कांहीं हरकत नाहीं. ” हे बोलतांना जणूं मुद्दामच ज्योआकिमकडे न पाहतां ते दुसरीकडे बघत होते. “ एक असामान्य बुद्धीचा व दिलदार अंतःकरणाचा मनुष्य गेला ! खरंच रेनॅट्स, मी म्हणतों तें खोटं नाहीं. तुझे अनन्वित हाल झाले, मला कबूल आहे; परंतु ज्या जीविताचा तूं विनाश केलास त्याची भरपाई तुझ्या दुःखभोगानं अजून झालेली नाहीं. तूं आत्मशुद्धीच्या मार्गावर आहेस; परंतु तुझा प्रवास संपायला अवकाश आहे. अरे, पण तुझ्या अंगांत ताप आहे नाहीं का ? मी विसरलोंच. आत्तां तूं कांहीं बोलणार होतास काय ? ”

प्रोफेसर थाबले. ज्योआकिमचा श्वासनिःश्वास आवेगानं झाला, त्याची नाडी फार जलद वाहूं लागली तेंही त्यांच्या बोटांना कळलं. परंतु त्याच्या तोंडून शब्द फुटला नाहीं—तो गप्पच राहिला.

प्रोफेसर त्याच्याजवळून उठले, अन् जरा उल्हासानं बोलूं लागले,

" रेनॅट्स, तूं कॅथॉलिक असतास तर बरं झालं असतं. कॅथॉलिक धर्मपंथाचीं तत्त्वं माणसाच्या आत्मशुद्धीला फार पोषक आहेत असं मला वाटतं. कर्म अन् भोग, पाप व अनुताप याची योग्य मिळवणी कशी करावी तें कॅथॉलिक पंथाच्या माणसाला समजतं. मीं ज्या उद्योगाचा अंगिकार केला आहे त्याच्या निमित्तानं किती तरी माणसांच्या पापकृत्यांची कबुली मला ऐकावी लागली आहे. दुःखपरिहारासाठीं जो मनुष्य माझ्याकडे येतो तो मोकळेपणानं बोलला, आपल्या मनांतले सारे विचार सांगून टाकून त्यानं स्वतःचं हृदय हलकं केलं, कीं मला आनंद होतो. कारण अशानंच मनुष्याच्या आत्म्यात जें कांहीं विष भिनलेलं असेल त्याचा निचरा होतो. ठीक आहे. तूं आपल्या हातांची सारखी चाळवाचाळव चालविली आहेस ती बंद कर पाहूं. अगदीं स्वस्थ राहूं देत हात, अन् झोप घे. आजची रात्र आपण सारेजण पूर्ण शांत चित्तानं घालवूं या. तिकडे इस्पितळांत कोशे-टसुद्धां आतां स्वस्थ निजला असेल. उफराट्या जगाची कल्पना त्याच्या मनां-तून मीं घालवून टाकिली आहे. आतां मी एक सिगार ओढणार, अन् थोडा वेळ लिहीत बसणार आहें. हें पुस्तक इथेंच असूं दे ! कीं तुला त्याची भीति वाटते ? "

" होय, भय वाटतं. "

" मग मी तें घेऊन जातों. 'गुड नाइट' रेनॅट्स " असं म्हणून ज्योआ-किमच्या कापऱ्या बोटांवरचा आपला मृदु सांत्वनशील हात प्रोफेसरनीं दूर केला.

मग ते खालीं आपल्या खोलींत गेले. त्यानीं 'सिगार' पेटविली, जरा वेळ लेखन' केलं अन् ते स्वस्थ बसले. जणूं ते कसली तरी चाहूल ऐकूं येईल म्हणून कानोसा घेत होते. दोन तासांनीं त्यांच्या 'औषधा'चा परिणाम ज्योआंकिमवर झाला. जिन्याच्या पायऱ्यांवर धडपडलेलीं पावलं वाजलीं,

मधेंच तीं थांबलीं, पुन्हा वाजलीं, अन् मग प्रोफेसरांच्या खोलीच्या दारावर टक्टक् आवाज झाला. प्रोफेसर एकदम उठले. त्यांनीं दार उघडलं; झटकन् ज्योआकिमच्या खाकेंत हात घालून त्याला सावरलं. त्याच्या फट-फटीत जेहऱ्याच्या स्नायूंची विचित्र हालचाल होत होती. मुद्रेवर असहायता आली होती अन् त्याच्या डोळयावरचा तो वण लाल दिसत होता. प्रोफे-सरांनीं घाईनं कोचावरचीं पुस्तकं दूर केलीं, ज्योआकिमला निजवलं, त्याच्या हुडहुडणाऱ्या अंगावर कांबळं घातलं, अन् त्याच्या तोंडावर उजेड येऊं नये म्हणून दिव्यापुढें आडोसा केला.

मग त्यांनीं विचारलं, " ज्योआकिम ! काय रे ? "

तो अडखळत म्हणाला, " मला बोलायचं...आहे...सांगायचं आहे. माझ्या त्या कृत्याची सारी... हकीकत तुम्हांला सांगावी...असं वाटतं... "

प्रोफेसरांनीं उत्तर केलं नाहीं. ते खालीं बसले अन् ज्योआकिमकडे पाहूं लागले. ज्योआकिमला आतां पूर्ण परिचित झालेला सात्त्विक निष्कपटभाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसूं लागला, व त्यांच्या दृष्टीच्या मोहिनीनं भारून जाऊन तो आपली हकीकत सांगूं लागला.

प्रारंभीं त्याचा आवाज घोगरा होता, अन् शब्द अडखळत होते. त्याच्या बोलण्याचा ओघ कांहीं वेळानं मात्र नीट सुरू झाला. तरीही त्याच्या सांग-ण्यांत सुसंगति नव्हती. कित्येक गोष्टी तो न सांगतां तशाच ठेवी, अन् कांहीं गोष्टी तो पुनःपुन्हा सांगे. भलत्याच ठिकाणीं तो प्रारंभ करी, अन् मधेंच तो इतक्या घाईनं बोलूं लागे, कीं त्याचं त्यालाच गोंधळल्यासारखं होई, अन् मग आवेग शमेपर्यंत त्याला थांबावं लागे. परंतु थांबत थबकत का होईना, आपल्या कृत्याचं चित्र त्यानं पुष्कळच यथार्थतेनं रंगविलं, आणि अखेर जेव्हां त्यानं आपली कहाणी संपविली, तेव्हां अंतःकरणावरचं एक मोठं ओझं दूर झालंसं त्याला वाटलं.

त्यानं बोलायला प्रारंभ केला तेव्हां त्याचा चेहरा फटफटीत होता. मात्र त्याची वृत्ति पुष्कळच स्थिर होती. त्याचं बोलणं ऐकतांना प्रोफेसरांना असं वाटलं, कीं जणूं त्याचा प्रत्येक शब्द त्याचं अंतःकरण पिळवटून निघत आहे. मधेंच तो आपले दोन्ही पंजे एकमेकांत अडकवून इतके दाबी, कीं त्याच्या बोटांचे सांधे पांढरेफटक दिसूं लागत. मधेंच त्याला कोरडा हुंदका येई अन् मग तो कांहीं वेळ स्तब्ध राहत असे. मधेंच तो हास्य करी, पण तें करतांना त्याचे ओठ थरथर कापत. जेव्हां सारी हकीकत सांगून झाली, तेव्हां तो अगदीं निश्चल झाला, अन् त्याचं सगळं अंग घामानं इतकं भिजलं, कीं जणूं त्याला घेरी आली होती.

"त्या दिवशीं पाऊस पडत होता—" तो सांगूं लागला—"हो, पाऊस पडत होता. किती स्पष्ट आठवतो मला तो पाऊस. त्या दिवसांत सगळ्याच गोष्टींची आवळ होत होती. माझ्या खोलीच्या खिडक्यांच्या तावदानांवर किती तरी दिवसांत कुणी फडकं मारलं नव्हतं. त्या मळक्या तावदानांवरून पावसाचे थेंब ओघळत होते. मी असा विचित्र मुलगा होतों तेव्हां कीं त्या थेंबांवरून माझं भवितव्य मी ठरवूं लागलों. एका थेंबाकडे पाहून मी मनाशीं म्हटलं, हा थेंब जर खालीं ओघळत खिडकीच्या कट्टयापर्यंत पोंचला, तर माझा बेत मी पार पाडीन; तो थेंब पावसानं मधेंच धुतला गेला तर मी तें कृत्य करणार नाहीं. खिडकीवरच्या पाण्यांत मिसळून जाऊन तो थेंब दिसेनासा झाला तेव्हां मला कसं सुटल्यासारखं वाटलं अन् केवढा आनंद झाला तें मला अजूनही आठवतं. मीं स्वतःशीं म्हटलं, मी कृत्य करणार नाहीं; मला जिवंत राहायला मिळेल !

"परंतु हा सारा वेडेपणा होता. कारण मनांतल्या मनांत माझा निश्चय झाला होता अन् तो बदलणं शक्य नव्हतं. मनुष्यानं एखादा विचार फार वेळ करून ठेवलेला असला, कीं त्यापासून परावृत्त होण्यांत भेकडपणा आहे, स्वतः-

शीच बेइमानी करण्यासारखं तें आहे असं त्याला वाटूं लागतं. प्रधानांचा खून करण्याचा विचार माझ्या मनांत प्रथम केव्हां आला कुणास ठाऊक, पण आतां तो विचार सर्वस्वी माझ्या मालकीचा झाला होता. माझे इतर सहकारी चुकले, मारले गेले, त्याच्या किती तरी अगोदरच माझा विचार ठरला होता. होय, मी एका गुप्त मंडळाचा सभासद होतों. जे सभासद चुकत अगर विश्वासघात करीत त्यांचीं नांवं काळ्या यादींत दाखल केलीं जात, त्यांचा प्राण घेतला जाई. असल्या प्रकारांचं आम्हां तरूणांना मोठं आकर्षण वाटे. अजूनही तें मला साहजिक वाटतं. कारण त्यांत धोका होता, धाडस होतं. आम्हांला जीवितांत इतर ठिकाणीं जें मिळत नव्हतं त्याचा या प्रकारांत अनुभव घेतल्यासारखं आम्हांला वाटे. खाऊन खाऊन लठ्ठ झालेले श्रीमंत खुशालचेंडू अन् त्यांच्या बायका गाड्याघोडे उडवीत जातांना पाहिलं, कीं आमच्या गुप्तमंडळाचं आम्हांला स्मरण होत असे, अन् आमच्या अपरिपक्व मनाला वाटे, जगांतला हा अन्याय अन् हें शल्य आपण दूर करणार आहोंत. मात्र प्रधनांचा खून करण्याची कल्पना प्रथम माझ्याच मनांत आली, इतर कुणाच्याही नव्हे. मग मी ती आस्केनिअसजवळ बोललों. किंवा असंहि असेल— नव्हे, आतां मी विचार करतों तेव्हां वाटतं असंच असेल, कीं ती कल्पना आस्केनियसची होती. तो माझ्याजवळ केव्हां तरी सहज बोलला असेल, अन् मग त्या कल्पनेनं माझ्या मनांत मूळ धरलं असेल. नक्की कांहींच सांगतां येत नाहीं. येवढं खरं, कीं एके दिवशीं मी स्पष्ट विचार करूं लागलों, कामगाराचे कपडे घालून वेषांतर करावं, प्रधानांच्या बंगल्यावर जावं, त्यांचा खून करावा, अन् मग स्वतःवर गोळी झाडावी. वेषांतराची कल्पना अगदीं पहिल्यापासून माझ्या डोक्यांत होती. कामगाराचा वेष घेण्याखेरीज दुसरी कांहीं युक्ति मला सुचली नाहीं. जेव्हां जेव्हां माझ्या कृत्याची

आगाऊ कल्पना मी करून पाहत असे तेव्हां तेव्हां माझ्या दृष्टीला चित्र दिसे तें असं, कीं कामगाराचे मळकट जांभळे कपडे मीं घातले आहेत, माझ्या मस्तकांतून गोळी गेली आहे, हातांत रिव्हॉल्व्हर तसाच आहे, अन् मी मरून पडलों आहे. हें असंच चित्र मीं कां रेखाटावं कुणास ठाऊक! पण माझ्या मनांत तें पक्कं स्थिर झालं होतं, अन् त्याला थोडंसं कारणही होतं. यंत्राशीं खटपट करण्याची मला नेहमीं आवड वाटत असे, अन् माझ्या मनाचा हिशोब असा, कीं कामगाराचा वेष घेतला कीं प्रधानांच्या बंगल्यांत प्रवेश करून घेणं मला सोपं जाईल, अन् शिवाय खून केल्यानंतर मला कुणी ओळखणार नाहीं.

" मात्र दोन गोष्टींची शक्यता हिशोबांत धरायला मी विसरलों होतों. माझा प्रयत्न कदाचित् फसेल, किंवा स्वतःवर गोळी झाडणं माझ्याकडून होणार नाहीं हें मीं कधीं लक्षांतच घेतलं नाहीं.

" असो, तेव्हां काय सांगत होतों, त्या दिवशीं पाऊस पडत होता. त्या दिवसांत जेव्हां पहावं तेव्हां पाऊस पडतच असे. मीं रिव्हॉल्व्हर अन् कामगाराचे ते जांभळे कपडे माझ्या कपाटांत लपवून ठेवले होते. ते मी बाहेर काढले तेव्हां मला एकदम संताप आला. मात्र संतापाची ती उर्मी आल्याबद्दल मनातल्या मनांत मला आनंद झाला. कारण त्या संतापानं मला एक प्रकारची चालना दिली. माझ्या मनांतली धाकधूक नाहींशी होऊन ठरलेल्या मार्गानं माझं पाऊल त्यामुळें पडूं लागलं. मी घाईघाईनं घराबाहेर पडलों. निघतांना कुणाचाही निरोप घ्यायचा नाहीं असं मीं आधींच मनाशीं ठरविलं होतं.

" पण आधीं तुम्हांला आस्कोनिअसबद्दल सांगितलं पाहिजे. पुढें मला कळलं, कीं त्याचं खरं नांव निराळं होतं, पण आपण त्याला आस्कोनिअस म्हणूं. हं. आस्कोनिअस म्हणजे— तुम्हांला इतकंच सांगतों, कीं तोच एक

माझा जिवाभावाचा स्नेही होता. माझ्या आईपेक्षांही तो मला अधिक जवळचा वाटे. एका स्त्रीवर माझं प्रेम होतं, पण तिच्यापेक्षांही आस्केनिअस मला अधिक प्रिय होता. तो खरा मर्द होता. आदर्श पुरुषाची माझी जी कल्पना होती तिच्याप्रमाणें तो होता. तो माझ्यापेक्षां वयानं पुष्कळच मोठा होता. त्याला शिस्तीची मोठी आवड होती, अन् तो मला नेहमीं धाकांत ठेवी. त्याच्याविषयीं मला एवढं आकर्षण कां वाटत असे तें मला आतां सांगतां येणार नाहीं, अन् त्याची अन् माझी आतां ताटातूट झालेली आहे; परंतु अजूनही त्याची आठवण झाली, कीं माझं हृदय प्रेमानं भरून येतं. माझ्या हातून घडलेल्या हत्येची जबाबदारी अन् तिचं पाप वस्तुतः आस्केनिअसच्या माथीं मारलं पाहिजे असंही म्हणतां येईल; पण त्याचा निर्णय करण्याची माझी इच्छा नाहीं. कारण मला वाटतं मीच काय, हजारों सैनिकांनीं आस्केनिअसनं पुढारीपणा घेतलेला पाहतांच मृत्यूच्या खाईत आनंदानं उडी घ्यावी, असा तो होता. हें चित्र डोळ्यांपुढें आणा म्हणजे तुम्हांला आस्केनिअसची खरी कल्पना येईल. त्याच्या विचारांत अन् बोलण्यांत उत्साहाची अन् कराराची अशी कांहीं चमक होती, कीं तिच्या मोहिनीनं आम्ही सारे भारून गेलों होतों. मला नेहमीं वाटायचं, कीं कांहीं तरी करून आस्केनिअसची शाबासकी मिळवावी. वीरकृत्य करावं, अन् लोकांकडून वीरपुरुष म्हणून घ्यावं असं मला वाटे.

"प्रधानांचा प्राण घेतला पाहिजे ही कल्पना माझ्या मनांत केव्हां दृढ झाली तें मला सांगतां येणार नाहीं. तिचा बरेवाईटपणा मीं कधीं पारखून पाहिला नाहीं. माझ्या मनांत ती रुजली, अन् मी जिकडे जाईन तिकडे सतत माझ्यामागें हिंडूं लागली. त्या वेळीं माझ्या दर्जाच्या लोकांव्यतिरिक्त मी समाजांत वावरलों नव्हतों. मला इतकंच वाटे कीं जो तो हताश झालेला आहे, अन् प्रधान म्हणजे लोकांचा मोठा शत्रु असं ज्याला त्याला वाटत आहे. प्रधानांना मी कधीं पाहिलं नव्हतं, किंवा त्यांचं भाषणही ऐकलं नव्हतं. त्यांनीं

ग्रंथ लिहिले होते हें तर मला आतां कळतं आहे. आज त्यांचं तें पुस्तक मीं सहज हातांत घेतलं तेव्हां माझ्या अंतःकरणाचा कसा थरकाप झाला ! मात्र त्या दिवसांत सबंध बायबल जरी मलाकुणीं कोळून पाजलं असतं तरी माझा निश्चय पालटला नसता.

" आतां–प्रत्यक्ष खून माझ्या हातून कसा घडला तें सांगतों. ती हकीकत सुसंबद्ध रीतीनं सांगणं कठीण–फार कठीण आहे. तुम्हांला सगळा प्रकार नीट समजावून सांगण्याचा माझी इच्छा आहे, पण कसं सांगावं तें मला सुचत नाहीं..."

ज्योआकिमन दोन्ही डोळ्यांवर आपले हात ठेवले अन् मग किती वेळ तरी तो अगदीं स्तब्ध राहिला. मोठमोठे उसासे टाकल्यासारखा त्याचा श्वासोच्छ्वास होत होता. तो पुन्हा केव्हां बोलूं लागतो याची वाट पाहात प्रोफेसर स्वस्थ बसले.

" मी घरांतून बाहेर पडलों. पाऊस पडत होता, अन प्रथम कांहीं वेळ मी झपाझप चाललों. पण मग मात्र मधेंच इथें तिथें असा मी रेंगाळूं लागलों. एके ठिकाणीं दोन कुत्रीं खेळत होतीं. तीं दिसतांच माझ्या मनांत आलं, आतां मला पुन्हा कधीं कुत्रीं दिसायचीं नाहींत; पण असले विचार मनांत येऊं द्यायचे नाहींत असा मीं निश्चय केला होता. मी मनाशीं म्हटलं, ' आगे बढो ' अन पुढें निघालों. एकदम मला जेलेनाची अतिशय आवेगानं आठवण झाली. तिच्याशीं माझा संबंध होता. वाटलं अखेरचं एकदां तिच्याकडे जावं अन् तिला बाहुपाशांत घट्ट धरावं. किंबहुना जीविताविषयींचा दाहक आसक्ति त्या क्षणीं वाटली तशी मला पूर्वी कधींच वाटली नव्हती. प्रधानाची हत्या होणार या विचारापेक्षां आतां मी मरण पत्करणार हाच विचार माझ्या मनांत अधिक होता. एकदम शेंकडों गोष्टी मला आठवूं लागल्या. नाहीं नाहीं त्या

मूर्खपणाच्या क्षुद्र गोष्टी माझ्या डोक्यांत येत होत्या. मात्र माझा बेत मी व्यवस्थितपणें पार पाडीत होतों. वेषांतर करायसाठीं एका सार्वजनिक मुत्रीची जागा मी ठरवून ठेवली होती. तिथें मी शिरलों अन् ते निळे मळकट कपडे चढविले. हत्यारं डाव्या काखेंत घेतलीं, रिव्हॉल्व्हर उजव्या खिशांत घातला अन् मग मी प्रधानांच्या बंगल्याकडे निघालों.

" मी तिथें पोंचलों तो बाहेरच्या बाजूस एक मोटार उभी होती. अन् दोन संत्री पहाऱ्यावर खडे होते. मुख्य दिवाणखान्याच्या दरवाजाची एक फळी उघडी होती. मी आंत डोकावून पाहिलं तों शोफर एका नोकरापाशीं गप्पा मारीत बसला होता. मला एकाएकीं वाटलं माझा बेत अगदीं खुळचटपणाचा आहे, मला बंगल्यांत प्रवेश मिळणं शक्यच नाहीं. मी परतलों अन् तिथून निघून गेलों. माझ्याकडे कुणी लक्ष दिलं नव्हतं.

" मनांतल्या मनांत मी निराशेनं जळजळत होतों. कांहीं वेळ मी रस्त्यानं भटकत राहिलों, एका चाळीभोंवतीं प्रदक्षिणा केली, अन् मग एका हॉटेलांत शिरून मद्य प्यालों. मी माझा आवाज बदलला होता, बोलण्याची घाटणी देखील बदलली होती. इथेंही माझ्याकडे कुणी लक्ष दिलं नाहीं. मग मला पुन्हा धैर्य आलं अन् मी प्रधानांच्या बंगल्यावर परत गेलों. तिथें सारं कांहीं मघांच्यासारखं होतं. मोटार अजूनही उभी होती. त्यावरून मीं तर्क केला कीं, प्रधान अद्यापि घरांतच असले पाहिजेत. माझा बेत माझ्या डोक्यांत अगदीं तयार होता; पण तो पार पाडताना काय काय घडेल याची मला कल्पना नव्हती.

" मी मनाचा हिय्या केला अन् बंगल्यांत शिरलों. इकडे तिकडे बिलकूल नजर न टाकतां त्या दोन संत्र्यांच्या पुढून मी सटकलों तेव्हां माझ्या छातींत धाड-धाड होत होतं. दारावरच्या नोकरानं मला विचारलं, 'काय पाहिजे ?' मीं सांगितलं, 'टेलिफोनची तार दुरुस्त करायला कंपनीनं मला

पाठवलंय.' तो म्हणाला, 'तुझी कांहीं तरी चूक होत असली पाहिजे. कुणाचं घर सांगितलं तुला ?'

" मी डगमगलों. 'हेर शूस्टर यांचं' असे शब्द माझ्या तोंडून गेले. हें ऐकून शोफर हसला. तो नोकर म्हणाला, 'तूं घर चुकला आहेस.' मग मी परत फिरलों. मनांत आलं, आतां घरीं जाऊन झोप ताणायला काय हरकत आहे ? विलक्षण उल्हासानं अंतःकरण हलकं झाल्यासारखं वाटलं मला. जणूं माझी जबाबदारी मीं पार पाडली होती, अन् आतां मला विश्रांति घ्यायला हरकत नव्हती. पण लगेच माझं मन मला म्हणालं, 'हा शुद्ध भेकडपणा आहे, अशानं तुला आस्केनिअसला तोंड दाखवितां येईल का पुन्हा ?' अशा विचारांत मी उभा होतों तोंच त्या संत्र्यांनीं खडी ताजीम दिली, अन् बंगल्यांतून एक गृहस्थ बाहेर पडले. त्यांनीं शोफरला कांहींसं सांगितलं, आपली छत्री उघडली, अन् ते चालूं लागले.

" मी यापूर्वी कधीं प्रधानांना पाहिलं नव्हतं, पण हेच ते असले पाहिजेत असं मीं ताबतोब ओळखलं. मी त्यांच्या मागोमाग चालूं लागलों. माझी ही क्रिया एखाद्या यंत्रासारखी झाली. किती तरी वेळ मीं बिलकुल विचार केला नाहीं. त्या वेळच्या माझ्या मनाच्या शून्य अवस्थेचं वर्णन करणं कठीण आहे. तुमच्या इस्पितळांत एकोणीस नंबरचा तो रोगी होता ना, त्याला माहीत होती मनाची ही शून्यावस्था कशी असते ती. मी प्रधानांच्या मागोमाग निघालों हलके हलकेच; कारण पाऊस पडत होता. ओव्हरकोट चढविणं शक्य नव्हतं त्यामुळें माझे कपडे लवकरच चिंब भिजले अन् मला चांगलीच थंडी वाजूं लागली. सुमारें पंधरा मिनिटं अशीं गेल्यावर मग एकदम माझ्या लक्षांत आलं, कीं प्रधानांचा एखादा रक्षक त्यांच्या मागोमाग असेल. मीं आजूबाजूला नजर टाकली, पण मला कुणी दिसलं नाहीं. काय करावं तें नक्की मला सुचेना. माझं मन भलभलत्या दिशांनीं धावत होतं, अन् हजार गोष्टी एकदम माझ्या मनांत गर्दी करीत होत्या.

मी मनाशीं असंही म्हणत होतों, कीं मी प्रधानांच्या मागोमाग चाललों आहे तो सहज, ते कुठें जातात तें पहायसाठीं, अमुक एका हेतूनं नव्हे. आज माझ्या हातून कांहीं एक घडतां कामा नये; मग मीं पाहिलं तों प्रधान रस्ता ओलांडून गेले अन् बगीचांत शिरले. मी मागोमाग गेलों.

"बगीचांत त्या वेळीं माणसं जवळजवळ नव्हतींच. पावसाचे थेंब झाडांच्या फांद्यांवरून ठिबकत होते. जमीन पाण्यानं मऊ झाली होती. मी चाललोंच होतों. कांहीं वेळ पुढें चाललेल्या त्या गृहस्थाकडे मीं पाहिलं सुद्धां नाहीं. मीं माझी नजर जमिनीकडे लावली होती, अन् कां कुणास ठाऊक, त्यांच्या उमटलेल्या पावलांवर मी अगदीं काळजीपूर्वक पावलं टाकीत होतों. तसं चालतांना मला किती तरी वस्तू दिसल्या. अर्धं खाऊन टाकलेलं एक नासकं सफरचंद, फाटलेलं डाग पडलेलं पत्र, अन् अशाच इतर वस्तू. मला त्या अजूनही स्पष्ट दिसतात. मग एकदम माझ्या अंतःकरणांत धबकल्यासारखं झालं. मी भानावर आलों अन् माझी छाती वेगानं धडधडूं लागली. माझ्या मनांत आलं, आतां करून टाकूं. हीच वेळ आहे—हीच. बागेंतल्या ज्या वाटेनं आलों त्या वाटेनं मी कधीं परत जाणार नाहीं. अन् हा विचार माझ्या मनांत येताच एखाद्या वाफेच्या एंजिनाचे लयबद्ध आवाज व्हावे तसे आवाज मला ऐकूं आले. मीं चमकून इकडे तिकडे पाहिलं, पण मला कांहींच दिसल नाहीं. कानटळया बसविणारे ते ठोके माझ्या डोक्यांतच होत असले पाहिजेत. माझ्या मनांत आलं, माझ्या डोळ्यांच्या शिरासुद्धां लाल झालेल्या असाव्यात"

ज्योआकिम थांबला. आतां ती हकीकत सांगतानाही त्याच्या मस्तकांत घाव बसूं लागले, अन् त्याचे डोळे लालबुंद झाले. बोलणं पुढें चालू ठेवण्याचा त्यानं जोराचा प्रयत्न केला, पण उरलेली हकीकत त्याच्या तोंडून निघेना. त्याचा आवाज पुन्हा घोगरा झाला, अन् त्याच्या पंजांवर घामाचे थेंब उभे राहिलेले दिसले. तो म्हणाला,

" त्याच वेळीं अकस्मात् प्रधान चालतां चालतां थांबलेले मला दिसले. त्यांनीं आपली भिजलेली छत्री मिटली, अन् वर आभाळाकडे पाहिलं. त्यांच्या डोक्यावर एक लहानशी ' फेल्ट ' ची टोपी होती, ती लवकरच भिजली. पाऊस पडतच होता; अन् झाडांच्या फांद्यावरून पाणी ठिबकत होतं. पण ते आपली छत्री पुन्हां न उघडतां पूर्वीपेक्षांही अधिक सावकाश चालूं लागले. कांहीं वेळानं मात्र ते थांबले, व मग अकस्मात् त्यांनीं वळून माझ्याकडे नजर टाकली. चमत्कारिक खरंच, पण मला वाटलं कीं ते मला ओळखतील, मी त्यांच्या मागोमाग जात होतो हें त्यांना माहीत असलं पाहिजे, माझा हेतुसुद्धां त्यांना कळला असला पाहिजे. माझा हात उजव्या खिशांत होता. रिव्हॉल्व्हर घट्ट धरलेला होता मी आपल्या बोटांनीं. माझा नेम चांगला होता. आस्केनिअसनं आम्हा सगळ्यांना तयार केलं होतं. मी झटकन् खिशांतून रिव्हॉल्व्हर काढला. माझा हात इतका कापूं लागला, कीं मला तो धड मुठींत धरवेना. पण मी स्वतःला निश्चयानं सावरलं. मात्र तितक्यांत माझ्या लक्षांत आलं कीं, प्रधान माझ्यापुढें पाठमोरे उभे होते; त्या स्थितींत मी त्याना मारणार कसा ? म्हणून मी मोठ्यांदा शीळ घातली. माझ्या डोक्यांतली विचारांची क्रिया अजीबात थांबली होती; पण आमच्या गुप्त मंडळाची सांकेतिक शीळ माझ्या तोंडून बाहेर पडली खरी. ती ऐकतांच प्रधान वळले अन् त्यांनीं माझ्याकडे पाहिलं. मी थांबलों नाहीं. पुढें झालों अन् त्यांच्याजवळ गेलों. प्रधानांनीं जागच्या जागीं उभं राहून माझ्याकडे दृष्टि लावली. त्या क्षणीं मी एकदम गांगरून गेलों. मला वाटलं, हे प्रधान नव्हेतच. मी त्यांचे फोटो पाहिले होते; पण तसे ते मला मुळींच दिसेनात. छे, हे प्रधान असणं शक्यच नाहीं असं माझ्या मनांत आलं, अन् त्याबरोबर माझ्या शरीराला कंप थांबला. त्याच क्षणीं मला पाहून दचकल्यासारखी प्रधानांनी मुद्रा केली; अन् जणूं कांहीं बोलण्यासाठीं त्यांनीं तोंड उघडलं. मी हात उचलला, अन् गोळी झाडली. मी काय केलं

तें असं मलाच कळलं नाहीं. अन् ' ठो ' दिशीं आवाज झाला तेव्हां मी दचकलों.

“ प्रधानांनीं हात वर केले, अन् त्यांच्या शरीरानं हेलकावे खाल्ले. एखाद्या झाडाप्रमाणें मी पुढें झटकलों अन् त्यांना सावरलं. त्यांचा देह माझ्या अंगावर पडला, तेव्हां मी हातांतलीं हत्यारं अन् पिस्तुल सुद्धां टाकून दिलं अन् त्यांना घट्ट धरलं. त्यांच्या देहाचा भार मला जड वाटला. मला स्वतःलाच त्या क्षणीं इतका अशक्तपणा वाटला कीं, मला उभं राहवेना. ओल्या गवतावर मी बसलों, अन् त्यांचं मस्तक मांडीवर घेतलं. तो सारा प्रकार माझ्या हातून घडला असं मला वाटतंच नव्हतं. ते माझ्या मांडीवर असे कां पडले तें मला कळेना. कारण कुठें जखम झालेली मला दिसत नव्हती. पण त्याच क्षणीं एक विलक्षण गोष्ट घडली—फारच विलक्षण.

“ माझ्या मांडीवर पडल्यापडल्या त्यांनीं डोळे उघडून पाहिलं, अन् हळूंच म्हटलं, 'मित्रा मी तुझा फार आभारी आहे.' दुसऱ्याच क्षणीं त्यांचे डोळे गरकन् फिरले, अन् त्यांचं मस्तक कलंडून खालीं ओल्या गवतावर पडलं. मी झटकन् थोडा पाचोळा गोळा केला, अन् त्यांच्या डोक्याखालीं सरकवला. मात्र तसं करतांना माझ्या डोक्यांत कसलाच विचार नव्हता. ”

ज्योआकिमचा कंठ सद्गदित झाला होता, कोरडे हुंदके देतां देतां तो म्हणाला, “ होय, खरंच असं झालं. ते म्हणाले, ' मित्रा, मी तुझा फार आभारी आहे.' ते धड शुद्धीवर नव्हते; त्यांनीं मला ओळखलं नाहीं, अखेरचा श्वास टाकण्यापूर्वी ते मला पुन्हां एकदां म्हणाले, ' मित्रा, मी तुझा फार आभारी आहे. '

' मी इकडे तिकडे पाहिलं. मला कुणी दिसलं नाहीं. मी पळालों. पण लगेच मी परत आलों. मला काय वाटलं कुणास ठाऊक; मी हत्यारं गोळा केलीं, अन् मग मी निघालों. अगदीं सावकाश चाललों होतों मी. वाटेंत हातगाडींत घोड्याची लीद भरून नेणारे दोन लोक मला भेटले. जरा पुढें

गेल्यावर मीं पाहिलं तों ओल्या रेतींत उठलेलीं माझीं पावलं मला दिसलीं; मग मी एकदम भानावर आलों, अन् माझ्या लक्षांत आलं, कीं माझा रिव्हॉल्व्हर तसाच टाकून दिला होता मीं. मी अजून जिवंत होतों, अन् आल्या वाटेनं परत चाललों होतों.

"यानंतर मीं काय केलं तें मला माहीत नाहीं. तें आठवण्याचा मीं पुष्कळदां प्रयत्न केला आहे, पण कांहीं केल्या आठवत नाहीं. माझ्या स्मृतींत मोठा खंड पडल्यासारखं झालं आहे. मला येवढंच आठवतं, कीं मी जागा झालों तेव्हां मी आपल्या घरीं अंथरुणांत होतों अन् संध्याकाळ झालेली होती. अजूनही पाऊस पडतच होता.. सारं कांहीं जसंच्या तसंच दिसत होतं. मीं योजिलेलं कृत्य मात्र माझ्या हातून घडलं होतं..."

ज्योआकिमची हकीगत संपली. तो गप्प झाला, अन् मूर्च्छा आल्यासारखा पडला. त्याच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला होता. प्रोफेसर कांहीं न बोलतां स्तब्ध राहिले. मग ते त्याच्याजवळ गेले, अन् खालीं वाकले. त्याची मुद्रा विलक्षण श्रमल्यासारखी, जवळ जवळ निष्प्राण अशी त्यांना दिसली. त्यांनीं आपला रुमाल काढला व त्याच्या मस्तकावरचा घाम टिपला.

मृदु स्वरांत त्यांनीं विचारलं, "आतां बरं वाटतं ना?" ज्योआकिमनं कृतज्ञतेनं मान हलविली. त्याचीं सारीं गात्रं लुलीं झालीं होतीं. त्यानं डोळे मिटले होते तरी त्याच्या डोळ्यांचीं झाकणं थरथरत होतीं तीं कांहीं वेळानं शांत झालीं.

प्रोफेसर खिडकीपाशीं गेले, आणि तिच्या लाकडी फळ्या त्यांनीं उघडल्या. बाहेर जिकडे तिकडे दंव पडलं होतं, आणि 'पाइन' झाडांच्या ताज्या हिरव्यागार पर्णराजींत पक्ष्यांचा किलबिलाट होत होता. ते म्हणाले,

"उजाडलंच म्हणायचं; सूर्योदयाला आतां थोडाच अवकाश आहे. आज कदाचित् तुला बरं वाटेल. मग वाटलं तर तूं ऊठ अन् सफरचंदाच्या झाडाखालीं थोडा वेळ बैस."

अर्धवट अंधारांत अंथरुणावर पडल्यापडल्याच ज्योआकिमनं हलकेच विचारलं, "मी पापी आहे काय? माझ्याकडून पाप घडलं काय?"

प्रोफेसरांनीं आपलं डोकं खिडकीबाहेर काढलं. बाहेर अरुणोदयाच्या वेळचा मंद वारा वाहत होता. ते म्हणाले, "खरं म्हटलं असतां जगांत पाप नाहींच. फक्त कर्म अन् त्याचं फल घडत असतं."

ज्योआकिम अगदीं शांत पडून राहिला. जणूं त्याला झोप लागली होती. कांहीं वेळानं त्यानं हलक्या आवाजांत विचारलं, "आतां पुढें माझं काय होईल?"

"तुझं मनुष्यत्व तुला परत मिळेल." असं म्हणतांना प्रोफेसर खिडकींतच उभे होते. प्रातःकालचा धूसर सोनेरी प्रकाश त्यांच्या मुद्रेवर पडला होता.

## भाग तिसरा

# पश्चात्तापदग्ध

# १३

"हिलेनब्रुक" च्या सस्वल कुरणामध्यें पांचपन्नास गायींचा एक मोठा कळप उभा होता. ठेंगण्या, ठुसक्या, अंगावर मधून मधून काळे ठिपके असलेल्या पांढऱ्या शुभ्र गायी होत्या त्या. सबंध दिवस पोटभर चर-ल्यानंतर संध्याकाळच्या वेळीं मधेंच या ठिकाणीं, मधेंच त्या ठिकाणीं, असे गवताचे उगाच लहरीनं चावे घेत जेव्हां त्या उभ्या राहतात तेव्हां त्यांचे आचळ तट्ट फुगून भारावतात, अन् मधेंच एखादी गाय हलकेंच हंबरते. आपले पुढे वाऱ्याच्या दिशेकडे करून संथपणें रवंथ करीत त्या उभ्या राहिल्या कीं वाटतं, जणूं अस्ताचलावर टेकलेल्या सूर्याच्या आरक्त बिंबाचं त्या ध्यान करीत आहेत. कुरणांत इकडे तिकडे शिंगरं चरत असतात तीं मोठीं चपळ तवानीं, देखणीं दिसत असतात अन् पोटांत मावेनासा आनंद झाल्याप्रमाणें त्यांची धावपळ चाललेली असते. मधेंच एखादा ससा वाट चुकल्याप्रमाणें पुढें येतो व आपले लांब कान उभारून गवतांत कांहीं वेळ बसतो, किंवा जंगलां-तून एखादं हरीण बाहेर निघतं अन् त्या गायींच्या जवळपास मोठ्या निर्भय दिमाखानं भटकत राहतं. जिकडे तिकडे माशांचे थवे घोंघावत असतात. गायी आपल्या शेपट्यांनीं त्यांना मारीत असतात; पण तरी त्यापैकीं कांहीं त्यांच्या

पाठीला चिकटतातच व तिथें जें भक्ष्य मिळेल तें खाऊं लागतात. खारावलेला वारा समुद्रावरून निघतो तो गवत-पात्यांवरून वाहतो, लव्हाळ्यांत सळसळ करतो, छोट्या छोट्या डबक्यांच्या जलपृष्ठाला चाटून जातो अन् मग विसावा घेतो. जंगलांतल्या वृक्षांच्या फांद्या हेलावत असतात, अन् मधेंच त्यांचे शेंडे एकमेकांवर भिडले कीं खट्‌दिशीं आवाज होतो. सगळीकडे स्तब्धता असते. मग एकाएकीं ही स्तब्धता फारच वाढल्यासारखी वाटते, अन् लाटांचा आवाज मोठ्यांदा ऐकूं येऊं लागतो. सूर्यगोलाचं प्रतिबिंब पाण्यात पडलेलं असतं तें बराच वेळ दिसत राहतं, अन् अखेर तें क्षितिजाखालीं सरकून नाहींसं होतं.

या सुमारास गवळ्यांच्या तरुण मुली गायींच्या धारा काढण्यासाठीं कुरणा-वर येतात. 'स्टाइने फॉस' ला सगळ्यांपेक्षां अधिक लांबून यावं लागतं. ती 'हिलेवाक्ट' मध्यें राहते, व त्या खेड्यांतून टेकडी उतरून यायला तिला अर्धा तास लागतो. ती येते तेव्हां तिनं आपल्या मानेवर कावड घेतलेली असते अन् तिच्या हातांत धार काढायसाठीं लागणारी एक छोटी लाकडी बादली असते. 'हिलेवाक्ट' म्हणजे एक अगदीं छोटं गांवढं गांव आहे. या गांवांत कोळी लोकांच्या पांच-पंचवीस झोपड्या आहेत, ती जागा त्यांच्या मालकीची नाहीं. नव्याण्णव वर्षांच्या करारानं ते तिथं राहिलेले आहेत. या करारांतील एक कलम असं आहे, कीं हिलेवाक्टच्या मुलींनीं खालीं कुरणांत जाऊन गायींच्या धारा काढल्या पाहिजेत. 'स्टाइने' कुरणाकडे निघाली, कीं 'बीच' झाडाचं एक पान ती आपल्या तोंडांत धरते, अन् त्यावर शिटीचा फुंकर घालून विलक्षण श्रुतिमनोहर स्वर काढीत असते. एक लहानसा निळा रुमाल तिनं आपल्या मस्तकाभोंवतीं गुंडाळलेला असतो. त्याचा तिला मोठा दिमाख वाटतो. चालतां चालतां मधेंच ती आपला डावा पंजा नितंबा-वर ठेवते. तिचा नितंब बांधेसूद अन् मांसल आहे, अन् त्यावर हात ठेकून

आपल्या तालबद्ध गतीमुळें पावलांपासून नितंबापर्यंत उठणाऱ्या लहरींचा स्पर्श अनुभविण्यांत स्टाइने फॉसला मोठी गंमत वाटते.

आज कुरणाच्या कवाडापाशीं स्टाइने पोंहोचली तों बाकीच्या मुलींनीं धारा काढायाला सुरवातसुद्धां केली होती. स्टाइनेनं आपली कावड खालीं ठेवली, धार काढण्याच्या वेळची आपली घडवंची गोठ्यांतून आणून मांडली, भोंवतालच्या मुलींशीं एखाद दुसरा शब्द ती बोलली, आणि आपल्या आठ गायी वळवून आणून हारीनं उभ्या करून ती कामाला लागली. मग बोलणं चालणं बंद झालं अन् त्या स्तब्ध वातावरणांत फक्त गायींच्या जबड्यांचा व मांड्यांत पिळल्या जाणाऱ्या दुधाच्या धारांचा आवाज आणि खालीं समुद्रस- पाटीपाशीं होणाऱ्या लाटांच्या गंभीर हालचालींचा पुसट ध्वनि ऐकूं येत होता.

परंतु या शांततेंत मधेंच एकदम जंगलाच्या कडेशीं कुणाची तरी चाहूल झाली. एक मनुष्य झाडाझुडपांतून पुढें आला, थांबला आणि आपल्या दिपलेल्या दृष्टीला तळहाताचा आडोसा करीत त्यानं सूर्याकडे पाहिलं. सूर्यास्ताच्या वेळच्या त्या लाल प्रकाशाच्या झोतांत त्याच्या डोक्यावरचे केस अन् दाढीही लालभडक दिसली, अन् कुंपणावरून उडी मारून तो जेव्हां छायेंत आला तेव्हांच त्याची मुद्रा व त्याचे अवयव स्पष्ट दिसूं लागले. गायीच्या पायांखालून वाकून पाहून स्टाइनेनं या अनोळखी माणसाकडे नजर टाकिली.

तो या मुलखांत प्रथमच पाऊल टाकीत होता हें तर अगदीं उघड दिसत होतं. वयानं तो असेल सुमारें तीस वर्षांचा. त्याचा वर्ण काळसर होता. केस दाट होते, दृष्टि स्थिर होती, अन् त्यानं आखूडशी दाढी वाढविलेली होती. त्याच्या खांद्यांची ठेवण अशी भक्कम दिसली कीं त्याला कष्टाच्या कामाची सवय असावी. तो कोळ्यासारखा दिसत नव्हता किंवा मजुरासारखाही दिसत नव्हता, अन् तो पांढरपेशा सभ्य गृहस्थ असेल असंही वाटत नव्हतं. हिलेवाक्टमध्ये नवं माणूस क्वचितच दिसे, त्यामुळें स्टाइनेनं त्याच्याकडे अगदीं निरखून पाहिलं, अन् तिच्या मनांत आलं, मोठी चमत्का-

रिक दिसते आहे स्वारी. तिच्या पुढ्यांतल्या गाईची धार काढून झाली अन् बादली भरली तेव्हां मोठं भांडं आणण्यासाठीं तिला त्याच्या अंगावरून जाणं भाग होतं. आपली मान किंचित् हलवून तो म्हणाला "गुड डे", अन् तो तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत राहिला. तिचे पाय उघडेच होते, अन् तिच्या पावलांनीं ओलसर गवत वरखालीं होत होतं.

तीं भांडं घेऊन परत आली, अन् दुसऱ्या गायीपुढें आपली घडवंची ठेवूं लागली तेव्हां त्यानं विचारलं, "इथें गवतावर मी आडवा झालों तर चालेल ?"

स्टाइने म्हणाली, "अं हं, अशी परवानगी नाहीं."

तथापि त्यानं तें मानलं नाहीं. तो पालथा पडला, अन् आपले दोन्ही हात जुळवून त्यावर हनुवटी टेकून समोर बघत राहिला. डोळ्यांपुढच्या गवताच्या उंच उंच झुबक्यांतून त्यानं पाहिलं तों त्याला हिरव्यागार कुरणाची जी उतरण दिसली तिच्या टोकाशीं लहान लहान जलाशय होते, लव्हाळ्याचं घोस दिसत होते, पलीकडे दूर तटबंदीची भिंत आकाशाच्या पार्श्वभूमीवर काळीभोर वाटत होती, अन् तिच्याही पलीकडे एका पवनचक्कीची काळी आकृति लहानशा खेळण्यासारखी भासत होती.

त्यानं मोठा श्वास घेतला अन् म्हटलं, "किती रम्य आहे ही जागा!"

स्टाइने म्हणाली, "तुम्ही कुणी परकी दिसतां."

"परकी—हो, तसं म्हटलं पाहिजे." असं तो चटकन् म्हणाला, पण त्यानं लगेच दुरुस्ती केली, "पण खरं म्हणजे मी इथे परका नाहीं; उलट मला घरीं आल्यासारखं इथें वाटतं आहे. इथें म्हणजे या गांवीं असं नव्हे, तर जर्मनींत. जर्मनी हा माझा मायदेश."

तो ज्या तऱ्हेनं जर्मन शब्द उच्चारण्याचा प्रयत्न करीत होता ती तऱ्हा मोठी आकर्षक होती.

दुधानं भरलेली बादली घेऊन स्टाइने पुन्हा उठली व गोठ्याकडे जाऊन परत आली तेव्हां तो तिच्याकडे पाहून हसला आणि मग जणूं आतां हरकत नाहीं असं समजून तो तिच्याशीं बोलूं लागला. त्यानं कितीं तरी वर्षं अमेरिकेंत घालविलीं होतीं. उत्तरेकडे, पश्चिमेकडे, मन मानेल तसं त्यानं भ्रमण केलं होतं, अन् अतां तो घरीं परत आला होता. इथें तो आपली मायभाषा बोलूं शकत होता. लोकही जर्मन बोलत होते. मायभाषेंतले शब्द किती मधुर वाटत होते त्यांच्या कानांना ! तो सहसा कुणाशीं एकदम अंतःकरण मोकळं करून बोलत नसे; पण या घटकेला तसं बोलावंसं त्याला वाटत होतं. त्यानं हजार ठिकाणं पाहिलीं होतीं, परोपरीचे अनुभव घेतले होतं, हजार धंदे केले होते, काबाडकष्टालासुद्धां नाहीं म्हटलेलं नव्हतं. लोक म्हणतात अमेरिकेंत खूप उद्योग केला कीं माणसाला लाखोपति व्हायला वेळ लागत नाहीं. पण लोकांचा हा भ्रम होता. श्रीमंत कोण होतो ? ज्याच्या डोक्यांत लहानपणापासूनच श्रीमंत व्हायच्या कल्पना असतात, अन् ज्याला पैशाखेरीज दुसरं कांहीं सुचत नाहीं तो. पण त्याची वृत्ति तशी नव्हती. पैशाच्या आधीं इतर हजार गोष्टींचे विचार त्याच्या मनांत येत. लहानपणापासूनच त्याचा स्वभाव असा होता. " पैशापेक्षां एकेक गवताची काडी अधिक मोलाची मी समजतों, तुम्हांला खरं वाटो वा न वाटो " असं उद्गारून त्यानं पुढ्यांतल्या गवताची एक काडी ओढून घेतली अन् तिच्यावरच्या नाजुक सुवर्णरंगी शिरा तो न्याहाळून पाहूं लागला. तेवढ्यांतच सूर्य खालीं सरकला होता; अन् दूर अंतरावरच्या 'बाल्टिक' समुद्रावर तांबड्या सोनेरी आणि निळसर रंगांची मनोहर क्रीडा दिसूं लागली होती.

मग जसजसा अंधार पडूं लागला अन् वातावरण अधिकाधिक स्तब्ध होऊं लागलं तसतसं तो प्रवासी आपल्या अंतःकरणांतल्या मायदेशाबद्दलच्या ओढीचं वर्णन करूं लागला.

त्या ओढीपुढें त्याचा अखेर नाइलाज झाला होता असं दिसलं. जों जों वर्षामागून वर्ष सरत होतं तों तों ती ओढ त्याला अधिकाधिक असह्य होत गेली होती. एखादी जखम लक्षांत यावी त्याप्रमाणें तिचं तीव्र दुःख त्याच्या अंतःकरणांत उद्‌भवलं होतं. मग त्याला विलक्षण अस्वस्थता वाटूं लागली होती, अन् एखाद्या ज्वरासारखी अगर दुखण्यासारखी ती सतत वाढत गेली होती. असं झालं कीं त्यानं एक गांव सोडून दुसऱ्या गांवीं जावं. स्थलांतरानं चित्ताला शांति मिळेल असा हिशेब करावा; परंतु ती त्याला मिळत नसे. बरं वाटेल म्हणून या कुशीवरून त्या कुशीवर होणाऱ्या अन् त्यामुळें अधिकच वेदना अनुभविणाऱ्या दुखणाइतासारखी त्याची अवस्था झाली होती. या अवस्थेचं त्यानं परोपरीनं वर्णन केलं. आपण पाहिलेल्या मोठमोठया शहरांच्या हकीगती त्यानं सांगितल्या. त्या प्रचंड शहरांत फत्तरांच्या भव्य इमारती लागतील तेवढ्या होत्या; पण मानवी आयुष्य नव्हतं, निसर्गाची रमणीयता नव्हती. लहान शहरंही मोठयांसारखींच होतीं. अंधारानं अन् दुष्ट प्रकारांनीं तीं गजबजलीं होतीं, अन् माणूस माणसाला ओळखीत नव्हतं. परदेशांत मायभाषेचा एक शब्दही तोंडावाटे काढतां येईनासा झाला कीं साऱ्या गोष्टी कंटाळवाण्या वाटतात, आयुष्याचा वीट येतो, खाणं-पिणं, उद्योग कशाकडेच लक्ष लागत नाहीं, अगदीं गुदमरल्यासारखं होऊन जातं, अन् अखेर असा एक क्षण येतो, कीं सगळया गोष्टींवर लाथ मारून मनुष्य घराकडे परततो. सूर्यास्ताच्या विलक्षण शोभेकडे अचल दृष्टि ठेवून तो सारखं बोलत होता. त्यानं पैसा साठविला नव्हता, अन् आता पोटासाठीं उद्योग पाहाण्याचा व्याप पुन्हा पहिल्यापासून करणं त्याला भाग होतं. पण असेना का ? तो आपल्या मायदेशांत परत आला होता ! मायदेशांतल्या एका जंगलालगतच्या कुरणावर तो या क्षणीं खुशाल पडला होता ! इथें जर्मन देशांतलीं झाडं त्याच्या दृष्टीला दिसत होतीं ! लोक जर्मन भाषा बोलत होते ? गायींनासुद्धां ती भाषा समजत होती ! सारं सारं कसं आनंदमय होतं !

त्याचं हें बोलणं लक्षपूर्वक ऐकत असतांना स्टाइनेच्या अंतःकरणांत त्या प्रवाशाविषयीं सहानुभूति उत्पन्न झाली. ती म्हणाली, "तुमच्या भावना समजतात मला. मला जर हिलेनब्रुक सोडून जायची वेळ आली तर मला अतिशय दुःख होईल. दूर शहरांत कुठें रोजगार मिळाला तरी मी नाहीं तो पत्करणार."

"बरोबर आहे. शहरं म्हटलीं, कीं अमेरिकेतल्यासारखं आयुष्य तिथें आलंच. आपण जर्मन लोक आपल्या देशाची अमेरिका बनवूं लागलों आहोंत हें मला बघवत नाहीं. अमेरिकेंतले लोक कशासाठीं जगतात माहीत आहे? व्यापार, नफेबाजी, पैसा, अन् या ना त्या गोष्टींत रेकॉर्ड मोडणं, यांखेरीज त्या लोकांना दुसरा कसला घ्यासच नाहीं. तिकडून इकडे परत येतांना प्रवासांत हा प्रकार माझ्या लक्षांत विशेष आला, अन् मला त्याची किळस आली. आमचे लोक स्वतःची तीच गत करून घेत आहेत हें मनांत आलं कीं वाईट वाटतं."

त्याचे हे शेवटचे उद्‌गार स्टाइनेच्या समजतीच्या पलीकडे होते, त्यामुळें कांहीं उत्तर करण्याऐवजीं ती धार काढीत राहिली. दुधाच्या पांढऱ्या शुभ्र धारा भांड्यांत पडल्या कीं त्यांचा आवाज होत होता, आणि दूध जेव्हां वर आलं आणि भांड्यांतला फेस दाटून वाढला तेव्हां त्यांत जोरानं पडणाऱ्या धारांचा आवाज मोठा श्रुतिरम्य वाटला.

प्रवासी म्हणाला, "आज तीन दिवस या किनाऱ्यालगतच्या प्रदेशांतून मी भटकतों आहे, शेतवाडी दिसली कीं काम मागतों आहे, पण कुणी देत नाहीं."

"इकडे काम कसं मिळणार तुम्हांला? प्रत्येक शेतावर पुरेशीं माणसं आहेत. शेत कापायचं झालं किंवा बटाटे काढायचे झाले कीं सारीं माणसें मिळून कामाला लागतात. तसंच आज वर्षानुवर्षे चालत आलेलं आहे."

बोलतां बोलतां तिनं गाईच्या पुठ्ठ्यावर थाप दिली, अन् दुधानं भरलेलं भांडं उचलून ती उभी राहिली. भांड्यांतला फेस अगदीं ओसंडायला आला

होता त्याकडे प्रवाशाची दृष्टि लागलेली तिला दिसली. तिनं विचारलं, "तुम्हाला तहान लागली असेल, नव्हे, ?"

"तहान लागल्यासारखा दिसतों मी ? होय, फार तहान लागली आहे."

"मग प्या तर हें." असं म्हणून तिनं दुधाचं भांडं पुढें केलं.

प्रवासी उठून आपल्या गुडघ्यांवर टेकला, आणि तोंड पुढें करून ओंजळींत स्टाईनेनं ओतलेलं फेसदार दूध गटागटा प्याला. तहानलेल्या बालकानं कृतज्ञता दाखवावी तशी त्याची चर्या झाली, अन् स्टाईनेच्या चेहऱ्यावरून त्यानं आपली नजर हालविली नाहीं. त्या क्षणीं त्याच्या अंतरात्म्याला विलक्षण शांति वाटत होती, आणि तो गोरस, तो विसावा, आजूबाजूचं तें रम्य दृश्य, अन् दुधाचं भांडं हातीं घेऊन उभी राहिलेली ती किशोरी, या सर्व गोष्टी त्या गाढ शांतींत विलीन झाल्यासारख्या त्याला वाटल्या !

तो गंभीरपणानं म्हणाला, "मरणाच्या घटकेला मला जर कसली आठवण होईल तर या तृषाशांतीची !" हे उद्गार त्यानं काढावेत हें चमत्कारिक वाटण्यासारखं होतं. परंतु फारा वर्षांनीं मायदेशाला परत आल्यामुळें त्याची एकंदर वृत्तिच कांहींशी विलक्षण झाली होती.

तोंपर्यंत बाकीच्या मुलींनीं धारा आटपल्या होत्या. खांद्यांवर कावडी घेऊन त्या परत निघाल्या तेव्हां त्यांच्या आकृती मंदावत चाललेल्या संधिप्रकाशांत पुढें मागें होतांना दिसल्या.

स्टाइनेनं त्याला विचारलं, "पलीकडच्या गांवढ्यांवरसुद्धां तुम्हांला काम नाहीं मिळालं ?"

"नाहीं. पण तिथें मला कुणीसं सांगितलं कीं 'हिलेवाक्ट' गांवांत मी गेलों तर तिथें मला धंदा मिळेलं. कारण तिथला एक मनुष्य म्हणे नुकताच समुद्रांत बुडुन मेला आहे, अन् मच्छीमारीच्या कामासाठीं नव्या माणसाची गरज आहे."

" हं-हं, आमच्या गांवीं एक मनुष्य बुडून मेला खरा. त्याचं नांव फॉस; तो माझा चुलतभाऊ होता. त्याच्या मृत्यूनं ' हाने फॉस ' वर मोठा प्रसंग गुदरला आहे. नुसती शेती असती तर तिनं एकटीनं केलं असती; पण मच्छीमारीच्या एका पडावांत तिची भागीदारी आहे; अन् पडाव तर पाण्यांत गेला पाहिजे रोज. पडावाची अर्धी मालकी ' क्रूझे ' नांवाच्या तिच्या भावाकडे आहे, पण तो एकटा कसा पडाव हाकारणार ? ' व्हाइन ' नांवाचा तिचा मुलगा आहे; पण तो अवघा तेरा वर्षांचा. त्याची कितीशी मदत होणार ? खरंच, तुम्ही ' हाने फॉस 'ला विचारा. पडाव चालविणं, जाळं फेकणं असलीं कामं येतात तुम्हांला ? "

" येतात थोडीं बहुत ! " असं म्हणत प्रवाशानं आपल्या हातांकडे पाहिलं. स्टाइनेनंही त्यांकडे दृष्टि टाकली. चांगले मजबूत दिसले त्याचे हात.

" मग तुम्ही चालायला लागा तर. माझं काम संपलंच आहे. मलाही निघालं पाहिजे. " असं ती म्हणाली पण चालूं लागली नाहीं. कांहीं वेळ ती जागच्या जागींच बसली. तिनं एक गवताचं पातं खुडून आपल्या तोंडांत धरलं, आपले दात गुडघ्यांवर टेकले आणि समोरच्या अस्त पावणाऱ्या सूर्याकडे तिनं टक लावली.

प्रवाशानं तिच्याकडे दृष्टि टाकली. त्याला ती देखणी वाटली. तिची ती मुग्ध निष्कपट आकृति सायंकाळच्या त्या रम्य देखाव्याशी इतकी तद्रूप झाल्यासारखी त्याला भासली, कीं तिच्याकडे पाहून त्याच्या अंतःकरणांत समाधानाची ऊब उत्पन्न झाली. तो म्हणाला, " पण आतां मला तूं आपलं नांव सांगितलं पाहिजेस. म्हणजे जिनं मला गोरस पाजला तिचं नांव मी मरतांना घेईन. "

" माझं नांव ? तें तुम्ही ओळखलं पाहिजे. "

" ओळखूं ? बघ. तुझ्याकडे लक्षपूर्वक पाहिलं कीं वाटतं--थांब हं जरा--तुझं नांव ' मारिया ' असलं पाहिजे. "

“ मारिया ? शाब्बास ! पण मारियाच काय म्हणून ? ”

“ माझ्या ओळखीची एक स्त्री होती तिचं नांव मारियाच होतं. तिच्या ओठांची ठेवण अगदीं तुझ्यासारखी होती. ”

“ अमेरिकन ? ”

“ छे जर्मन. ज्या गांवीं ती होती तें अगदीं पुरेपूर जर्मन होतं. फार वर्षं झाली त्या गोष्टीला, पण मला तिचा विसर पडणं शक्य नाहीं. ”

“ अस्सं ! ही तुमची मारिया देखणी असेल ? ” असं विचारतांना ती मनांतल्या मनांत किंचित् रुष्ट झाली होती. ”

“ होय. त्या गांवीं पुष्कळसे लोक येत ते केवळ तिला पहायला, इतकी देखणी होती ती ! ”

“ असं काय ? ” तिच्या शद्बांत विस्मय आणि राग होता.

“ होय. अन् तिला एक मूलसुद्धां होतं. ”

“ असेल ! ”

प्रवासी मनांतल्या मनात हसूं लागला होता. तो उल्हासानं पुढें म्हणाला, “ वाईट एवढंच कीं ती एक लाकडाची मूर्ति होती. तिची स्थापना एका देवळांत केल्ली होती. तुला पाहून मला तिची आठवण होते. ”

“ मला नका सांगू तुमच्या गोष्टी. जा चालते व्हा. ” असं म्हणून आपला झगा झटकीत स्टाइने उभी राहिली. “आतां मला जायलाच पाहिजे, पाहिलंत, सगळ्या मुली गेल्यासुद्धां. ”

खरंच, कुरणांत आतां कुणी दिसत नव्हतं, अन् गायी मंद गतीनं गोठ्याकडे चालल्या होत्या. जंगलातलीं झाडं आतां निळसर काळसर दिसूं लागलीं होतीं अन् कुंपणापासल्या पाणथळींतून बेडकांचे आवाज उठूं लागले होते. स्टाइने आपली कावड उचलूं लागली तेव्हां त्या प्रवाशानं विचारलं, “ मी कावड खांद्यावर घेऊन तुमच्या शेतापर्यंत येऊं का ? ”

" छे छे, तुमच्याबरोबर चालतांना मला कुणी पाहिलं म्हणजे ? तुम्ही त्या भिंतीच्या बाजूबाजूनं जा म्हणजे लवकरच हिलेवाक्ट गांव तुम्हांला लागेल. दुसरी झोपडी हाने फॉसची आहे. 'फर' झाडाच्या रांगेपासची नव्हे हं; त्याच्या वरच्या बाजूची; 'ओक' वृक्षापाशीं दिसेल ती. येऊं मी आतां ?"

" तुझे किती आभार मानूं ? पण मला तुझं नाव कळलं नाहीं अजून."

" स्टाइने फॉस. झालं ? गुड नाइट."

" गुड-नाइट."

त्यानं कुंपणावरून सहज उडी मारली अन् तो निघाला. पण भिंतीपाशीं तो थोडा थबकला अन् त्यानं मागें वळून पाहिलं. त्याला स्टाइने दिसली. उंच सरळ बांध्याची, अन् कावड खांद्यावर पेलून सहजगतीनं जाणारी. तिचा एक हात तिनं नितंबावर ठेवलेला होता. मग ती 'हेझल'च्या झुडपां-आड दिसेनाशी झाली.

तिच्या डोक्याभोंवतालच्या निळया रुमालाचं वाऱ्यानं फडफडणारं टोक अखेरचें दिसलं तेव्हां प्रवासी पुन्हा ओरडला " गुड-नाइट." स्वच्छ खणखणीत आवाजात उलट साद आली " गुड-नाइट "; अन् सारं वातावरण अगदीं निवळलेलं असल्यामुळें ते शब्द अगदीं जवळून आल्यासारखे वाटले.

प्रवासी कांहीं वेळ जागच्या जागीं उभा राहिला आणि मग निघाला. त्याच्या डाव्या हाताला समुद्र होता. त्याच्या लाटांचा किनाऱ्यावरच्या वाळूंत आवाज चालला होता. वर डोक्यावर आतां एखाद दुसरी चांदणी दिसूं लागली होती आणि आभाळाचा रंग समुद्राच्या पाण्यापेक्षांहि अधिक गडद काळा दिसूं लागला होता. त्याच्या उजव्या हाताला कुंपण होतं अन् त्यापलीकडे जंगल होतं. त्या सर्वांवर अंधाराचा पडदा हलके पडूं लागला होता. हवेंत गारवा आला होता, त्यांतील दर्प उग्र व तिखट होता; परंतु गंमत अशी कीं,

तो नाकाला झोंबल्याबरोबर आपण आतां खरोखरीच आपल्या मायदेशांत आलों अशी सुखकारक भावना प्रवाशाच्या अंतःकरणांत उत्पन्न होत होती. तो जरा उभा राहिला अन् स्वतःशींच हसला. तो मनाशीं म्हणत होता, तिचे डोळे भिन्न भिन्न रंगांचे असावेत हें केवढं आश्चर्य! एक पिंगट, अन् दुसरा झऱ्याच्या ताज्या पाण्यासारखा कांहींसा हिरवा! आणि तिच्या अंगाची कांति कशी 'हेझल'च्या दाण्यासारखी! पण तिच्या मस्तकाभोवतालच्या रुमालांतून बाहेर डोकावून भुरभुरणारे केस पांढरे होते! आणि तिचे ते सुदृढ पिंग्या रंगाचे हात अन् त्यांवर चमकणारी ती लव! निरनिराळ्या रंगांचे दोन डोळे असलेली किशोरी त्यानं पूर्वी कधीं पाहिली नव्हती!

प्रवासी पावलं टाकीत होता तो हे विचार करीत. मृदु स्वरांत उच्चारलेल्या आनंदोद्गारांच्या लहरींप्रमाणें त्याच्या मनांतले ते विचार वाहत होते. दगड, गोटे अन् पर्णराजी ओलांडीत अज्ञात गुप्त स्थळाकडे अंधारांतून वाहत जाणाऱ्या जलौघानं मर्मरशब्द करावा तद्वत् त्या विचारांची गति सुरू होती.

तो हिलेवाक्टला पोंचला तेव्हां पुरता अंधार पडला होता. पण अशोक वृक्षाजवळचं तें घर त्याला सहज ओळखतां आलं अन् तो आंत शिरला.

बाहेरच्या खोलींत दिवा जळत होता. जमिनीवर एक लहान मुलगी एका करड्या रंगाच्या मांजराशीं खेळत होती. पलीकडे टेबलाशीं एक मुलगा बसला होता; त्याच्या हातांत चमचा होता व तो कसली तरी वाट पाहत असावा. एका अंगानं विस्तवाचा प्रकाश खोलींत आला होता, अन् प्रवासी जेव्हा पलीकडच्या स्वैंपाकघरात गेला तेव्हां शेकोटीपाशीं विस्तवाकडे टक लावून पाहत असलेली एक स्त्री त्याच्या दृष्टीस पडली. तिला त्याची चाहुल लागली नाहीं त्यामुळें त्याला तिच्याकडे निरखून पाहून घेतां आलं. सुमारें चाळीस वर्षांची असावी ती. मजबूत बांध्याची आणि स्थूल. तिचे केस काळसर तांबूस रंगाचे होते, व तिनं ते अगदीं दाबून कपाळावरून मागे घेत-

डोळे होते. तिचे नाक-डोळे ठसठशीत होते. ती दिसायला कांहीं वाईट नव्हती, पण तिच्या ठिकाणीं देखणेपणा क्वचित् नव्हता. त्याचा शब्द तिनं ऐकला तेव्हां दचकून तिनं त्याच्याकडे पाहिलं, अन् भीतीनं ती इतकी कलंडली, कीं मागच्या भिंतींचा तिला आधार घ्यावा लागला. पण दुसऱ्याच क्षणीं आपण असं भ्यालों याचं तिला आश्चर्य वाटलं, अन् ती हलकेच हसली.

प्रवाशानं आपली हकीकत थोडक्यांत सांगितली. इथें काम मिळेल असं त्याला कुणी सांगितलं म्हणून तो आला होता. रात्रीच्या मुक्कामापुरता त्याला आसरा मिळण्यासारखा होता काय ?

ती स्त्री कांहीं वेळ आपल्याच विचारांत मग्न झालेली दिसली अन् स्तब्ध राहिली. मग ती हलकेच म्हणाली, "इथें पुष्कळ काम मिळण्यासारखं आहे." तिनं त्याला आपादमस्तक न्याहाळून पाहिलं. त्याचे खांदे चांगले रुंद होते, हात कणखर होते, एका हातावर जहाजाचा नांगर गोंदलेला होता, आणि त्याचे नाकडोळे शिल्पमूर्तींच्या खोदलेल्या अवयवांसारखे वाटत होते. किंचित् संशय दाखवीत ती म्हणाली, "कष्टाचं काम तुम्ही कराल असं वाटतं. मच्छीमारीच्या कामाची तुम्हांला कांहीं माहिती आहे ?"

"आहे थोडी बहुत."

"पण तुम्ही तर या भागांतले दिसत नाहीं. घरदार कुठें आहे तुमचं ?"

प्रवाशानं हात उचलला अन् हवेंत अशा कांहीं रीतीनं फिरविला कीं जणूं त्याला सुचवायचं होतं, म्हटलं तर सारी दुनिया माझं घर, म्हटलं तर मला घरच नाहीं. तो उघड म्हणाला, "मीं फार वर्षं परदेशांत काढलीं. पण मी जर्मन आहे. मला ठेवून घेतलंत तर मी वाटेल तितकं काम करीन."

"उद्यां सकाळीं पाहूं या आपण. माझा भाऊ कूर्झे मला भेटला म्हणजे मी त्याला विचारीन. वस्तीला राहिलांत तरी माझी हरकत नाहीं. पण माझ्याजवळ अंथरूण नाहीं. गवताचं एक पोतं टाकून देईन तुमच्यासाठीं."

हें सांगतांना त्या स्त्रीनं आपली किंचित् विचारमग्न जड दृष्टि त्याच्यावर सारखी ठेविली होती.

प्रवासी परत वळून त्या मुलाकडे गेला. त्यानं हात पुढें केला तेव्हां कांहींशा साशंक वृत्तीनं त्या मुलानं आपलीं लहान उबदार घाणेरडीं बोटं त्याच्या हातीं दिलीं. कांहीं न बोलतां त्या स्त्रीनं 'सूप' टेबलावर आणून ठेविलं, अन् पाहुण्या-साठीं एक खुर्ची ओढून सरकवली.

मग ती बाहेर गेली अन् ताज्या पावाचा एक मोठा तुकडा हातांत घेऊन परत आली तिनं आतां एक अगदीं स्वच्छ फडकं आपल्या उरोभागावर चढविलं होतं. पावावर तिनं आपले दोन्ही हात "क्रॉस"ची आकृति करून धरले आणि मग तो कापून त्याचा एकेक तुकडा प्रत्येकापुढें ठेविला. प्रवाशानं टेबलाखाली आपले पाय ताणून पसरले अन् मोठ्या समाधानाच्या वृत्तीनं पावाचे तुकडे करण्यास आरंभ केला.

त्यानं खाणं संपलं तेव्हां त्या स्त्रीनं विचारलं, " तुमचं नांव काय ? "

त्या प्रवाशानं उत्तर दिलं, " माझं नांव ज्योआकिम बूर्थ. "

# १४

होय हिलेवाक्टला आलेला तो प्रवासी म्हणजे ज्योआकिम बूर्थच होता. तो आतां आपल्या मायदेशाला परत आला होता. तो बहुधा शांत असे; त्याची चर्या गंभीर दिसूं लागली होती, त्याची नजर स्थिर वाटत होती, आणि त्याचे हात काबाडकष्टांनीं मजबूत व कणखर बनले होते. त्याचं भीतीचं अन् धावपळीचं आयुष्य आतां संपलं होतं. लपतछपत हिंडावं, शंका आली कीं दूर पळावं, कष्ट करावेत, संकटं अन् दुःख सोसावीत अशा प्रकारें त्यानं जीं कित्येक वर्षं काढलीं तीं आतां कायमचीं सरलीं होतीं. आपल्या मायदेशाच्या समुद्र किनाऱ्यालगतच्या एका शांत खेडेगांवांत तो आतां आला होता व कोळ्यांच्या, कामकऱ्यांच्या संगतींत त्यांच्यापैकींच एक म्हणून राह्यचं त्यानं ठरविलं होतं. वाजत-गाजत नौबतींच्या आवाजांत अन् शिंगाच्या तुतारींत एखाद्या जेत्यानं मिरवीत यावं तद्वत् तो आपल्या देशात परत आला नव्हता हें उघड होतं; परंतु कच खाऊन, कंबर मोडून तो आला नव्हता इतकं खास. किंबहुना त्याच्या शांत, अबोल, गंभीर वागणुकीकडे पाहून कुणालाही असं वाटण्यासारखं होतं, कीं यानं आपल्या ठिका-

णच्या उसळणाऱ्या अनिवार भावनांशीं युद्ध करून प्रयत्नानं मिळविलेल्या विजयाची शांति आपल्या हृदयांतल्या एखाद्या गुप्त स्थळीं ठेवली असावी.

हिलेवाक्टच्या समुद्रतीरावरच्या निःशब्द वातावरणाचा त्याला अतिशय मोह पडला, आणि त्याचं आकंठ सेवन करून तें त्यानं आपल्या जीवनांत खोल खोल उतरूं दिलं. तो समुद्र, उतारावरचं तें गवत, माथ्यावरचं तें आकाश, छोट्या छोट्या चमचमणाऱ्या असंख्य तारकांनीं फुललेल्या रात्रीं, लाटांचा गंभीर नाद, तीं विस्तीर्ण कुरणं आणि कोवळ्या रानगवताचा तो सुगंध ! या सौंदर्याला त्यानं जणूं घट्ट मिठी मारिली ! त्यानं नांगर धरला व मच्छीमारीसाठीं जाळं हातीं घेतलं तें अशा सामर्थ्यानं आणि प्रीतीनं कीं जणूं त्या वस्तूंना तो आपल्या जीवाशीं एकरूप करून घेत होता ! त्याच्या हृदयाला अखेर हवा तो विसांवा सांपडला होता !

हिलेवाक्ट गांवांत ज्योआकिम प्रथम राहिला तो आठ दिवसांसाठीं. मग तो दोन महिन्यांकरितां म्हणून आणखी राहिला; आणि त्यानंतर तो राहिला तो कायमचाच. त्यानं हिलेवाक्टला राहावं याचं एक विशेष कारण होतं. पण त्याची वाच्यता इतक्यांत नको. त्या कारणाखेरीज दुसरं जें एक कारण होतं तेवढं इथें सांगितलं म्हणजे पुरे. गांवांतले लोक म्हणत, ' यानं इाने फॉसशीं चांगलंच जमविलं आहे', आणि हें खरं होतं. रोज संध्याकाळीं मच्छीमारीचा पडाव तो बंदरांत परत आणून नांगरी; त्या पडावाप्रमाणेंच आपलं अंतःकरण स्थिर झाल्यासारखं ज्योआकिमला वाटूं लागलं होतं. तो सकाळीं उठला कीं त्याच्या खिडकीबाहेर मच्छीमारीचं पिंगट दमट जाळं टांगलेलं त्याच्या दृष्टीला दिसे. त्याच्या दृष्टीस तें प्रथम पडलं तेव्हां त्याचं मन जुनी कुठली तरी खोल खोल अशी आठवण काढून पाहूं लागलं. त्याला असंहि वाटलं, कीं तें जाळं आपण स्वप्नांत पाहत असूं. पण मग रोजच्या कामाला प्रारंभ करताच ते सारे विचार तो विसरत असे.

क्रुझेची व त्याची चांगली गट्टी जमली. क्रूझे म्हणजे हाने फॉसचा भाऊ, अन् दिसायला हुबेहुब तिचाच दुसरा नमुना होता. त्याचे केस तांबडे होते, बांधा दणकट अन् स्थूल होता, आणि तो सहसा तोंडातून शब्दच काढीत नसे. 'फॉस', 'क्रुझे' आणि 'होस्ट' अशीं तीनच कुटुंबें हिलेवाक्ट गावांत होतीं. झोपड्या किती तर अवघ्या आठ. आणि मच्छीमारीचे पडाव चार होते. दोन कुटुंबांनीं मिळून एक पडाव ठेवावा, अन् मासे अर्धे अर्धे वाटून घ्यावे अशी गावांतल्या लोकांची रीत होती. त्यांचा हा असा जीवनक्रम कित्येक शतकं चालला होता, अन् पुढेंही चालणार होता. समुद्रकिनाऱ्यालगतच्या त्या शांत गांवांतल्या बहुतेक वस्तू अशाच शाश्वत स्वरूपाच्या होत्या.

बुडून मेलेल्या हाने फॉसच्या नवऱ्याची जागा ज्योआकिमनं सहज भरून काढली, अन् त्यामुळें गांवचे लोक त्याला 'फॉस' असंच म्हणूं लागले. हानेच्या नवऱ्याचा लौकिक कांहीं चांगला नव्हता. तो सदा असमाधानी असे. कोणताही एक उद्योग धड करीत नसे आणि तो मोठा वाचाळ अन् दारूड्याही होता. तो अखेर मेला तो एका विचित्र हास्यास्पद अपघातानं. ल्यूटे गांवच्या गुत्त्यांत खूप झोकून घरीं परत जातांना दलदलीकडे वाहत गेलेल्या कालव्याच्या पाणकुंडींत तो पडला होता अन् बुडून मेला होता. हाने फॉस या गोष्टीचा कधीं उल्लेख करीत नसे. तिला त्याची शरम वाटत असावी.

मेलेल्या फॉसची आणि नव्या पाहुण्याची तुलना करतांना गांवांतले लोक बोलत ते प्रथम अशा आविर्भावानं कीं, हा नवा माणूस तरी कसा आहे कुणास ठाऊक. पण पुढें हळूहळू त्यांच्या बोलण्यांत आदर व्यक्त होऊं लागला. लोक 'ज्योकेन फॉस' असा त्याचा उल्लेख करीत, व त्याच्याविषयीं बोलतांना असा अभिप्राय दाखवित कीं त्याला सर्व गोष्टींचा पुरेसा समज होता, आणि कुठलंही काम त्याला सांगितलं कीं तें तो दक्षतेनं करी. तो चांगला सशक्त होता, त्याला कामाची हौस होती, आणि त्याचा मितभाषी

स्वभाव दुसऱ्याला सुखाचा वाटण्यासारखा होता. त्याला मच्छीमारीची सारी कामं तर येत होतींच; पण शिवाय त्याला लिहितां येत होतं अन् हिशोब करतां येत होता. त्यामुळे लवकरच गांवांत जाऊन दलालांकडे मासळी टाकून हिशोब करून पैसे आणण्याची कामगिरी क्रुझेनं त्याच्याकडेच सोपविली, आणि ज्योकनही हीं सारीं कामं चोख करूं लागला. इतकंच नव्हे तर कित्येक कामं कुणी न सांगतांच तो उरकून टाकी. त्यानं झोपडीचं कौलार दुरुस्त केलं, अन् हानेच्या नवऱ्याच्या मृत्यूनंतर झोपडीलगतची जी जमीन दुर्लक्षित झाली होती तिचीही मशागत त्यानं केली. शहराकडे मासळी नेतांना ज्या गाडीचा उपयोग तो करीत असे तिचा घोडा आंधळा होता. त्याच्यासाठीं तो गवत कापी, अन् संध्याकाळीं त्या गवताचा भारा तो खांद्यावरून वाहून घरीं आणी. आणि हानेच्या बटाट्याच्या वाफ्यांत आज शेंकडों वर्षं पडलेली एखाद्या धिप्पाड बैलाएवढ्या आकाराची प्रचंड शिळा त्यानं उलथून दूर केलेली जेव्हां हिलेवाकटच्या लोकांनीं पाहिली तेव्हां तर त्यांनीं कौतुकानं व आश्चर्यानं तोंडांत बोटंच घातलीं.

शिवाय लोकांना लवकरच असंही समजून आलं कीं हा नवा माणूस त्यांना प्रथम वाटलं होतं त्याप्रमाणें कांहीं एखादा भिकारी किंवा भटक्या नव्हता. हानेच्या घरांत जेव्हां तो राहिला, अन् हिलेवाकटच्या लोकांत जेव्हां त्याची प्रतिष्ठा मान्य झाली, तेव्हां एके दिवशीं त्यानं आपलं सामान आणविलं. मी आपलं सामान आणवितों असं तो म्हणाला तेव्हां गांवकऱ्यांना मोठं आश्चर्य वाटलं, परंतु त्यांनीं पाहिलं तों खरोखरच त्याचं सामान आलं. दूरवरच्या प्रवासानं मळलेल्या पण अजूनही नीटनेटक्या दिसणाऱ्या अशा दोन पेट्या आल्या. त्यांत व्यवस्थित भरून ठेवलेले बरेचसे कपडे होते अन् बूट वगैरे सामान होतं. आणि त्यांत बरीचशी पुस्तकंही होतीं. त्याच्या बसायच्या खोलींतल्या केस विंचरण्याच्या टेबलावर मोठमोठे शिंपले वगैरे जें सामान आधींच होतं त्यांतच ज्योकेननं तीं पुस्तकं रचून टेवलीं.

त्यातलीं चित्रं पाहाण्याची हानेच्या छोट्या मुलाला परवानगी होती, पण हात स्वच्छ असतील तेव्हांच. त्याच्या सामानांत हत्यारांची एक पेटीही निघाली. त्यांतलीं कांहीं तर हिलेवाक्टच्या लोकांनीं पूर्वी कधीं पाहिलींही नव्हतीं अशीं होतीं. परंतु लोकांना विस्मयाचा सर्वांत मोठा धक्का बसला तो त्याच्या सामनांत दोन घड्याळं होतीं हें पाहून. त्यापैकीं एक काळं होतं तें तो काम करतांना वापरी, आणि दुसरं सुंदर छड्याचं सोन्याचं होतं त्याचा तो विशेष प्रसंगीं उपयोग करी. आणि या सगळ्यावर कळस चढविण्यासाठीं कीं काय तो एके दिवशीं हानेला म्हणाला, "माझ्यासाठीं बँकेंत निराळं खातं उघडायला पाहिजे." तें ऐकून हानेला वाटलं, हा कांहीं कुणी साधासुधा माणूस नाहीं. इतके दिवस तिनं ज्योकेनला पेंढ्यांच्या पोत्यावर निजायला लावलं होतं, परंतु आतां तिनं मुकाट्यानं आपल्या सासऱ्याच्या वेळची एक गादी काढली अन् ती त्याच्या निजायच्या जागीं अंथरली.

अशा प्रकारें ज्योकेन हिलेवाक्टचा कायमचा रहिवासी झाल्यावर हाने फॉसनं एके दिवशीं त्याला म्हटलं, "तुला आतां बेलिफाकडे जाऊन रिपोर्ट केला पाहिजे आणि तिथें रीतसर काय करायचं तें केलं पाहिजे." मग कांहीं दिवसांनीं एकदां शहराकडे मासळी नेण्याचं काम कूझेवर सोपवून ज्योकेननं आंघोळ केली, कपडे चढाविले, जाकिटावर सोन्याचं घड्याळ लटकाविलं, अन् सकाळीं आठ वाजण्याच्या सुमारास स्वारी निघाली.

बेलिफ मोलर हा एक ठेंगणासा वृद्ध गृहस्थ होता. त्याच्या तोंडांत नेहमीं तंबाखूचा बार भरलेला असे, व त्याच्या लिहिण्याच्या टेबलावर एक तस्त ठेव. लेलं असे. लिहितांना अगर वाचतांना किंवा एखाद्या माणसाकडे नीट पाह्यचं असलं म्हणजे तो आपला चष्मा काढून दूर करी, पण तो मग पुन्हा नाकावर चढवी अन् एखाद्या मोठ्या कामदाराचा आव आणी.

ज्योआकिम बूर्थजवळ स्वतःची नांवनिशी सिद्ध करणारा कागद होता

आणि वयाच्या सतराव्या वर्षी त्यानं लष्करांत काम केलं होतं त्या वेळचं एक जुनं घड्या पडलेलं सर्टिफिकेटहि होतं; परंतु तेवढ्यानं बोलिफसाहेबांचं समाधान होण्याचा रंग दिसेना. ते त्याच्याशीं बोलतांना चष्म्याची सारखी काढघाल करूं लागले, पिकदाणींत पुनः पुन्हा थुंकूं लागले, आणि एकंदरींत जरा बाधाच उत्पन्न झाल्यासारखं दिसलं.

हिलेवाक्टला राह्यला आलेल्या त्या नव्या माणसाकडे आपादमस्तक न्याहा-ळून गुरगुरत ते म्हणाले, " छे, छे ! कायद्याला सोडून होत आहे हें सारं. " तो होता तरी कोण ? मूळचा कुठला ? इकडे कसा आला ? इतकीं वर्षं कुठें होता ? अन् आता तो बुडून मेलेल्या फॉसच्या बायकोबरोर राहत होता काय ? कुठल्या नात्यानं ? भाडेकरी म्हणून ? तो जेवत खात होता कुठें ? हान्नेच्या होडींत त्याची पाती होती काय ? कराची बाकी थकली होती ती कोणी द्यायची ? छे छे, कायद्याच्या दृष्टीनं हा सगळा सावळा गोंधळ होता !

" मोठ्या साहेबाला विचारलं पाहिजे मला " असं गुरगुरत म्हणून बोलिफ मोलर उठला, आणि ज्योआकिमचं तें चुरगळलेलं लष्करी सर्टिफिकेट हातांत घेऊन तो लंगडत लंगडत वरिष्ठ अधिकारी हेर फॉन फालिन यांच्या बंगल्या-कडे गेला. खिडकींतून बाहेरचे चंदेरी रंगाचे छोटे छोटे ' स्वॉलो ' पक्षी दिसत होते त्यांकडे बघत ज्योआकिम खुशाल वाट पाहत राहिला. त्याच्या चित्तांत बिलक्षण शांतता भरून राहिली होती. अशा प्रकारें तो तब्बल एक तास बसला तेव्हां त्याला हेर फॉन फालिनचं बोलावणं आलं.

फालिन उणापुरा उंच होता. घोड्यावर बसायच्या वेळेस घालतात तसली तंग विजार त्यानं घातली होती. आपल्या बागेनजीकच्या खोलींत तो येरझारा घालीत होता, आणि ज्योआकिम समोर उभा राहिला तरी त्याकडे न पाहतांच त्यानं प्रश्न विचारायला सुरुवात केली.

" तुझं नांव काय, ज्योआकिम बूर्थ काय? आणि फॉस बाईच्या घरीं तूं राहणार आहेस काय? कायमचा राहणार काय?"

" होय कायमचा."

" ज्याच्या त्याच्या अभिरुचीचा हा प्रश्न आहे म्हणा. परदेशांतून आलास काय?"

" होय."

" हें पहा, त्याचं असं आहे, तुझी एकंदर हकीकत कांहीं सरळ गुणाची वाटत नाहीं. तिच्यांत कांहीं तरी संशयास्पद आहे." असं म्हणून आपल्या येरझारा थांबवून फालिन एकदम ज्योआकिमसमोर उभा राहिला.

ज्योआकिमनं रुकारार्थी सलाम केल्याप्रमाणें मान वाकविली. त्याच्या मनांत आलं, आपण एका बड्या ऑफिसरापुढें उभं राहून जणूं आपण त्याच्या बरोबरीचे प्रतिष्ठित गृहस्थ आहोंत अशा आविर्भावानं मान झुकवीत आहोंत हें काय आश्चर्य; आणि त्याच क्षणीं फालिनही मनाशीं म्हणत होता, हा तर कोणी चांगला प्रतिष्ठित गृहस्थ दिसतो. तो मग लगेच आपला स्वर बदलून म्हणाला,

" हें पहा बूर्थ, कांहीं लपवाछपवी न करतां तूं मला साऱ्या गोष्टी सांगशील तर बरं होईल. अमेरिकेंत जाण्यापूर्वी तुझ्यावर कांहीं किटाळ आलं होतं?"

ज्योआकिम अगदीं ताठ सरळ उभा राहिला व म्हणाला, " होय, आलं होतं."

" अन् आतां परत येऊन कुठें तरी एखाद्या निवान्त कोपऱ्यांत आयुष्य काढायची तुझी इच्छा आहे, होय?"

१३]

"होय, असंच."

"पण परदेशांत गेला होतास तर तिकडेच कां नाहीं राहिलास बाबा?"

"तिकडे तसे दिवस काढणं मला अगदीं अशक्य झालं."

"अस्सं. ... पण तुझ्यावर किटाळ आलं होतं म्हणालास तें कसलं? कोणता गुन्हा केला होतास? लांडी लबाडी, बनावट सही, असलाच मामुली स्वरूपाचा असेल तुझा गुन्हा, होय ना?"

"नाहीं. माझ्या गुन्ह्याचा राजकारणाशीं संबंध होता."

"हं! केव्हां म्हणतोस, दहा वर्षांपूर्वी? हं; त्या वेळीं राजकारण बरंच गडबडीचं होतं खरं. परंतु त्या वेळच्या गुन्हेगारांना नव्या सरकारनं केव्हांच माफी देऊन टाकिली आहे! तुला माहीतच असेल कीं?"

"नाहीं, मला माहीत नाहीं."

"थांब हं, तुझं नांव सांग पाहूं पुन्हा, बूर्थ, नाहीं का? तुझ्या या नांवावरून कसल्या तरी अस्पष्ट आठवणी होतात मला. हां, तुझी आई 'रेकबेर्ग' घराण्यांतली होती काय? सायलेशियांतलं रेकबेर्ग घराणं? आं?"

ज्योआकिम शांतपणें म्हणाला, "होय."

फालिन चटकन् वळला आणि पुन्हा घाईघाईनं पावलं टाकीत येरझारा घालूं लागला. तो अगदीं जोरानं कसली तरी आठवण करून पाहत होता, आणि त्यामुळें जवळजवळ केशविहीन असलेल्या त्याच्या भालप्रदेशाजवळचं तुळतुळीत कातडं स्फुरलेलं स्पष्ट दिसत होतं. ज्योआकिम अर्थातच स्वस्थ उभा राहिला. खिडकींतून दिसणाऱ्या हिरवळीकडे आणि बागेंतल्या कालदर्शक यंत्राकड त्यानं दृष्टि लावली होती.

जरा वेळानं पुन्हा ज्योआकिमपाशीं एकदम उभा राहून फालिन् म्हणाला, "बूर्थ, आतां मला सगळं आठवलं. मी आतां तुला अधिक प्रश्न विचारणार

नाहीं. तुला हिलेवाक्ट गांवांत राह्यचं असेल तर मी अडचणी ·उपस्थित करणार नाहीं. पण अशा या भिकार गावांत राहून आपलं सारं आयुष्य घालवायचं तूं ठरवावंस हें पाहून भारी वाईट वाटतं. आतां पूर्वींचे दिवस राहिले नाहींत. मला नक्की आठवत नाहीं सगळं परंतु अराजक चळवळींत तूं होतास एवढं स्मरतं. तुझ्यासारखेच आणखीही किती तरी लोक होते. त्या वेळीं तुझ्यासारख्या लोकांवर सरकारची वक्रदृष्टि होती. पण आता काळ बदललेला आहे तुझी इच्छा असेल तर मी तुझ्यासाठीं अवश्य प्रयत्न करीन. तुला चांगली नोकरी सहज मिळेल. या कुग्रामात येऊन स्वतःला एक प्रकारें पुरून घ्यायचं तूं ठरविलं आहेस तें काय म्हणून ? छे, छे, आपण तुझ्यासाठीं नोकरीची खटपट करणार. तुझ्यासारखीं करारी माणसं देशाला हवीं आहेत. ''

फालिन इतका भावनाविवश होऊन बोलत होता, कीं त्याचे शब्द तोंडांतून धड बाहेर पडत नव्हते, आणि त्याच्या नाकावर घामाचे लहान लहान थेंब दिसूं लागले होते.

ज्योआकिम म्हणाला, '' तुमचा मी फार आभारी आहे; पण पूर्वींच्या माझ्या मित्रांशीं आता माझा कांहीं संबंध उरलेला नाहीं. मोल–मजुरी करून मी गेलीं दहा वर्षं घालाविलीं आहेत. ''

'' पूर्वींच्या मित्रांशीं संबंध उरला नाहीं म्हणतोस ? म्हणजे राजकीय मतांच्या दृष्टींनं ना ! ''

'' नाहीं, सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीनं. राजकारण म्हणाल तर त्याबद्दल आतां मला काडीचीसुद्धा माहिती नाहीं; अन् मला राजकारणाशीं कांहीं करायचंही नाहीं. ''

'' कांहीं करायचं नाहीं ? थट्टा करतोस वाटतं ! राजकारणाबद्दल तुझीं कांहीं मतं तर असतील ना ? प्रत्येक माणसाला कांहीं मतं म्हणून असतातच. ''

'' असतील. '' अगदीं निर्विकारपणानें ज्योआकिम म्हणाला.

हेर फॉन फालिन पुन्हा खोलींत येरझारा घालूं लागला. घोड्यावर बस ण्याच्या वेळचे उंच उंच बूट त्याच्या पायांत होते ते करकर वाजत होते, अन् त्यांच्या कातड्याचा दर्प सुटला होता. कांहीं वेळानं तो बोलूं लागला,

" मला हें खरं वाटत नाहीं. हिलेवाक्टच्या एका झोपडींत कायमचं राहून एखाद्या कोळ्याचं जिणं घालवावंसं वाटतं तुला ? कोळ्याचं तरी बरं मी म्हणतों. आज घटकेला तूं कोळीही नाहींस, एका कोळणीचा नोकर आहेस, दुसरं काय ? "

" होय, पण मला हिलेवाक्ट आवडतं आणि तिथें राहण्यांत मला पूर्ण संतोष आहे. "

" ठीक, देव तुझं भलं करो. तुझ्या निश्चयापासून तुला परावृत्त करण्याचा मी कशाला प्रयत्न करूं ? कुणाची अभिरुचि कशी असेल त्याचा नेम नाहीं ! तुझ्याहूनही अधिक चमत्कारिक गोष्टी मीं ऐकल्या आहेत. तेव्हां ...पण तें जाऊं दे. हं तुझं नांव बूर्थ तर ? तुझ्या आईला मी ओळखीत होतों. पण काय रे, मला जो बूर्थ आठवतो तो पोलिसांच्या गोळीबाराला बळी पडला होता कीं ! मला आतां आठवूं लागलं. "

" तुमचं म्हणणं बरोबर आहे. तो. तो बूर्थ मारला गेला, पुरला गेला. "

" होय ? मग—"

" फालिनसाहेब, एक मेहेरबानी करा. जो बूर्थ मारला गेला त्याला विसरून जा; आणि जिवंत आहे त्याला सुद्धां. असं समजा, कीं जो बूर्थ मारला गेला त्यानं हिलेवाक्टचा जो कोळी बुडून मेला त्याचं काम आता अंगावर घेतलं आहे. जें आयुष्य मीं पत्करलं आहे त्यांतलीं कर्तव्यं मीं नीट पार पाडलीं कीं मला समाधान आहे. हानें फॉसची जमीन पडीकझडीक व्हायला लागली आहे. तिला देणंही झालं आहे. पण या साऱ्या गोष्टी सुरळीत करण्या

साठीं मला जें काय करतां येईल तें मीं करणार आहे. छप्पर दुरुस्त करण्यासाठीं मला लव्हाळी मिळतील तर—"

"ती गोष्ट बेलिफाच्या हातांतली आहे. त्याला विचार. तुझं भलं व्हावं अशीच माझी इच्छा आहे. गुड-बे" फालिन तुटक स्वरांत म्हणाला आणि मग आपली रुंद काठाची टोपी हातांत घेऊन बूथे वाकला आणि त्यानं निरोप घेतला.

आपल्या जुनाट पद्धतीच्या उंच टेबलापाशीं विचारमग्न मुद्रेनं कांही वेळ उभं राहून फालिन बेलिफाला म्हणाला, "मोलर, या माणसाची हकीकत जरा संशयास्पद वाटते. कुठला डांबिस मनुष्य आपल्या या भागांत आला आहे तें काय सांगावं!"

"पण साहेब, माझं मत सांगायची परवानगी असेल तर हा माणूस वाईट असेल असं मला नाहीं वाटत."

"वाईट? छे, छे, मी तर अगदीं उलट म्हणतों. तो जों जों अधिक बोलूं लागला तों तों तो चांगला सुशिक्षित असावा असं वाटलं, नाहीं का? पण जें नांवगांव तो सांगतो तें खरोखरच त्याचं आहे कीं नाहीं देव जाणे. अन् तें कसंही असलं तरी आपण त्याच्यावर जरा पाळत ठेवावी हें चांगलं."

"आलं माझ्या लक्षांत साहेब, आपण काळजी करूं नका" असं म्हणून बेलीफ महाराजांनीं आपला चष्मा नाकावर चढविला.

अशा प्रकारें त्या दोन अधिकाऱ्यांचा विचार ठरला आणि हिलेवाक्टच्या छोट्या जगांत ज्योआकिमचा कायमचा प्रवेश झाला.

ज्योआकिम घराची वाट चालूं लागला. तो अत्यंत आनंदांत होता. त्याच्या अंतःकरणांत कांहीं एका विलक्षण सुखाची ऊब उत्पन्न झाली होती, आणि त्याचा उल्हास अगदीं ओसंडूं लागला

होता. चालतांना तो मधूनमधून थांबे आणि हवेचा अगदीं खूप मोठे झोत आंत ओढून श्वास घेई. कसला तरी विलक्षण हर्ष व उत्सुकता त्याच्या अगदीं पोटांत मावेनाशी झाली असावी!

हिलेवाक्टला जाण्याचा जो अगदीं सगळ्यांत जवळचा रस्ता होता त्यानं तो चालला होता. प्रथम तो कुरणांमागून कुरणं ओलांडून गेला, नंतर तटाच्या भिंतीच्या अंगानं चालत राहिला. प्रारंभीं लष्करी शिस्तीनं चालल्याप्रमाणें त्याचीं पावलं पडत होतीं, पण मग तो तीं झपाझप टाकूं लागला. आणि अखेर हिलेवाक्टमधल्या झोपड्यांचीं छपरं दिसूं लागलीं, व कुरणावर एक छोटा जांभळा रुमाल फडफडलेला त्याला दिसला तेव्हां शक्य तितक्या वेगानं दौड मारण्यास त्यानं प्रारंभ केला.

# १५

आयुष्यांत प्रथमच प्रीतिपाशांत सापडलेल्या माणसाची स्थिति काय वर्णावी आणि तो माणूस कसा, तर ज्याला सुखाची विश्रांति थोडीच मिळाली होती, ज्याचं आयुष्य संकटांत अन् कष्टात गेलं होतं असा. अर्थात् स्त्रीसमागमाचं सौख्य त्यानं अधूनमधून उपभोगलं होतं, चुंबनालिंगनादि क्रीडा त्यानं केल्या होत्या, अन् तो आपल्या मार्गानं पुढें गला होता. परंतु आतां खऱ्या प्रीतीचा स्पर्श त्याच्या अंतःकरणाला झाला होता, व त्यामुळें एकदम सारं जग पालटल्यासारखं त्याला वाटूं लागलं होतं. वस्तुमात्राचं स्वरूप एकदम नव्या दीप्तीनं उजळल्यासारखं झालं होतं आणि जिकडे तिकडे एखाद्या गुप्त ज्योतीचा प्रकाश भरल्याप्रमाणें त्याला भासत होता. फुलांनीं व सुगंधांनीं ओतप्रोत भरलेलीं अशीं कुरणं, आणि नवकिशोरीच्या पदाघातांनीं आपलं मस्तक खालीवर करणारे असे तृणांकुर कुठें असतील काय? गूढ भाव दाखविणारीं आणि इतकीं आल्हादकारक गर्द अरण्यं कधीं कुणी पाहिलीं असतील काय? आणि वृक्षशाखांवरची असा मधुर शब्द करणारी पर्णराजी? एखाद्या 'ओक

झाडाची नुसती छाया दिसल्याबरोबर त्याच्या अंतःकरणांत कसली तरी हुर-हुर उत्पन्न होई; एखाद्या लहानशा जलौघाचा मंजुळ ध्वनि ऐकतांना त्याला वाटे आपल्या जीवाची तृप्ति कधीं होणार नाहीं. आणि चहूंबाजूंस पसरलेल्या ज्योत्स्नेकडे त्यानं दृष्टि लाविली कीं त्याच्या हृदयाला विलक्षण भरती येई! श्वासोच्छ्वास करतांना त्याला वाटे अशी हवा पूर्वी कधीं आपण हुंगली नव्हती; आणि त्याच्या धमन्यातून अंगभर जो द्रवपदार्थ वाहत होता तो सामान्य रक्त नसून विलक्षण हर्षभराचा धावता उसळता झोत होता! हातांत फुलांनीं भरलेल्या परड्या घेऊन एका मागोमाग नाचत, हसत येणाऱ्या अभि-सारिकांप्रमाणें दिवसामागून दिवस आल्यासारखे त्याला वाटत होते! प्रीतीच्या उन्मादकारक वसंतकालाचा आनंद काय सांगावा!

या कालांत हृदयाला मोह पाडणाऱ्या गोष्टी काय थोड्या होत्या? त्याची प्रियमता जवळ होती, व तिचा सहवास सुलभ आहे ही जाणीव विशेष सुखाची असे. हिलेवाक्ट म्हणजे एक अगदीं छोटंसं जग असेल, परंतु तिथल्या एका झोपड्यांत स्टाइने राहात होती ना? मग याहून अधिक आनंदाचं स्थळ जगांत दुसरीकडे कुठें कसं असेल? रोज सकाळीं उठल्याबरोबर अंगणांत यावं, आणि वाट पाहत उभं राहावं. सर्पण गोळा करण्यासाठीं स्टाइने आपल्या झोपडीच्या दारांतून बाहेर पडली कीं दृष्टीस पडावी. तिनं झगा नेस-लेला असायचा अन् तिच्या अंगांत एक पोलकं असायचं. एखाद्या 'हेझल' झाडाच्या फळासारखी तिची आकृति पिंगट रंगाची व तकतकीत दिसायाची. तिच्या या नुसत्या दर्शनानं दीर्घकाल टिकण्यासारखा हर्ष त्याच्या अंतःकरणांत भरावा, आणि मग त्यानं मोठ्या खुषीनं खालीं खाडीकडे जावं, अन् भरतीला येऊं लागलेल्या समुद्रांत जाळं पसरण्याचे कष्ट तासन् तास करावे लागले तरी त्यांचा त्याला शीण वाटूं नये!

संध्याकाळीं घरीं परततांना एखादें वेळीं वाटेंत खिडकीवर काम करीत असलेली स्टाइने त्याच्या दृष्टीस पडत असे. किंवा कधीं हातांत ताजी भाजी

घेतलेली स्टाईने आपल्या छोट्या बगीचांतून बाहेर येतांना त्याच्या दृष्टीस पडे. किंवा एखादे वेळी लांब दाव्याला बांधलेल्या आपल्या गाईला खाली उतरत्या कुरणाकडे नेतांना ती त्याला आढळे; अथवा आपल्या धाकट्या भावाच्या गळयाभोंवती हात टाकून झोपडीच्या उंबरठ्यावर उभी राहिलेली ती त्याला दिसे सूर्य तळपत असे. सकाळीं गडद जांभळ वाटलेलं समुद्राचं पाणी आतां फिक्या रंगाच दिसूं लागलेलं असे, आणि पैलतीराच्या वाळूपाशीं जलपृष्ठावर सोनेरी रंगाच्या लहरी मधूनच चमचमत असत. मग दिवस मोठा प्रसन्न तेजानं कांठोकांठ भरल्यासारखा वाटे.

स्टाइने नुसती इकडे तिकडे जातांना दिसली तरी त्याला सुख होई. वाळत टाकलेलं जाळं उलगडण्याच्या कामीं ती आपल्या बापाला मदत करी. तेव्हा तिची वाकलेली पाठमोरी आकृति आणि तिचे पसरलेले हात त्याच्या दृष्टीस पडत. किंवा हातांत खुरपं घेऊन गवत कापण्यासाठीं ती निघालेली असतांना त्याच्या दृष्टीस पडे. जंगलातून ती परत येई तेव्हां तिच्या माथ्यावर लाकडांची मोळी असे, आणि 'रास्पबेरी' फळांनीं भरलेलं भांडं तिच्या हातांत असे. अशी इकडे तिकडे हालताना तिची देहयष्टि किती कोवळी वाटे. कधीं तिच्या पायांत लाकडी जोडे असत, कधीं ती उघड्या पायांनीं चालत असे. रविवारीं मात्र चांगले पॉलिश केलेलं काळे चकचकीत बूट ती घालींत असे. या स्टाइनेच्या मोहक गतीसारखी जगांतल्या दुसऱ्या कोणत्या तरी तरूणीची गति असेल काय ?

तिला प्रत्यक्ष डोळयांनीं पाहाण्यांत तर सुख होतंच; पण ती जवळ आहे आणि आपल्या दृष्टीस ती केव्हांही पडेल या जाणीवेंतही सुख होतं. तिनें आतां परका भाव ठेवला नव्हता, अथवा ती कधीं आढ्यताही दाखवीत नसे. दिवसांतून दहादां बोलण्याची संधि येई, आणि या गोष्टीचं सुख कमी नव्हतं.

त्यानं म्हणावं, " गुड डे, स्टाइने. "

तिनं उत्तर करावं, "गुड डे"

"आज हवा किती सुंदर पडली आहे."

"होय, पण वारं सुटण्याचीं चिन्ह दिसतात."

"खरंच, हा पहा वाऱ्याचा झोत."

"अच्छा, गुड बाय."

"अच्छा, गुड बाय. पुन्हां भेटूंचं आपण स्टाइने."

हें काय थोडं झालं ? ज्यानं पूर्वी कधीं प्रीती अनुभवली नव्हती त्या माणसाला एवढ्याशाच संभाषणाचं सुख किती तरी पुरेसं होतं.

नंतर संध्याकाळीं स्टाइनेच्या लाकडी जोड्यांची चाहूल त्याला पुन्हां ऐकूं येई. डुकरांना चारा घालण्यासाठीं ती निघालेली असे.

"इव्हानिंग स्टाइने" त्यानं म्हणावं.

"इव्हानिंग."

"अजून कामांतच आहेस ?"

"तर ! कामांवांचून कसं चालेल."

"बरोबर आहे; अच्छा, गुडनाइट स्टाइने."

"गुड नाइट."

"स्टाइने, मजेनं झोप घे."

"थँक्स्. जोकेन, तूं सुद्धां आनंदानं झोपीं जा."

मग त्यानं आपल्या झोपडीसमोर बसावं, आसमंतात विलक्षण शांतता भरलेली असावी, समुद्राचा पृष्ठभाग काळाभोर दिसत असावा, आणि वर आकाश तारकापुंजांनीं नुसतं खचलेलं असावं ! बसल्या बसल्या त्यानं मनाशीं पुन्हा म्हणावं, गुड नाइट, स्टाइने ! माझ्या ख्रिस्टीना ! गुड नाइट. तुला गाढ निद्रा मिळो...

परंतु हा नुसता प्रेमाचा प्रारंभ होता. या आल्हाददायक दिवसानंतर दुसरे

दिवस आले ते निराळया तऱ्हेचे होते. या कालांत निव्वळ दृष्टिसुख त्याला पूर्वीसारखं पुरेसं वाटेना, आणखी कांहीं तरी पाहिजे अशा अतृप्तीनं त्याच चित्त अस्वस्थ झालं, आणि त्याला परोपरीचीं स्वप्नं पडूं लागलीं. तो स्टाइनेबरोबर कुरणांत हिंडत असे. ती त्याला ताजा गोरस प्यायला देई; तिचा हात अलगद धरून तो तिला आपल्याशेजारीं खालीं गवतावर पडावयास लावी, मग तिच्या हातावरून तो आपला हात प्रेमानं फिरवी, तिनं डोक्याभोंवतीं गुंडाळलेला रुमाल दूर करून तिचे केस दोन्ही हातांत पकडी, तिचं मस्तक इतकं मागें लोटी कीं किंचित् भीतीनं तिची दृष्टि गंभीर होई; आणि मग तो जेव्हां तिच्याशीं एकरूप होई तेव्हां त्याला वाटे आपण सुखाच्या डोहांत उडी घेऊन आपला जीव जणूं बुडवून टाकीत आहोंत!...

परंतु हीं केवळ त्याचीं स्वप्नं होतीं. खरी गोष्ट ही होती कीं, स्टाइनेची व त्याची एकांतीं गाठ पडण्याचा संभवच नसे. फार तर एखाद्या दिवशीं तिसऱ्या प्रहरीं, मच्छीमारीचीं जाळीं सुकविण्याच्या वेळीं, स्टाइने आपली गाय राखीत आपल्या धाकट्या भावाला जवळ घेऊन कुरणांत कोठें तरी बसलेली त्याला दिसे. मग तो प्रथम उतारावरून खालीं जाई, किनाऱ्यावर कांहीं वेळ इकडे तिकडे करी; आणि मग सहज तिच्या दिशेनं आल्याप्रमाणें वर चढून येई. येतांना एखादा खेकडा पकडून तो आणी, व स्टाइनेजवळ आल्यावर म्हणे, "तुझ्या भावाला हें खेळणं आणलंय बघ," व असं म्हणून तो त्या छोट्या मुलाजवळ खालीं बसे. "वा! किती सुंदर खेळणं आणलंत" असं म्हणून स्टाइने आपलं जाळं जरा दूर करून सरकून बसल्यासारखं करी, आणि मग त्या दोघांचं थोडं संभाषण होई. परंतु त्या संभाषणाचे विषय अगदीं साधे असत. हवा कशी आहे, वादळ होणार कीं काय, या वर्षी पाण्यांत 'कॉन' जातीच्या माशांखेरीज दुसरा मासाच कसा येईना, होल्स्टल एक 'ईल' सांपडलं होतं अन् त्यानं तें फालेन साहेबाला दाखवायसाठीं नेलं होतं म्हणे, स्टाइनेची आई म्हणत होती आतां बटाट्याचं पहिलं पीक काढा

बलो झालें आहे, पण खरं म्हणजे बटाटे असून चांगले धरले नव्हते, असल्याच गोष्टी तीं दोघं बोलत

मग मधेंच तीं दोघंहि स्तब्ध राहात. जाळं ओढून घेतां घेतां आपल्य बोटांभोंवतीं गुंडाळण्यांत व त्याला गाठी मारण्यांत स्टाइने मग्न होई व ज्योआकिम तिच्याकडे सारखा पाहत राही. पाहतां पाहतां तो म्हणे, "तुझ्याकडे सारखं बघत राहावंसं वाटतं. जाळ्याची गुंतागुंत काढून तूं तें सरळ करीत असतेस तेव्हां फार मोहक दिसतेस. माझं जाळं दुरुस्त करायला असं कुणी असतं तर किती बरं झालं असतं."

"तें कां ? हाने फॉस आपलं जाळं दुरुस्त नाहीं का करीत ?"

तें ऐकून ज्योआकिम उठे आणि रागावल्याप्रमाणें चालूं लागे. आपल्याला दुहेरी दुखापत झाल्यासारखं त्याला वाटे. कारण त्यानं ज्या नाजुक अभिप्रायानं जाळ्याचा विषय काढला त्याकडे तिनं दुर्लक्ष केलं होतं; आणि शिवाय त्याला स्वतःचं जाळं नव्हतं, हानेचा केवळ एक नोकर म्हणून तो काम करीत होता ही कांहींशी अपमानास्पद गोष्ट तिनं मुद्दाम सूचित केली होती.

म्हणून तो रागानं जो उठे तो आपल्या झोपडीकडे झपाझपा चालत जाई. हाने खरोखरच तिथें आपल्या जाळ्याची डागडुजी करीत बसलेली असे. ज्योआकिमला येतांना पाहून ती आपलं काम थांबवी आणि वळून त्यांच्याकडे बघे. तिच्या फिकट, रुंद मुद्रेंत खोल बसविल्यासारखे वाटणारे तिचे डोळे स्वच्छ व पाणीदार दिसत. हाने म्हणजे एक अबोल गंभीर वयस्क स्त्री होती. ज्योआकिम तिच्या अंगावरून जाऊन झोपडींत शिरे, कुदळ घेऊन बाहेर येई आणि डुकरांच्या गोठ्यामागची जमीन खणूं लागे. मनांतला सारा राग तो त्या कामांत बाहेर काढी.

परंतु लगेच दोन दिवसांनीं स्टाइनेची गाठ पडल्यावर तिच्या संभाषणानं त्याचा रुसवा कोठच्या कोठें नाहींसा होई. ती त्याच्याविषयीं अगदीं निकट भाव दाखवी, व आपल्या उण्या उत्तराची पुरती भरपाई करून टाकी.

एकदां तिनं विचारलं, "तुझ्या 'ओक' झाडाजवळ हा केवढा प्रचंड दगड ?"

तिला सारी हकीकत माहीत होती, पण ती मुद्दामच विचारीत होती.

ज्योआकिम म्हणाला, "तो म्हणतेस होय? तो मोठा आहे असं वाटतं तुला?"

"तर काय रे. केवढा तरी! एखाद्या माणसाइतकं वजन असेल त्याच."

"हं:! त्याच्या दुप्पट वजनाचा आहे तो. चांगला बैलाइतका जड! मीच तो खणून लोटीत आणला ना इथें"

"एखाद्याला खरं सुद्धां वाटायचं नाहीं. तुझी ताकद केवढी म्हणायची!"

ती लाडीगोडीं करीत होती खास. ज्योआकिमच्या शरीरांतले सारे स्नायू ताणून स्फुरूं लागले आणि त्यानं त्या संधीचा फायदा घेतला. तो म्हणाला,

"होय, तो धोंडा खणून लोटीत आणून मी इथें झाडाखालीं ठेविला. त्यावर बसून भोवतालचा देखावा आतां पाहतां येतो. हवा स्वच्छ असली तर संध्याकाळच्या वेळीं दूरवरचे दिवे सुद्धां दिसतात. तुला वाटलं तर तूं सुद्धां बसत जा कीं येऊन या दगडावर, अन् बघत जा देखावा"

त्याची ती सूचना स्टाइनेला कांहीं विशेष वाटली नाहीं. जन्मल्यापासून विस्तीर्ण समुद्र तिच्या दृष्टीला पडत गेला होता, अन् त्या देखाव्याचं कौतुक तिला वाटेनासं झाल होत. नंतरच्या तीन दिवसांत रोज चांगली रात्र होईपर्यंत ज्योआकिमनं त्या दगडावर बसावं, अन् धडधडत्या हृदयानें तिची वाट पहावी. पण मग मात्र एकदां संध्याकाळीं समोरच्या बागेतून

अनवाणी बाहेर पडलेली एक आकृति जवळ आली आणि दगडावर त्याच्या शेजारीं बसली. तिचा उष्ण श्वासोच्छ्वास: त्याला स्पष्ट कळत होता. हवेंत उबारा होता, आभाळांत ढग आले होते, रात्र अंधेरी होती, समुद्र दिसत नव्हता, आणि दूर अंतरावरचे दिवेही अदृश्य होते.

काहीं वेळ तीं दोघं स्तब्ध राहिलीं. मग सामान्य घरगुती गोष्टींबद्दल त्यांचं बोलणं हलक्या आवाजात होऊ लागलं.

"मी प्रथम त्या दिवशीं तुला कुरणावर भेटलों तें आठवतं?"

"हो. मला प्रथम वाटलं तुझ्या दाढीचे केस तांबडे आहेत, पण नंतर माझ्या लक्षात आलं कीं सूर्यप्रकाशाच्या झोतानं मला तसा भास झाला होता.

"मी फार दमलों होतों अन् मला किती तहान लागली होती. आणि स्टाइने, तूं मला गोरस प्यायला दिलास."

"हो. आणि मग तूं किती वेळ तरी काय काय हकीकती सांगत, राहिलास. त्या ऐकताना मी मनात म्हणत होतें, मोठा विलक्षण मनुष्य दिसतो हा."

"अजूनही तुला असंच वाटतं?"

"म्हणजे कस म्हणतोस?"

"स्टाइने, अजूनसुद्धां मी तुला परका वाटतो काय?"

"छे, आतां नाहीं. पण खरं म्हणशील तर मला कळत नाही. कदाचित् नेहमींच तूं मला थोडास परका वाटशील."

रात्र होऊ लागली होती अन् आजूबाजूला अगदीं स्तब्ध होतं. ढगांनीं व्यापलेल्या आकाशाखालचं सारं जग निःशब्द होतं, वर माथ्यावर एकही तारा दिसत नव्हता, झोपड्यातही दिवे नव्हते, मधूनच फक्त बागेच्या बाजूनं रातकिड्यांचा शब्द ऐकूं येत होता.

कुपणाच्या बाजूनं हाने फॉस आली व ती त्या दोघांच्या अंगावरून गेली. तिच्या मनांत असतं तर दगडावर त्यांच्याजवळ बसायला

तिला कांहीं हरकत नव्हती. परंतु ती बसली अगर थांबलासुद्ध । नाहीं, पुढें निघून गेली. रात्रीच्या त्या अंधारांत तिची भव्य काळी आकृति कांहींशी गंभीर भासली.

"गुड नाइट" असं अगदीं हलक्या आवाजांत म्हणून स्टाइने त्याच्यापासून दूर सरकली अन् निघून गेली नंतर कितां तरी वेळ ज्योआकिम त्या दगडावर एकटाच, आपल्या हृदयाचे ठोके ऐकत, बसून राहिला.

तिला कांहीं हरकत नव्हती· परंतु ती लबसी नाहीं अगर थाबलीसुद्ध ।

त्यानंतर बहुतेक रोज संध्याकाळीं तीं दोघं त्या ठिकाणीं एकत्र बसू लागलीं त्यांनीं तसं कां बसूं नये ? समुद्रकिनाऱ्यालगतच्या सगळयाच गांवांतले कोळी आपलं दिवसभराचं काम आटोपलं म्हणजे आपापल्या खोपट्यांपुढें बसत असत. हवा निवळलेली असे, वाऱ्याचा झोत ताजा ताजा वाटे, 'फ्लाउंडर' जातीचे मासे आतां निघाले असल्यामुळें जाळीं खूप भरलेलीं असत, आणि कितीदां तरी शहराकडे मच्छी रवाना करतांना पेट्या अपुऱ्या पडत.

मासळी दलालाकडे टाकून ज्योआकिम पैसे घेऊन येई, व त्यांतला भाग त्याला मिळे. मग एके दिवशीं शहरांत मुद्दाम जाऊन त्यानं स्टाइनेसाठीं एक तांबडा रुमाल आणला. लोकरीचा सुबक रुमाल होता तो, अन् त्याच्या किनारीवर रेशमानं गुलाबाची फुलं भरलेलीं होतीं. संध्याकाळीं ती जेव्हां त्याच्या जवळ येऊन बसली तेव्हां त्यानं तो तिला दिला. तिची मुद्रा आनंदानं फुलल्यासारखी दिसली. त्या दोघांची अगदीं हलक्या आवाजांत कुजबुज चाले, आणि जसजसे दिवस जाऊं लागले तसतसा त्यांच्या बोलण्यांतला मोकळेपणा वाढूं लागला. एकदां तर आपल्या झग्यासाठीं नवं कापड आणण्याकरितां स्टाईने ज्योआकिमबरोबर शहरांत सुद्धां गेली. ते दिवस ऑगस्ट महिन्याचे होते, आणि सूर्यप्रकाश दशदिशांना अगदीं तळपत होता. तीं दोघं गाडींत बसून शहराकडे गेलीं. बाजारांत जाऊन झग्याचं कापड पसंत करण्यांत ज्योआकिमनं स्टाइनेला मदत केली, मग तो तिला एका विश्रांतिगृहांत घेऊन गेला, तिथें त्यांनीं मद्य घेतलं अन् केक्स खाल्ल्या आणि मग

परत येतांना जेव्हां एकदां गाडींतल्या जागेवर स्टाइनेचा झोक गेला तेव्हां त्यानं आपला हात तिच्याभोवतीं टाकला. सुखानं आणि उल्हासानं त्याला अगदीं शिणल्यासारखं वाटत होतं, त्याच्या डोळ्यांची जळजळ होत होती आणि हृदयाचे ठोके किती जलद पडत होते. त्यानंतरच्या रविवारीं 'ल्यूटे गांवांतल्या एका विश्रांतिगृहांत नृत्यसभारंभ झाला तिथें स्टाइने आली होती व तिनं ज्योआकिमबरोबरही तिनं नृत्य केलं...

ज्योआकिम स्वप्नं रचूं लागला. एकीकडे मच्छीमारीचं काम नावेवर करीत असतांना त्यानं परोपरीचीं मनोराज्यं करावीं...आपण एक लहानशी जमीन खरेदी करूं आणि छोटीशी पर्णकुटी बांधूं. पुढची बसायची खोली, स्वैंपाकघर, अन् निजायची खोली, इतकं बस्स झालं. आपण खिडक्यांना पांढरे पडदे लावूं, आणि भिंतींना हिरवा अन् दारांना पांढरा रंग देऊं. स्टाईने आपली झालेली असेल, आणि मग कालांतरानं आपल्याला तीन चार मुलं होतील तीं सारीं स्टाइनेसारखीं भक्कम बांध्याचीं, पिंगट वर्णाचीं अन् शुभ्र केसाचीं !...

अशीं त्याचीं स्वप्नं चालत. तो प्रेमपाशांत सापडला होता, आणि एखाद्या उंच कड्यावर उभं राहून तोल सावरणाऱ्या माणसाप्रमाणें त्याची अवस्था झाली होती प्रेमामुळें त्याच्या ठिकाणचा विचार व संयम नाहींसा झाला होता. नृत्यसमारंभानंतर एके दिवशीं संध्याकाळीं स्टाइनेची व त्याची गाठ पडली तेव्हां त्यानं एकदम तिला बाहुपाशांत ओढलं, आणि तिचं जोरानं चुंबन घेतलं. ती इतकी स्तिमित झाली कीं तिला काहीं बोलवेच ना. तिनं हात उंच करून त्याचं तोंड दूर ढकललं, व ती पळाली. ती अगदीं रडायच्या घाईला आलेली दिसली.

चुंबनामुळें तिला रडू यावं ! ज्योआकिमला तें समजेना ! हें चांगलं लक्षण होतं कीं वाईट ? दोन दिवस गेले, तीन दिवस गेले, स्टाइने पूर्वीप्रमाणें अक , ' झाडाखालच्या त्या दगडावर बसायला आली नाहीं. दूर अंतरावर

वावरत असतांना ती त्याला दिसली तो तिच्याजवळ गेला तरी ती त्याच्याकडे बघेना आणि तुटक उत्तरं देण्यापलीकडे बोलेना.

एके दिवशीं संध्याकाळीं स्टाइने गौळवाड्यांतून बाहेर पडत असतांनाच त्यानं तिला गाठली. 'गुड इव्हनिंग' असं म्हणून तो तिच्याबरोबर चालूं लागला. तिच्या मुद्रेवर खुषीचा अभिप्राय दिसला. तिन्हीसाजा झाल्या होत्या. आजूबाजूस शांत होतं. पूर्वेकडे लहानशी हिरवट रंगाची चंद्राची कोर वर येत होती. तीं दोघं कुरणांत येऊन पोहोचलीं तेव्हां थोड्या विश्रांतीसाठीं गवतावर बसलीं.

" स्टाइने, मी तुझ्याजवळ बसलों तर चालेल ? "

" नाहीं कधीं म्हटलं ? "

" माझ्यावर तूं रागावली नाहींस ? "

" अं हं. पण पुन्हा तूं तसं करता कामा नये "

" होय--? "

काहीं वेळ दोघंही स्तब्ध राहिलीं. मग ज्योआकिमनं विचारलं,

" स्टाइने, ती माझी फार मोठी चूक झाली काय ? मला समजत नाहीं--माझी समजूत होती कीं मी तुला आवडतो."

" होय, आवडतोसच—"

" मग मीं तुझा मुका घेतां कामा नये असं का म्हणतेस ? समज—पण नको, मी तुला सरळच विचारतों मी तुझ्याशी लग्न केलं तर ? " त्याचा आवाज अगदीं खोल व कांपरा होता.

स्टाइने गवताची काडी चघळीत गप्प बसली. मग ती अगदीं हलक्या आवाजात म्हणाली,

" तें कसं शक्य आहे ? असं करीत नाहींत. कारण माझं आधींच दुसऱ्याशीं—"

"काय ? आधींच दुसऱ्याशीं--? पण स्टाइने--"

"होय दुसऱ्याशीं. आतां मला सतरावं वर्ष सरत आलं आहे. माझा अन् त्याचा वाङ्निश्चय झाला आहे, आणि नाताळांत त्याच्याशीं माझं लग्न व्हायचं आहे." प्रत्येक शब्द उच्चारतांना स्टाइने आपली मान हालवीत होती.

कुणी तरी आपल्या मस्तकावर घणाचा घाव घातल्यासारखं ज्योआकिमला वाटल त्यानं मनोराज्यांत उभी केलेली ती पर्णकुटी–पांढऱ्या पडद्यांनीं अन् हिरव्या भिंतींनीं सजविलेली आणि स्टाइनेच्या व मुलाच्या हसण्या खेळण्यानं गजबजलेली ती पर्णकुटी—एकदम कोसळली ! तिच्या कोसळण्याचा आवाज ज्योआकिमला स्पष्ट ऐकूं आला. परंतु आपली निराशा त्यानं स्टाइनेच्या लक्षांत येऊं दिली नाही. तो स्वाभिमानी होता. त्यानं आपली मुद्रा निर्विकार ठेविली. तो म्हणाला,

"हं, तुझं लग्न ठरलंय ? कुणाशीं तें तरी सांग. माझ्या ओळखीचा आहे तो ?"

"नाहीं. तो सफरीवर दूर गेलेला आहे. 'हान्सा' बोटीवर तो गेला त्याला एक वर्ष होऊन गेलं. आतां तो परत आला कीं त्याचे आईबाप त्याला घर देणार आहेत अन् मग आमचं लग्न होणार आहे."

"या हिलेवाक्ट गावांतलाच आहे का !"

"नाहीं ल्यूटे गावचा आहे. त्याचं नांव कार्ल होल्स्ट—तो अन् मी बरोबर शाळेंत जात होतों—"

पुन्हा दोघंही स्तब्ध राहिलीं कुरणावर दंवबिंदु पडत होते, गोठ्यांतली एक गाय हंबरली, आणि रातकिड्यांचा किर्र्र्र आवाज एकदम थांबला.

"अस्सं—कार्ल होल्स्ट काय ? आणि तुझं त्याच्यावर फार प्रेम आहे."

"होय, फार."

"अन् स्टाइने माझ्यावर ? माझ्यावर प्रेम नाहीं करीत तूं."

" होय, ज्योकेन, तुझ्यावरही मी प्रेम करते-- अतिशय..."

" त्या दुसऱ्यावर—कार्ले होल्स्टवर तुझं प्रेम आहे तर ?"

" तसं नाहीं. त्याच्यावरही माझं प्रेम आहे. आम्ही दोघं शाळेत बरोबर जात होतों."

साध्यभोळया, निष्कपट स्टाइनेच्या मनाचा मोठा गोंधळ उडाला होता. आपल्या मनातल्या वृत्तींचीं गुंतागुंत तिला उलगडतां येत नव्हती. तिच्या डोळयातून दोन अश्रुबिंदु खालीं ओघळले. कुरणावर बसून बोलतां बोलतां आसवं गाळणाऱ्या स्टाइनेकडे बघतांना ज्योआकिमच्या मनांत आलं, ती दुसऱ्याची वाग्दत्त वधू होती, अन् तिच्यावर त्याची मालकी होती. परंतु असे विचार मानून प्रीति कधी थांबते काय ? छेर्ता उलटी अशा वेळेस सुरू होते... असल्या विचारानीं ज्योआकिमला इतक्या यातना झाल्या, कीं त्याला वाटलं कुणी तरी आपलं हृदय भाजीत, पोळीत, कापीत आहे. तिच्या मर्मी लागेल असं कांहीं तरी बोलून आपला राग काढवा असं त्याला वाटलं, आणि त्यानं विचारलं—

" आणि तो दुसरा...त्यानं तुझे हवे तितके मुके घेतले तरी चालतील ?"

" हो अर्थात्" स्टाइने हलकेंच म्हणाली.

" आणि मी ? मी तुझा मुका घेतां कामा नये ?"

" अं हं, त्यांत पाप आहे." असं पुटपुटताना तिनं आर्जवाच्या भावानं त्याच्याकडे दृष्टि टाकिली.

परंतु त्यानं तें ऐकलं नाहीं, त्याच्या विवेक अगदीं नष्ट झाला होता. अनावर, हट्टी, वेडी इच्छा त्याच्या अंतःकरणांत जणूं एकदम प्रज्वलित झाली. त्यानं एकदम तिचे केस दोन्ही हातांनीं गच्च धरले, तिला मागं लोटून तिची मान वर केली, आणि अगदीं आवेगानं तिच्या मुखाचं चुंबन घेतलं. मग तीं दोघं उठलीं, आणि एकमेकांशीं एक शब्दहि न बोलतां तिन्हीसांजच्या धूसर प्रकाशांत तटाच्या बाजूनं गांवाकडे चालत गेलीं.

ती रात्र ज्योआकिमला फार वाईट गेली. जणूं सप्तकुंडांत त्याचा दाह होत होता. आपल्या स्वतःच्या अंतःकरणाशीं ता झुंजत होता त्यानं रानोमाळ धूम ठोकली, अंग जमिनीवर फेकून तो पडला आणि मुठी भरभरून त्यानं गवत इतक्या जोरानं उपटलं कीं त्याच्या बोटांबोटांतून रक्त आलं तें त्याला चाटून टाकावं लागलं. मग तो उठला, समुद्राकडे धावत गेला आणि काटक्याच्या कठीण उशींवर मान टाकून तो तिथल्या दमट वाळूंत पडला. आपल्या तप्त शरीरावरचे कपडे त्यानं ओरबाडून काढले, अन् धावत जाऊन समुद्रांत प्रवेश केला. पाण्यांत एकेक पाऊल पुढें टाकलं कीं त्याच्या शरीराचा ताप कमी होत होता. हवेंत गारवा होता. उत्तर दिशेला आभाळांत ढगांचा दाट थर दिसत होता. एकेक लाट आंत आली कीं तिच्यावर लखलखणारी श्वेतवर्ण आयाळ दिसत होती खोल पाण्यांत शिरल्यावर त्यानं क्षणभर शरीर सावरायचं सोडून दिलं, अन् पाण्याबरोबर तो वाहत राहिला. मग त्यानं उचंबळणाऱ्या भरतींत सूर मारला, आणि त्याच्या मस्तकाभोंवतीं मोठमोठ्या वन्यपशूंप्रमाणें उसळणाऱ्या लाटांत जेव्हां त्यानं हात मारले तेव्हां त्याच्या पांढऱ्या-शुभ्र दाट फेसानं आपलं मस्तक न्हाऊं दिलं. अखेर तो थकला व गारठला तेव्हांच परत वळून त्यानं लाटांच्या पाण्याबरोबर आपलं शरीर किनाऱ्याकडे येऊं दिलं. त्याचं सर्वांग निथळत होतं, पण आतां त्याचा दाह निवाला होता. चढावरून चालत जाऊन तो आपल्या झोपडीकडे गेला

ते उन्हाळ्याचे दिवस होते. लवकरच ऊष्मा अधिकाधिक होऊं लागला. सूर्याच्या तळपत्या उन्हांत सोन्यासारखीं पिवळीं धमक पिकं खुलून दिसूं लागलीं. 'राय' धान्याच्या शेतांशेतांत कापणीचीं यंत्रं सुरू झालीं, आणि त्यांच्या गरगर फिरणाऱ्या पात्यांत पिकाचीं ताटं पकडलीं जाऊं लागलीं. 'क्लव्हर' गवत केव्हांच उंच उंच वाढलं होतं. त्याच्या फुलांतल्या मधाचा उन्मादक गंध हवेंत उठत होता.

'ओट' च्या पिकाचे शेंडे चंदेरी दिसूं लागले होते. त्याची 'कापणी आतां जवळ आली होती. अरण्याच्या मागच्या बाजूच्या जमिनींत 'हे' गवताचं उंच दाट रान माजलेलं होतं, त्याची वर्षातली दुसरी कापणी करायसाठीं बोलावणं आलं तेव्हां सगळीं कुळं आपापले विळे घेऊन जमा झालीं. त्यांतच ज्योआकिम होता. गवत कापण्याचं तें काम त्याला बरं वाटलं. त्या श्रमांनीं त्याच्या शरीराला आराम मिळूं लागला. तो आपला विळा खांद्यवर चढवी, धारेच्या दगडाचं शिंग कंबरपट्ट्याला लटकावी, आणि शेतांत जाई. जिकडून तिकडून कामकरी जमा झालेले असत. मुकादम असे तो साऱ्यांना रांगेरांगेनं उभं करी, आणि मग कापणीचं काम सुरू होई. पहिल्या अर्धा तासपर्यंत काम जरा रेंगाळत चाले. लोकाचे हात वाकडे तिकडे चालत. पण एकदां स्नायू ढिले झाले कीं साऱ्याच्या हाताना गति येई, आणि मग कामाची खरी मजा सुरू होई. हाताचे मागेंपुढें झोके व्हावे, ताटं कटकन् आवाज करून पडावीं, आणि उभं पीक आडवं करून मागं टाकीत कामकऱ्याची फाइलच्या फाइल पुढेंपुढें सरकत जावी. प्रथम कपाळावरू, नंतर खाद्यावरून अन् मग सबंध पाठभर घामाच्या धारा निथळूं लागाव्या. वाऱ्याची गार झुळूक येई आणि घामानं भिजलेली शरीरं थंड करी. तो ऊष्मा, त्या घामाच्या धारा, कापून पडलेल्या गवतांतून उठणारा तो हिरवट दर्प, जणू आतपस्नानाचा तो एक अपूर्व सोहळाचा असे.

संध्याकाळीं थकून, गळून ज्योआकिम घरीं परते तेव्हां वाटेंत कुंपणापाशीं त्याची व स्टाइनेची गाठ पडे. त्यानं दिलेला लाल रुमाल तिच्या डोक्यावर असे, आणि जणू त्याचीच वाट पाहात थांबल्याप्रमाणें ती उभी असे. ती नजरेला पडताच त्याच्या अंतःकरणाचा दाह सुरू होई, अन् त्याल वाटे तिच्या सौंदर्याचा आपल्याला थोडा विसर पडला आहे. परंतु तें सौंदर्य त्याला पुन्हा स्पष्ट दिसे. तिच्या उभं राहाण्यांत थोडी

लज्जा, थोडा स्नेह, पश्चात्ताप, अन् कांहींसा खोडकरपणा असे. तो तिच्या हातांत हात घाली अन् मग हिलेवाक्टपर्यंत तीं दोघं बरोबर चालत. जणूं त्याचं भांडण कधीं झालंच नव्हतं. ज्योआकिमची मनोराज्यंसुद्धां पुन्हा सुरू होत अन् एक दमलेला शेतकरी विळा टाकून हिरव्या भिंतीच्या खोपट्याकडे परत येत आहे व दारांत त्याची बायको त्याच्या स्वागतार्थ उभी आहे असं चित्र त्याच्या दृष्टीला पुन्हा दिसूं लागे.

या काळांत त्याचं मन जरी अस्वस्थ होतं तरी त्याला झोप अगदीं उत्तम लागे. तो दिवसभर काबाडकष्ट करी व अंथरुणावर अंग टाकल्याबरोबर निद्रावश होई. 'हे' गवताची कापणी जोरांत चालूं होती. तीन शेतं कापून झालीं होतीं. गवताच्या शिगाच्या शिगा जिकडे तिकडे पसरल्या गेल्या होत्या. आतां शेतावर बायका जमूं लागल्या होत्या. कारण पुढचं काम त्याचं होतं.

मध्यान्हाच्या सुमारास कामावरचे सारे स्त्री-पुरुष जंगलाच्या कडेला पाणवठ्याच्या कांठाला पडून राहात. त्यांचीं शरीरं तापलेलीं व घामानं डवडवलेलीं असत. त्यांच्या अंगाला घामाचा व गवताचा असा मिश्र वास येत असे. परंतु पाणवठ्यातलं स्वच्छ थंड पाणी लखलखतांना पाहिलं कीं त्याना मोठं सुख होई. पोरसवदा बायका आपापसांत बोलत, गाणीं गात किंवा एकमेकींची थट्टा करीत. त्यांपैकीं कांहींनी इस्त्री केलेले साधे सुती रुमाल डोक्यावर घेतलेले असत, कांहींच्या डोक्यावरचे रुमाल रेशमाचे असत. ज्योआकिमला वाटे त्या सगळ्यांत स्टाइनेच जास्त देखणी आहे. पण तिच्या मस्तकाभोंवतीं त्यानं दिलेल्या लाल रुमाला-ऐवजीं जांभळा रुमाल त्याला दिसे, व मग माथ्यावर सूर्य असूनहि विषादाचा अंधार त्याला असह्य होई.

सारे कामकरी घरीं परतले कीं स्टाइने ज्योआमच्या जवळ जवळ असे. ती त्याला टाळीत नसे. उलट त्याच्याबरोबर असावं अशी तिची खटपट

चालल्यासारखी दिसे. कार्लबद्दलची भाषा आतां बंद झाली होती, आणि थोड्या दिवसांपूर्वी त्यानं चुंबनाचा जो जुलूम केला त्याचाही उल्लेख तिनं कधीं केला नाहीं. खरं म्हणजे तीं एकमेकांशीं फारच थोडं बोलत. मात्र तीं दोघं बरोबर चालूं लागलीं म्हणजे त्यांचीं पावलं अगदीं लयींत अशीं बरोबर पडत, कीं जणूं त्यांचीं मनं एक झालीं होतीं.

सात आठ दिवसांनंतर सारं गवत कापून झालं. उघड्या जमिनीवर सप्टेंबरच्या सूर्याचीं उन्हं पडूं लागलीं, आणि गवतांतून उठलेला गंध तिखट वाफेप्रमाणें वृक्षराजी ओलांडून हिलेवाक्टपर्यंत पोंचूं लागला. आतां सोमवारीं गाड्या भरल्या जाऊन गवत घरीं जाणार होतं. संध्याकाळीं जोआकिम सगळ्यांच्या मागें एकटाच शेतांत राहिला अन् हिलेवाक्टच्या मुलींच्या मागोमाग जाणारी स्टाइने पुनः पुन्हा त्याच्याकडे वळून पाहूं लागली. एकदम जिकडे तिकडे अगदीं स्तब्ध झाल्यासारखं वाटत होतं गवत कापल्याचे खसखस आवाज होत नव्हते, माणसाचीं बोलणीं हसणीं नाहींशीं झालीं होतीं, गवतावांचून उघड्या पडलेल्या कुरणावरचे रातकिडे सुद्धां शब्द करीत नव्हते. दूर अंतरावर जंगलाच्या सीमेपाशीं एकच एक पक्षी साद घालीत होता.

स्टाइने परत वळली, ज्योआकिमजवळ गेली, अन् म्हणाली,

" घरीं परत यायचं नाहीं कां तुला ? "

" अंहं मी जरा थांबणार आहे. मी अगदीं दमून गेलों आहे; अन् इथेंच पडून विश्रांति घ्यावीशी वाटते मला. "

" आतांशा संध्याकाळीं कुठें दडी मारीत असतोस ? मी तुझी रोज वाट पहाते. "

" वाट पहातेस ?—माझी ?—तूं ? "

स्टाइने झटकन म्हणाली, " होय, मी रोज संध्याकाळीं त्या दगडावर बसतें अन् तुझी वाट पहातें, पण तूं येतच नाहींस ! "

" स्टाइने, मी यावंसं तुला वाटतं ? "

"मला नाहीं कळत. मला आतां कांहींच कळेनासं झालं आहे. पण मी फार कष्टी आहे."

तिनं त्याच्याकडे नजर लाविली होती. तिच्या हृदयाची व्यथा तिच्या दृष्टींत स्पष्ट दिसत होती, पण त्याचंहि हृदय व्यथितच होतं.

"ज्योकेन्, आताशां संध्याकाळीं तूं काय करीत असतोस ?"

"कधीं समुद्रावर जाऊन पोहतों, कधीं इथेंच गवतांत पडतों अन् विचार करीत राहतों."

किंचित् चिडून ती म्हणाली, "तूं पुन्हा मला चमत्कारीक वाटूं लागलास. हें सारं तूं कुठें शिकलास ? अमेरिकेंत ? अच्छा— तुझी मर्जी !—गुड नाइट."

हे शद्व तिनं अगदीं सावकाश उच्चारले. मग आपल्या नेहमींच्या सवयी-प्रमाणें तिनं गवताची एक काडी तोंडात धरली, अन् जायसाठीं ती वळली. तिच्या मागोमाग ज्योआकिम झटकन् गेला, आणि त्यानं तिचा हात आपल्या हातीं घेतला. काहींशा घोंगऱ्या स्वरांत त्यानं विचारलं,

"स्टाइने, तुझं माझ्यावर खरोखर प्रेम असेल-माझ्यासाठीं सारं सोडायाची तुझी तयारी असेल— ऐकलंस का ?—सारं दूर फेकून मी जसा आहे तसा पत्करण्याची तुझी इच्छा—"

"हुं ?—" तिनं उत्सुकतेनं विचारलं.

पण तिचा हात सोडून देऊन तो म्हणाला,

"गुड नाइट. गुड नाइट स्टाइने. मी जें बोललों त्याकडे लक्ष देऊं नको. आतांशा मी काय करतों तुला माहीत आहे ? मी इथे गवतावर पडतों अन् तुझा विचार करीत राहतों. कधीं कधीं सबंध रात्र अशी काढतों. मी मनाशीं म्हणतों, स्टाइने ...स्टाइने...ख्रिस्टीना ! माझ्या मनांत येतं समजा एखादे वेळीं रात्रीं तूं त्या अरण्यांतून माझ्याकडे आलीस आणि गवतावर माझ्या कुशींत निजलीस तर किती बरं होईल ! रात्रभर मी हा विचार करीत राहतों.

यावांचून दुसरं कांहीं मला सुचत नाहीं. गुड नाइट, स्टाइने. आनंदानं झोपीं जा—''

तिनं त्याच्याकडे पाहिलं तेव्हां कुणी रागं भरलं कीं लहान मुलाच्या मुद्रेवर भीतीचा, दैन्याचा अन् आर्जवाचा भाव दिसावा तसा तिच्या मुद्रेवर दिसला. आणि त्यांत कांहींशी गंभीरता व स्त्रीला निसर्गतःच पुरुषाची जी भीति वाटते ती भीति देखील होती. "गुड नाइट" असं ती हलक्या आवाजांत पुटपुटली, अन् मग ती निघून गेली.

ज्योआकिम खालीं गवतांत आडवा झाला. पाण्यांत बुडावं त्याप्रमाणें त्या सुगंधी गवतात तो पडला. त्यानं आपल्या मुठी घट्ट आवळल्या, हातपाय ताणले, व आपल्या शिणलेल्या पण कणखर सशक्त अंगावर, सुंदर छातीवर आपले हात फिरविले. मग सारं शरीर ढिलं सोडून तो स्वस्थ उताणा निजला. त्याच्या माथ्यावर आकाशाचा प्रचंड विस्तार होता, अन् त्यांत आता एकामागून एक चांदणी दिसूं लागली होती आकाशाकडे पाहतां पाहतां निषांत अमर्याद रात्रीच्या विस्ताराशीं आणि तारकांच्या गूढ गतीशीं तो एकजीव झाला. त्याला वाटलं अनंत अंतराळांत आपण तरंगत आहोंत. तो स्टाइनेचा विचार करूं लागला. मग त्याला झोप लागली.

त्याला स्वप्न पडलं. लहानसं पण अगदीं स्पष्ट. आणि तें संपल्याबरोबर तो जागा झाला.

त्याला असं स्वप्न पडलं कीं. आपण आपल्या घरीं विस्कटलेल्या अंथरुणांत पलंगाच्या कठड्यावर पाय टाकून निजलों आहोंत. त्या वयांत तो जसा होता तसेंच आपण पुन्हा झालों असं त्याला वाटलं. एका विलक्षण धाडसी कृत्याचा निश्चय करणारा एक दुर्बल पोरसवदा तरुण. त्यानं आपली सिगरेटची डबी हात लांब करून घेतली, पण ती रिकामी होती. त्याच्या कपाटांत मळक्या कपड्यांचं एक गाठोडं होतं. त्याचा विचार आला कीं त्याच्या मनाला यातना होऊं लागत. त्याच्या खिडकीच्या बाहेरच्या बाजूस माडी

पकडायचं जे जाळं घेऊन तो रोज सकाळीं समुद्रावर जात असे तें वाळत घातलं होतं. दार उघडलं अन् शार्लोट आंत आली. ती आतां म्हातारी झाली होती. स्वप्नांतच तो मनाशीं म्हणाला, होणारच कीं ती म्हातारी. तांबूस केसांच्या हाने फॉससारखी ती दिसायला लागली होती. तिनं त्याला हलवून जागं केलं. तो जागा झाला--अन् इथेंच त्याचं स्वप्न संपलं.

तो पुन्हा नीट भानावर आला. रात्रीच्या प्रहरीं गवतांत पडल्या पडल्या या स्वप्नाची आठवण तो मानवेगळी करूं लागला, तोंच कुणी तरी आपल्या-जवळ उभं आहे असं त्याला वाटलं. कांहीं वेळ तें कोण असावं त्याला नीट कळेना. रात्र असूनही एक विचित्र, अस्पष्ट प्रकाश दिशांत थरथरत होता. चंद्राचा प्रकाश फिकट होत चालला होता, आणि पश्चिमेकडे अरण्यांतल्या झाडांच्या माथ्यांवर चंद्रबिंब तरंगत होतं. समुद्राच्या दिशेला उन्हाळी वीज पुन:पुन्हा लकाके आणि तिच्या प्रकाशांत मधेंच खालची जमीन किंवा मधेंच समुद्राचं पाणी दृष्टीस पडे.

"कोण, स्टाइने ? तूं ?" त्यानं हलकेंच विचारलं. त्याचा आवाज कापरा झाला आणि जणूं हृदय उचंबळून त्याच्या कंठांत आलं.

"होय, मीच."

"तूं माझ्याकडे आलीस —? तूं ?"

"होय मी तुझ्याकडे आलें आहे. पण तूं मला कसलाहि उपसर्ग देतां कामा नये"

"नाहीं—नाहीं; मी कांहीं करतां कामा नये, मला माहीत आहे; अन् मी कांहीं करणारही नाहीं. तुला दिसतंच आहे कीं, मी अगदीं स्वस्थ पडलें आहे. ये, अशी माझ्याजवळ बैस. तूं आलीस ! किती गोड आहेस तूं. मी तुझा हात धरूं ?"

"हं धर."

"तुझीं बोटं किती मजबूत. कार्ल होल्स्टबरोबर तुझं लग्न झालं तर किती धीराची पत्नी त्याला मिळेल. तूं खूप कष्ट करशील अन् आपल्या नवऱ्यावर प्रेम करशील. रडूं नकोस. स्टाइने, स्टाइने लाडके, रडूं नकोस. तुझ्या डोळ्यांतून आसवं ओघळत आहेत काय? बघ, मी तुला कसला तरी उपसर्ग देतों आहे काय? मी निमूट पडून राहिलों आहे अन् विचार करतों आहे स्टाइने, तुझं म्हणणं बरोबर आहे, किती झालं तरी मी काय एक परका मनुष्य. तुझी वांच्छा मीं करतां कामा नये. माझा सारा इतिहास तुला कळला तर—छे—नव्हेच तें. पण स्टाइने, तुझं माझ्यावर प्रेम आहे काय?"

"अगदीं फार—"

"पण नको. तूं कार्लशीं लग्न कर. तेंच सुखाचं होईल. पण त्य दिवशीं तूं मला प्यायला दूध दिलंस अन् आज रात्रीं तूं अशी माझ्याकडे आलीस. स्टाइने, हें बघ मी अंतर्यामीं अगदीं एकटा आहे. अन् त्यामुळें माझ्या भावना मला आवरतां येत नाहींत. पण या क्षणीं मी फार सुखांत आहे. अशा सुखांत असणं म्हणजे माझ्या दृष्टीनं केवढी मोठी गोष्ट आहे तें कदाचित् तुला कळायचं नाहीं. पण मी तुला सांगतों, या क्षणीं भारी सुखांत आहे मी. पाहिलंस, आतां जिकडे तिकडे कसं शांत झालं आहे—"

ज्योआकिमनं आपले हात तिच्या स्तनांवर ठेवले. आणि त्यांमधील मृदु पोकळींत आपलं मस्तक टेकलं तिच्या हृदयाची धडधड त्याला त्या स्तनांतून ऐकूं येत होती. अन् त्याला वाटलं ते जणूं दोन थरथरते चिमणे पक्षीच आहेत! त्याचा जीव उल्हसून जांभळ्या चंदेरी ढगावर बसून चंद्रबिंबाच्या अंगावरून पार पलीकडच्या अनंत आकाशाच्या पोकळींत भराभर गेला.

# १६

हिलेवाक्ट म्हणजे गवती छपराच्या आठ झोपड्यांचं एक गांवढं गांव. पण बाहेरच्या विस्तीर्ण जगांत मानवी जीवित वैचित्र्यानं जितकं भरलेलं असेल तितकंच इथेंही तें भरलेलं होतं. मानवी स्वभावाच्या साऱ्या तऱ्हा इथें सापडण्यासारख्या होत्या. हर्ष, खेद, शौर्य, भय, कठोरता, मृदुता, संतोष, असंतोष, अशा साऱ्या भावना इथे व्यक्त होत होत्या. जो तो आपल्या जीवनपथावरून चाललेला होता. इथल्या लोकांपैकीं पुष्कळ असे होते की ते आपआपलं दैव आपापल्या हातानं घडवीत होते; पण पुष्कळ असेही होते कीं दैवानं जें दिलं तें धीरानं सहन करीत होते. इथली एकेक व्यक्ति मृत्युवश झाली कीं एका मानवी चरित्राची अखेरी होत होती. कमी अधिक भलेपणानं आणि धीरानं जीवीताशीं झगडून, सुखदुःखाचा आपला वाटा भोगून, एका अनंत नियतीच्या सूत्रानुसार सारे लोक आपल्या प्रवासाच्या अखेरच्या टप्प्याकडे चाललेले होते.

कूसेचीच गोष्ट पाहा. तो इतका अबोल होता कीं एखाद्याला वाटाव हा मुका

तर नाहीं! पण तो कांहीं बोलत नसे यावरून त्याला कसली चिंता नव्हती असं समजतां आलं असतं काय? नाहीं. त्याची बायको ज्वरानं आजारी झाली तिला खोकला येऊं लागला, पण तिचं तें दुखणं, विशेष विकोपाला जाईल असं वाटलं नव्हतं. पण मग रात्रीच्या प्रहरीं तिला वाताचा झटका येऊं लागला. वाताच्या भरात ती आपल्या मुलांची आठवण काढूं लागली. सात मुलं होतीं तिला. आणि दुसऱ्या दिवशीं बिचारी मरण पावली!

शहरांत जाऊन प्रेतवाहनाची पेटी आणणं क्रूसेला भाग होतं. डोक्यावर जबरदस्त प्रहार होऊन मूर्च्छित झालेल्या माणसाप्रमाणें क्रूसे व्यवहार करीत होता. त्याची सगळयांत थोरली मुलगी अनी क्रूसे वयानं जरा मोठी होती म्हणून बरं. आतां "किएल" गांवातील आपली नोकरी सोडून घरीं येणं तिला भागच होतं. ती मूळची मोठी बळकट बांध्याची देखणी मुलगी होती; पण ती किएलहून घरीं आली ती अगदीं बदलेली, सुकलेली आणि म्हातारी दिसूं लागलेली; तिला काय झालं होत देव जाणे. परंतु ती कसलं तरी दुःख सोशीत होती खास. बापाच्या घरीं आल्यावरही ती रोजच्या रोज आणखी आणखी थकूं लागली, अधिकाधिक बिकट दिसूं लागली. तिला झालेलं मूल जगलं असतं तर बरं झालं असतं. परंतु तें जगलं तर नाहींच, पण फशीं पडलेल्या त्या बिचाऱ्या मुलीच्या देहाला व्याधि मात्र जडली शहरातल्या एका डॉक्टरला तिची प्रकृति दाखविली तेव्हां त्यानं तिला इस्पितळात पाठवलं. पण तिथेंच आठ दिवसांच्या आंत ती वारली, आणि लोक अपापसांत कुजबुजूं लागले कीं, कसल्या तरी जालीम औषधानं तिचं पोट बिघडलं होत अन् त्यातच तिचा अंत झाला होता.

क्रूसेच्या वाट्याला हीं असलीं दुःख आलीं होतीं. तो त्याबद्दल तोंडांतून 'ब्र' सुद्धां काढीत नसे; पण म्हणून त्याच्या अंतर्यामी यातना कमी होत्या काय? त्याच्या घरांत मुलंबाळं असूनही तें त्याला भकास वाटे, आणि तो

खुरडल्यासारखा घरांत इकडे तिकडे वावरे. मचव्याच्या कामांतहि त्याचं लक्ष नसे. हवा कशीही असली तरी तो मचवा घेऊन खुशाल समुद्रांत जाई. हलके हलके त्याच्या डोक्यावरचे केस पांढरे होत चालले....

त्याचप्रमाणें हाने फॉसचा मुलगा हाइन. त्याच्या परीनं त्यालाही दुःख होतंच, आणि तें सहन करीतच तो आयुष्य कंठीत होता. त्याचं मन मोठं महत्त्वाकांक्षी होतं, आणि त्याला किती तरी गोष्टी कराव्याशा वाटत होत्या. त्याच्या अंगचे सारे गुणदोष विचारात घेतले तर कुणीही असंच म्हटलं असतं कीं विजारीच्या खिशांत हात घालून हिंडणारा व तोंडांत सारखी तंबाकू चघळणारा ठेंगणासा हाइन म्हणजे मानवी चरित्राचा एक नमुना होता. बुडून मेलेल्या आपल्या बापाचे बूट आणि त्याची विजार तो मोठ्या अभिमानानं घाली, जनू त्या पोषाकांत हिंडतांना तो मोठा रुबाबदारही दिसे. तथापि आपल्या बापाचं काम आपण करावं ही जी त्याच्या मनांतली इच्छा ती मात्र पुरी होत नव्हती. आपल्याला कोणी विचारीत नाहीं असं त्याला सारखं वाटत असे. ज्योआकिम आल्यापासून त्याच्या आईनं त्याच्याकडे अगदींच दुर्लक्ष केलं होतं. त्याच्या मनांत सारखं येई, आपल्या आईनं आपलं थोडं देखील कौतुक का करू नये ! तो शूर होता आणि उद्योगी होता. घरकामांत आणि मच्छीमारीच्या कामात तो मदत करीत असे, कारा नांवाच्या आपल्या छोट्या बहिणीला जितकं येईल तितकं शिकवीत असे, घोड्याचा खरारा करीत असे, गाडीची साफसुफी करी, बागकाम करी, पाणी आणी, कोळसे आणी, आणि अलीकडे तर गोठ्यासाठा नवे खाब रंधून तयार करण्याच्या उद्योगाला तो लागला होता. परंतु त्याची आई त्याला कधीं प्रशंसेचा शद्ब बोलून दाखवील तर शपथ. तोंडातून एक शद्बहि न काढतां आणि जड अंतःकरणानं तिचे व्यवहार चालत, आणि अमेरिकेकडून आलेल्या त्या नव्या पाहुण्याकडे तिची दृष्टि सदा लागलेली असे. कितीदां तरी आपला आपल्याशींच ती दीर्घ निःश्वास टाकी.

हें सार पाहून हाइनच अंतःकरण मारी कष्टी होत असे. कांहीं झालं तरी तो अजून पोरसवदाच तरुण होता. अपल्या आईनं आपली प्रशंसा करावी, आपल्या पाठीवरून हात फिरवावा असं त्याला वाटणं साहजिक होतं. ज्योआकिमशीं भांडण–तंटा करून आपल्या अंःतकरणांतला सारा राग त्याला काढून टाकता आला असता तर त्याच्या मनाचा कोंडमारा कमी झाला असता; पण दुर्दैव असं की त्याला स्वतःला ज्योआकिमविषयीं आदर व प्रेम वाटे. आपण त्याच्यासारखं कर्तबगार व्हावं अशी त्याच्या मनाची धाव होती; आणि त्यामुळें विजारींत हात खुपसून, तोंड घट्ट दाबून घेऊन आणि मुद्रेवर तिरस्कार दाखवून ज्योआकिमवर रागानं तोंडसुख घेण्याचा त्यानं कितीहि प्रयत्न केला तरी अंतःकरणांतल्या प्रेमभावामुळें त्याला तो साधतच नसे. त्याला उघड उघड दिसे कीं, ज्योआकिम आपल्या घरीं आला व त्यानं मनःपूर्वक कष्ट केले म्हणूनच आपली जमीन पुन्हा नीट नेटकी झाली, घराला जरा रूपं आलं. आणि या उपकाराबद्दल ज्योआकिमला काय मिळत होतं, तर आसऱ्याची जागा आणि एखाद्या सामान्य नोकराला मिळेल इतकीच मजुरी.

हाने फॉसच्या अंतःकरणांतही ज्योआकिमविषयीं गाढ कृतज्ञता उत्पन्न झाली होती. तिचं आजपर्यंतचं आयुष्य दुःखांतच गेलं होतं. तिचा नवरा जिवंत होता तोंपर्यंत त्याच्या दारूडेपणामुळें तिच्या वांट्याला दुख, कष्ट आणि असंतोष यांखेरीज कांहींच आलं नव्हतं. पण ज्योआकिम आल्यापासून तिचा दुःखभार नाहींसा झाला होता. आयुष्यांत प्रथमच निश्चिंतपणानं ती जगूं लागली होती. अर्थात् ज्योआकिम आपला उपकारकर्ता आहे अशी भावना तिच्या ठिकाणीं उत्पन्न झाली होती.

ज्योआकिमसारखा निर्व्यसनी आणि उद्योगी पुरुष आपल्या घरीं राहूं लागल्यापासून आपलं आयुष्य किती निराळ्या तऱ्हेन जाऊं लागलं तें हानेला स्पष्ट

दिसत होतं. तिच्या अंतर्यामीं एक अशी काहीं नवीनच प्रसन्नता उत्पन्न झाली कीं तिचं वर्णन तिला शब्दांनीं करतां आलं नसतं. मात्र त्या प्रसन्नतेविषयीं तिचा तिलाच विस्मय वाटला. ती अधिकच अबोल झाली, लोकांत मिसळावंसं तिला वाटेना. आणि स्टाइने दिसली कीं तिला वाटे आपण दूर जावं. ज्योआकिमच्या निजण्याच्या खोलींतल्या खिडकींत तिन फुलझाडाच्या कुंड्या ठेवल्या, भिंतीवर एक शिकारीचं चित्र टांगलं, रोजच्या रोज पाव रोटीबरोबर ईल माशाचा भाजलेला तुकडा ती ज्योआकिमला खाऊं घालूं लागली, आणि त्याला प्यायसाठीं ती दूध देई त्यावरची साय ती तशीच राहूं देई. अरेरे! मध्यवयांतल्या स्त्रीच्या अंतःकरणांत प्रेमाचा उद्‌भव झाला कीं त्याची तिला शरम वाटावी, व आपली प्रीति आपण आवरली पाहिजे अशी भावना असावी कीं निसर्गाचा ही किती दुष्ट तऱ्हा! मनातल्या मनांत ती स्वतःची आणि स्टाइनेची तुलना वारंवार करीत असावी. स्टाइने अंगावरून गेली कीं तिनं अगदीं डोळे फोडून तिच्यामागं पाहत राहवं, आणि मग झट्‌कन घरांतल्या खोलींत जाऊन कपड्याच्या पेटीवरच्या आरशापुढें उभं राहून स्वतःकडे पाहत राहावं. ती देखणी नव्हती. तिच्या भुवया दाट नव्हत्या तिचं शरीर मजबूत होतं, पण ती स्थूल होती ती मोठ्या कसोशीनं आपले हात व आपलं तोंड धुऊन स्वच्छ करूं लागली, अन् रोज सकाळीं आपले गाल चोळून साफ करूं लागली. केस विंचारतांना ती त्यांवरून मोठ्या कौतुकानं पुनः पुन्हा हात फिरवी तिचे केस लांबसडक आणि दाट होते. अगदीं एखाद्या तरूण स्त्रीसारखे. आजपर्यंत ती ते अगदीं घट्ट कपाळावरून मागें घेऊन बांधीत असे पण एके दिवशीं ती आपल्या खोलीच्या बाहेर आली तों एखाद्या अपराध्याप्रमाणें तिची दृष्टि खालीं जमिनीकडे लागलेली होती. तिनं केसांचा भांग काढला होता, अन् त्यांचे फुगे कपाळावर बरेचसे पुढें आणून तिनं ते अगदीं सैलसे बांधले होते. सुंदर दिसण्याची आपली ही खटपट ज्योआकिमच्या लक्षांत येणार या विचारानं तिचं अंतःकरण व्यथित होत होतं...

परंतु असल्या गोष्टींकडे लक्ष देण्याच्या मनःस्थितींत ज्योआकिम कुठे होता ? तोंड गच्च दाबून धरून, मान वर करून त्याला आपल्या विवेकबुद्धीशी झगडायचं होतं ना ? स्टाइने किती झालं तरी एक अवघ्या सतरा वर्षांची मुग्ध किशोरी होती. ती स्वतःच्या निश्चयानं आपला मार्ग ठरवील हें शक्य नव्हतं. परिस्थितीबरोबर वाहत जावं आणि दैवानं जें वाट्याला येईल तेंच आपलं सुखदुःख मानावं अशीं जीं माणसं असतात त्यांतली स्टाईने होती. ती धैर्यानं कांहीं करील हें शक्य नव्हतं. तिच व स्वतःचं भवितव्य ठरविण्याची जबाबदारी ज्योआकिमलाच पार पाडायची होती. त्याला पुनः पुन्हा असा जबरदस्त मोह पडे, कीं स्टाइनेला बाहुपाशात घट्ट धरावं, तिला आपलीशी करावी, आणि इथून निघून जावं...

परंतु जावं म्हणजे कुठें जावं ? पुन्हा पूर्वीचं तें भटकयाचं आयुष्य पत्करून तसल्या आयुष्यांत आपली सहचारिणी होण्यास स्टाइनेला तो सांगणार होता ? इथं या समुद्रकिनाऱ्यालगत कुरणा-कुरणांतून मेंढरं चरत होतीं, मेंढपाळ त्याच्याकडे दृष्टि लावून सुखानं स्वस्थ बसले होते, समुद्रांत शिरणाऱ्या मच-व्याची पिंगट शिडं वाऱ्यावर डौलानं फडफडत होतीं याखेरीज दुसऱ्या कोणत्या तरी परिस्थितींत स्टाइनेला सुख शक्य होतं काय ? कालेशीं तिचं लग्न झालं तर ल्यूटे गावांतल्या एका झोपडींत तिचा संसार व्यवस्थितपणें सुरू होणार होता. दूर देशाला गेलेलं जहाज परत येत होतं, अन् त्यांतच काले होता. स्टाइनेसारखाच त्याचा वर्ण पिंगट असेल, तिच्यासारखा त्याचा स्वभाव निष्कपट असेल, आणि त्याचे केसही तिच्यासारखेच पांढुरके असतील.

मानवी जीवितांत सामान्यतः जेवढं सुख मनुष्याच्या वाट्याला येतं तेवढं आपल्याला मिळालं असं मानणं ज्योआकिमला एका दृष्टीनं भाग होतं. गेल्या सबंध ग्रीष्म ऋतूभर त्यानं सुख उपभोगलं होतं, आणि हें सुख कांहीं थोडं नव्हतं. किंबहुना दैवानं त्याच्यावर अकल्पितपणें मेहेरबानी केली होती, अन् ज्या सुखाची त्याला कल्पनाही नव्हती असं सुख त्यानं अनुभवलं होतं. पण

आतां सुखानंतर दुःख त्याच्या वाट्याला येणारसं दिसत होतं. त्यानं आपल्या ग्रंथसंग्रहांतून एक पुस्तक काढलं. हें त्यानं कितीदा तरी वाचलं होतं. त्यांतलं एक पान त्याला आतां अगदीं पाठ झालं होतं, तें त्यानं उघडलं. होय, साऱ्या मानवजातीला उद्देशून लिहिलेलं तें धीरगंभीर वाक्य त्या पानावर त्याच्या दृष्टीला स्पष्ट दिसत होतं.

" माणसाला केव्हांही नीतीनं वागायचं झालं कीं त्याग, आत्मसंयमन, स्थितप्रज्ञता इत्यादि गुणांचं कठीण व्रत त्याला पत्करावं लागतं... "

किती कठोर शब्द हे ! त्या शब्दाचं सत्य ज्याच्या अनुभवाला पूर्णांशानं येत होतं त्याला तर त्यांची कठोरता फारच जाचण्यासारखी होती. ज्योआकिमनं आपलीं सारीं पुस्तकं दूर लोटलीं आणि तो समुद्राकडे चालत गेला. त्याचं मन अत्यंत अस्वस्थ झालं होतं, आणि कसंही करून मनाची शांति परत मिळवावी असं त्याला वाटत होत. उतरणीपलीकडच्या गवतावर स्टाइने हातांत पाण्याची हिरवी झारी घेऊन जातायेताना या वेळीं नेहमीं दिसे. कार्लशीं लग्न झाल्यावर उपयोगीं पडावं म्हणून हातविणिचं जाडंभरडं कापड तयार करून तिनं तें गवतावर पसरलं होतं, आणि त्यावर पाणी चुबकायसाठीं ती पुनः पुन्हा घरांतून बाहेर येत असे. ज्योआकिम निघाला अन् त्यानं कुरणाभोंवतीं एक फेरी मारली. सुदैवानं स्टाइने त्याला दिसली नाहीं. मग तो समुद्रकांठच्या वाळूत पडला आणि एखादी वस्तु दृष्टीपुढें धरुन न्याहाळावी त्याप्रमाणें तो आपल्या स्वतःच्या आयुष्याचा विचार करूं लागला.

एकंदरींत पाहतां त्याचं आयुष्य खडतर झालं नव्हतं. त्याला दुःख सोसावं लागलं होतं, कष्ट करावे लागले होते, प्रियजनांच्या सहवासाला मुकून एकान्त सोसावा लागला होता, आत्मसंयमनाची गुप्त शिक्षा भोगावी लागली होती, सुखासीनत्व आणि विलास त्याच्या वाट्याला आले

नव्हते. परंतु जें जें सुखदुःख वाट्याला आलं तें आपल्या कृतकर्मानं आलं असंच त्याला सदैव वाटलं होतं. तारुण्याच्या ऐन आरंभाला त्याच्या हातून हत्या घडली होती. अशी हत्या कीं जिचं क्षालन कशानंही होऊं नये. प्रारंभीच वाममार्गानं गेलेल्या त्याच्या या अशल्या आयुष्यांत प्रेमसाफल्याचं सुख कसं बर असेल? ज्या घराच्या भिंती हिरव्या रंगानं रंगविल्या आहेत, सूर्यानं प्रकाशित केलेल्या खिडक्यांवर पांढरे स्वच्छ पडदे सोडले आहेत, आणि छपराखालीं लहान लहान चिमण्यांनीं घरटीं केलीं आहेत, अशा घरांत आपल्या प्रियतमेबरोबर राहण्याचं सुख त्यच्या वाट्याला येणं कसं शक्य होतं?...

'स्टाइने, येतों मी'... कर्म आणि भोग याची बरोबर वजाबाकी झालीच पाहिजे...'स्टाइने, येतों; एका ऋतुपुरताच तुझा सहवास मला लाभला हें काय थोडं झालं? येतों, येतों...'

अशा प्रकारें हिलवाक्टच्या लोकांचीं सुखदुःखमिश्रित जीवितं चाललेलीं होतीं. दिवसांमागून दिवस गेले. नाताळाचा सण आला. स्टाइनेचं लग्न झालं. हाने फॉसनं आपल्या हातानं विणलेला लोकरीचा गरम स्वेटर ज्योआकिमला सणाची भेट म्हणून दिला.

पुढें उन्हाळ्यात हाने फॉसचा घोडा एकाएकी मेला. तो घोडा म्हणजे तिच्या धंद्यात तिला अत्यंत उपयोगी असणारं असं एक जनावर होतं; आणि शिवाय आज इतकीं वर्षं तिनं त्याला प्रेमानं संभाळलं होतं. त्यामुळें त्याच्या मृत्यूचं तिला भयंकर दुःख झालं. धीर खचूं न देणारी स्त्री होती ती; परंतु घोडा मेल्याचं कळल्याबरोबर ती धावत अपल्या खोलीकडे गेली आणि हुंदके देऊन देऊन किती वेळ तरी रडली. कांहीं दिवस तिच्या घरांत जिकडे तिकडे सुतकाची अवकळा पसरल्यासारखं झालं. पण मग ज्योआकिमनं एके दिवशीं सारं वातावरण बदलून टाकलं. शहरांत जाऊन त्यानं बँकेतून

आपले पैसे काढले आणि एक देखणा बच्चा घोडा खरेदी करून आणून ता हानेच्या स्वाधीन केला. तें शिंगरू अजून कोवळं होतं. कुरणावर इकडे तिकडे तें स्वैर धावूं लागलं या गोष्टीनं हिल्लेवाक्टमध्ये अगदी खळबळ उडाली काहीं दिवस लोकाना तोच एक विषय होऊन राहिला, आणि त्यावरून जो तो निरनिराळे तर्क बांधूं लागला क्रूसे इतका अशील मनुष्य, पण त्याला सुद्धां ज्योकेननं आपल्या पैशांतून हानेसाठीं घोडं खरेदी करावं ही गोष्ट साधी वाटली नाहीं. एके दिवशीं मच्छीमारीचं काम आटपून घरीं परत येत असतांना तो म्हणाला,

"ज्योकेन, मला वाटत आता लवकरच तूं हानेशीं लग्न करशील!"

तें ऐकतांच ज्योआकिमला अगदीच वेड्यासारखं आणि गोंधळल्यासारखं वाटलं "छीः, मूर्ख तर नाहींस तूं?" असं म्हणून त्यानं तो विषय संपविण्याचा प्रयत्न केला. परंतु क्रूसची खात्री पटली नाहीं. काही वेळानं तो पुन्हा एखादी अगदी उघड दिसणारी गोष्ट बोलल्याप्रमाणें म्हणाला, "बरोबर आहे, ज्योकेन, आता तूं लवकरच हानेशीं लग्न करशील."

नंतर उघड्या हवेंत ज्योआकिम पडला असतांना हानेचा मुलगा हाइन त्याच्याजवळ आला. त्यानं तंबाकूच्या थुंकीची जोरानं पिचकारी मारली आणि तोच विषय काढला.

प्रथम त्यानं घोड्याची तारीफ केली. तो आल्यापासून तो रोज मोठ्या कसोशीनं त्याचा खरारा करीत असे. असा उमदा घोडा हिल्लेवाक्टमध्यें किंवा ल्यूटेमध्यें तर नव्हताच, पण शहराकडे जाणाऱ्या कोणत्याही मासळीच्या गाडीला इतकं उमदं जनावर जोडलेलं कुणाला दिसलं नसतं. अशा प्रकारें घोड्याची बरीच तारीफ केल्यावर त्यानं पुन्हा एकदां विचारलं, "आता तुझं, या घोड्याचं, आणि माझ्या आईचं कसं काय व्हायचं रे?"

ज्योआकिमनं त्याच्याकडे आश्चर्यानं पाहिलं. पण त्यानं आपलं बोलणं पुढें चालूं ठेविलं,

" खोटं नाहीं ! तूं उगीचच घोडं दिलंस असं तर तुझं म्हणणं नाहीं ? इथें आजूबाजूस कोणी नाहीं. तुझ्या मनांत काय हेतु आहे तो मला तूं सांगितला पाहिजे. कुणी उगीचच्या उगीच दुसऱ्यासाठीं घोडं खरेदी करील, दुसऱ्याच्या तबेल्यांत बांधील अन् कामाला लावील, यावर कुणाचा विश्वास बसणं शक्य नाहीं. का घोड्याचे पैसे तूं पुढें मागें माझ्या आईकडून घेणार आहेस ? "

" हाइन, हें काय विचारतोस तूं ! घोडं माझ्या मालकीचं आहे. "

" बरोबर आहे. अर्थात् घोडं तुझ्या मालकीचं आहे. पण घोडं सोडलं तर दुसरं काय आहे ? तूं नेहमीं मागें म्हणत असतोस माझं जाळं, माझा मचवा माझ्या गायीला वासरू झालं, आमच्या गोठ्यात थोडे नवे खांब हवे आहेत. असल्या तुझ्या बोलण्याचा अर्थ काय ? इथल्या साऱ्या जिंदगीची मालकी बळकावायचा बेत आहे कीं काय तुझा ? बलिफाची गाठ घ्यायलाहि तूं वरचेवर जात असतोस पण तुला एक गोष्ट सांगून ठेवतों पुढें तुझी निराशा होऊं नये म्हणून तूं ती लक्षात ठेव. आमच्याकडे अशी रीत आहे कीं बापाची मिळकत सरळ मुलाला मिळायची; आणि मी वयात आलों कीं हें सारं माझ्या मालकीचं झालंच पाहिजे. "

" होय बेटा, मला हें सारं पक्कं माहीत आहे ! "

" मग आमच्या जिंदगींत तू आपला सारा पैसा कशासाठीं घालतोस ! काय विचार आहे तुझा ? सांगून टाक मला. त्याला हरकत कसली ? "

ज्योआकिमनं चिडून म्हटलं, " अरे कसला आलाय् विचार–? आपण सगळ्यानीं मिळून सुखांत राहावं एवढंच. मी तुमच्या घरीं राहत नाहीं ! आपल्याला घोड्याची गरज लागली, तें विकत घेण्याइतके पैसे माझ्याजवळ

हीमे, मीं घोडं खरेदी केलं. तुझा बाप माझ्या जागीं असता तर त्यानं असंच केलं नसतं काय ? "

एकदम समाधानाची मुद्रा करून हाइन म्हणाला, " हेंच मला समजायला हवं होतं. माझ्या बापाच्या जागीं तूं स्वतःला समजत असलास, तर ज्योकेन, सगळें ठीक अन् रास्त आहे. मग माझं कांहींच भांडण नाहीं. तूं केलंस तें बरोबरच आहे पण ही कल्पना प्रथम केव्हां आली तुझ्या डोक्यात ?

तें संभाषण अशा अकल्पित वळणावर संपलं. मग ज्योआकिम उठला आणि घराकडे परतला. त्याचं चित्त कांहीं स्वस्थ नव्हतं तो उद्योग करूं लागला, परंतु त्याची नजर पुनः पुन्हा चोरटेपणानं हानेकडे वळूं लागली. तिच्याशीं लग्न करण्याचया दृष्टीनं त्यानं तिच्याकडे पूर्वी कधींच पाहिलं नव्हतं. तो आपल्या स्वतःच्या आयुष्यात इतका रमला होता की त्यानं यापूर्वी हानेला नीटसं निरखून पाहिलं देखील नव्हतं. आतां मात्र तो पाहूं लागला, आणि त्याला ती कांहीं वेगळीच दिसूं लागली.

हाने ज्वानीच्या भरांत होती असं कसं म्हणतां येईल ? परंतु तिची पूर्वीची फिकट आणि थकल्यासारखी मुद्रा आतां राहिली नव्हती. तिच्या दृष्टींत नवीनच सखोलता आली होती; आणि तिला माहीत नव्हतं पण ती ज्या ज्या वेळीं ज्योआकिमकडे पाही त्या त्या वेळीं तिची नजर उत्सुकेतनं भरल्यासारखी दिसे. तिचं वय आता चाळीस वर्षांच झालं होत, आणि तिच्यात सौंदर्य नव्हतं; परंतु ती जेव्हा गृहकृत्यांत गुंतलेली असे तेंव्हा तिच्याकडे पाहाणाऱ्याला वाटावं, हिच्या ठिकाणीं कांहीं एक विशेष रुबाब आहे खास. ज्याचीं पाळंमुळं जमिनींत खोल गेलेलीं आहेत व ज्याच्या शाखाची विस्तीर्ण शीतल छाया पसरली आहे अशा वृक्षाप्रमाणें हाने होती.

तिसऱ्या प्रहरची घटका झाली तेव्हां ज्योआकिम बाहेर पडला, आणि आपल्या मनाशीं विचार करीत भटकत भटकत ल्यूटे गांवापाशीं आला. एका

विश्रांतिगृहांत शिरून त्यानं थें डं मद्य घेतलं. मग तेथून निघून तो गांवा-तल्या वस्तीच्या भागातून जाऊं लागला. ऊन सपाटून पडल होतं, आणि घरांगातल्या बायका बाहेर आपापल्या जाळ्याची डागडुजी करण्यात गुंगल्या होत्या. काल हॉल्स्टच्या घरापुढें ज्योआकिमला स्टाइने दिसली ती आतां पूर्वीमारखी सडसडीत राहिली नव्हती. तिला दिवस गेले असल्यामुळें ती जराशी स्थूल दिसत होती, आणि आपले लाकडी जोडे घालून ती इकडे तिकडे डुलत डुलत हिंडत होती.

" मॉर्निंग, स्टाइन ! "

" मॉर्निंग, ज्योकेन ! "

" आज उकडतं आहे. "

" हो. पण आतां लवकरच वारा वाहूं लागेल. "

" हो, असं दिसतं "

" तुझं कसं काय चाललं आहे ज्योकेन् ? तूं एक घोडं विकत आणलंस असं ऐकतें ? "

" होय. आम्ही ठीक आहोत. स्टाइने, तूं ? "

" मी ठीक आहे ज्योकेन्. "

" अच्छा स्टाइने. "

" अच्छा ज्योकेन्. "

म्हणजे प्रीति देखील शाश्वत नव्हती तर ! ज्योआकिमचं अंतःकरण अगदीं शांत होतं. अंतःकरणांतून एकदम कुठले तरी गुप्त झरे फुटून उसळल्या-प्रमाणें जी भावनेची लाट त्याच्या अनुभवाला पूर्वी येत असे ती आतां नाहींशी झाली होती. कसली सुद्धां हुरहुर नव्हती. आठवण देखील उरली नव्हती. परंतु त्यामुळें दुःखही सरलं होतं. वारा अजीबात पडावा आणि

समुद्राचं पाणी अगदीं निश्चल शांत दिसावं तशी अवस्था ज्योआकिमच्या प्रत्ययाला येत होती...

बेलिफाच्या घरावरून जातां जातां तो सहज आंत शिरला. त्याचं कांहीं काम नव्हतं, पण सहज गप्पा मारायला म्हणून. बोलतां बोलतां बेलिफ म्हणाला,

"बूथ, तुझ्या हिताची म्हणून एक गोष्ट तुला सांगतों. आतां अधिक दिरंगाई न लावतां तूं आपलं राहणं कायद्याच्या दृष्टीनं नीट व्यवस्थित करावंस हें चांगलं."

"होय, पण कसं?"

"तुझा साराच प्रकार कायद्याच्या दृष्टीनं विलक्षण आहे हें कसं तुला कळत नाहीं? घोडं तुझ्या मालकीचं, गाडी क्रूसेच्या मालकीची, आणि मचव्यामध्यें हाईनची पाती! ठीक पण काम तर सारं तूं करतोस एखाद्या सामान्य मजुराला मिळावी इतकीसुद्धा मजुरी तुला मिळत नाहीं, आणि तुझी काम करण्याची तऱ्हा पाहावी तों जशी कांहीं सारी इस्टेट तुझ्या मालकीची!"

"होय, मला जेवढं करतां येईल तेवढं करावं या बुद्धीनं मी वागतों. मी जें काम करतों तितकं करणं माझं कर्तव्य आहे असं मला वाटतं."

"कर्तव्याच्या गप्पा राहूं देत तुझ्या. माझं म्हणणं असं कीं कायद्याच्या दृष्टीनं हें सारं वाकडं तिकडं आहे तुझं सारं वागणं मालकासारखं, पण तूं मालक नाहींस. म्हणून म्हणतों—"

"इस्टेट संभाळायचं काम तेवढं माझं समजतों मीं. हाइन मोठा चांगला मुलगा आहे. लवकरच तो वयांत येईल आणि मग—"

"मला वाटतं तुझ्या खऱ्या नांवानं तुला कुणीच हाक मारीत नाहीं, होय ना? सारे जण तुला फॉस म्हणतात."

"हो, म्हणतात खरं."

"मग बाबा; हू म्हण अन् हानेशीं लग्न लावून टाक. तसं केलंस म्हणजे सारं ठीक होईल. कायद्याच्या दृष्टीनं मग कांहीं तक्रार राहायची नाहीं."

"परंतु बेलिफसाहेब, माझी खरी अडचण तुम्हांला माहीत आहे. माझ्या-वर तो डाग असतांना मी हानेशीं कसं लग्न करूं?"

या गोष्टीला कांहीं दिवस झाले, आणि तो विषय तितक्यातच राहिला.

परंतु मग एकदां रात्रीच्या वेळीं हानेनं स्वतःच त्याबद्दल बोलणं काढलं. तो एक पुस्तक वाचीत पडला होता, आणि दिव्याच्या पलीकडच्या बाजूला हाने शिवणकाम घेऊन बसली होती. ती बोलूं लागली ती थांबत थांबत आणि चाचरतच. तिच्या घरांत ज्योआकिमची अवस्था चमत्कारिक होती. तो धड नोकर नव्हता, धड मालक नव्हता. तिची स्वतःची इच्छा अशी होती कीं त्यानं मालक म्हणून राहवं...बोलता बोलता तिनं आपले हात मांडीवर टेकले, आणि हलक्या आवाजांत पुढें म्हटलं, "तुझे माझ्यावर उपकार झाले आहेत. तुझ्यावर फार जीव लागला आहे माझा. तुझ्यासारखा पुरुष मीं अजून कधीं पाहिला नव्हता..."

ही कबुली देतांना तिला किती प्रयास पडले असतील याची ज्योआकि-मला कल्पना होती. त्यानं पुस्तक दूर लोटलं, क्षणमात्र विचार केला, आणि मग आपल्या मनातली खरी गोष्ट तिला सांगून टाकली,

"हाने, तुझे माझ्यावर फार उपकार आहेत. तुझ्या सहवासांत राहणं मला सुखाचं वाटतं. या घरात मी फार आनंदात आहे. पण मीं तुझ्याशीं लग्न करावं असं म्हणत असशील तर तुला स्पष्ट सांगितलं पाहिजे, कीं तसं होणं शक्य नाहीं. लग्नाचा विचार मीं करता कामा नये. माझ्या आयु-ष्यात एक मोठी दुर्दैवी घटना घडलेली आहे, आणि त्यामुळें—"

"ज्योकेन, तूं माझ्या घरीं आलास त्याच्यापूर्वी तुझं आयुष्य सरळ मार्गानं

गेलं नाहीं हें मला समजतं. तुला वाटलं तर तूं आपलं पूर्वचरित्र सांग, नाहीं तर सागूं नकोस. त्याव्याचून माझं कांहीं अडलं नाहीं आज तूं कसा आहेस हे मी चांगलं ओळखतें."

"छे. छे हाने, तूं चुकतेस. माझे नागरिकत्वाचे कागदपत्र सरळ नाहींत, आणि त्यामुळें लग्नाची नोटिस देणं मला शक्य नाहीं छे, मीं तो विचारच करतां कामा नये."

हानेची मुद्रा बदलली, आणि किंचित् कष्टी आवाजानं तिनं विचारलं, "म्हणजे, तुझ्या हातून—इतकं का काहीं वाईट घडलेलं आहे ?"

"होय, फार वाईट."

हानेनं मोठ्या प्रयत्नानं आपल्या तोंडावर हास्य आणलं व म्हटलं, "असेना असलं तर. तू खून तर केला नाहींस कुणाचा—?"

ज्योआकिम स्तब्ध राहिला. त्यानं फक्त तिच्याकडे दृष्टि लावली. त्यानं जरी तोंडावाटे एक शब्दही काढला नाहीं तरी त्याच्या त्या दृष्टींतच कबुलीचा अभिप्राय होता.

हाने प्रथम त्याच्याकडे अगदीं स्तब्धपणें पाहत राहिली. पण मग त्याच्या त्या बघण्याचा अर्थ जेव्हा तिच्या लक्षांत आला तेव्हा तिचा चेहरा एकदम पाढरा झाला. ती आपल्या जागेवरून ऊठली, व हळकेंच त्याच्या मागच्या बाजूस जाऊन उभी राहिली. ती म्हणाली,

"तूं प्रथम इथें आलास तेव्हा तुला पहातांच मी एकदम घाबरलें. कां तें माहीत आहे तुला ? मीं आधींच एकदा तुला स्वप्नात पाहिलं होतं. मला असं स्वप्न पडलं, कीं बुडून मेलेला एक माणूस लोकांनीं घरांत आणला आहे; पण त्याचा चेहरा फॉससारखा नव्हता, तुझ्यासारखा होता. मला पुष्कळदां अशीं स्वप्न पडतात अन् तीं खरीं होतात. त्यामुळें जें दुःख वाट्याला यायचं तें येतंच, पण—"

तरी ज्योआकिमनं कांहीं उत्तर केलं नाहीं. त्यानं आपलं डोकं किंचित् मागें टाकल्यासारखं केलं, तेव्हां हाने फॉसनं तें आपल्या मोठमोठ्या हातांनीं जवळ घेतल्यासारखं करून आपल्या वक्षःस्थलावर टेकूं दिलं तिच्या त्या पुष्ट, रुंद, वत्सल वक्षःस्थलावर मस्तक टेकून पडणं ज्योआकिमला मोठं सुखाचं वाटलं. त्यामुळें त्याच्या मानसिक एकाकीपणाची तीव्रता कमी होऊन तो त्याला जरा सुसह्य वाटूं लागला. अगदीं मृदु शब्दात तो म्हणाला,

" हाने, आपण एकत्र राहूं. "

ती परत आपल्या जागीं जाऊन बसली व तिनं आपलं शिवणकाम हातीं घेतलं. ज्योआकिमनं पुस्तक उचलण्यासाठीं हात पुढें केला.

" किती शांत वाटतं ! " असा उद्गार काढून त्यानं वाचायला प्रारंभ केला.

# १७

कुणी बडे पाहुणे हिलेनब्रुकला शिकारीसाठीं आले होते. अगदीं अंधार पडेपर्यंत बंदुकांचा आवाज ऐकूं येत असे. अरण्याकडच्या रस्त्यालगतचा लोखंडी फाटक बंद केलीं गेलीं होतीं. आणि हिलेनाकडच्या लोकांना इकडे किंवा ल्यूटे गांवाकडे जायाचं झालं तर लांबच्या समुद्रकाठालगतच्या रस्त्यानं जावं लागत होतं तांबडीं हरणं भिऊन गेलीं आणि अरण्याच्या अगदीं दाट भागांत जाऊन दडलीं. पूर्वीं त्यांना कुणी उपसर्ग देत नसे तेव्हां पुष्कळदां तीं कुरणावर स्वैर-पणे हिंडतांना दिसत असत. परंतु आता ती दिसेनात. गोठ्यांत निजलेल्या गाईदेखील मध्येच बंदुकींचा बद्द आवाज कानीं पडला कीं दचकूं लागल्या.

मुख्य मंत्री ग्रेगॉरसाहेब शिकारीवर आले होते, आणि त्यानीं एक मोठा काळवीट मारला होता. त्यांनीं त्या काळविटाची शिकार केलेली पाहून फाले-नला मनांतल्या मनांत जरा विषाद वाटला होता, कारण सकाळपासून त्यानं तो हेरून ठेवला होता. पण मनांतली निराशा त्यानं बाहेर दाखविली नाहीं. ग्रेगॉरसाहेब मोठे सुस्वाभावी व आनंदी होते, आणि त्यांचा हिलेनब्रुकला

मुक्काम असेपर्यंत त्यांची उत्तम बरदास्त ठेवण्याची त्याची इच्छा होती. आज सकाळीं तो जरा लवकरच बाहेर पडला. नुकते आठ वाजले होते आणि बेलिफाच्या घराभोंवतालच्या बागेतल्या गुलाबांवर दंवबिंदू असून गार वाऱ्यावर डुलणारीं तीं फुलं सतेज दिसत होतीं. दारांतून डोकावून फालेन बेलिफाला म्हणाला "

"मोलर, ईल माशाच्या शिकारीला जायची साहेबांची इच्छा आहे. अगदीं उत्तम शिकार मिळेल असं ठिकाण दाखविणारा माणूस पाहिजे आपल्याला. कोण काढतोस ?"

"वा ! आपला फॉस आहे कीं. तो नेहमीं उत्तम उत्तम ईल मासे पकडून आणीत असतो. आत्तांच तो इथें येऊन गेला. साहेब पांच मिनिटं वाट पहातील तर छोकरा पाठवून त्याला बोलावून आणतों."

"ठीक, ठीक. अन् हें बघ, अगदीं एक नंबरचा गळ काढून ठेव आणि फॉस आला कीं त्याला माझ्या बागेंतल्या खोलींत पाठवून दे" असं बजावून फालेन गेला.

मुख्य मंत्री ग्रेगॉरसाहेब अगदीं खुषींत होते. चालतां चालतां ते मधेंच शीळ घालीत किंवा गाणं गुणगुणत आणि मधेंच गप्पा मारूं लागत. हिलेनब्रुकचा हा प्रांत त्यांना अगदीं मनःपूर्वक आवडला होता. भोंवतालच्या हवेची मजा घेण्यासाठीं हात पसरल्यासारखे करून ते म्हणाले,

"याला म्हणावं मर्दाचं आयुष्य. फालेन, खोटं नाहीं सांगत, आज काल शेतकऱ्याच्या आयुष्यासारखा दुसऱ्या कशांत रुबाब नाहीं यांत शंकाच नाहीं अगदीं. या आयुष्याची मिजास घेण्याचं माझ्या नशिबांत नाही म्हणून मला वाईट वाटतं. पण आपल्या मालकीची छोटीशी का होईना जमीन असावी ही इच्छा माझ्या मनांत अजून आहे. माझ्या लहानपणीं बाल्टिक समुद्रावर माझ्या आईची शेतीभाती होती. आमच्या आईच्या कुटुंबाला आस्कोनेअस

म्हणत. ते दिवस गेले, पण शेतकऱ्याचं रक्त अजूनही माझ्यांत आहे. असं एखादं ठिकाण दृष्टीस पडलं, तिथली व्यवस्था अन् मशागत पाहिली, असं कुरण आणि हिरवळ दिसली कीं वाटतं आपण आपले मालक आहोंत असं वाटून मनुष्य मस्त असतो अशा ठिकाणा. शपथ!"

फालेन म्हणाला, "होय, मला कांहीं कमी नाहीं. आपल्याला हिलेनब्रुक आवडलं हें पाहून मला आनंद होतो. हं—आपल्याला हवा तो मनुष्य आला. फॉस! ए! इकडे ये जरा"

"किती उमदा माणूस आहे हा दिसायला! इथल्या लोकांचं हाडपेर चांगलं मजबूत दिसतंय."

"हो, तसं म्हणायला कांहीं हरकत नाहीं. मात्र हा फॉस कांहीं इथला नाहीं हो; तो परमुलखांतून आलेला आहे, आणि त्याचं पूर्वचरित्र जरास डाग-ळलेलं आहे. माझी तर कल्पना आहे, कीं तो कदाचित् आपल्या ओळखीचाही निघेल."

"तो कसा? १९१४ च्या महायुद्धांत तो होता काय? माझ्याच तुकडींत असेल? होय ना?

"मी नाहीं आपल्याला सांगणार. आपण त्याला ओळखतां कीं काय तें मला पहायचं आहे. त्याच्या पूर्वचरित्राची हकीगत जर खरी असेल तर ती मोठी विलक्षण म्हटली पाहिजे... हं, काय फॉस, आलास? ठीक!"

तेवढ्यांत ज्योआकिम पायऱ्या चढून वर आला होता. त्यानं सलाम केला नाहीं.-माशाच्या शिकारीच्या वेळेस लागणारा दांडा आणि टोपल्या त्याच्या हातांत होत्या.

"हें बघ फौस, साहेबांना ईल माशांची शिकार करायची आहे. अगदीं उत्तम जागेवर घेऊन जा त्यांना. भले लठ्ठ मासे मिळाले पाहिजेत हं. घाई

नाहीं. तुझी मेहनत वाया जायाची नाहीं. ठीक आहे. साहेब, आपण याच्या बरोबर जा. आतां जेवणाच्या वेळीं आपली भेट. "

ग्रेगॉरच्या मागून चालतां चालतां ज्योआकिमनं विचारलं, " ईल माशांची शिकार करायची आपल्याला! खरं म्हणजे आतां जरा उशीर झाला. सूर्य वरती यायच्या आंत ते गळ चटकन् पकडतात. आज जिकडे तिकडे मच्छी-मारीला वाईट हवा पडली आहे. सकाळीं आम्हांला कुणालासुद्धा मासळी मिळाली नाहीं. "

" बरं पाहूं या आपलं नशीब. नाहींच कांहीं मिळालं तर काय करायचं ?"

" तिकडे चोरदरवाजाच्या बाजूला आपण जाऊं या. बहुतेक त्याच ठिकाणीं स्वाऱ्या असतात." असं म्हणून ज्योआकिम पुढें झटकन वेगानं चालू लागला. ग्रेगॉरच्या पायांत कातड्याचे लठ्ठ लठ्ठ उंच बूट होते. त्याला तितक्या जलद पावलं टाकता येईनात. पुढें चालणाऱ्या त्या कोळ्याची रुंद पाठ न्याहाळतां न्याहाळतां त्याच्या मनात आलं, आपण या इसमाला पूर्वी कुठे तरी पाहिलं असलं पाहिजे. " याला पाहतांच कुणाचं तरी अन् कसलं तरी स्मरण होतय मला परंतु कांहीं केल्या पुरता ओळखता येत नाहीं याला. डोळ्यावर वण आहे, तेव्हा हा लढाईवर गेला असला पाहिजे. पण लढाईवर साऱेच लोक गेले होते. अन् शिवाय त्याला किती तरी वर्षे झालीं. अयुष्यात भेटलेलीं सारींच माणसं कशी लक्षांत राहायचीं ?...."

ज्योआकिमही आपल्यापरी आपल्या विचारांत गढला होता. " ही शहरांतलीं बडीं माणसं आपल्या जागीं कां राहत नाहींत ? इकडे येऊन आमचे ईल मासे पकडायला कुणी सांगितलंय यांना ? आमचीं कामं टाकायचीं अन् याची आम्हीं तैनात करायची ? माश्यासाठीं गळ टाकून बसायचा यांना लवकर कंटाळा आला तर देव पावला. या असल्या लोकांना कुठलं फार वेळ तिष्ठत बसवायला ? "

आतां ते दोघं कुंपणाच्या कडेकडेनं चढउतारावरून चालले होते. मग कुंपण संपल आणि बराच वेळ वाट दलदलींतून गेली. मग तर ती दिसेनाशीच झाली. ओलीं झाडुझुडपं, गवत, लव्हाळीं तुडवीत त्यांना जावं लागत होतं.

"या वाटेनंच आपण लवकर पोंचूं" ज्योआकिम मागें वळून म्हणाला. त्यानं पाहिलं तों साहेब बरेच मागं राहिले होते.

"या वाटेन? चांगलं. या खाचरांतनं चालत जायचं म्हणतोस काय?"

"आपल्याला जिथें जायचं आहे तिथें पोंचायला हीच एक वाट आहे. टाका कीं पाऊल. भिऊं नका, खालीं जाणार नाहीं तुम्ही, जागा जरा ओलसर आहे इतकंच."

"जरा ओलसर! हंः!" पायाखालच्या राडींतून साहेब आपले बूट उपसून वर काढात होते. त्यांनीं पाऊल उचललं की, पाण्याच्या चिळकाड्या उडत आणि त्या जागीं मोठा खळगा होई. "जरा ओलसर! तुला काय होत आहे? माझ्यासारखा संधिवात असता तुला म्हणजे म्हणाला नसतास जरा ओलसर!"

त्या शब्दांचं ज्योआकिमला कांहीं वाटलं नाहीं. त्यानं पुन्हा मान वळविली व आपल्या ताब्यांतल्या बड्या साहेबांकडे दृष्टि लावली. सुमारें पन्नास वर्षांचा गृहस्थ असावा तो. उंच, बराचसा स्थूल, अन् अवजड. त्याच्या पोटाच्या उंचवट्यावर शिकारीच्या वेळेस घालायचं गरम जाकीट ताणून घट्ट बसल होतं, आणि ऊन फारसं नव्हतं तरी तो घामाघूम झाला होता. डोक्यावरचे केस कापून इतके पातळ केले होते कीं त्यामुळें टक्कल लक्षांत येऊं नये. त्याच्या गुळगुळीत डोक्यावर अन् नाकावर घामाचे थेंब दिसत होते. त्याच्या मुद्रेवरून त्याचा स्वभाव मनमोकळा आणि प्रेमळ असावा असं

वाटत होतं तोंडाचा रंग तांबडा लाल आणि गडद दिसत होता. दोन तीन अखमाही दिसत होत्या. डोळे निळे होते; आणि कपाळ चौकोनी अन् भव्य असून तिथला वर्ण तोंडापेक्षा काहीं फिकट वाटत होता.

त्या कपाळाकडे पाहून आपल्या मनाशींच विचार करीत ज्योआकिम पुन्हा म्हणाला.

" आपल्याला इथनंच गेलं पाहिजे."

" अच्छा, गेलं पाहिजे तर जाऊं या!" असं म्हणून ग्रेगॉरनं उडी टाकायसाठीं पाऊल उचललं

आणि त्याच क्षणीं ज्योआकिमनं त्याला ओळखलं!

ओळखताक्षणी त्याच्या हृदयाचे ठोके किंचित् मंद झाले. तो मनाशीं म्हणाला, हा आस्कानिअसच कीं. आणि त्याच्या तोंडावर हास्य दिसूं लागलं. तें हास्य मंत्री महाशयांना दिसल्यावाचून राहिलं नाहीं आणि ते मनातल्या मनांत जरा चिडले. खाचरातून जोरजोरानं पावलं टाकतां टाकतां त्यांना वाटलं, हा माणूस आपली थट्टा तर करीत नाहीं? पण छे, त्याच्या त्या हसण्यात दुष्टपणा किंवा चावटपणा नव्हता. उलट प्रीतीचा व सहानुभूतीचा स्निग्ध भाव दिसत होता.

कोळयानं आपला मोठा पिंगट वर्णाचा हात पुढें करून म्हटलं, " साहेब, माझा हात धरा आणि अगदीं मला लागून माझ्या मागोमाग या. मी सुखरूप नेईन तुम्हांला."

असं म्हणताना त्या खेडवळ प्रांतातली हेंगाडी जर्मन भाषा त्यानं वापरली नाहीं ग्रेगॉरला वाटलं हा शब्द आणि उच्चार करण्याची ही तऱ्हा आपल्या ओळखीची आहे. परंतु विस्मृतीचा पडदा त्याला पुरता दूर करतां येईना. तो म्हणाला,

" मला वाटतं मीं तुला पूर्वी कुठें तरी पाहिल आहे. "

" असेल." एवढंच ज्योआकिम म्हणाला.

त्यानं ग्रेगॉरचा हात धरून त्याला त्या खाचरांतून चोर दरवाजामागच्या समुद्रकिनाऱ्यावरच्या भागावर नेलं. तिथें पोंहचल्यावर बरोबर आणलेलं सामान त्यानं उलगडलं. गळाला लावायचे किडे त्यानं काढले आणि मासे ठेवायच्या हिरव्या डब्यांत तो पाणी भरूं लागला. ग्रेगॉरनंही शिकारीला बसायची तयारी केली. त्यानं जाकीट काढून तें गवतावर पसरलं. तो बसला व मग त्यानं गळ फेकला. त्या कोळयाच्या सांगण्याप्रमाणें त्यानं दोरी काठाच्या शक्य तितकी जवळ ठेवली. कांहीं वेळानं त्यानं दांडी गवतावर ठेवली, आणि सिगारेट पेटविता पेटविता हसत ज्योआकिमला विचारलं.

" सिगारेट ? "

" द्या, Thank You. " ज्योआकिमनं सिगरेट घेतली, आपली काड्याची पेटी काढून ती पेटविली आणि जोरानं झुरके मारीत म्हटलं, " मी जरा चोर दरवाजाच्या पलिकडे जाऊन पाहतों तिकडे मासे आहेत कीं काय. " आणि तो गेला.

पण ज्या क्षणीं त्यानं सिगरेट पेटविली त्याच क्षणी एकदम ज्योति पेटावी त्याप्रमाणें एक आठवण ग्रेगॉरच्या मनांत क्षणभर आली, व लगेच नाहींशी झाली. एक क्षणभरच त्याच्या दृष्टीला एक खोली दिसली तिची फरशी पांढरी होती. भिंतीला निकेल धातूच्या मुठी होत्या, अन् खोलीत विजेचा लखलखाट होता. त्याच्यापुढें एक गालफडं बसलेला तरुण उभा होता अगदीं पांढरा फटक पडला होता तो, आणि आपल्या मुद्रेवर कांहीं दिसूं नये असा त्याचा प्रयत्न चालला होता.. पण जणूं कांहीं ग्रेगॉरच्या जाणीवेला फट पडून तिच्यांतून हें चमत्कारिक दृश्य त्याला दिसलं. दुसऱ्याच क्षणीं तें दिसेनासं झालं.

मंत्री महाशय आपल्या मनाशीं म्हणाले, 'हं, हं, आतां आलं लक्षांत. ज्या मुलानं तो खून केला तोच हा खास; पण तो इथें कसा ?...'

ग्रेगॉर आतां पन्नाशीचा होता आणि वयाच्या मानानं त्याच्या ठिकाणीं

अनेक प्रकारें दुबळेपणा आला होता. त्याला संधिवात जडला होता, लिहावाचायच्या वेळेस त्याला चष्मा वापरावा लागे, आणि त्याची स्मृतिदेखील नीट काम करीत नसे.

आता त्याला स्पष्ट आठवलं कीं या माणसाचा व आपला पूर्वी एकदां पुष्कळच संबंध होता. परंतु ज्या तरुणानं आपल्या धाडसी कृत्यानं सारा देश हादरून सोडला होता त्याचं नाव त्याला काहीं केल्या आठवेना. तो त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत राहिला, पण छे, त्याचं नाव काहीं त्याला आठवेना. पण मग एकदम आणि अगदीं सहजासहजीं त्याला दुसऱ्या एका गोष्टीची आठवण झाली. त्यानं झट्कन आपली सिगारेट तोंडातून बाहेर काढली आणि शिटी घातली. खणखणीत अन् स्वच्छ! खुणेची ती जुनी साद कर्कश आवाज करीत पाण्यापलीकडे पोचली.

ती ऐकताच कुणी तरी घाव घालावा त्याप्रमाणें ज्योआकिमची अवस्था झाली. एकदम थबकून त्यानं मागं वळून पाहिलं. ती खुणेची शिटी ऐकताच त्याचं पूर्वचरित्र एकदम उफाळून वर आलं त्या वेळची तारुण्यातली धडाडी, त्या वेळचीं सुखस्वप्नं, त्या वेळची पराक्रमाची दिव्य जाणीव—सारं सारं एका क्षणात एकदम परत आलं!

तो क्षणभर जागच्या जागीं खिळल्यासारखा उभा राहिला, काहीं वेळ घोटाळला आणि मग परत आला भूतकालात व विस्मृतींत गडप झालेलं असं त्याच्या चारित्र्यातलं काहीं तरी एकदम पुन्हा जिवंत झालं होतं व त्यामुळें तो अगदीं हादरून गेला होता.

तेवढ्यात ग्रेगॉर उठून उभा राहिला होता, व त्याच्याकडे पाहत होता.

ते दोघ समोरासमोर उभे राहिले. दोघानीं नाटकी बोलणीं केलीं नाहीत, अश्रु ढाळले नाहींत, किंवा एकमेकाना मिठीही मारली नाहीं. ज्योआकिम घरीं रहात होता त्या वेळीं त्याच्या खोलींत "शिपाईगड्यांचा निरोप" नांवाचं जें चित्र त्याच्या सतत दृष्टीस पडलं

होतं त्याची त्याला त्या क्षणीं स्पष्ट आठवण झाली. परंतु त्या चित्रांत प्रियजनांचं आलिंगन, अश्रुपात इत्यादि प्रकार जसे चालले होते तसे या दोघांनी मुळीच केले नाहीत. ज्योआकिम आतां एक साधा कोळी बनला होता. त्याच्यात तटस्थता आली होती, त्याचा स्वभाव अबोल बनला होता. भावनोत्कटता त्याच्या ठिकाणीं उरली नव्हती. प्रेगॉर तर मुख्य मंत्री झाला होता, व त्या वरिष्ठ पदाला अनुरूप असा त्याच्या स्वभावांत बदल झाला होता. भावनावश होऊन बोलावस वाटणं त्याला शक्य नव्हतं. आणि कदाचित् वाटल असतं तरी तो कसं बोलाणार ? आपल्या जुन्या प्रियमित्राचं नांव त्याला कांहीं केल्या आठवत नव्हतं.

तरी देखील किंचित् गहिंवरून तो म्हणाला, "अरे, तूं होय ? आतां मीं तुला ओळखलं बघ पण तुझी व माझी पुन्हा अशी भेट व्हावी हें किती विचित्र ! मला तूं ओळखलंस ? अं ?"

ज्योआकिम हसत म्हणाला, "होय. मघांशी—त्या खाचरांतून येताना."

"असं बरं, तुझं कसं काय चाललं आहे ? तूं इथं राहत असतोस तर ! पोलिसांच्या गोळीबाराला दाद दिली नाहींस म्हणायची ? बडा चलाख आहेस तूं ! इथें तूं आहेस, अन् चांगला जिवंत आहेस तुझी बहीण तर समजते तूं मागेंच मेलास."

"माझी बहीण !" असं उद्गारून ज्योआकिमनं मान वर करून पाहिलं

"हं, तिची खुशाली समजावी म्हणून तूं कधीं प्रयत्न केला नाहींस वाटतं ? वा रे ! तिचं फार छान चाललं आहे. तिचा नवरा मला वारंवार भेटतो. इमारतकामाचा मोठा धंदा आहे त्याचा, आणि तो स्वभावानं मोठा गोड आहे. त्याचीं मुलं किती देखणीं आहेत ! तुझी बहीण म्हणजे एक असामान्य स्त्री आहे बघ. मला तिच्याविषयी पराकाष्ठेचा आदर वाटतो.

पण तें असो, तूं इकडे कसा आलास अन् इथे कसा राहतोस तें मला सांग ना! खोटं नांव धारण करून, होय ना?"

"मी इथें अगदी सुखात आहे."

"काय म्हटलंस? अगदीं सुखांत? वा, छान! मला वाटतं हें भोग तूं तात्पुरतं म्हणूनच पत्करलं असलं पाहिजेस... बूर्थ.... हां, बरोबर बूर्थच!" तें नाव आठवल्यामुळें प्रेगॉरला हायसं वाटलं व अकस्मात् इतरांच्या गोष्टींचा उलगडा व्हावा अशी त्याची इच्छा झाली. "दोस्ता, असा एकाएकी तूं मला भेटल्यानं मला काय वाटत असेल याची कल्पना कर. ते सारे जुने दिवस माझ्या डोळ्यांपुढें उभे राहिले आहेत बघ. बाप रे! काय आफाट विचारांचीं पोरं होतों आपण! तूं तर एक भलतंच कृत्य केलंस तुझं कृत्य त्या वेळीं मला किती शूरपणाचं वाटलं तें स्मरतं मला. खरंच तें मला मर्दपणाचं वाटलं. तें चुकीचं असेल—अगदीं वेडेपणाचं असेल, निदान आज हें कबूल केलं पाहिजे; पण तुझं कृत्य अगदीं सुसंगत होतं यात बिलकुल शंका नाही. माथेफिरू कामत्त्यासारखे आपण सारे वागत होतों नाहीं? आपले ते बॉबगोळ अन् तीं पिस्तुलं! अच्छा. त्या काळांत तें सगळं ठीक होतं आता किती समजूतदार झालों आहोंत आपण. पण हें काय? मीच सारखं बोलतों आहे. तूं आपल्याविषयीं कांहींच सांगत नाहीस मला"

"काय ऐकावंसं वाटतं तुला माझ्याविषयीं? मला फार आनंद झाला आस्केनिअस—"

"अन् मलाही अगदीं अंतःकरणापासून आनंद झाला बघ. हं, तर काय तूं सफाई पळालास? शाबास! अर्थात् मीं असं म्हणूं नये, म्हणावं का सांग बूर्थ! माझी अम्मलदार या नात्याची जबाबदारी माझ्या लक्षांतच राहत नाहीं. मंत्रिमंडळांत माझं वजन चांगलं आहे. पण आपल्या मानसन्मानाला उचित ठरेल असं वागलं पाहिजे ना माणसानं. हुंडणावळीचा दर आता

चांगला आहे. कामाचा त्रास फार होतो एखादे वेळीं... पण आतां पुढें तूं काय करणार तें मला सांग ना ?"

"मी इथें राहतों—" ज्योआकिमनं सांगायला प्रारंभ केला. ग्रेगॉरच्या हर्षभराच्या बोलण्यानं त्याला स्वतःला थिजल्यासारखं अन् बरंचसं गोंधळल्या-सारखं झालं होतं. त्याला वाटलं सारं अंतःकरण अगदीं उघड करून टाकावं. त्यानं आस्केनिअसच्या कपाळाकडे व तोंडाकडे दृष्टि लावली. तो बोलूं लागला. पण "मी इथें राहतों" यापलीकडे त्याच्या तोंडून शब्द निघाले नाहींत.

"तूं इथें राहतोस. पण कसा ? खोटं नांव धारण करून ? लपून ? अरे, हा सारा नाटकी वेडेपणा आहे. आणि त्याची आतां गरजही नाहीं. साऱ्या जुन्या गोष्टी लोक आतां विसरून गेले आहेत. अगदीं निश्चिंत मनानं पूर्वीचं आपलं आयुष्य सुरू करायला तुला काहीं एक प्रत्यवाय नाहीं. तुझी इच्छा असेल तर मी स्वतः जातीनं तुला आश्वासन देतों. अम्मलदार या नात्यानं नव्हे—पण "

"नाहीं. मी इथें खोटं नांव धारण करून राहतों असं म्हणता यायचं नाहीं. फॉसचा मचवा, त्याचं घर, त्याचं कुटुंब—सगळंच माझ्याकडे आलं आहे म्हणून लोक मला फॉस म्हणतात—इतकंच. तें ठीकच आहे. पण मी खोट्या नावानं लपूनछपून राहतों आहे असं कसं म्हणतां येईल आस्केनिअस ? मी कोळयाचा धंदा करतों, अन् फॉलेनसाहेबाच्या बंगल्यावर सकाळीं मी आलों तो सरळ माझ्या मचव्यावरून. तेव्हां माझ्या अंगावर हे कपडे असावेत हें साहाजिकच नाहीं काय ?"

बोलतां बोलता ज्योआकिमचा गोंधळ वाढत गेला, अन् त्यानं आपल्या अंगातल्या गरम जाकिटाकडे विचित्र दृष्टि टाकली.

क्षणभर आठवण केल्यासारखं करून मंत्री महाशय म्हणाले, "अरे, पण तूं तर आमच्या मंडळाचा सभासद होतास ! आपल्यांतले लोक आठवतात

तुला ? स्पीएस—स्पीएसची आठवण आहे तुला ? तो आतां बडा मॅजिस्ट्रेट झाला आहे. आणि गार्व्हेन्स ? एका मोठ्या श्रीमंताच्या मुलीशीं त्यानं लग्न केलं आहे, अन् नामांकित वकील झाला आहे तो. मोठमोठ्या कारखानदारांचा सल्लागार वकील म्हणून खूप पैसे कमावतो आहे अन् तूं इथें एका लहानशा मच्छीमारीच्या गांवांत पडलेला असावास ? छे, छे, अशा गावठ्या गांवांत कुजत पडायची तुला कांहीं एक गरज नाहीं. माझं ऐक—"

" आस्केनिअस, मी इथें अगदीं पूर्ण समाधानांत आहे. "

" समाधानांत ? शी: असलं बोलणं कुणी ऐकलं आहे ? किती वर्षे झालीं तुला इथें येऊन ? "

" जवळ जवळ पांच. पुढच्या वसंतऋतूंत—"

" पांच वर्षे ! बाप रे ! अन् त्यापूर्वी काय केलंस तूं ? "

" जें पडेल तें काम केलं. परदेशात भटकलों. तेलाच्या खाणीवर काम केलं. हॉटेलांत वाढपी म्हणून राहिलों, आणि कांहीं दिवस इलेक्ट्रिशियन् म्हणूनही नोकरी केली. पुष्कळ नव्या गोष्टी शिकलों मी. कांहीं काळ माझं फारच चांगल होतं, आणि मीं थोडे पैसे देखील साठविले होते पण चार मित्राच्या नादीं लागलों, ते पैसे घालून एक कंपनी काढली अन् ती कंपनी लवकरच बुडाली ! मग जी थोडी पुंजी उरली होती ती घेऊन इकडे माय-देशाला परत आलों अन् आतां मी इथें राहत आहे..."

ग्रॅरचा कंठ थोडासा भरून आला. तो म्हणाला, " मित्रा, तुझे फार हाल झाले असले पाहिजेत. पण हरकत नाहीं. आपण तें सारं बदलून टाकूं. तूं मला भेटलास हें फार छान झालं. आतां मी तुझी गोष्ट ताबडतोब मनावर घेणार. असं आश्चर्यानं काय पाहतोस माझ्याकडे ? स्वतःची चलती सुरू झाली की जुन्या दोस्तांना विसरून जाणाऱ्यांपैकीं मला तूं समजतोस कीं काय ? शांत हो, मला विचार करूं दे. हो, मी लवकरच तुझ्यासाठीं एक चांगली नोकरी—"

ज्योआकिमच्या मनांत आलं आतां मात्र हा आपला जुना दोस्त आस्केनिअस दिसतो खरा. तो किंचित् हास्य करीत त्याच्याकडे पाहत होता, आणि त्याच्या प्रत्येक शब्दांत त्याला तरुण्यांतला तो जुना आस्केनिअस दिसत होता. सरळ मनाचा, उच्छृंखल, ऐसपैस बोलणारा पण प्रामाणिक आणि इमानदार, फक्त दूरवर विचार न करणारा, असा आस्केनिअस! ज्याच्यावर त्यानं त्या वेळीं प्रेम केलं, ज्याच्यासाठीं त्यानं तें महासी कृत्य केलं, आणि ज्याचं रक्षण व्हावं म्हणूच त्यानं स्वतःवर संकट ओढून घेतलं! ज्योआकिमचे डोळे किंचित् भरून आले व तो काहींशा मृदु स्वरांत म्हणाला,

" आस्केनिअस माझ्याविषयीं हा गैरसमज झालेला दिसतो. माझं कांहीं एक गाऱ्हाणं नाहीं. मी इथें अगदीं पूर्ण समाधानांत आहे."

" छे, शाब. सुचलं मला. अगदीं तुला योग्य अशी नोकरी आहे." ग्रेगॉरची मुद्रा एकदम उजळली व तो सांगू लागला, " किंबहुना, या नोकरीसाठीं तुझ्याइतका योग्य दुसरा माणूस मिळायचा नाहीं. जर्मनीचा प्रतिनिधि म्हणून अमेरिकेंत पाठविणार मी तुला. तुला कसं वाटतं?... आतां मी या गोष्टींत तावडतोब लक्ष घालतों. ही नोकरी तूं पत्करलीस तर थोड्याच वर्षांत तूं चांगला श्रीमंत होशील..."

पण ज्योआकिम थंडपणानं म्हणाला, " नको, मला नको. आस्केनिअस तूं फार भला आहेस, पण आता असल्या कामीं माझा उपयोग नाहीं. ज्या तऱ्हेचं आयुष्य मीं इथें पत्करलं आहे तेंच मला सगळ्यात साजेसं आहे. खोटं नाहीं."

" पण इथें राहतोस म्हणजे करतोस तरी काय? मला सांगशील?"

" इथले सारेच लोक जें करतात तेंच मीं करतों. दिवसांतून दोनदां मचवा घेऊन समुद्रांत जायचं; अन् मग मासळी शहराकडे न्यायची. मचवा, जाळीं, शिडं नीट दुरुस्त ठेवण्याचं काम तर असतंच; शिवाय घर आहे, जमीन आहे, गुरंढोरं आहेत. माझ्या मालकीचा एक घोडा अन् दोन गाई आहेत.

हें काय थोडं झालं ? खरंच सांगतों मी तुला, आमचं अगदीं उत्तम चाल-लेलं आहे."

"पण पैसे मिळतात का ?"

"अर्थात् मिळतात तसं नसतं तर घोडा आणि गाई कशा खरीदल्या असत्या मीं ? सारा भरण्यापुरते अन कपड्यालत्त्यापुरते पैसे मिळवतों मी. थोडीशी शिल्लकही टाकतों. अर्थात् मधूनच एखादा मोठा आकस्मिक खर्च येतो. परवाच पहा, नवीन जाळं विकत घ्यावं लागलं त्यात फार पैसे गेले..."

"पण बूर्थ, हें काय तुझं केविलवाणं वर्णन ? या तुझ्या आयुष्याला काय माणसाचं आयुष्य म्हणायचं ? तुझी दया येते मला. माझं ऐक तूं—"

"आस्केनियस, माझं आयुष्य तुला केविलवाणं वाटत असलं तर तो माझ्या वर्णनाचा दोष आहे. आतांशा मी फारसा बोलत नाहीं. त्यामुळें माझी सवय गेली आहे, अन् इथल्या माझ्या राहणीचं वर्णन थोडक्या शब्दांत करणं जमत नाहीं. पण माझं घर तूं येऊन पहा. इतकं सुंदर घर आमच्या गांवातच नव्हे, तर ल्यूटे गांवांत सुद्धां आढळायचं नाहीं तुला त्यांतली शेगडी मीं माझ्या कल्पनेनं अन् माझ्या हातांनीं बाधली आहे. भिंतींना हिरवा रंग दिला आहे, खिडक्यांवर पांढरे पडदे सोडले आहेत, आणि सजावट-सामान मीं स्वतः तांबड्या रोंगणानं रंगवलं आहे. शिवाय सुतारकामही पुष्कळ करायचं असतं आणि त्यांत माझा किती तरी वेळ जातो. या गोष्टी तुला कदाचित् विशेष वाटायच्या नाहींत, मा ित आहे मला. पण शिवाय मुलांचाही सुख आहे ना. फॉसचीं दोन मुलं मी माझींच समजलों आहे. गेलीं पांच वर्षं मीं त्यांचं लालन पालन केलं. अशीं देखणीं आहेत दोघंही ! त्याच्यापासून केवढं सुख मिळतं मला. मुलगा आहे तो हाडापेरानं मजबूत अन् उद्योगी आहे. अन् मुलगी ! तिचा तो इथल्या सार्‍याच मुलासारखा पिंगट वर्णाचा चेहरा ! अन् तिचे नितळ केस तूं पहायला पाहिजेस एकदां. माझी लहानशी बाग ही आहे. झोपडीच्या पुढच्या अंगणांत एक मोठी शिला मीं मांडली आहे. शेता-

डोंतून मींच ती खणून काढली अन् तिथपर्यंत आणली. संध्याकाळच्या वेळीं मी त्या शिलेवर बसलों, आणि आजूबाजूस पाहूं लागलों, कीं समाधानानं माझं अंतःकरण भरून येतं. यावांचून निराळं वर्णन मला करतां यत नाहीं. सारं कसं शांत वाटत! मी गहूही पिकवितों आनां पुढच्याच आठवड्यांत माझं शेत कापायला होईल. दुपारच्या वेळस माझ्या गव्हाच्या शेतांतून मी चालत असलें कीं ताटांताटांवर दिसणाऱ्या ओंब्यांकडे पाहून अंतःकरण अगदीं उचंबळून येतं. तुला कदाचित् वाटेल हें कांही तरी नाटकी बोलणं. पण मीं मघाशी सांगितलं ना माझी बोलण्याची सवय सुटली आहे अन् माझ्या इथल्या आयुष्याचं वर्णन करतांना भलतेच शब्द मी वापरीत असेन..."

"छे, छे. इतका का मी मूर्ख आहे. तुझ्या बोलण्यातला आशय समजतो मला. गव्हाचं शेत किती सुंदर दिसूं शकतं त्याची मला कल्पना आहे. आणि मुलंबाळं! दुर्दैवानं मला स्वतःला मूल नाहीं. तूं म्हणतोस तें खोटं नाहीं. पण या गोष्टीला दुसरी बाजू आहे. मुख्य म्हणजे तूं जन्मतः शेतकरी नाहींस. तुला मन आहे."

"मन? हं, पण त्याचं असं आहे बघ. दिवसभरच काम आटपलं कीं माणूस मुळीं आधी पार थकून जातो; आणि मी जन्मानं शेतकरी नसलों तरी आता शेतकऱ्याची राहणी माझ्या थोडीशी अंगवळणी पडली आहे. मी थोडंसं वाचन करतों काहीं निवडक पुस्तकं माझ्याजवळ आहेत तीं मी पुष्कळदां वाचतों. वादविवाद करावासा एखादे वेळीं वाटला, तर आमचे बेलीफसाहेब आहेतच. एखादे वेळीं संध्याकाळीं घटकान् घटका बसून आम्ही नाना तऱ्हेच्या विषयांवर—"

"पण बाबा, तूं कितीही सांगितलंस तरी इथें तूं कुजतो आहेस यांत शंका नाहीं. तुझ्यासारख्या माणसाला गोडी वाटावी असं काय आहे तुझ्या या इथल्या आयुष्यांत?"

"आं? आहे तर..मी सध्यां ज्या उद्योगांत गुंतलों आहे तो यशस्वी झाला तर केवढा महत्त्वाचा ठरणार आहे!"

"असं ! मग गोष्ट निराळी. कसला उद्योग चालवला आहेस सांग तरी मला ?" असा प्रश्न करताना ग्रेगॉरनं अगदीं उत्सुकेतन ज्योआकिमकडे पाहिलं. त्याच्या मनात येत होतं, ही वल्ली काय करील त्याचा नेम नाहीं खराच. किती गूढ दिसते याची मुद्रा !...

"मी सांगतों तुला" ज्योआकिम म्हणाला, "मी माझ्या मचव्यासठीं एक मोटारचं यंत्र तयार करतों आहे."

"काय, सांगतोस काय ?"

"मी एक मोटारचं यंत्र तयार करतों आहे."

"तुला येईल ?"

"अखेर साधलंच पाहिजे. त्याच उद्योगांत सध्यां मी आहे परवां मचव्याला यंत्र बसवून मी चक्कर मारून पाहिली. जमलं नाहीं नीटसं, कारण मचव्याचा पुढचा भाग भारावून पाण्यात जरा जास्ती बुडाला; पण यंत्र काम देतं येवढं ठरलं माझा प्रयोग मी लवकरच यशस्वी करीन. थोडीं थोडकीं नव्हे पांच वर्षं घालविलीं आहेत मीं त्या उद्योगांत !"

तें अखेरचं वाक्य अशा विचित्र आभिमानाच्या स्वरांत त्यानं उच्चारलं, कीं ग्रेगॉर काहींसा चिडला. तो किंचित् गोंधळून थोडासा थांबला; पण मग म्हणाला,

"मूर्ख, माझं ऐकतोस का जरा ? हा कसला खुळेपणा आरंभिला आहेस ? असल्या उद्योगांत उगीच काय म्हणून जिवाची यातायात करतोस ? मचव्याला यंत्रं लावावयाचं असेल तर तें तुला बाजारांत आयतं नाहीं मिळणार ? वाफेवर चालणारा मचवासुद्धां तुला तयार मिळेल. उत्तर समुद्राच्या भागांत कोळी लोक आज किती तरी वर्षें वाफारी चालवताहेत. त्यांत आहे काय मोठंसं ! आणि या साध्या गोष्टीसाठीं तूं इथें कष्ट करीत दिवस काढतो आहेस ! आणि याला तूं जगणं म्हणतोस ? छे, छे. आतां माझं ऐक—"

"असं आहे. मला माझ्या हातांनीं स्वतःचं वाफारं तयार करायचं

आहे." ज्योआकिम म्हणाला. त्याच्या मुद्रेवर लहानपणीं निश्चयाचा व अविचाराचा जा भाव दिसत असे तो या वेळीं स्पष्ट प्रगट झाला. ग्रेगॉरला तो दिसला व त्याला आपलं हसूं आवरता आलं नाहीं तो म्हणाला, "बूर्थ, मोठा विचित्र माणूस आहेस तूं. पूर्वीच्या त्या दिवसांत तुझं इतरांपेक्षा कांहीं तरी निराळं असे. आपल्याच विचारांत गुरफटून एकटेपणानं रहायची तुझी तऱ्हा होती. आणि आताही तेच करता आहेस तूं. तुझा स्वभाव पालटणं शक्य नाहीं हेंच खरं. तू आपल्या मार्गानं जाणार. तुझ्यासाठीं कांहीं करणं शक्य नाहीं. का तुझ्याजवळ पैसे नाहींत म्हणून यंत्राची ही खटपट चालविली आहेस? मी देऊं का पैसे?"

अगदीं हट्टी चर्या करून बूर्थ म्हणाला, "अंहं, मला हवं असलेलं यंत्र मी आपल्या हातांनीं तयार करणार."

ग्रेगॉरनं खांदे उडविले आणि गळाच्या दांडीकडे पाहिलं. इतका वेळ तिचा त्याला अजीबात विसरच पडला होता. तो मनाशीं म्हणाला, याच्याशीं वाद घालण्यांत कांही अर्थ नाहीं पण किती खेदाची गोष्ट!...

ते दोघे बसले होते त्या ठिकाणीं खालच्या बाजूस हिरवं काळं पाणी झुळुझुळू वाहत होतं, त्याकडे ज्योआकिमनं नजर टाकली तों मध्यवयाच्या किंचित् स्थूल आस्कॅनिअसचं प्रतिबिंब त्याला दिसलं. त्याच्या मनांत क्लेशकारक विचार येत होते. ते व्यक्त करण्याचा प्रयत्न करून तो म्हणाला

"समाजापासून स्वतःची ताटातूट करून मी राहतों असं तूं म्हणतोस. पण आस्कॅनिअस, हें खरं नाहीं. मी पळून गेलों तेव्हां समाजाच्या बाहेर पडलों हें खरं; पण आतां तसं नाहीं. आता मी परत आलों आहे, समाजांत शिरलों आहे, आणि स्वतःचं स्थळ मीं निर्माण केलं आहे. आतां माझ्या स्वभावांतली बंडखोरी नाहींशी झाली आहे."

त्याच्या त्या बोलण्यांत ग्रेगॉरला कसलाच अर्थ दिसेना. तो म्हणाला, "तुझ्याबद्दल फार खेद होतो मला. तूं पुन्हा चांगल्या उद्योगाला लागावंस

अन् आपल्या आयुष्याचं सार्थक करावंस म्हणून तुला मदत करण्यांत मला मोठं भूषण वाटलं असतं. पण तूं मुळीं आपला हट्ट सोडींतच नाहींस!"

त्यानं खांदे उडविले. दोघेही स्तब्ध झाले त्याच्या संभाषणांतून कांहींच निष्पन्न झाल नव्हतं, आणि तें तेवढ्यावरच संपलं. दोन ध्रुवांइतके ते परस्परांपासून दूर होते. आणि त्याचा संबंध जडावा अशी कोणतीच गोष्ट नव्हती. आस्कनिअस समाजातल्या आपल्या स्थानाला चिकटून राहिलेला होता, आणि त्याच स्थानावर आजही तो उभा होता. त्याचं शरीर सुटलं होतं, एका मोठ्या अधिकाराच्या जागेवर तो होता, आपल्या कर्तृत्वानं हाताखालच्या माणसांत त्यानं आदर निर्माण केला होता उलट ज्योआकिमच आयुष्य किती निराळ्या वळणान गेलं होतं! त्याच्या हातून गुन्हा घडला होता, त्यानं यातना भोगल्या होत्या, त्याच्या अंतःकरणाचं ज्वलन झाल होतं, आणि अनंताच्या सीमेवर त्याच्या आत्म्यानं कितीदा तरी भ्रमण केलं होतं! आणि असे ते दोघे लहानपणचे मित्र व जुन्या काळातले सहकारी या घटकेला या विचित्र ठिकाणीं, खाडीच्या हिरवट पाण्याकडे पाहत शेजारीं शेजारीं बसले होते. परंतु आपण एकमेकांपासून किती दूर आहोंत याची जाणीव त्याना होती व एकमेकांशीं पुढें काय बोलावं तें त्यांना मुळींच सुचत नव्हतं! कांहीं वेळानं ज्योआकिम उठला व म्हणाला, पलीकडच्या बाजूस मासे आहेत कीं काय पाहून येतों. परंतु मंत्री महाशयाची शिकारीची हौस आतां संपली होती म्हणा किंवा ते त्रासले होते म्हणा, ते उठले, अवघडलेले पाय त्यांनीं ताणले आणि मग ते सामान आवरूं लागले.

निघण्याच्या वेळीं त्या दोघात थोडासा वाद झाला. बूर्थला एकाद्या सामान्य कोळ्याप्रमाणें वागवायला ग्रेग्रॉर तयार नव्हता, आणि त्यानं सारं सामान घेऊन एकाद्या नोकरासारख आपल्यामागें यावं हें त्याला पसंत पडेना. शेवटीं दोघानीं सामानाची वाटणी करून घेतली आणि मग ते खाचरांतून वाट चालत घरीं निघाले. आतां भर दुपारची वेळ झाली होती. पांढऱ्या पांढऱ्या

चकाकणाऱ्या माशा हवेंत घोंघावत होत्या, आणि लव्हाळ्यांतून इकडे तिकडे वेगानं फिरताना त्याचा विचित्र ध्वनि चालूं होता. ऊन फार लागूं लागलं म्हणून मंत्री महाशयांनीं आपल्या भव्य कपाळावर टोपी चढविली. अखेर दोघांच्या वाटा फुटल्या, व एकमेकांचा निरोप घेण्याची वेळ आली, तेव्हां दोघानीं तो सहजासहजीं घेतला. फॉलेनमाहबाकडे शिकारीसाठीं पाहुणा आलेला बडा अंमलदार हिलेनब्रुकच्या वाटेनं गेला; आणि अबोल, साधा, कष्टाळू कोळी आपल्या घरीं जाण्यासाठीं हिलेवाक्टच्या वाटेनं चालूं लागला.

सूर्य डोक्यावर अगदीं तळपत होता. खालीं पाण्यावर त्याच्या किरणांचे पट्टे चकाकत होते. ओहटाची धमका होती आणि किनाऱ्यालगतचे खडक पाणसपाटीपासून दूर दिसत होते. वाऱ्याची मंदशी झुळूक वाहत होती, आणि शेतशेतातून चालणाऱ्या मळणीच्या यंत्राचा मधूनच कानावर येणारा ध्वनि उद्योग आणि समृद्धि यांच्या प्रशस्तिगीतासारखा वाटत होता.

ज्योआकिम तटाच्या बाजूबाजूनं लांब लांब टांगा टाकीत चालला होता. वाटेंत एके ठिकाणीं रस्त्याच्या कडेलाच मेंढ्याचा मोठा कळप चरत होता, त्यांच्या गळ्यांतल्या घंटांचा किणकिण ध्वनि चालू होता. गुराख्याची निश्चल आकृति उभी होती. लवकरच हिलेवाक्टचीं कौलारं त्याला दिसूं लागलीं. त्यानं पाहिलं तों त्याच्या स्वतःच्या घराच्या छपरातून वर जाणारा धूर स्पष्ट दिसला. जळाऊ लाकडाचा तो दर्पयुक्त धूर म्हणजे बाल्टिक समुद्राजवळच्या खेड्यातल्या जीवनाचं प्रतीक होतं.

उतरणीवरची मऊ हिरवळ ओलांडून जाताना त्यानं पाहिलं तों पलीकडे झालच्या बाजूस एक लहान मुलगी कामात दंग झालेली त्याला दिसली. तो थबकला आणि स्वतःशीच हसत तिच्याकडे पाहत राहिला. हानंच मोठाले लाकडी जोडे तिनं घातले होते अन् ती पावल टाकूं लागली कीं ते पुनः पुन्हा निसटून पडत होते. तिनं खांद्यावर एक काठी टाकली होती. तिच्या टोकाला जड सामान बांधलेलं आहे अशी तिनं कल्पना केलेली दिसली. आणि एक जुनी चरवी

तिच्या हातांत होती ती मोठ्या गंभीरपणानं ती सावरीत होती. ज्योआकिमला पाहतांच ती उड्या मारीत त्याच्या जवळ आली. हनुवटीनं तिच्या हातांतल्या चरवी दर्शवून ज्योआकिमनं विचारलं,

" काय बेत आहे ? अं ? "

" मी आता खाली कुरणांत जाऊन गाईंची धार काढणार आहे "

ज्योआकिमला गंमत वाटली तो म्हणाला, "वा, छान. परवाच बोलिफसाहेब मला विचारीत होते की आता तुमची छोटी मुलगी तुम्हांला केव्हां मदत करायला लागणार ? "

आपल्या घराच्या दारापुढून जातांना आंतल्या खोलीत शेगडीसमोर उभी असलेली हाने त्याला दिसली. त्यानं तिला उद्देशून तो हर्षभरानं एक दोन शब्द बोलला व पलीकडे आपल्या शेतात गेला. ' राय ' धान्याचं पीक घरीं आणलं गेलं होतं, आणि आज कुणाची मदत न घेता हाइन प्रथमच नांगर चालविणार होता

ज्योआकिम शेताच्या कडेला उभा राहिला आणि अगदीं कसून जोरानं नांगर रेटणाऱ्या त्या पोरसवदा तरुणाकडे पाहत राहिला. नांगराचे पट्टे अगदी सरळ रेषेंत पडावे तसे पडत नव्हते; मध्येंच जमिनींतलं एखादं नाठाळ ढेकूळ धक्का देई तेव्हां हाइनचे खांदे हादरल्यासारखे होत पण तो चुकारपणा करीत नव्हता. जमीन नुसती वरवर खरवडून त्याचं समाधान होत नव्हतं. ऊर उसासून तो नांगर दाबी आणि खालातून काळी ओलसर जमीन उफाळून बाहेर निघाली की त्याला बरं वाटे. त्या छोट्या मुलीचा हात आपल्या हातीं घेऊन शेताच्या कडेला उभं राहून भर उन्हात घामाच्या धारांनीं न्हाऊन निघणाऱ्या त्या तरुणाकडे व घोड्याकडे पाहतां पाहतां ज्योआकिमच्या अंतःकरणात प्रसन्न वृत्ति उदय वली. थोड्या वेळापूर्वी आपल्या राहणींतल्या ज्या सुखाचं वर्णन प्रेमळजवळ करण्याचा त्यानं प्रयत्न केला होता तें हेंच सुख होतं एक पट्टा संपवून परत नांगर चालवीत दुसऱ्या फेरीसाठीं हाइन आला तोंपर्यंत ज्योआकिम थांबला.

हाइन धापा टाकीत होता आणि हसत हसत आपल्या बाहीनं तोंड पुशीत होता. ज्योआकिम त्याला म्हणाला, "पहिल्या पहिल्यांदा फार त्रास होतो या कष्टाच्या कामाचा."

"पण अगदीं वाईट नाहीं ना नांगरलं?"

"छे, छे, फक्कड!"

मग नांगर हातीं घेण्याचा मोह ज्योआकिमला आवरेना. त्यानं नांगरायला सुरुवात केली, आणि भरारा अगदीं सरळ रेषेंत दोन पट्टे काढले.

मग तो जेवायसाठीं घरांत गेला.

संध्याकाळीं ज्योआकिम समुद्रावर गेला आणि मंदमंद हेलावणाऱ्या लाटांच्या जवळच वाळूंत स्वस्थ पडला. अंधार पडूं लागला होता. समुद्राच्या पाण्याची मर्यादा दिसत नव्हती. आकाशाचा अंत दिसत नव्हता, आणि पाण्याची व अस्मानाची ज्या ठिकाणीं मिळणी झाली होती तिथें क्षितिजरेषेवर मंद प्रकाश स्फुरत होता.

सारं विश्व कसं शांत झालं होतं! जणूं अनंत अंतराळांत तोल संभाळून परमेश्वराच्या उघड्या तळहातावर तें अगदीं स्थिर व सुरक्षित राहिलेलं होत!

# १८

होहेनहौसेन येथील इस्पितळावरील मुख्य डॉक्टर हेर प्रो. लेन्सबर्ग यांस:—

" आमच्या मुलुखांतील एक कोळी नुकताच वारला, त्याच्या मृत्यूची बातमी येथील बेलिफ या नात्यानें आपणास कळविण्याचें काम माझ्याकडे आलेलें आहे. या माणसाचें खरें नांव ज्योआकिम बूर्थ; पण ज्या कुटुंबांत तो राहत होता त्यावरून सारे लोक त्याला फॉस असें म्हणत. त्यानें जिवंतपणीं माझ्याजवळ अनेक वेळां प्रगट केलेल्या इच्छेनुसार मी आपणांला लिहीत आहे. आणि आजच्याच टपालानें त्याच्या सामानांत सापडलेली बरीचशी पुस्तकें, आणि कागदपत्रें आपणांकडे रवाना करीत आहे.

बूर्थला कशा प्रकारें मृत्यु आला तें निश्चितपणें सांगतां येत नाहीं, कारण अपघाताच्या वेळीं जीं दोन माणसें त्याच्याबरोबर होतीं त्यांपैकीं क्रूसे नांवाच्या कोळयाला वेड लागल्यासारखें झालेलें आहे, आणि दुसरा हाइन फॉस, हा प्रत्यक्ष त्या प्रसंगीं बेशुद्ध होता.

जी माहिती मला मिळवतां आली तीवरून मला वाटते तशी हकीगत लिहितों.

गेल्या २७ तारखेस वर उल्लेखिलेल्या तिघांनीं संध्याकाळी जाळें पाण्यांत टाकलें आणि मचवा परत आणला. परंतु अंधार पडल्यावर क्रूमे बूर्थकडे येऊन म्हणूं लागला कीं ज्या अर्थी वादळ होणार असें वाटत आहे त्या अर्थी आपण जाऊन जाळें काढून आणावें हें चांगलें. असें पुष्कळदां होतें कीं वादळ झालें म्हणजे पक्की टाकलेलीं जाळीं सुटून समुद्रांत वाहात जातात. बूथचें जाळे अगदीं नवें कोरें असल्यामुळें तें वाहून गेल्यास त्याचें मोठें नुकसान होणार होतें

खरें म्हणजे वादळ आल्यासारखें कुणालाही वाटत नव्हतें. परंतु वर सांगितल्याप्रमाणें क्रूमेचें डोकें आतांशा ठिकाणावर नाहीं. तो कांहीं केल्या आपलें म्हणणे सोडीना; व त्याच्यासारख्या म्हाताऱ्या माणसाला अंधारांत एकटें जाऊं देणें धोक्याचें वाटल्यावरून बूर्थ व हाईन हे दोघेही त्याच्याबरोबर मचव्यांतून गेले.

सुमारें तासानंतर मात्र वादळ खरोखरीच सुरू झालें; आणि तें इतक्या प्रचंड जोराचें कीं, असें वादळ या खाडींत आमच्या आठवणींत झालेलें नाहीं. वादळाचा जोर विलक्षण होता एवढेंच नव्हे तर त्याची दिशाही सारखी आणि वेगानें बदलत होती. मध्यरात्रीच्या सुमारास वादळ जरासें थंडावलें; परंतु मचवा परत आला नाहीं हें पाहून हिलेवाकटच्या लोकांनीं इथले इनामदार हेर फॉन फालेन यांचे वाफारें काढून समुद्रात हाकारलें.

त्यांना बरेंच आंत गेल्यावर बूर्थचा मचवा मोठ्या समुद्राकडे वाहत चाललेला आढळला. जाळ्याची नासधूस झालेली होती परंतु तें मचव्यांत ठेवलेलें होतें. मचव्याचीं शिडें आवरलेलीं होतीं. हाईन फॉस चिंब भिजून गेला होता आणि कपाळावर मोठी जखम झाल्यामुळें बेशुद्ध झाला होत . ज्योआकिम बूर्थ मचव्यांत नव्हता, आणि त्याचें प्रेत अजूनही सापडलें नाहीं.

हाइन फॉस सांगतो कीं वादळांत सापडून त्यांचा मचवा ल्यूटे गींवच्या खडकाकडे वेगानें जाऊं लागला. मचवा उलटूं नये म्हणून त्यानीं शिडें आवरलीं आणि कसेंहीं करून मचवा खडकाच्या विरुद्ध दिशेकडे न्यावा म्हणून वल्हीं मारण्यास प्रारंभ केला. त्या झंझावातांत आणि अंधारांत त्याला स्वतःला जाळें मुळींच दिसलें नाहीं. समुद्र तर एखाद्या खवळलेल्या प्रचंड भोंवऱ्यासारखा वाटत होता. त्याला एवढेंच आठवतें कीं एका क्षणीं मचवा इतका झुकला कीं त्याला वाटलें तो उलटला. शिडाच्या खांबावर तो फेकला गेला, त्याच्या डोक्यावर जबरदस्त आघात झाला आणि तो खालीं पाण्यांत पडला. पुढें काय झालें तें त्याला माहीत नाहीं.

क्रूमे आतांशा बरेच दिवस भ्रमिष्टासारखें करीत असे, आणि परवाच्या रात्रीनंतर तर तो पुरताच वेडा झाला आहे. परंतु त्या प्रसंगाची हकीगत तो सांगतो ती अशी, कीं बूर्थनें दोनदां समुद्रांत उडी घेतली. एकदा हाइन फॉसला वाचविण्यासाठीं, आणि मग पुन्हा मचव्याला अडकलेलें जाळें त्याला दिसलें तें आंत ओढून घेण्यासाठीं. हें करतांना तो दोनदां वर आलेला दिसला, परंतु नंतर तो खालीं गेला तो गेलाच.

बूर्थ पटाईत पोहणारा होता हें खरें, परंतु केवळ जाळें काढण्यासाठीं त्यानें आपला जीव धोक्यांत घातला असेल हें विश्वसनीय वाटत नाहीं, परंतु जाळें ज्या अर्थी मचव्यांत सापडलें त्या अर्थी क्रूमे सांगतो तें खरें असलें पाहिजे, व आपल्या सवंगड्यांना वांचविण्याचा व जाळें काढण्याचा प्रयत्न करीत असतांच बूर्थ प्राणाला मुकला असें म्हटलें पाहिजे.

हिलेवाक्ट, हिलेनब्रुक आणि ल्यूटे या गांवांतल्या साऱ्या लोकांना मनस्वी दुःख झालेलें आहे. निष्ठा, स्वार्थत्याग, आणि इतरांच्या हितासाठीं कष्ट करण्याची तयारी हें बूर्थचे विशेष गुण होते. या गुणांच्या आचरणांत त्याचें सर्व आयुष्य गेलें, आणि ते आचरितांनाच त्याला मृत्यु आला.

' गेल्या कित्येक वर्षांत माझे व बूर्थचे संबंध बरेचसे जिव्हाळयाचे झाले होते, आणि त्याचें पूर्वचारित्रही मला थोडेंसें माहीत होतें. या नात्यानें माझें वैयक्तिक मत म्हणून मी नमूद करूं इच्छितों कीं ज्या प्रकारें तो जगला आणि ज्या प्रकारें अखेर मेला त्यायोगें त्याच्या हातून घडलेलें पापकृत्य पूर्णांशानें धुतलें गेलें.

( सही ) मोलर
हिलेन्ब्रुकचा मेरीफ."

— समाप्त —

# बी. एम्. पुरोहित

औषधी दुकान

महाद्वार रोड कोल्हापूर

आमचेकडे सर्व तऱ्हेची औषधें, इंजेक्शन, मलमें वगैरे माल मिळेल.

बाहेरगांवी आपलेस हवी ती सर्व औषधें काळजीपूर्वक धाडूं.

आमचेकडे

## पेनिसिलीन

केव्हांही मिळेल

— भेटा अगर लिहा. —

बी. एस्. पुरोहित

प्रोप्रायटर

# कोल्हापुरांत पुष्कळ बँका आहेत

पण

गरीबापासून श्रीमंतापर्यंत सर्वांना सारखीच
अुपयोगी पडणारी

# धी सिटी बँक लि०

## कोल्हापूर.

**ठेवीवरील व्याजाचे दर—**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| चालू खातें १½ टक्के | १ वर्ष | मुदतबंद खातें | ४ | टक्के |
| सेव्हिंग खातें २½ टक्के | २ वर्षे | ,, | ५ | ,, |
| | ३ वर्षे | ,, | ६ | ,, |

दत्ताजीराव जे. गुरव
मॅनेजिंग डायरेक्टर.

पंढितराव अे. जामसांडेकर
चेअरमन.

# आघाडीवरील विमा संस्था—

भविष्यकालाची योग्य प्रकारें तरतूद

करणेकरितां

# दि युनियन लाईफ ऍशुअरन्स कं. लि. मुंबई

— याच विमा संस्थेची निवड करा. —

एन्. एस्. कोवाडकर

ब्रँच सेक्रेटरी,

कर्नाटक व महाराष्ट्र ब्रँच

मार्केट-बेळगांव.

# दि न्यू इंडिया अॅशुअरन्स कं. लि.,

## फोर्ट, मुंबई.

●

### भांडवल

| | |
|---|---|
| अधिकृत रुपये | ६,००,००,००० |
| मागणी झालेले रुपये | ३,५६,०५,२७५ |
| भरपाओी झालेले रुपये | ७१,२१,०५५ |

**हिंदुस्थानांतील सर्वांत मोठ्या भांडवलाची**
**सर्व प्रकारचे विमे घेणारी विमा कंपनी.**

विशेष माहितीकरितां खालील पत्त्यावर भेटा अगर लिहा.

**जी. डी. पटवर्धन**
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज,
वुइल्सन रोड,
कोल्हापूर, (S.M.C.)